# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक ०६-०५-१९८८ ते ०५-०५-१९८८**

**रजिष्टर क्र.०१**

# सभेस उपस्थित सदस्यांची नांवे

| अ. क्र. | नांवे | अ. क्र. | नांवे |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. यादव अशोक सायन्ना | ३१. | सर्वश्री डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल |
| २. | स.स.श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | ३२. | स.स.श्री. म. इस्माईल अब्दुल करीम |
| ३. | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | ३३. | स.स.श्री. फैयाजखान अहमद खॉन |
| ४. | स.स.श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | ३४. | स.स.श्री. अलिम बेग मिर्झा |
| ५. | स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | ३५. | स.स.श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद |
| ६. | स.स.श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | ३६. | स.स.श्री. स. हुसेन स. अहेमद |
| ७. | स.स.श्री. सोनवणे केशव काशिनाथ | ३७. | स.स.श्री. मगर शंकर जिजाराम |
| ८. | स.स.श्री. भगूरे तुळशीराम छगन | ३८. | स.स.श्री. मानकापे नामदेव शामराव |
| ९. | स.स.श्री. सुर्यवंशी महोदय पुंडलिक | ३९. | स.स.श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी |
| १०. | स.स.श्री. पाटील नरेंद्र यादवराव | ४०. | स.स.श्री. सुग्रीम हरलाल रिडलान |
| ११. | स.स.श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव | ४१. | स.स.श्री. अलफ खाँ हुसेन खाँ |
| १२. | स.स.श्री. म. अय्युब गुलाम जिलानी | ४२. | स.स.श्री. वाघमारे सुदाम भानुदास |
| १३. | स.स.श्री. मुजीब अलमशा खान | ४३. | स.स.श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी |
| १४. | प्रधान बंडू गोविंदराव | ४४. | स.स.श्री. थोरात किशोर गोविंदराव |
| १५. | स.स.श्री. नारायण मोहन | ४५. | स.स.श्री. अजीम खॉ दादामिया अ. रहेमान |
| १६. | स.स.श्री. जावेद हसन खॉ कासीम हसन खॉ | ४६. | स.स.श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ |
| १७. | स.स.श्री. तकी हसन खॉ कासिम खॉ | ४७. | स.स.श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव |
| १८. | स.स.श्री. स. अहमद एकबालउद्दीन स. मो.कुतुबोद्दिन | ४८. | स.स.श्री. डॉ. काळे शांताराम यशवंत |
| १९. | स.स.श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | ४९. | स.स.श्री. दत्त प्रदिपकुमार एस. |
| २०. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | ५०. | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग हरमसिंग |
| २१. | स.स.श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | ५१. | स.स.श्री. बारपाल गजानन रामकिशन |
| २२. | स.स.श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | ५२. | स.स.श्री. गोडसे आनंद जगदिश |
| २३. | स.स.श्री. अ. रशीद खॉ (मामु) अ. हमीद खॉ | ५३. | स.स.श्री. जहागिरदार अजीज मुख्तार अहमद |
| २४. | स.स.श्रीमती दलाल लता श्रीनिवास | ५४. | स.स.श्री. मोरे राधाकृष्ण तुळशीराम |
| २५. | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप नारायण | ५५. | स.स.श्री. जावळे प्रकाश शिवराम |
| २६. | स.स.श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | ५६. | स.स.श्री. गाढे गंगाधर सुखदेव |
| २७. | स.स.श्री. हाजी महंमद हफिजोद्दीन | ५७. | स.स.श्री. हळनोर गोरजराम नानाराव |
| २८. | स.स.श्री. छापरवाल रमेश नारायण | ५८. | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव |
| २९. | स.स.श्री. पालीवाल विजय गोविंदलाल | ५९. | स.स.श्री. परदेशी सुभाष शिवलाल |
| ३०. | स.स.श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | ६०. | स.स.श्री. नवपूते कचरू चंद्रभान |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**पहिली सर्वसाधारण सभा दि. ६ मे ८८**

## कार्यवृत्तांत

आज रोजी दुपारी २.०० वाजता अलंकार नाट्यगृहात सर्व साधारण सभेच्या पहिल्या बैठकीस सुरुवात झाली. प्रथम महापालिका आयुक्त श्री. मो. बा. फडतरे यांनी नवनिर्वाचित सदस्यसांचे स्वागत केले. त्यांनतर सभेच्या कार्यक्रम पत्रिकेवरिल विषय वाचून दाखविले.

**विषय क्र. १** कार्यक्रम पत्रिकेनुसार औरंगाबाद महापालिकेच्या महापौरांची निवड प्रथम घेण्यात येईल असे जाहीर केले आणि सदरील निवडणूकीकरिता खालील दोन उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेचे सांगितले.

१) डॉ. काळे शांताराम यशवंत
२) सौ. लता दलाल श्रीनिवास

उमेदवारांपैकी नामनिर्देशन पत्र परत घेण्यासाठी पांच मिनीटाचा अवधी देण्यात आला. दिलेल्या अवधीमध्ये कोणत्याही उमेदवाराने नामनिर्देशन पत्र परत घेतले नाही. आयुक्तांनी पुढे असे सांगितले की, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना मतमोजणीच्या वेळी आपल्या प्रतिनिधींची नियुक्ती करावयाची असेल तर तसे नियुक्ती पत्र त्यांनी दाखल करावे. दोन्हीही उमेदवारांनी असे नियुक्ती पत्र दाखल केले नाही. सन्माननीय सदस्य घडामोडे मोतीराम नारायणराव व खैरे चंद्रकांत भाऊराव यांनी मतपेटी एक आहे की दोन, मतदान बुथ किती आहेत अशी पृच्छा केल्यावर आयुक्तांनी मतदान पेटी एकच आहे असे सांगितले आणि मतदान कक्ष जरी दोन असले तरी या मतदानाकरिता फक्त एकच कक्ष वापरले जाणार आहे. मतदान कक्षात एकावेळी एकच मतदार राहिल काय असे श्री. घडामोडे यांनी विचारल्यावर आयुक्तांनी होय असे उत्तर दिले.

त्यानंतर दुपारी बरोबर २.३० वाजता महापौराच्या निवडणूकीची प्रक्रिया सुरु झाली. या निवडणूकीस अर्धा तास वेळ देण्यात आला. स. सदस्य श्री घडामोडे, श्री. खैरे आणि श्रीमती लता दलाल यांनी सभागृहात इतर काही लोक आले आहेत त्यांना बाहेर पाठविण्यात यावे अशी मागणी केली. यावर आयुक्तांनी असे सांगितले की, सभागृहात स. सदस्य आणि अधिकृत मनपा कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिलेला नाही. त्यानंतर श्री. घडामोडे यांनी सभागृहामध्ये पत्रकारांना बसण्याची व्यवस्था करावी अशी मागणी केली. पत्रकारांची बसण्याची व्यवस्था सभागृहालगतच केली आहे असे आयुक्तांनी स्पष्ट केले. परंतु पत्रकारांना सभागृहात बसू द्यावे अशी आग्रहाची मागणी सर्वश्री घडमोडे, खैरे, श्रीमती दलाल इत्यादींनी केली. यावेळी शिवसेनेच्या स. सदस्यांनी गोंधळ करण्यास सुरुवात केली, आणि पक्षकारांना सभागृहामध्ये बसण्याची व्यवस्था त्वरित करावी अशी मागणी मोठ्या आवाजात केली. या मागणीचा विचार करून पत्रकारांना सभागृहाच्या पाठीमागील बाजूस टेबल पार्टीशियन करून पत्रकारांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर श्री. घडामोडे यांनी असा हरकतीचा मुद्दा मांडला की, वास्तविक ही सभा महापालिकेच्या सभागृहात व्हावयास पाहिजे. त्यावर आयुक्तांनी असा खुलासा केला की, मा. जिल्हा दंडाधिकारी यांच्या सुचनेनुसार आजची सभा अलंकार नाट्यगृहात घेण्यात आली आहे.

त्यानंतर आयुक्तांनी सभागृहाचे कामकाज पुढे चालू ठेवले. सुरुवातीस प्रश्नोत्तरामुळे जो १० मिनीटाचा वेळ गेला, तो भरून काढण्यासाठी मतदान ३.१० वाजता संपेल असे सांगून आयुक्तांनी स. सदस्यांना मतपेटी उघडून रिकामी असल्याचे दाखविले. नंतर नियमाप्रमाणे आयुक्तांनी सदर मतपेटीस कुलूप लावून त्यावर आपल्या सहीची मोहर लावली. आणि चावी स्वत:कडे ठेवली व मतपेटी श्री. एच.आर. बाहेती, मतदान अधिकारी यांच्या स्वाधीन केली. मतदान कक्षामध्ये श्री. बाहेती यांच्या मदतीस श्री. एम. के. मोईनोद्दिन हे होते. परिनिरिक्षक म्हणून श्रीमती डी. बी. कुलकर्णी, श्री. सी. एस. सोनी आणि श्री. आर. के. सदावर्ते यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यानंतर सन्मानणीय सदस्य घडामोडे मोतीराम यांनी आणखी एक हरकतीचा मुद्दा उपस्थित केला की, महापालिकेची निवडणूक नियमावली मराठी भाषेतून देण्यात यावी. ही नियमावली निवडणकीच्या सात दिवस अगोदर द्यावयास पाहिजे होती, परंतु तसे झाले नाही, असा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. तसेच नियमावली मराठीत दिली न गेल्यामुळे, आजची सभा आम्ही होवू देणार नाही असे सांगितले. त्यावर आयुक्तांनी असा खुलासा केला की, महापालिकेची मूळ नियमावली इंग्रजीमधून आहे आणि मराठी भाषांतरही तयार करण्यात आले असून, हे सन्मानीय सदस्यांना देणेसाठी उपलब्ध आहे. योवळी आयुक्तांनी नियमावलीची मराठी प्रत सन्माननीय सदस्यांना दाखविली. परंतु सन्माननीय सदस्य आयुक्ताचे म्हणने ऐकण्यास तयार नव्हते. आपण महाराष्ट्राचा व मराठी भाषेचा अपमान करित आहात, आतापर्यंत इंग्रजी व उर्दू भाषेचे वर्चस्व राहिले आहे, परंतु यावेळी तसे घडू दिले जाणार नाही, असे प्रतिपादन श्री. मोरेश्वर सावे व चंद्रकांत खैरे यांनी केले. यावेळी आयुक्तांनी नम्रपणे असे सांगितले की, महाराष्ट्रांचा व मराठी भाषेचा अपमान करण्यसाचा आपला हेतू नाही: नियमास धरूनच सर्व कामकाज होत आहे. कृपया आपण शांत रहा. असे आयुक्तांनी आवाहन केल्यानंतरही सदस्य आयुक्तांची बाजू ऐकण्यास तयार नव्हते. आयुक्त वारंवार त्यांच्या मागणीबद्दल खुलासा करित होते. परंतु आपली वरिल मागणी पुढे रेटण्याचा अट्टहास त्यांनी धरला. तेंव्हा एकदा आयुक्तांनी त्यांना सभागृहात स्थानापन्न होण्याची विनंती केली, आणि सभागृहाचे कामकाज चालू ठेवले व महापौर निवडणूक प्रक्रियेस परत सुरुवात केली प्रथम श्रीमती डी. बी. कुलकर्णी यांना प्रभाक क्र. १ चे स.सदस्य श्री. यादव अशोक सायन्ना यांना मतदानासाठी पाचारण केले. श्री. सायन्ना मतदान करण्यास व्यासपीठावर चढले असता सर्वश्री जैस्वाल प्रदिप शिवनारायण, दत्ता प्रदिप कुमार एस, व श्रीमती दलाल यांनी व्यासपीठावर दुसऱ्या बाजूने चढून त्यांना मतदान करण्यास प्रतिबंध केला, आणि त्यांना व्यासपिठावरून उतरण्यास भाग पाडले. त्यानंतर श्री जैस्वाल प्रदिप व दत्त प्रदिपकुमार एस, यांनी मतदान कक्षात घुसून मतदान अधिकारी यांच्या ताब्यातील मोहरबंद मतपेटी जबरजस्तीने हिसकावून घेतली, आणि सभृहात आणून जमीनीवर टाकली. त्यावर सर्वश्री जैस्वाल प्रदिप व दत्त प्रदिपकुमार एस हे बसले. यामुळे सभागृहामध्ये प्रचंड गोंधळ व आरडाओरड सुरु झाली. त्यामुळे सभागृहाचे पूढील कामकाज चालू ठेवणे अशक्य झाले. तसेच कोण काय बोलत आहे हे समजणेही अशक्य झाले. परिस्थिती तणावाची आहे व अटोक्याच्या बाहेर गेलेली आहे हे पाहुन आयुक्तांनी २.५० वाजता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे घोषित केले. आणि सदस्यांनी त्वरित शांतता प्रस्थापित करावी असे आवाहन केले. सभेचे कामकाज केव्हा सुरू करण्यात येईल याबाबत लवकरच घोषणा करण्यात येईल असे स्पष्ट केले. तद्नंतर स. सदस्य मनमोहन ओबेराय यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला की, सभेचे कामकाज नियमाप्रमाणे स्थगित ठेवता येत नाही. सेभेचे कामकाज पुढे चालू राहिले पाहिजे अशी मागणी त्यांनी व डॉ. संचेती यांनी केली. योवळी सभागृहातील एकंदर परिस्थिती अत्यंत गोंधळाची होती. काही सदस्य खुर्चीवर

चढले आणि सभा स्थगित ठेवू नका, महापालिका प्रशासन जातीयवादास बळी पडत आहे अशा घोषणा दिल्यानंतर सभागृहात आणखीनच गोंधळ वाढलाव काही सदस्यांमध्ये आपआपसात शाब्दीक चकमक उडाली. काही सदस्यांनी सभागृहातील खुर्च्या उचलून एकमेकास मारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सभागृहातील फर्निचर विखुरले गेले. दरम्यान आयुक्तांच्या टेबलासमोर येऊन काही सदस्यांनी सभा स्थगित ठेवण्याची व काही सदस्यांनी सभा त्वरित सुरु करण्याची मागणी केली. सदस्य अनावर होत आहे, अशा परिस्थितीत शांतता प्रस्थापित करण्योच आवाहन आयुक्तांनी वारंवार केले. तरीही गोंधळ चालूच होता. आणि परिस्थिती अटोक्याबाहेर गेली तेंव्हा आयुक्तांनी सदस्यांना विनंती केली की, त्यांनी त्वरित शांतता प्रस्थापित करावी. सदरील विनंतीचा काहीही उपयोग न झाल्याने आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने आयुक्तांनी पोलिसांना सभागृहात पाचारण केले. त्यावर काही सदस्यांनी पोलिसांना सभागृहात आणू नका असे सांगितले. त्यावर आयुक्तांनी त्यांना आपण कृपया शांतता राखा असे पुन्हा-पुन्हा आवाहन केले आणि पोलिसांना सभागृहा बाहेर जाण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे पोलिस सभागृहाबाहेर निघून गेले. मध्यंतरीच्या काळात काही स. सदस्यांनी पोलिसांशी झोंबाझांबी केली, काही शिवसेना सदस्यांनी आयुक्तांच्या टेबलाजवळ येवून टेवलावर जोरजोरात हात आपटून आम्ही सभा होवू देणार नाही अशी आक्रमक भूमिका घेतली. आयुक्तांनी सदस्यांना विनंती केली की, त्यांनी सभागृहाच्या बाहेर जावे. या विनंतीचाही काही उपयोग झाला नाही आणि गोंधळ चालूच राहिला. दुपारी सुमारे ३.०० ते ३.३५ या वेळात आयुतंनी जिल्हा दंडाधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षक यांचेशी सभागृहातील परिस्थिती आटोक्यात आणून शांतता व सुव्यवस्था प्रस्थावित करण्याविषयी सर्व दृष्टीकोणातून विचार विनीमय केला.

जिल्हा दंडाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधिक्षक यांनीही सदस्यांना सभागृहात शांतता प्रस्तापित करण्याचे आवाहन केले. काही वेळानंतर सभागृहात शांतता प्रस्तापित झाली आणि जिल्हा दंडाधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षक हे सभागृहातून निघून गेले. त्यानंतर सुमारे ३.४५ वाजता सभेचे कामकाज ४.३० वाजता सुरू होईल असे घोषित केले. तेंव्हा स. सदस्य श्री. घडामोडे, श्री. खैरे आणि श्रीमती दलाल यांनी असा आक्षेप घेतला की, सभा तहकुबीच्या वेळी पुढील बैठक केव्हा होणार हे घोषित करण्यात आलेले नव्हते म्हणून आता ही सभा पुन्हा चालू करता येणार नाही, आम्ही ती होवू देणार नाही. तथापि आयुक्तांनी हरकतीचा मुद्दा अमान्य केला व ठरल्याप्रमाणे सभेचे कामकाज चालू होईल असे स्पष्ट केले. त्यानंतर श्री. चंद्रकांत खैरे यांनी सुमारे ४.३० वाजता घेण्यात येणारी सभा बेकायदेशीर आहे अशा अर्थाचा अर्ज सुमारे ४.१९ वाजता आयुक्तांना दिला. आयुक्तांनी त्यांना आपल्या अर्जातील विनंतीचा विचार करता येणार नाही असे सांगितले. घोषित केल्याप्रमाणे स्थगित सभा सुमारे दुपारी ४.३० वाजता सुरू होईल असेही त्यांनी सांगितले. त्यानंतर वरील सदस्य सभागृह सोडून निघून गेले.

त्यानंतर ४.३० वाजेच्या सभेस आवश्यक असणारी गणपूर्ती सभागृहात असल्याची खात्री करून सभा सुरू झाली. आयुतंनी मतपेटी उघडून ती मोकळी असल्याचे उपस्थित सदस्यांना दाखविले आणि सदरील मतपेटीस कुलूप लावून आपल्या सहीची मोहर लावली व चावी स्वतःकडे ठेवून मतपेटी मतदान अधिकारी यांचे स्वाधीन केली. महापौर निवडणूकीसाठी ३० मिनीटाचा अवधी देण्यात आला. मतदान सुमारे ४.३५ वाजता सुरू झाले व सुमारे ५.०५ वाजता मतदानाचा अवधी संपल्याचा आयुत्ांनी जाहिर केले. त्यानंतर मतदान कक्षातून मतपेटी आयुतंच्या टेबलावर आणून उघडण्यात आली. मतपत्रिका बाहेर काढून आयुक्तांनी त्यावर सह्या केल्या व मतमोजणीसाठी मतपत्रिक

परिनिरिक्षक यांच्या स्वाधीन केल्या मतमोजणीनंतर आयुक्तांनी खालीलप्रमाणे निकाल जाहिर केला.

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण मतदान | - | ६० | |
| झालेले मतदान | - | ३२ | डॉ. शांताराम यशवंत काळे - ३२ |
| वैद्य मते | - | ३२ | श्रीमती लता श्रीनिवास दलाल - शुन्य |
| अवैद्य मते | - | नाही | |

महापौर पदी डॉ. शांताराम यशवंत काळे हे विजयी झाल्याचे आयुक्तांनी घोषित केले.

त्यानंतर नवनिर्वाचित महापौरांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले व उपमहापौर पदाच्या निवडणूकीची घोषणा केली. उपमहापौर पदासाठी खालील दोन उमेदवार असल्याचे सभागृहात सांगण्यात आले.

१) तकीहसन खॉन कासिम खान

२) सुर्यवंशी महादेव

उपमहापौर पदाचे उमेदवारी अर्ज परत घेण्यासाठी पांच मिनिटांचा कालावधी दिला. सदर कालावधीत कुणीही उमेदवारी मागे घेतली नाही. सदर निवडणूकीसाठी ३० मि. कालावधी देण्यात आला. महापौरांनी असे सुचित केले की, मतमोजणीच्या वेळी ज्यांना आपला प्रतिनिधी नियुक्त करावयाचा असेल तर तसेच लेखी प्रतिनिधीच्या नावासह त्यांनी सुचित करावे. कोणत्याही उमेदवारांनी अशा प्रतिनिधीची नियुक्ती केली नाही. मतदानास सुमारे ५.२२ वाजता सुरुवात झाली आणि सुमारे ५.५२ वाजता महापौरांनी मतदानाची वेळ संपल्याचे जाहीर केले. त्यानंतर मतदान कक्षातून मतपेटी आणून महापौरांच्या टेबलावर उघडण्यात आली. तद्नंतर महापौरांनी मतपत्रिकेवर सह्या करून, सदर मतपत्रिका परिनिरिक्षाकांचे स्वाधीन केल्या. मतमोजणीनंतर महापौरांनी खालीलप्रमाणे निकाल जाहीर केला.

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण मतदान | - | ६० | |
| झालेले मतदान | - | ३२ | तकी हसन खान - ३२ |
| वैद्य मते | - | ३२ | सुर्यवंशी महादेव - शुन्य |
| अवैद्य मते | - | शुन्य | |

महापौरांनीउपमहापौरपदी श्री. तकी हसन खान कासीम खान हे विजयी झाल्याचे घोषित केले. महापौरांनी विद्युत पुरवठ्यात खंड पडल्यामुळे ४० मिनीटे सभेचे कामकाज स्थगित केले.

**<u>विषय क्र. २</u>** सांयकाळी ६.४५ वाजता महापौरांनी स्थायी समितीच्या १२ सदस्यांच्या निवडणूकीची घोषणा केली. सदर निवडणूकीसाठी खालील १३ सदस्यांची नामनिर्देशन पत्रे दाखल झाल्याचे महापौरांनी सभेत सांगितले.

१) श्री. अलफरखान हुसेन खान

२) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण

३) गोढे गंगाधर सुखदेव

४) गिल एकबालसिंग प्रितमसिंग

५) घडामोडे मातीराम नारायण
६) नवपुते कचरू चंद्रभान
७) पंडागळे रतनकुमार नारायणराव
८) मगर शंकरराव जिजाराव
९) मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१०) यादव अशेक सायन्ना
११) वाघमारे सुदाम भानुदास
१२) विधाते प्रभाकर सिताराम
१३) सावे मोरश्वर दिनानाथ

. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी पांच मिनिटांचा कालावधी दिला. सदर कालावधीत कुणीही उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही म्हणून महापौरांनी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला.

मतदानास सुमारे ४५ मिनिटांचा कालवधी देण्यात आला. मतदान ६.४५ वाजता सुरू झाले आणि ७.३० वाजता मतदानाचा अवधी संपल्याचे महापौरांनी जाहीर केले. तद्नंतर मतपेटी मतदान कक्षातून आणून महपौरांच्या टेबलावर त्यांच्यासमोर उघडण्यात आली. मतपत्रिकेवर महापौरांनी सह्या केल्या. नंतर त्या परिनिरिक्षकांच्या स्वाधीन केल्या. मतमोजणीनंतर महापौरांनी खालीलप्रमाणे निकाल जाहीर केला.

| | | |
|---|---|---|
| एकूण मतदान | - | ७२० |
| झालेले मतदान | - | ३८४ |
| वैद्य मते | - | ३८४ |
| अवैद्य मते | - | शुन्य |

खालीलप्रमाणे उमेदवारांना मतदान झाले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सर्वश्री अलफरखान हुसेन खान | - | ६० |
| २) | सर्वश्री कुमावत अविनाश लक्ष्मण | - | शुन्य |
| ३) | सर्वश्री गाढे गंगाधर सुखदेव | - | ७२ |
| ४) | सर्वश्री गिल एकबालसिंग प्रितमसिंग | - | ६० |
| ५) | सर्वश्री घडामोडे मातीराम नारायण | - | शुन्य |
| ६) | सर्वश्री नवपूते कचरू चंद्रभान | - | शुन्य |
| ७) | सर्वश्री पंडागळे रतनकुमार नारायणराव | - | ६० |
| ८) | सर्वश्री मगर शंकरराव जिजाराव | - | शुन्य |
| ९) | सर्वश्री मिर्झा अन्वरबेग हमीद बेग | - | ६० |
| १०) | सर्वश्री यादव अशोक सायन्ना | - | ७२ |
| ११) | सर्वश्री वाघमारे सुदाम भानुदास | - | शुन्य |
| १२) | सर्वश्री विधाते प्रभाकर सिताराम | - | शुन्य |
| १३) | सर्वश्री सावे मोरेश्वर दिनानाथ | - | शुन्य |

महापौरांनी खालील सदस्य निवडून आल्याचे जाहीर केले.

१) सर्वश्री अलफरखान हुसेन खान

२) सर्वश्री गाढे गंगाधर सुखदेव
३) सर्वश्री गिल एकबालसिंग प्रितमसिंग
४) सर्वश्री पंडागळे रतनकुमार नारायणराव
५) सर्वश्री मिर्झा अन्वरबेग हमीद बेग
६) सर्वश्री यादव अशोक सायन्ना

शेवटी महपौर व उपमहापौर यांनी समारोपाची भाषणे केली आणि महापौरांनी आभार प्रदर्शनानंतर संध्याकाळी ७.५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# *महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि. २८ जून १९८८ च्या सभेचा कार्यवृत्तांत*

दिनांक १८-०६-८८ रोजी सकाळी ठीक ११ वाजता अलंकार नाट्यगृहात औरंगाबाद महापालिकेचे महापौर मा. श्री. डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली.

सभेस मा. सदस्य श्री. जावेद हसन हे वगळता सर्व सदस्य तसेच महानगरपालिका अधिकारी वर्ग उपस्थित होते.

**विषय क्र. ६** मा. सभासदांचे प्रस्ताव मा. श्री. चंद्रकांत खैरे व मा. श्री. मोतीराव घडामोडे (सूचना दि. ३१-०५-१९८८) "महानगरपालिकेच्या प्रत्येक सभेच्या प्रारंभी वंदे मातरम् हे राष्ट्रगीत सर्व सदस्यांनी म्हणून सभेचे कामकाज सुरू करावे व सभेच्या शेवटी जन-गण-मन हे राष्ट्रगीत म्हणून सभेचे कामकाज संपवावे"

**ठराव क्र. ३** सर्वप्रथम श्री. चंद्रकांत खैरे यांनी विषय पत्रिका सोडून त्यांनी विषय क्र. ६ वरील प्रस्ताव सभेस वाचून दाखविला व सभेस वंदेमातरम् या राष्ट्रगीताने सुरु करण्याची विनंती केली यावर मा. महापौर यांनी सुचविले की आजच्या सभेतील विषय विषयपत्रिकेनुसार क्रमवार घेतले जातील. सदरचा विषय आल्यानंतर त्यावर चर्चा केली जाईल. यावर स. सभासद श्री. घडामोडे यांनी सुचविले की, विषय पत्रिकेवरील विषय क्र. ६ यास प्रथम क्रम देवून ठाणे व पुणे महानगरपालिका येथील पध्दतीप्रमाणे ही सभा वंदेमातरम् या राष्ट्रगीताने सुरू करण्यात यावी. या विषयावर बऱ्याच स. सभासदांनी आपली मते मांडली. श्री. गंगाधर गाढे यांनी विषय क्रमांकाप्रमाणे विषयावर चर्चा करावी असे सांगितले. श्री. मोरेश्वर सावे यांनी वंदेमातरम् या गीतानेच आजचे काम सुरू करावे नसता हे गान गाईले जाईल असे सांगितले. श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी हा विषय आधी घेवून चर्चा करावी अशी विनंती मा. महापौर यांना केली यावर मा. महापौर यांनी निर्णय दिला की, स. सदस्यांच्या इच्छा लक्षात घेवून विषय क्र. ६ ला प्रथम क्रमांक देवून चर्चेला घेत आहे. सदरील प्रस्तावाचे उपमहापौर यांनीही स्वागत केले. तसेच आपण सर्व धर्मीयांच्या भावनांचा आदर केला पाहिजे असे ही ते म्हणाले. त्या नंतर प्रस्तावास सर्व सदस्यांनी मंजुरी दिली. आणि वंदेमातरम् हे गीत म्हणून सभेच्या पुढील कामकाजास सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र. २.** नुकत्याच औरंगाबाद शहरात झालेल्या दंगलीत मृत्यू पावलेल्या व्यक्तींना श्रध्दांजली वाहणे.

**ठराव क्र. ४.** प्रथम नुकत्याच शहरात झालेल्या दंगलीत मरण पावलेल्या व्यक्तींना दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

**विषय क्र. ३.** मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशास अधिन राहून दि. ६ मे, १९८८ रोजी झालेल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

**<u>ठराव क्र.</u> ५.** विषय क्र. ३ बाबत कोणास काही बोलावयाचे आहे काय अशी सूचना मा. महापौरयांनी दिली. त्यावर कोणीही चर्चा केली नाही म्हणून दिनांक ६ मे, १९८८ च्या सभेचा कार्यवृत्तांत हाय कोर्टाचे आदेशाचे अधिन राहून मंजूर करण्यात आला.

**<u>विषय क्र.</u> ४.** पाणी पुरवठा, जलनिस्सारण व गलिच्छ वस्ती सुधरण विभाग - औरंगाबाद शहराची वितरण व्यवस्था पूर्णरचना टप्पा क्र. १ अन्वये एकूण अंदाजित रक्कम रुपये १८,६२,३४,०००/- ढोबळ खर्चाची योजना शासनाने मंजूर केली असून १०% लोक वर्गणी १,८६,२३,४००/- देणे आहे. त्यापैकी ८६-८७ या वर्षात ३०,००,०००/- रुपये लोक वर्गणी देण्यात आलेली आहे व १९८८-८९ या वर्षाच्या अर्थ संकल्पामध्ये १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तरी परिसर अभियांत्रिकी विभाग क्र.२ यांना लोक वर्गणी देण्याच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ६.** विषय क्र. ४ सभेपुढे ठेवण्यात आला. सर्वप्रथम मा. आयुक्त यांनी सांगितले की, औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठ्याबाबत वितरण व्यवस्थेच्या पूर्नरचना टप्पा क्र. १ चे काम चालू आहे. महापालिकेने रु. ३० लक्ष लोकवर्गणी भरलेली आहे. एकूण लोकवर्गणी रु. १,८६,२३,४००/- आहे. लोक वर्गणी भरली गेली नसल्यामुळे काम मंदावले आहे. तरी त्वरित लोक वर्गणी भरल्यास १९९१ च्या प्रारंभी या योजनेचे पाणी जनतेस मिळू शकेल. या विषयी बोलतांना डॉ. संचेती म्हणाले की, अमरावती महापालिकेप्रमाणे औरंगाबाद शहरालाही लोक वर्गणी भरण्यापासून सुट मिळावी. यावर मा. आयुक्त यांनी सुचविले की, मा. महापौर याबाबत शासना बरोबर पत्र व्यवहार करीत आहे. शासनाचा निर्णय सभागृहा पुढे ठेवण्यात येईल. परंतु लोक वर्गणी न भरल्यामुळे सदरील कामाची गती मंदावली आहे. यावर सर्वानुमते तूर्त रु. ५०/- लाख लोक वर्गणी त्वरित जमा करण्याची मंजुरी दिली जाते असे ठरले.

त्यानंत मा. श्री. सावे यांनी विषय क्र. ३ वर चर्चा न होता पुढचा विषय निवडणे हे योग्य नव्हे जर ही चर्चा आज होऊ शकत नसेल तर पुढील सभेत चर्चा होईल असे मा. महापौर यांनी सांगावे अशी मागणी केली. श्री. घडामोडे व सौ. दलाल यांनीही वरील मागणीस पांठिबा दिला. यावर मा. महापौर यांनी सुचित केले की, जेव्हा त्यांनी विषय क्र. ३ पुकारला तेव्हा स. सदस्य त्यावरील चर्चेसाठी उत्सुक नव्हते आणि आता पुढचा विषय चर्चेला आला आहे म्हणजे त्या पूर्वीचा विषय मंजूर झालेला आहे. तेव्हा या विषयावर पुन्हा चर्चा करण्याची गरज नाही असा निर्णय दिला. या मा. महापौर यांच्या निर्णयाच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या २८ सभासदांनी पांच मिनीटांसाठी सभात्याग केला. नंतर सर्व सभासद पुन्हा सभागृहात आले.

**<u>विषय क्र.</u> ५.** औरंगाबाद शहराचा जुन्या नगर परिषद हद्दीसाठी शासनाने दि. ०६-०१-१९७५ पासून अंमलात आणलेली विकास यांजना दहा वर्षानंतर म्हणजे जानेवारी १९८५ मध्ये सुधारित करणे आवश्यक होते. तथापि विकास योजना सुधारण्याचे काम अद्याप हाती घेतलेले नाही, म्हणून हे काम लवकर हाती घेणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलमे २३ अन्वये विकास योजना सुधारण्यास सर्व साधारण सभेची मान्यता मिळण्याकरीता प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ७.** सर्वप्रथम मा. आयुक्त यांनी या विषयांवर विस्तृत निवेदन केले व सभागृहात माहिती दिली. यापूर्वी नगर पालिकेच्या काळामध्ये अशाच प्रकारच्या विकास

योजना आराखडा तयार करण्यात येवून त्यात बऱ्याच जागा [विविध कामासाठी] आरक्षित करण्यात आल्या होत्या त्यापैकी फक्त १०-१२ जागांचाच विकास योजना आराखड्याप्रमाणे करण्यात आला आहे. अशी सूचना स. सभासद श्री. स. हुसेन स. अहेमद यांनी मांडली.

सभागृहातील बऱ्याच सभासदांना विकास योजना आराखड्याची माहिती नाही याबाबत सविस्तर माहिती दिल्यानंतरच या विषयांवर निर्णय घेण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे व श्री. मोरेश्वर सावे यांनी मांडली. यावर मा. आयुक्त यांनी खुलासा केला की, प्रत्येक १० वर्षांनी शहराचा विकास आराखडा तयार करण्यात येतो. सन-१९७५ मध्ये अशा प्रकारचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. आता नविन विकास आराखडा तयार करून त्यास सभागृहाची मंजुरी मिळाल्यानंतरच शासनाच्या मंजुरीसाठी पाठविला जाईल. सध्या फक्त विकास आराखडा बनविण्याची परवानगी द्यावयाची आहे. विकास आराखड्याबाबत स. सभासदांना काही सूचना द्यावयाच्या असल्यास नगर रचना विभागाकडे द्याव्यात. त्याप्रमाणे विकास आराखडा सुधारणा करण्याची कार्यवाही नियमाप्रमाणे हाती घेण्यात येईल तसेच सभासदांच्या सुचनेप्रमाणे येत्या १५-२० दिवसांत विकास आराखड्या विषयीची सारांश टिप्पणी देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

सर्वानुमते महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २३ अन्वये औरंगाबाद शहराचा विकासयोजना आराखड्यात सुधारणा करण्याची मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ७.** मा. श्री. मोरेश्वर सावे व मा. री. चंद्रकांत खैरे (सूचना दि. ३१-०५-८८) "महापालिकेच्या प्रत्येक सभा या महापालिकेच्या सभागृहात घेण्यात याव्यात. नेहरू भवन हे महानगरपालिकेच्या सभा घेण्याच्या दृष्टीकोणातून योग्य नव्हे. यापुढील सभ्ेसाठी नेहरू भवनाचा विचार करू नये. महापालिकेच्या अशा प्रकारच्या सभा नेहमीच होणार असल्या कारणाने त्यासाठी योग्य अशा सभागृहाची ताबडतोब व्यवस्था करावी."

**ठराव क्र. ८.** महापालिकेच्या प्रत्येक सभा या महापालिकेच्या सभागृहात घेण्यात याव्यात हा श्री. मोरेश्वर सावे यांनी दिलेला प्रस्ताव त्यांनी वाचून दाखविला त्यास श्री. चंद्रकांत खैरे यांनी अनुमोदन दिले. शहराला महापालिकेच्या दर्जा मिळाल्यानंतर प्रशासकाच्या कालावधीत महापालिकेच्या दृष्टीने सभागृहाचे इमारतीची योग्य व्यवस्था झाली नाही या बद्दलही खेद व्यक्त केला. तेंव्हा यापुढे सर्व सभा पर्यायी व्यवस्था होईपर्यंत औरंगपुरा येथील शॉपिंग सेंटरमध्ये घ्याव्यात अशी सूचना मांडली. सध्या टाऊन हॉलची इमारत ही मिटींग घेण्यास योग्य आहे. त्यामध्ये किरकोळ दुरुस्ती करून यापुढच्या सभा टाऊन हॉलमध्ये घेणे योग्य राहील अशी सूचना मा. उप महापौर आणि स. सभासद श्री. अलफरखाँ यांनी मांडली.

वरील चर्चेत भाग घेतांना स. श्री. घडामोडे यांनी महापौर व उप महापौर यांच्या बद्दल तथाकथित शब्द प्रयोग केला यावर स. सदस्य डॉ. चेनफरण संचेती, श्री. गंगाधर गाढे, श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी हरकत घेवून माननिय सभासद यांनी आपले शब्द मागे घ्यावेत असे सुचविले. या सुचनेवरही स. सभासदांनी आपले शब्द मागे घेण्यास नकार दिल्यामुळे सत्तारुढ पक्षाच्या सभासदांनी त्याच्या निषेधार्थ सभात्यातग केला. पाच मिनिटांनी सर्व सभासद पुन्हा सभागृहात आले.

वरील विषयावर मा. आयुक्त यांनी महापौर यांचे परवानगीने खुलासा केला की, महापालिकेच्या सभा कोठे घ्यावयाच्या ही प्रशासकीय बाब आहे. महापालिकेच्या सभासाठी अद्ययावत सुसज्ज असे सभागृह पाहिजे या मागणी बाबत

प्रशासनाचे दुमत नाही. सभासदांच्या सुचनांची दखल घेवून लवकरच सभागृहाची व्यवस्था करणत येईल. या खुलाशानंतर सर्वानुमते ठरले की, महापालिकेची सभा कुठे घ्यावयाचे ही बाब प्रशासकीय आहे. तरीही मा. आयुक्तांनी सभासदांच्या मागणीचा विचार करून सुसज्ज सभागृह तयार करण्याची व्यवस्था करावी.

**विषय क्र ८.** मा. सौ. लता दलाल व मा. श्री मोरेश्वर सावे [सूचना दि. ३१-०५-८८] "नुकत्याच झालेल्या औरंगाबाद दंगलित मृत्यू पावलेल्या व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी तसेच महापालिकेचे कर्मचारी कै. पिंगळे यांना महापालिकेतर्फे आर्थिक मदत मरावी व त्यांच्या पत्नीस विनाअट महापालिकेच्या कार्यालयात नोकरीत समाविष्ट करून घ्यावे."

**ठराव क्र. ९.** नुकत्याच शहरात झालेल्या दंगलीत मृत्यू पावलेल्या व्यक्तींना श्रध्दांजली वाहणे व दंगलित महानगरपालिका कर्मचारी कै. पिंगळे यांचे कुटुंबियांना मदत देणेबाबत विषयावर चर्चा करण्यात आली. त्यात मा. आयुक्त यांनी खुलासा केला की, कै. पिंगळे यांच्या पत्नीला नौकरी देण्यात आली असून त्या कामावर रुजूही झाल्या आहे. शासनातर्फे त्यांना रु. १०,०००/- ची मदत दिली आहे. सार्वजनिक विमा योजनेतून नियमाप्रमाणे रु. २०,०००/- त्यांना लवकरच मिळतील. महानगरपालिका कर्मचाऱ्यातर्फे ही त्यांना मदत देण्यात आली आहे. तेंव्हा परत महानगरपालिका तर्फे आर्थिक मदत देण्याची आवश्यकता नाही. सार्वजनिक विमा योजना ही कर्मचाऱ्यांची वैयक्तीक योजना आहे. महानगरपालिकेची नाही. म.न.पा. तर्फे आर्थिक मदत शक्य नसेल तर किमान त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी मनपाने घ्यावी. जेणेकरून ती एक मदत होईल. असे सौ. दलाल यांनी सुचविले. यावर आयुक्तांनी खुलासा केला की, शासन सर्वांना मोफत शिक्षण देते. त्यामुळे तो प्रश्नच येत नाही. शेवटी मा. आयुक्तांचे खुलासा नुसार चर्चा संपविण्यात आली.

मा. सभापती यांचे परवानगीने ऐन वेळीची चर्चा

विषय पत्रिकेवरील कामकाज संपल्यानंतर महापौर यांचे अनुमतीने शहरातील रस्ते साफसफाई, पाणीपुरवठा, ड्रेनेज इत्यादी विषयावर मा. सभासदांनी चर्चा केली. वरील चर्चेत श्री. चंद्रकांत खैरे, सौ. दलाल, श्री. अशोक सायन्ना, श्री. मुजीब खान, श्री. नरेंद्र पाटील श्री. गोडसे, श्री. घडामोडे इ. सभासदांनी भाग घेवून त्यांचे संबंधित वार्डातील रस्ते, ड्रेनेज साफसफाई, रोषनाई बाबत तक्रारी मांडल्या, जालना रोडवर अनाधिकृत टपऱ्या झाल्या आहेत त्या हटविण्यात याव्यात. तसेच रोड दुरुस्त करवून लाईटची योग्य व्यवस्था व्हावी यावर मा. आयुक्तांनी खुलासा केला की, जिल्हा विकास व नियोजनाच्या बैठकीत जालना रोड वरील पाईप लाईन हटवून बाजूला टाकणे बाबत अंदाजपत्रक मान्य करण्यात आले आहे. परंतु अनेक बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळणे आवश्यक आहे.

शहाबाजार, रोशनगेट भागात रस्ते अरुंद आहेत. त्यामुळे शहर बस निटपणे जाऊ शकत नाही. रस्ते रुंद करण्यात यावेत असे श्री. मुजिब खान यांनी सुचविले. श्री. नरेंद्र पाटील यांनी एम. आय. डी. सी भागातील रस्त्यांकडे दुर्लक्ष होत आहे. तेथे रस्त्याचे कडेला झाडे लावली जात नाही असे सुचविले.

सिल्लेखाना येथील कत्तलखाना हलविण्यात आला आहे तरीही तेथे रस्त्यावर रक्त सांडलेले आढळून येते. पावसाळ्याचे दिवस असल्याने दुर्गंधी वाढत आहे, याची दखल घ्यावी अशी सूचना सौ. दलाल यांनी मांडली.

इंदिरानगर भागात अद्याप ड्रेनेज व्यवस्था नाही. साफसफाई होत नाही, मजूर गैरहजर असतात अशी तक्रार त्या वॉर्डातील सभासदांनी केली.

संसारनगर, राहुलनगर भाग स्लम घोषित करावा असेही सुचविण्यात आले.

श्री. घडामोडे यांनी सुचविले की, सिडको भागात महापालिकेच्या पाच शाळा आहेत. परंतु तेथे शिक्षक कमी आहेत. विद्यार्थ्यांचा खाजगी शाळेत जाण्याचा कल जास्त आहे. श्री. गंगाधर गाढे यांनी सुचविले की, महानगरपालिकेचा कारभार गलथान आहे. महानगरपालिकेच्या शाळांचा निकाल कमी का लागतो यांची कारणे शोधली पाहिजे, या शाळेमधून योग्य शिक्षण दिले जात नाही. शिक्षकांच्या बदल्या झाल्या पाहिजेत, शाळांच्या इमारतींची अवस्थाही चांगली नाही, जन्माचे प्रमाणपत्र वेळेवर मिळत नाही, महापालिका आर्थिकदृष्ट्या सबळ कशी होईल हे पाहिले पाहिजे.

वरील सर्व सूचना, उपसूचना, तक्रारींची मा. आयुक्त व मा. महापौर यांनी दखल घेतल्याचे सुचित केले व राष्ट्रगीतानंतर दुपारी १.३० वाजता सर्व सभासदांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/ |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

*सर्वसाधारण सभा दिनांक १६ जुलै १९८८ चा कार्यवृत्तांत*

**दिनांक १६ जुलै, १९८८ रोजी सकाळी ११.०० वाजता अलंकार नाट्यगृहात मा. महापौर डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षते खाली सर्वसाधारण सभेस वंदेमातरम् गीताने सुरुवात झाली.**
**या सभेस स. सदस्य सर्वश्री जावेद हसन खॉ, पालीवाल विजय व मो. ईस्माईल हे वगळता सर्व सदस्य तसेच महानगरपालिका अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

**विषय क्र. १०.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० मधील तरतुदीप्रमाणे स्थायी समितीच्या सहा (६) सभासदांची नेमणूक करणे.

**ठराव क्र. १०.** सभेच्या सुरुवातीस सौ. लता दलाल, श्री. कचरू नवपूते, श्री. मोतीराम घडामोडे यांनी आजच्या बैठकीबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय वाचून दाखविण्यात यावा अशी मागणी केली. मा. आयुक्तांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची मागणी सभागृहात दिली. सर्वोच्च न्यायालयाने दि. १६ जुलै, ८८ च्या मनपाच्या सर्वसाधारण सभेत स्थायी समितीच्यासहा राहिलेल्या सदस्यांची निवडणूक पुढील आदेश होईपर्यंत घेऊ नये असे सुचविले आहे. म्हणून ही निवडणूक आज या सभेत होणार नाही. असे सांगितले. मात्र सर्वसाधारण सभेमध्ये बाकी जे विषय आहेत त्याबाबत सभा होत आहे. असे ही मा.आयुक्तांनी स्पष्ट केले. यावर श्री. घडामोडे यांनी सर्वोच्च न्यायालयाची मुळ निर्णयाची प्रत वाचून दाखविण्यात यावी असे सांगितले असता मा. आयुक्तांनी सर्वोच्च न्यायालयाची मुळ सहीचे ऑर्डर आलेले नाहीत असे स्पष्ट केले. श्री. सावे यांनी आपल्याकडे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऑर्डरची प्रत आहे, असे सांगून ते सभागृहात वाचून दाखविले आणि न्यायालयाच्या आदेशावरून आजची ही सभा होवू नये असा अर्थ निघतो. असे त्यांना स्पष्ट केले. यावर आयुक्तांनी परत वरिल प्रमाणे त्यांच्या प्रश्नाचे निराकरण केले. त्यानंतर मा. महापौर यांनी सभेचे कामकाज पुढे सुरु केले.

**विषय क्र. ११.** सर्वसाधारण सभा दि. १८ जून, १९८८ चे कार्यवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ११.** सर्वप्रथम सभागृहापुढे मागील सभेचा कार्यवृत्त कायम करणेचा विषय ठेवण्यात आला. मा. महापौर यांनी तो वाचून दाखविला. श्री. घडामोडे यांनी सभागृहाने मा. महापौरांना मागील सभेच्या इतिवृत्तावर सह्या करण्याचा हक्क दिला होता, मंजूर करण्याचा अधिकार दिला नव्हता, असे सांगितले. मा. महापौर यांनी खुलासा केला की, इतिवृत्तांत हा सही करण्याच्या अर्थाने मंजूर झालेला आहे.

त्यानंतर सभागृहातील अनेक सदस्यांनी दि. १८ जून, ८८ च्या सभेच्या कार्यवृत्तांत ज्या ज्या स. सदस्यांनी मागण्या, सूचना, उपसूचना केल्या आहेत, त्याचा या वृत्तांतात उल्लेख तर नाही पण सदस्यांची नावे सुध्दा यात झालेली नाहीत, अशी तक्रार केली. मा. महपौर यांनी झालेल्या चुका दुरुस्त करण्यात येतील, असे सांगितले. त्यानंतर श्री. सावे व घडामोडे तसेच इतर स. सदस्यांनी सभागृहाचे लक्ष दि. १८ जून, ८८ च्या सभेच्या कार्यवृत्तांताकडे वेधले. या कार्यवृत्तांतात बऱ्याच चुका आढळून आल्या आहेत, त्यातील काही वाक्ये मोघम प्रकारची वापरण्यात आली आहेत, त्यातुन वाक्याचा बोध होत नाही. त्यामुळे त्यात दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतीपादन केले. सर्व मुस्लिम

सदस्य वंदे मातरम् आदर म्हणून ते म्हटले जाताना फक्त उभे राहतील परंतु तोंडाने उच्चार करणार नाहीत अशी दुरुस्ती मा. सदस्य श्री. अजिज जहागिररदार यांनी सुचविली व तयास अनुमोदन श्री. अजीजउल्ला बेग यांनी दिले. तसेच श्री. घडामोडे यांनी आरोप केला की, प्रभारी आयुक्त हे जिल्हाधिकाऱ्यांच्या तोऱ्यात वागतात. यावर मा. महापौर यांनी त्यांचा आरोप खोडून टाकतांना स्पष्ट केले की, आयुक्तांनी नियमास धरूनच काम केलेले आहे आणि सध्या कोर्टाच्या आदेशप्रमाणेच कामकाज होत आहे. यात गैर असे काहीच नाही. त्यानंतर शिवसेना सदस्यांनी ११.४५ वाजता सभात्याग केला. श्री. गंगाखेडकर यांनी सभागृहाचा वेळ एकाच विषयावर बराच खर्च होत असल्याचे निदर्शनास आणून देऊन प्रत्येक सदस्यांना बोलण्यासाठी वेळेचे बंधन घातले पाहिजे. जेणेकरून सभागृहाचा वेळ वाया जाणार नाही असे सांगितले. श्री. रशिदखॉ यांनी सांगितले की, सर्वप्रथम जनतेच्या कामास प्राधान्य द्यावे सभागृहाचा वेह वाया घालवू नये. मा. उपमहापौर यांनी याबाबत सांगितले की, आपण सर्वजण येथे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आलो आहोत. गोंधळ किंवा वाद करण्यासाठी नव्हे. तरी सर्वांनी सभागृहाचे काम व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करावा. दिनांक १८ जून, ८८ च्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. दरम्यान सभात्याग केलेले शिवसेना सदस्य परत सभागृहात आले.

**<u>विषय क्र.</u> १२.** शहराचा औरंगपुरा भागात मोफत आरोग्य केंद्र नाही. हा भाग शहराच्या मध्यवस्तीत असून महानगरपालिकेची नविन वास्तु तेथे आहे. या वास्तुत आरोग्य सेवा केंद्र चालविण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | प्रदिप जैस्वाल |
| अनुमोदक | - | १) मोरेश्वर सावे |
| | | २) जयंत ओक |
| दिनांक | - | १५-०६-८८ |

**<u>ठराव क्र.</u> १२.** प्रथम श्री. सावे यांनी ठराव वाचून दाखविला आणि श्री. ओक यांनी त्यास अनुमोदन दिले. औरंगाबाद शहरातील आरोग्य केंद्राबाबत बोलतांना श्री. घडामोडे यांनी सांगितले की, शहराचे आरोग्य खऱ्या अर्थाने कितपत सुदृढ आहे यांची सर्वांना कल्पना आहेच. औरंगाबाद शहरामध्ये मुंबई, पुणे भागासारखे अद्यावत दवाखाने नाहीत आणि म्हणून औरंगपुरा या भागात एका अद्यावत आरोग्य केंद्राची उभारणी व्हावी, तसेच याच भागात महापालिकेची एक मोठी वास्तु आहे. या ठिकाणी एक सुसज्ज दवाखाना उभारता येईल. यावर मा. महापौर यांनी सुचित केले की, सर्वप्रथम शहरात कुठे कुठे आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे हे पाहिले पाहिजे. शहरातील काही वस्त्या अशा आहेत की, जेथे दवाखाने नाहीत, विशेषतः किराडपूरा झेपडपट्ट्या या भागात दवाखाण्यासाची नित्यांत आवश्यकता भासते. त्यामुळे याबाबतीत एकाच वेळी प्रपोजल मांडावे जेणेकरून सर्वाचाच याबाबतीती विचार होईल. स. सदस्य श्री. अलफरखान यांनी असे सुचित केले की, गरजेनुसार दवाखाण्याची निर्मिती करावी. परंतु त्या अगोदर अंदाज पत्रकात किती तरतुद आहे, तेवढ्या तरतुदीमध्ये आपण दवाखाने उभारू शकतो किंवा काय या सर्वांचा विचार व्हावा. श्रीमती दलाल यांनी शासकीय रुग्णालय (घाटी) औरंगपुरा भागापासून दूर पडते, तसेच समर्थनगर भागात आरोग्य केंद्र नाही, त्यामुळे औरंगपुरा या भागात आरोग्य केंद्राची आवश्यकता असल्याचे सांगितले. मा. महापौर यांनी सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर चर्चेच्या शेवटी ते

म्हणाले की, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेशी सविस्तर चर्चा करून, सध्याच्या अंदाजपत्रकानुसार एखाद्या नविन आरोग्य केंद्राची निर्मिती करता येईल काय तसेच इतर प्रश्नाबाबत चर्चा करून पुढील सभेत या ठरावावर निर्णय देण्यात येईल असे सांगुन त्यांनी ठराव राखुन ठेवला.

**<u>विषय क्र.</u> १३.** मा. रतनकुमार पंडागळे [दि. ६ जुलै,८८] मागासलेल्या मराठवाडा विभागातील औरंगाबाद हे ऐतिहासिक शहर आहे. जवळच अजिंठा, वेरूळ लेण्या व दौलताबाद किल्ला आहे. तरी या उपेक्षित शहराच्या सर्वांगिण विकासासाठी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचेकडे शंभर कोटीची मागणी करणे.

**<u>ठराव क्र.</u> १३.** श्री. रतनकुमार पंडागळे यांनी निवेदन वाचून दाखविले. या बाबतीत यास ठराव म्हणायचे की, निवेदन हा प्रश्न उपस्थित झाला. खरे पाहता सदस्याला ठराव मांडता येतो, निवेदन नाही. निवेदन हे ठराव होवूच शकत नाही. निवेदन हे ठराव रुपाने सभागृहात मांडु नये व तयास ठरावाचे स्वरुप देण्यात येवू नये अशी मागणी सर्वश्री घडामोडे, सावे, श्रीमती लता दलाल यांनी केली. या बाबतीत झालेली चूक दुरुस्त करण्यात येईल असे मा. महापौर यांनी सांगितले, तेंव्हा श्री. घडामोडे यांनी यामध्ये अनुमोदकाचे नांवसुध्दा नसल्याचे निदर्शनास आणून दिले. श्री. पंडागळे यांनी आपल्या निवेदनाचे समर्थन करतांना सांगितले की, मुंबईसाठी केंद्र शासनाने १०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. डॉ. संचेती यांनी मुंबई महापालिकेने सुध्दा अशा प्रकारचा एक ठराव संमत करून मा. पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांचेकडे पाठविला, त्यानुसार महाराष्ट्र शासनाने ठरव मंजूर केला होता. तेंव्हा आपणही शासनाकडे अशाच प्रकारचे ठराव करून पाठवावा अशी मागणी केली. चर्चेचा विषय मागणी आहे, परंतु अगोदर यास ठराव म्हणावयाचे की निवेदन यावर चर्चा होणे आवश्यक आहे, असे मा. महापौर यांनी सांगितले. सौ. लता दलाल यांनी या निवेदनास ठराव म्हणून म्हणता येणार नाही. आणि जर तसे झालेच तर पुढे चालून एक वाईट पायंडा पडण्याचा शक्यता त्यांनी बोलून दाखविली. मा. महापौर यांनी श्री. पंडागळे यांनी दिलेल्या निवेदनाची मूळ प्रत पाहिली त्यावरून असे निदर्शनास आले की, श्री. पंडागळे यांनी आपल्या पत्रात प्रथम निवेदन म्हणून वापरलेला शब्द, शेवटी आयुक्तांना विनंती की, हे निवेदन ठराव रुपाने सभागृहात मांडावे असे स्पष्ट केले यावरून श्री. पंडागळे यांनी वापलेला "निवेदन" हा शब्द योग्य ठरतो म्हणून निवेदनाची भाषा ठराव रुपाने योग्य आहे, म्हणून यास ठराव म्हणण्यास हरकत नसावी असे सांगितले यावर अनेक सदस्यांनी आपलेच म्हणणे पुढे रेटण्याचा प्रयत्न केला असता मा. महापौर यांनी स्पष्ट केले की, या बाबतीत मी माझा निर्णय दिलेला आहे. यावरही कोणचा विरोध असेल तर त्यांनी मतदान करावे. मा. महापौर यांनी आपला निर्णय अगोदरच दिलेला होता. त्यामुळे हे निवेदन ठराव रुपाने सभागृहाने मान्य केले. याच्या निर्षधार्थ शिवसेना सदस्यांनी १२.३५ वाजता सभात्याग केला. त्यानंतर सदरील ठराव ३० विरुध्द २७ या बहुमताने मंजूर करण्यात आला.

**<u>विषय क्र.</u> १४.** महानगरपालिकेने औरगपुरा येथील नविन बांधलेले सुपर मार्केटमध्ये काही कार्यालये स्थालांतर करणे व पहिला, दुसरा, तिसरा मजला भाड्याने देवू नये, फक्त तळमजल्यावरील दुकाने भाड्याने देणे.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | प्रदिप जैस्वाल |
| अनुमोदक | - | मोरेश्वर सावे |
| दिनांक | - | १२/०७/८८ |

**<u>ठराव क्र.</u> १४.** यावेळी सभागृहात सुचक व अनुमोदक हे दोघेही उपस्थित नसल्यामुळे हा ठराव वगळण्यात आला.

**<u>विषय क्र.</u> १५.** महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या खेड्यातून आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे. महानगरपालिकेमार्फत दुरच्या रुग्णांसाठी रुग्णवाहिका ठेवणे.

सुचक - राधाकिसन मोटे
अनुमोदक - विठ्ठल पेरकर
दिनांक : - १२-०७-८८

**<u>ठराव क्र.</u> १५.** ठरावास प्रथम श्री. सावे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर श्री. पेरकर यांनी ठराव सभागृहास वाचून दाखविला. चर्चेच्या प्रारंभीच सर्वश्री गंगाखेडकर, अलफरखान व इतर सदस्यांनी आरोग्य सेवा विषयक प्रश्न विचारले. हयात आरोग्य सेवा कोठे कोठे उपलब्ध आहेत. यासाठी अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे खर्च करावा अशी सूचना तेसच रुग्णवाहिकेचा वापर सध्या केला जातो किंवा नाही, इत्यादी प्रश्नाची माहिती सभागृहास देण्याची मागणी केली. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सभागृहास शहरातील अरोगय केंद्राची माहिती दिली, महानगरपालिकेत एकूण १८ खेड्यांचा समावेश झालेला असल्यामुळे तेथेही आरोगय सेवा पुरविली जाते. शासनाच्या १००% अनुदानातून आरोग्य सेवा पुरविल्या जातात. श्री. गंगाखेडकर यांनी मागणी केली की, अजुनही काही खेड्यांमध्ये आरोग्य सेवा उपलब्ध नाही. म्हणून यासाठी येणाऱ्या खर्चास सभागृहाने मान्यता द्यावी. मा. महापौर यांनी चर्चा संपल्यानंतर याबद्दलचे सविस्तर निवेदन पुढील सभेत देण्यात येईल, असे सांगितले.

**<u>विषय क्र.</u> १६.** महानगरपालिका हद्दीत पुणे, नगर या शहराप्रमणे अद्यावत स्मशानभुमी तयार करणे. अंदाज पत्रकात आलेली विद्युत दाहिनीसाठी तरतुदीचा पाठपुरावा करणे.

सुचक - पांडुरंग भिमाजी पैठणकर
अनुमोदक - प्रदिप दत्त
दिनांक - १२-०७-८८

**<u>ठराव क्र.</u> १६.** सर्वप्रथम श्री. पैठणकर यांनी ठराव वाचून दाखविला. त्यात श्री. प्रदिप दत्त यांनी अनुमोदन दिले. श्री. अलफरखान यांनी अंदाजपत्रकात याबाबत तरतूद असतांना यास ठराव म्हणणे योग्य होणार नाही. अंदाजपत्रकाच्या तरतुदीप्रमाणे ह्यावर खर्च होईल. म्हणून ठराव मांडण्याची आवश्यकताच नाही अस त्यांनी स्पष्ट केले. यावर सौ. लता दलाल यांनी खुलासा केला की, विद्युत दाहिणीसाठी अंदाजपत्रकात तरतूद आहे, ते मान्य पण या ठरावामागील मुळ उद्देश याबाबत सतत पाठपुरावा करणे हा आहे. श्री. गाडे यांनी शिक्षणाचा प्रश्न योवळी उपस्थित केला. विद्युत दाहिणीसाठी ५ लाख अंदाजपत्रकात तरतूद आहे. आणि शाळेच्या दुरुस्तीसाठी केवळ १३ हजार आहे ही तफावत त्यांनी स्पष्ट करून मागणी केली की, विद्युत दाहिणीमधील काही रक्कम शाळेसाठी खर्च करावी. त्यानंतर स्मशानभुमीमधल्या असुविधांबाबत अनेक सदस्यांनी नाराजी व्यक्त करून याठिकाणी पाण्याची सोय, वृक्षारोपन आणि इतर सुविधांची मागणी केली. डॉ. संचेती यांनी सांगितले

की, यापूर्वीच्या प्रशासकांशी मी चर्चा केली. त्यावेळी त्यांनी सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच याकामी काही सेवाभावी संस्था आपणास मदत करण्यास तयार आहेत. त्यामुळे त्यांची मदत घेवून हे काम करता येईल यावर मा. महापौर यांनी संबंधित अधिकाऱ्यांस निवेदन करण्यास सांगितले असता संबंधित अधिकारी उपस्थित नसल्यामुळे शहर अभियंता यांनी त्याबाबत माहिती दिली. स्मशान भुमीबाबत सविस्तर माहिती व इतर कारणामुळे तसेच सभागृहाच्या मागणी वरून मा. महापौर यांनी ठराव क्र. ६ राखून ठेवण्या आणि पुढील बैठकीत हा मुद्दा परत चर्चेला घेतला जाईल असे सांगितले.

**विषय क्र. १७.** महानगरपालिकेच्या शाळांची दुरावस्था दुर करणेकरिता केलेली साडे तेरा हजारांची तरतूद अत्यंत अपूरी, तुटपूंजी आहे.

१) खर्चाची आवश्यकता, शाळांचा शैक्षणिक दर्जा, मराठी माध्यमाचा विस्तार.

सुचक - मोतीराम घडामोडे
अनुमोदक - चंद्रकांत खैरे
दिनांक : - १२-०७-८८

**ठराव क्र. १७.** स. सदस्य श्री. मोतीराम घडामोडे यांनी प्रथम ठराव वाचून दाखविला. श्री. घडामोडे यांनी शाळेच्या आवश्यक त्या सुधारणा व सुविंधासाठी अर्थसंकल्प रक्कम फारच अपूरी असल्याचे सांगून ती वाढवून देण्याची मागणी केली. श्री. खैरे यांनी सांगितले की, आम्ही पाठवित असलेले ठराव, काटछाट करून पाठविण्यात येतात, याबाबत त्यांनी चौकशीची मागणी केली. श्री. घडामोडे यांनी याबाबत बालतांना शाळांची दुरावस्थेबाबत सांगितले, शाळेत अपूर फर्निचर, शैक्षणिक साहित्याचा अभाव, रिक्त शिक्षक/शिक्षिका, सेविकांची पदे, मोडकळीस आलेल्या इमारती अशा अनेक त्रुटी श्री. अजिजउल्ला बेग, सौ. लता दलाल, इकबालसिंग गिल, मनमोहनसिंग ओबेराय, श्री. स. हुसेन, श्री. बंडु प्रधान, श्री. अ. रशीदखॉ, श्री. अजित शेळके, धनंजय गंगाखेडकर, श्री. अजिज जहागिरदार, गंगाधर गाढे यांनी दाखविल्या. ज्यामुळे नागरिकांची खाजगी शाळेकडे अधिक ओढ आहे. तसेच शिक्षकांची संख्या अपूरी असून अजून १६७ शिक्षक पदांची आवश्यकता आहे. श्रीमती दलाल यांनी नागेश्वरवाडी येथील शाळेत बालवाडी ते इयत्ता ५ वी पर्यंत विद्यार्थ्यांना विविध प्रकारची खेळणी देण्यात येतात. ती खेळणी अतिशय जुनी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शाळात सेविकांची संख्या अपूरी आहे. श्री. इगबालसिंग गिल यांनीही शाळेची इमारती पडायला आल्या आहेत असे सांगून शिक्षकांची भरती करावी, अशाी मागणी केली. चर्चेच्या ओघात श्री. घडामोडे यांनी शाळेच्या दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पात १३$^{१/२}$ हजार रुपये तरतूद असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री. सावे यांनी खुलासा केला की, १३$^{१/२}$ हजार रुपये नसून १३$^{१/२}$ लाख रुपये तरतूद आहे.श्री. अशोक सायन्ना यांनी पडेगांव येथील शाळेच्या दुरावस्थेची माहिती सभागृहात देवून याबाबत मनपाने कोणती कार्यवाही केली, याची माहिती आताच हवी असल्याबाबत मागणी केली. त्यावर आयुक्तांनी शिक्षणाधिकारी यांना निवेदन करण्यास सांगितले त्यावर शिक्षणाधिकाऱ्यांनी माहिती दिली की, पडेगांव येथील शाळेची इमारत पडावयास आली आहे. यापूर्वी प्रभारी शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांची पाहणी केली आहे. श्री. सायन्ना यांचे या उत्तरामुळे समाधान झाले नाही, त्यांनी आरोप केला की, शिक्षणाधिकारी हे सभागृहात चुकीची माहिती देत आहेत. त्यांना

याबाबतीत मुळीच माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. मा. महापौर यांनी श्री. सायन्ना यांना विनंती केली की, याबाबत २-४ दिवसात या विषयावर सर्वजण एकत्र बसून चर्चा करत. मा. आयुक्तांनी याबाबत अधिक स्पष्टीकरण देतांना सांगितले की, एकूण ३२ शाळा महानगरपालिकेच्या इमारतीत असून २७ शाळा या खाजगी इमारतीत आहेत. पडेगांव येथील शाळा दुरुस्तीच्या अवस्थेतही नसल्यामुळे त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही. संपूर्ण इमारत पाडून नविन इमारत त्या ठिकाणी उभा करावी लागणार आहे. उप आयुक्त यांनी सांगितले की, स्थायी समितीच्या बैठकीमध्ये याबाबतचे अंदाजपत्रक ठेवण्यात आले असून नविन इमारत त्या ठिकाणी बांधण्यात येईल. त्यानंतर सभागृहातील अनेक सदस्यांनी शाळेबाबतची माहिती, शिक्षणाची सोय व इतर सुविधंबाबत प्रश्न उपस्थित केले. श्किकांच्या भरतीच्या मागणीबाबत मा. आयुक्तांनी निवेदन केले की, १६७ शिक्षकांची पदे लवकर भरण्यात यावी. अशी मागणी यापूर्वीच शासनाकडे करण्यात आली असून शासनाशी त्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. शासनाच्या परवानगीने शिक्षकांची भरती केल्यास शासनाकडून ५०% अनुदान मिळते, नसता महापालिकेस १००% खर्च सोसावा लागेल. हे मा. आयुक्तांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. श्री. घडामोडे यांनी परत शिक्षक पदाच्या भरतीचा प्रश्न उपस्थित करून मागील बैठकीतसुध्दा याबाबत माहिती विचारली होती. यानंतर आयुक्तांनी सांगितले की, उपसचिवांशी चर्चा केली आहे, हे प्रकरण सध्या प्रोसेसमध्ये आहे.शेवटी शासनच याबाबतीत निर्णय घेणार आहे. मा. आयुक्तांनी दिलेली माहिती खरी वाटत नसल्याचे सांगून श्री. घडामोडे यांनी सभागृहास चुकीची माहिती देण्यात येवून नये असे सांगितले. परंतु आयुक्तांनी दिलेली माहिती संपूर्णतः बरोबर आहे असा खुलासा महापौर यांनी केला.

शेवटी हा ठराव पुढील बैठकीत घेतला जाईल असे मा. महापौर यांनी सभासदांच्या सुचनेवरून सांगितले.

**<u>विषय क्र.</u> १८.** शहागंज मंडईची सुधारणा करणे.

सुचक - नारायण मोहन फत्तेलष्कर
अनुमोदक - रमेश छापरवाल
दिनांक - १२-०७-८८

**<u>ठराव क्र.</u> १८.** प्रथम श्री. फतेलष्कर यांनी ठराव वाचून दाखविला, हा ठराव मालमत्ता अधिकारी याचेशी संबंधित असून ते सभागृहात हजर नाहीत, त्यामुळे यावर चर्चा होणे शक्य नाही. व माहितीमिळणे शक्य नसल्यामुळे हा ठराव पुढील बैठकीत घेण्यात यावा अशी मागणी श्री. गंगाखेडकर यांनी केली तसेच महापालिकेचे किती दुकाने आहेत, त्यात मुळ भाडेकरू किती, पोटभाडेकरू किती, दुकानावर किती थकबाकी आहे इत्यादिची माहिती ही पुढील बैठकीत द्यावी असे सुचविले. मा. महापौर यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करून यावर योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

**<u>विषय क्र.</u> १९.** नगर परिषदेचा ठराव क्र. (४१० दिनांक ३१-०५-८१) अन्वये बलवंत मोफत वाचनालयासमोरील चौकात महात्मा ज्यांतिबा फुले यांचा पुतळा उभारणे.

सुचक - चंद्रकांत खैरे
अनुमोदक - मोरेश्वर सावे
दिनांक - १२-०७-८८

**<u>ठराव क्र.</u> १९.** श्री. खैरे यांनी ठराव वाचून दाखविला, श्री सावे यांनी त्यास अनुमोदन दिले. श्री. सावे यांनी या ठरावावर अद्यापपर्यंत कार्यवाही झाली नाही. यावर अंमलबजावणी व्हावी याच उद्देशाने हा ठरावा मांडण्यात आला. मा. महापौर यांनी संबंधिताशी चर्चा करून यातुन कोणता मार्ग काढता येईल, याबाबत काय पॉलिसी ठरवावयाची ते पाहण्यात येईल असे सुचविले.

**<u>विषय क्र.</u> २०.** महापालिका हद्दित अनाधिकृत झालेले आणि होत असलेले बांधकाम व अतिक्रमनबाबत महापालिकेत प्रतिनियुक्तीवर योग्य अधिकारी नेमणे.

सुचक - धनंजय गंगाखेडकर
अनुमोदक - अजिजउल्ला बेग वाहेद बेग
दिनांक - १२-०७-८८

**<u>ठराव क्र.</u> २०.** स. सदस्य श्री. गंगाखेडकर यांनी ठरावा वाचून दाखविला व श्री. बेग यांनी त्यास अनुमोदन दिले. नगर परिषदेच्या काळापासून ते प्रशासकांच्या काळापर्यंत आणि आतापर्यंत शहरात अनाधिकृत बांधकाम, अतिक्रमणे होत आहेत, यावर आळा घालण्यासाठी एका प्रशासकीय अधिकाऱ्यांची याबाबतीत नेमणूक करावी. अशी मागणी श्री. गंगाखेडकर यांनी केली. शहरातील अनेक भागात अनाधिकृत बांधकामे आणि अतिक्रमण झाल्याचे अनेक सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. सहाय्यक संचालक, नगर रचना यांचेकडे अगोदरच जास्त काम आहे, त्यातच अतिक्रमण हटाव मोहिमेचे काम त्यांचेकडे दिले गेले. सहाय्यक नगर रचना यांनी जवाहर कॉलनी, साधना लॉजच्या पाठीमागे व शहरातील अन्य टिकाणी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत बांधकामे झल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. शेवटी मा. महापौर यांनी सहाय्यक संचालक नगर रचना यांना आवाहन केले की, याबाबतीत आपले काय मत आहे ते प्रांजाळपणे माझ्याकडे पाठवा. तसेच यावर चर्चा केल्यानंतर पुढच्या बैठकीत काय निर्णय घ्यावयाचा ते ठरवता येईल. दरम्यान श्री. खैरे यांनी एक उपसूचना मांडली की, आतापर्यंत जी अनाधिकृत बांधकामे झाली आहेत त्यापैकी किती तोडण्यात आली आहे, किती लोकांवर कार्यवाही करण्यात आली आहे. याची माहिति पुढील बैठकीत देण्याची मागणी केली.

**<u>विषय क्र.</u> २१.** १) महानगरपालिकेतर्फे घाटी हॉस्पिटलमध्ये बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी विद्युत दाहिणीची व्यवस्था करणे.

२) सध्या अस्तित्वात असलेल्या हिंदू स्मशानभूमी व कब्रस्तानाच्या परिसरात कुंपन लावणे, पाण्याची सोय करणे, बसण्याकरिता जागा व विजेचे दिवे लावण्याबाबत.

सुचक - अजिजउल्ला बेग वाहेद बेग
अनुमोदक - नरेंद्र पाटील
दिनांक - १२-०७-८८

**<u>ठराव क्र.</u> २१.** प्रथम श्री. अजिजउल्ला बेग यांनी ठराव वाचून दाखविला व श्री. नरेंद्र पाटील यांनी त्यास अनुमोदन दिले. या ठरावांवर अगोदरच चर्चा झाली असल्यामुळे मा. महापौरांनी पुढील ठराव चर्चेला घेतला. सदरील ठराव स्थायी समितीत ठेवण्यात येईल असे सुचविले.

**<u>विषय क्र.</u> २२.** वाढिव मालमत्ता कर (सामान्य कर) च्या ज्या सूचना दिलेल्या आहेत त्या रद्दबादल करणे व पूर्वी असलेला कर कायम करणे. नविन कर आकारणी संबंधी सूचना अधिकार स्थायीस समितीकडे सुपूर्द करणे व त्यावर सर्वसाधारण सभेत मंजुरी घेणे.

सुचक - नरेंद्र यादवराव पाटील
अनुमोदक - अजिजउल्ला बेग वाहेद बेग
दिनांक - १२-०७-८८

**<u>ठराव क्र.</u> २२.** स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी ठराव वाचून दाखविला. तर स. सदस्य श्री. अजीज उल्ला बेग यांनी अनुमोदन दिले श्री. पाटील यांनी यापूर्वीच्या प्रशासकांनी ४० पैशावरून ६५ पैसे वाढ केली आहे. ही वाढ जवळपास अडीचपट येवढी आहे. त्यातच सध्या रिव्हीजनच्या नोटीसेस देण्यात येत आहेत. ही वाढीव मालमत्ता कर रद्द करण्यात यावा असे सांगितले. श्री. अलफरखान यांनी या वाढीव मालमत्ता कराचा विरोध करून १९८६ मध्ये ४० ते २५ पैसे वाढ तर त्यानंतर ८० पैसे या करात वाढ करण्यात आली आहे. त्यांनी विनंती केली की, १९८६ मध्ये जो टॅक्स होता त्याच दराने आताही वसूल करावा. श्री. मुजीब खाँ यांनी प्रभाग क्र.१३ मध्ये शाळा, ड्रेनेज व नागरी सुविधा नसतांनाही गेल्या २० वर्षापासून टॅक्स वसूल केला जातो. शेवटी मा. महापौर यांनी सांगितले की, संबंधित अधिकाऱ्यांना नोटीसेस देण्याचे बंद करण्याचे सांगण्यात आले असून टॅक्स कोणत्या प्रकारे लावावा. त्याबाबत विचार केला जाईल. सभासदांनी सूचना केल्याप्रमाणे सन्मानिय सदस्यांची एक बैठक घेऊन याबाबत काय निर्णय घ्यावा हे पाहिले जाईल. तोपर्यंत आहे तोच मालमत्ता कर कायम राहील.

राष्ट्रगीतानंतर दुपारी ३.१५ वाजता सर्वसाधारण सभा सर्वांचे आभार माणून संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

***दिनांक १८ ऑगस्ट ८८ रोजी अलंकार नाटचगृहात झालेल्या सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत***

दिनांक १८ ऑगस्ट ८८ रोजी सकाळी ११.०० वाजता अलंकार नाट्यगृहात मा. महापौर डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेस वंदेमातरम् राष्ट्रगीत म्हणून सुरुवात झाली.

सभेस सर्व सदस्य तसेच महानगरपालिका कर्मचारी वर्ग उपस्थित होते. आजच्या सभेपुढे खालील विषय होता.

**<u>विषय क्र.</u> २३.** मुंबई प्रां. म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम २० मधील तरतुदीप्रमाणे स्थायी समितीच्या सहा (६) सभासदांची नेमणूक करणे.

**<u>ठराव क्र.</u> २३.** सभेच्या सुरुवातीस मा. महापौर यांनी सभेपुढील विषय वाचून दाखविला. त्यानंतर स. सभासदांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १० मिनिटांचा कालावधी दिला. श्री. गाढे यांनी या काळात उमेदवारी अर्ज किती भरले अशी विचारणा केल्यावरून मा. महापौर यांनी एकूण १९ सदस्यांनी उमेदवारी अर्ज भरल्याचे सांगितले. ह्यातील एकूण सात (७) जणांनी ऐनवेळी उमेदवारी अर्ज परत घेतले. त्यानंतर श्री. सावे यांनी मतदानाची पध्दत काय राहणार आहे, अशी पृच्छा केली. त्यावर मा. महापौरांनी मतदानाच्या पध्दतीबद्दल माहिती देतांना सांगितले की, मतदानासाठी अर्ध्या तासांचा वेळ राहील. मतपेटी शिल केली जाईल, प्रत्येक प्रभाग क्रमांकाने सदस्यांना मतदानाकरिता बोलाविले जाईल. त्यानंतर श्री. घडामोडे यांनी पत्रकारांना सर्वसाधारण सभेच्या सुचनापत्रक (Ageuda) मिळालेला नाही असे सांगितले.

उमेदवारी मागे घेण्याच्या अवधित मा. महापौर यांनी निवडणूकीसाठी उभे असलेल्या उमेदवारांची नावे तसेच त्यांचे अनुमोदक, सुचकांची नावे वाचून दाखविली निवडणूकीबाबतच्या इतर सूचना मा. महापौर यांनी यावेळी सभागृहास दिल्या.

त्यानंतर मतपेटी सदस्यांना उघडून रिकामी असल्याचे दाखवून दिले व त्यांच्यासमोर मतपेटी शिलकरून त्यावर मा. महापौरांच्या सहीची मोहर लावण्यात आली. डॉ. संचेती यांनी विनंती केली की, सभागृहांचा पक्षनेता व विरोधी पक्ष नेता यांची नावे जाहीर करावेत. मा. महापौरांनी डॉ. संचेतीच्या विनंतीवरून खालील नावे वाचून दाखविली.

१) श्री. मनमोहनसिंग ओबेराय - सभागृह नेता
२) श्री. चंद्रकांत खैरे - विरोधी पक्ष नेता

त्यानंतर मा. महापौरांनी स. सदस्यांना व्यासपिठावर येवून मतदान करण्याबाबत विनंती केली. तसेच मतदान शांततेत करण्योच आणि व्यासपिठावर एकावेळी एकाच उमेदवारांनी मतदानासाठी यावे असे आवाहन केले. ठिक ११.४० वाजता स्थायी समितीच्या उरलेल्या सहा (६) उमेदवारांच्या निवडीसाठी मतदानास सुरुवात झाली. छाननी अधिकारी यांनी प्रत्येक प्रभाग क्रमांकाप्रमाणे नावे वाचून दाखविले. त्याप्रमाणे एकूण ६० स. सदस्यांनी मतदान केले. दरम्यान मा. महापौर यांनी स. सदस्यांना जो पेन दिला जाईल, त्याच पेनाचा वापर करण्याचे सांगितले. ठिक १२.२५ वाजता मतदान पूर्ण झाले.

त्यानंतर मा. महापौर, उप महापौर, सभागृहनेता व विरोधी पक्ष नेता यांच्यासमोर मतपेटी उघडण्यात आली. सर्व मतपत्रिका बाहेर काढून प्रथम मा. महापौरांनी

मतपत्रिकेवर सह्या केल्या. मत मोजणीनंतर मा. महापौर यांनी खालीलप्रमाणे निकाल जाहिर केला.

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण मतदान | - | ३६० | (६० x ६ = ३६०) |
| झालेले मतदान | - | ३६० | |
| वैद्य मते | - | ३६० | |
| अवैद्य मते | - | -- | |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मोतीराम घडामोडे | - | ५६ |
| २) | कचरू नवपुते | - | ५६ |
| ३) | अजित शेळके | - | ६२ |
| ४) | स. अहमद एकबालउद्दिन | - | ६२ |
| ५) | स. हुसेन स. अहमद | - | ६२ |
| ६) | मोरेश्वर सावे | - | ५६ |
| ७) | अविनाश कुमावत | - | ०० |
| ८) | अजिज जहागिरदार | - | ०६ |
| ९) | किशोर थोरात | - | ०० |
| १०) | मोहसीन अहमद | - | ०० |
| ११) | वाघमारे सुदाम | - | ०० |
| १२) | विधाते प्रभाकर | - | ०० |

सर्वश्री मोतीराम घडामोडे, कचरू नवपूते, अजित शेळके, स. अहमद एकबालोद्दिन, मोरेश्वर सावे व स. हुसेन स. अहमद हे निवडून आल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

वरील नवनिर्वाचित सदस्यांचे मा. महापौर यांनी निवडून आल्याबद्दल पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले.

आभार प्रदर्शनानंतर जन-गण-मन हे राष्ट्रगीत म्हणून दुपारी १२.५५ वाजता सर्वसाधारण सभेची सांगता झाली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/ |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

***सर्वसाधारण सभा दि. १७ सप्टेंबर १९८८ चा कार्यवृत्तांत***

दि. १७ स्प्टेंबर, १९८८ सकाळी ११.०० वाजता अलंकार नाट्यगृहात मा. महापौर, डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षेतखाली सभेस सुरुवात झाली.

या सभेस खालील सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

१) मा. श्री. तकी हसनखान कासीम खान, उपमहापौर
२) मा. श्री. यादव अशोक सायन्ना
३) मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
४) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
५) मा. श्री. अजितउल्ला बेग वाहेद बेग
६) मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
७) मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ
८) मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन
९) मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक
१०) मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव
११) मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण
१२) मा. श्री. म. आयुब गुलाम जिलानी
१३) मा. श्री. प्रधन बंडु गोविंदराव
१४) मा. श्री. नारायण मोहन
१५) मा. श्री. स. अहमद एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन
१६) मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१७) मा. श्री. ओक जयवंत केशवराव
१८) मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग
१९) मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव
२०) मा. श्री. अब्दुल रशीद खा (मामू) अ. हमीद खान
२१) सौ. दलाल लता श्रिनिवास
२२) मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२३) मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२४) मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन
२५) मा. श्री. छापरवाल रमेश नारायण
२६) मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल
२७) मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव
२८) मा. श्री. डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
२९) मा. श्री. म. इस्माईल अ. करीम
३०) मा. श्री. फैयाजखान अहमद खान
३१) मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग
३२) मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद
३३) मा. श्री. स. हुसैन स. अहमद
३४) मा. श्री. मगर शंकर जिजाराम

३५) मा. श्री. मानकापे नामदेवराव शामराव
३६) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३७) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
३८) मा. श्री. अलफरखाँ हुसैन खाँ
३९) मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास
४०) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
४१) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव
४२) मा. श्री. अजिमखा दादामिया अ. रहेमान
४३) मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ
४४) मा. श्री. शिंदे मधूकरराव माणिकराव
४५) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस
४६) मा. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग
४७) मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन
४८) मा. श्री. गोडसे आनंद जगदिश
४९) मा. श्री. जहागिरदार अजिज मुख्तार अहमद
५०) मा. श्री. मोरे रामकृष्ण तुळशीराम
५१) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम
५२) मा. श्री. हाळनारे गिरजाराम नानाराव
५३) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५४) मा. श्री. परदेश सुभाष शिवलाल
५५) मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान

सुरुवातीस महापौरांनी सर्व सदस्यांना सूचना केली की, आघाडीच्या सर्व सदस्यांनी सभागृहाच्या एका बाजूस व विराधी पक्ष सदस्यांनी सभागृहाच्या दुसऱ्या बाजूस बसावे. यावर स.स.श्री. चंद्रकांत खैरे यांनी विचारणा केली की, ही बैठक व्यवस्था नेहमीसाठी राहिल का? यावर मा. महापौरांनी खुलासा केला की, ही पध्दत यापुढे प्रत्येक बैठकीत अनुसरली जाईल. नंतर "वंदेमातरम्" या गीताने सभेस सुरुवात झाली.

**विषय क्र. २४.** दिनांक १६-०७-८८ व १८-०८-८८ रोजी झालेल्या मनपाच्या सर्व साधारण सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

**चर्चा** मागील सभेच्या इतिवृत्तांवर चर्चा करतांना स. श्री. चंद्रकांत खैरे यांनी मा. महापौरांना विनंती केली की, आतापर्यंत या सभागृहात किती ठराव मांडण्यात आले. किती ठराव पास झाले, किती राखून ठेवण्यात आले वा फेटाळण्यात आले याचा एक फलक सभागृहात लावण्यात यावा.

स.श्री. सावे मोरेश्वर यांनी मा. महापौरांचे लक्ष दि. १६-०७-८८ रोजी झालेल्या सर्व साधारण सभेच्या कार्यवृत्तांतातील खालील ठरावाकडे वेधले.

विषय क्र. १२ व १५. औरंगपुरा भागात नविन आरोग्य केंद्राची निर्मिती व मनपा हद्दीत नव्यानेच समाविष्ट झालेल्या नविन १८ खेड्यांना पुरविण्यात यावयाच्या आरोग्य सोयींबाबतचे ठराव राखून ठेवले होते. तेव्हा या बैठकीत या विषयांवर निर्णय घेण्यात यावा. मा. महापौरांनी खुलासा केला की, या बाबतीत त्यांची आरोग्य

वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा झालेली आहे व औरंगपुरा भागाबरोबरच शहराच्या इतर अविकसित भागात पण दवाखाने सुरू करता येतील काय, याचा आराखडा तया करण्यास सांगितले आहे. हा आराखडा तयार केल्यानंतर स. सदस्यांशी विचार विनिमय करून त्यावर निर्णय घेतला जाईल. मा. महापौरांनी सांगितले की, आर्थिक परिस्थितीमुळे जर मनपा दवाखाने उभे करू शकत नसेल, तर त्वरित एक मोबाईल व्हॅन घेऊन नव्यानेच आलेल्या १८ आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात.

स. श्री. इकबालसिंग गिल, अशोक सायन्ना व रतनकुमार पंडागळे यांनी विचार मांडले की, आरोग्य विभागास मिळालेल्या पारितोषिक रु. १.५ लाख मधून व्हॅन खरेदी करण्यात यावी व झेपडपट्ट्यातूनही फिरते रुग्णालय सुरू करण्यात यावे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केला की, व्हॅन खरेदी केली जाणार आहे व यास स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे.

विषय क्र.१५ वरिल "स्मशान भुमी" बाबत सविस्तर माहिती द्यावी. मा. महापौरांनी खुलासा केला की, काही स्मशानभुमी आज मनपाच्या ताब्यात आहेत तर काही वादग्रस्त अवस्थेत आहेत. आपल्या ताब्यात असलेल्या स्मशान भुमीचे क्षेत्रफळ जर जास्त असेल तर तेथे झाडे लावण्याचे तसेच ज्या स्मशान भुमीत प्रेते जाळली जातात तेथे जाळावू लाकूड बाजार भावाने उपलब्ध करून देणेबाबत आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. तसेच ज्या स्मशाभुमी वादग्रस्त आहेत त्यांच्या मालकांशी चर्चा करण्याबाबतचे आदेशही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. स. श्री. चंद्रकांत खैरे व सावे यांनी सुचविल्याप्रमाणे आदेशाची एक एक मत विरोधी पक्ष नेता व सभागृह नेता यांना देण्याचे मान्य केले.

विषय क्र. १९ बलवंत वाचनालयासमोरील चौकास महात्मा फुले चौक असे नांव देणेबाबत मा. महापौरांनी खुलासा केला की, आजच्या बैठकीत चौक अथवा रस्त्यांना नांव देण्याचे ५-६ ठराव आलेले आहेत. या संबंधाने एक समिती स्थापन करण्यात येईल व सर्व स. सदस्यांनी आपल्या सूचना, उपसूचना या समितीस सादर कराव्यात. या समितीत सर्व घटक पक्षाचे एक एक प्रतिनिधी राहतील. सर्व सूचनांचा विचार करून समिती आपला अहवाल मा. महापौरांना सादर करील. अशी समिती बनविणेकरिता सर्वांनी मान्यता दिली.

श्री. चंद्रकांत खैरे यांनी सुचविले की, मागील बैठकीत शहरातील अनधिकृत बांधकामबाबत माहिती मागितली होती. त्याबाबतही खुलासा व्हावा. यावर मा. महापौरांनी खुलासा केला की, अनाधिकृत बांधकामाबाबत अधिकाऱ्यांबरोबरच स. सदस्यांनी पण आपआपल्या विभागातील अनाधिकृत बांधकामासाची माहिती मनपाला द्यावी म्हणजे त्यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. स. श्री. कुमावत अविनाश यांनी जवाहर कॉलनीतील त्रिमुर्ती चौकात झालेल्या अनाधिकृत बांधकामाकडे मा. महापौरांचे लक्ष वेधले. मागील सर्व साधरण सभेतही सहाय्यक संचालक नगर रचना यांनी ही माहिती लवकरच देऊ असे आश्वासन दिले होते. परंतु अद्याप पावेतो अशी माहिती मिळाली नाही. स. श्री. रतनकुमार पंडागळे यांनीही निवेदन केले की, शहराच्या इतर भागातही अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत, स. श्री कुमावत म्हणाले की, हा भाग शैक्षणिक झोन म्हणून जाहीर केलेला आहे. या भागात बरिचशी अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत. तेंव्हा हा भाग रहिवास विभाग म्हणून जाहीर करण्यातबाबत शासनास विनंती करण्यात यावी. यावर स. श्री. अलफखा यांनी ही बाब प्रशासकीय असून त्यावर या सभागृहात चर्चा करता येणार नाही तर स. सदस्यांनी कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यास भेटून माहिती मिळवावी असे आवाहन केले. मा.

महापौरांनी खुलासा केला की, यावर संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय लवकरच घेतला जाईल.

स. श्री. अजिजउल्ला बेग यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले की, जुन्या दराने टॅक्स घ्यावा असे ठरले असतांनाही काही भागात नविन दराने नोटिसा देण्यात येते आहेत. स. श्री. अशोक सायन्ना यांनी मागणी केली की, जी १८ खेडी मनपा हद्दित नव्यानेच आलेली आहेत, तेथे कुठल्याही सुविधा नसतांना, नविन दराने टॅक्स वसूल केला जातो. तो थांबविण्यात यावा. तसेच नळ कनेक्शन देतांना विकास निधी घेण्यात येऊ नये, असे असतांनाही या भागात (नविन १८ खेड्यात) नळ कनेक्शन घेतांना विकास खर्च घेतला जातो, तो बंद करण्यात यावा. स. सदस्याच्या प्रश्नांना उत्तर देतांना मा. महापौर म्हणाले की, जी नविन १८ खेडी महापालिका हद्दित नव्याने आलेली आहेत त्यातील जुनी घरे वगळता जी नविन बांधकामे होतील त्यांनाच फक्त नियमाप्रमाणे विकास खर्च भरावा लागेल.

स. सदस्य श्री. घडामोडे मोतीराम यांनी सभागृहाचे लक्ष वेधले व निवेदन केले की, शाळेमधून शिक्षकांची कमतरता आहे ही (१६७) पदे भरली जात नाहीत. मा. महापौरांनी खुलासा केला की, शासनाकडे शुन्याधारित अर्थसंकल्प असल्यामुळे अद्याप मंजुरी मिळाली नाही. व अशा वेळी जर महापालिकेने शासनाच्यासंमती विना शिक्षकांच्या नेमणूका केल्या तर त्याचा आर्थिक भार महापालिकेवर पडेल. शासनाने जर या शिक्षकांच्या नियुक्तीस मान्यता दिली तर या पदांवर होणाऱ्या खर्चाच्या ५०% एवढा खर्च शासनाकडून अनुदान म्हणून मिळेल व ५०% खर्च महानगरपालिकेस करावा लागेल. हा पूर्ण खर्च महापालिकेवर टाकावा काय याचा विचार स. सदस्यांनी करावा. शासनाची संमती मिळाल्या नंतरच या जागा भरल्या जातील. असा खुलासाही मा. महापौरांनी केला.

विषय क्र. २२ कडे स. स. श्री. अलफखॉ यांनी लक्ष वेधून सूचना केली की, "जाणकार नागरिकांची बैठक घेवून याबाबत निर्णय घेतला जाईल" "ऐवजी" सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा करण्यात येईल" असे वाक्य ठरावात असावयास पाहिजे. तशी दुरुस्ती ठरावात करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

स. श्री. अजिज जहागिरदार यांनी दि. ११-०८-८८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्तांताकडे सभागृहाचे लक्ष वेधून मागणी केली की, सदस्यांची नांवे बरोबर लिहीली जात नाही. तरी बरोबर लिहीण्यात यावी. कार्यवृत्तांत "अजिज जहागिरदार"ऐवजी" अजिज जहागिरदार" टाईप कलेले आहे. तेव्हा याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. यावर मा. महापौरांनी यापुढे अशी चूक होवू नये याची खबरदारी संबंधितानी घ्यावी असे आदेश दिले.

**<u>ठराव क्र.</u> २४.** शेवटी सूचना उपसूचना व सुचविलेल्या दुरुत्यासह दि. १६-०७-१९८८ व दि. १८-०८-१९८८ चे इतिवृत्तांततास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**<u>विषय क्र.</u> २५.** अ) औरंगाबाद शहराचे सुप्रसिध्द उर्दू भाषेचे कवि स्वर्गवाशी श्री. कमर इकबाल यांना श्रध्दांजली अर्पण करणे.

ब) नेहरू भवन ते औरंगपुरा भाजी मार्केट या नवीन रस्त्याचे नाव त्यांच्या स्मरणार्थ कमर इकबाल रोड ठेवणे

क) त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत महानगरपालिकेतर्फे देण्यात यावे.

सुचक - श्री. अजिजउल्ला बेग

अनुमोदक - श्री. नरेंद्र पाटील

**ठराव क्र. २५.** अ) स. सदस्य श्री. अजिजउल्ल बेग यांनी प्रस्ताव वाचून दाखविला. सुप्रसिध्द उर्दू भाषेचे कवी स्व. श्री. कमर इकबाल यांचे अकस्मित निधनाबाबत सभागृहात दोन मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली वाहिली तसेच माजी नगरसेवकि‍ा स्व. सौ. शकुंतलाबाई बोरसे यांनाही श्रध्दांजली वाहण्यात आली.

ब) त्यांचे नाव रस्त्यास देणेबाबत एक उपसमिती स्थापण्योच नक्की झालेले आहे. तेव्हा ती समितीच यावर निर्णय घेईल, असे सर्वानुमते ठरले.

क) आर्थिक मदत देणेबाबत महानगरपालिकेकडे वेगळा फंड नाही. तेंव्हा असे जे महान कवी / कलाकार असतील त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतीकरीता अगोदर एक फंड उभा करण्यात यावा. व नंतर या बाबत निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २६.** महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३० अन्वये खालील विशेष समित्या स्थापन करणे.

१) स्थापत्य समिती बांधकाम आणि पाणीपुरवठा.
२) स्वास्थ, पशुसंवर्धन आणि स्वच्छता समिती.
३) गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती.
४) शिक्षण समिती.

सुचक - श्री. अलफखाँ हुसेन खाँ
अनुमोदक - श्री. गंगाधर गाढे

**चर्चा** स. श्री. अलफलखाँ यांनी ठराव वाचून दाखविला स. श्री. सावे मोरेश्वर यांनी अनुमोदक सभागृहात नाहीत, तेंव्हा हा ठराव चर्चेला घेवू नये असा आक्षेप घेतला. यावर स. श्री. जावळे प्रकाश यांनी या ठरावाचे अनुमोदक व इतरही ज्या ठरावास अनुमोदन दिलेले आहे, असे स. सदस्य श्री. गंगाधर गाढे यांनी अधिकार पत्र दिले आहे. श्री प्रकाश जावळे यांनी दिलेले अधिकार पत्र सभागृहास वाचून दाखविले व या ठरावास अनुमोदन दिले. स. श्री. अलफखाँ यांनी सुचविले की, मी सहा समित्यांची सूचना केली होती. कोणत्या समित्यांना कोणते अधिकार असावेत, हे विस्तृत्पणे ठरविण्यासाठी माननिय महापौरांनी एक स्वतंत्र्य समिती स्थापन करावी व त्या समितीने विस्तृत चर्चा करून विविध समितत्यांच्या कार्यक्षेत्राविषयी व त्यांच्या अधिकाराविषयी एक टिपण त्यार करून ते माननिय महापौरांना सादर करावे. स. श्री. सावे मोरेश्वर यांनी सूचना केली की, अगोदर महापालिकेचे या बाबतचे उपविधी तयार करण्यात यावेत, व नंतरच या विविध समितत्या स्थापन करण्यात याव्यात. स. श्री. अलफखाँ यांनी स्पष्टीकरण दिले की, महाराष्ट्र म्युनिसीपालिटी ॲक्टप्रमाणे जे अधिकार महापालिकेस मिळतात त्या अधिकरांचा वापर करूनच त्या समितत्या स्थापन करावयाच्या आहेत, त्यासाठी स्वतंत्र्य नियम करण्याची आपणास आवश्यकता नाही. स. श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी सूचना मांडली की, पुणे, पिंप्री चिंचवड या महापालिकेकडून याबाबत माहिती मागवून आपणही त्यांच्या सारखीच पध्दत अनुसरावी. स. श्री. मोरेश्वर सावे यांनी खुलासा मागितला की, या समित्यांची नांवे का बदलण्यात आली? मा. उपआयुक्तांनी खुलासा केला की, या समित्या ऐच्छिक स्वरुपाच्या असल्यामुळे व महापालिका कामकाजाचे स्वरुप पहाता चार समित्या स्थापन कराव्यात असे ठरले होते. मात्र या समित्यांचे विषय कमी जास्त करण्यात आलेले नाही. स.

श्री. चंद्रकांत खैरे यांनी सूचना मांडली की, एकूण सहा समित्याच स्थापन करव्यात त्यास मान्यता देण्यात आली

**<u>ठराव क्र.</u> २६.** चर्चेनंतर सहा समित्या स्थापन करण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले. मात्र या समित्यांचे कार्यक्षेत्र व त्यांचे अधिकार ठरविण्यासाठी प्रथम एक समिती निर्माण करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> २७.** औरंगाबाद ते सातारा या गावाला जोडणारा (रस्ता) रोड अत्यंत गजबजलेला असून ह्या भागात कॉलेज वाढल्याने रहदारी व गर्दी वाढली आहे. हा रस्ता नागवळणी व अरुंद असल्याने ह्या रोडवर नागसेननगरमध्ये आतापर्यंत तीन बालकांचा विविध वाहनाने अपघात झालेल्या आहे. सातारा रोड वरील रेल्वे गेट समोरून मिलिंदनगर, कबीरनगर, मुरलीधरनगर ह्या वस्तीतुन सरळ पॉलिटेक्नीक कॉलेजच्या वस्तीगृहा समोरून रेल्वेस्टशन ते महात्मा फुलेनगर जोपडपट्टी रोडला जोडण्यात यावा व त्याकरिता संबंधितांशी चर्चा करून रोडकरिता पॉलिटेक्नीक कॉलेजची जागा मिळवावी.

सुचक - प्रकाश जावळे
अनुमोदक - श्री. अलफखाँ

**<u>ठराव क्र.</u> २७.** चर्चेत सदस्य श्री. गिरजाराम हाळनोर यांनी सुचविले की, एकनाथनगरपासून जर हा रोड तयार करण्यात आला तर जास्त योग्य राहिल. स. स. श्री. जावळे यांच्या म्हणण्याप्रमाणे जर हा रस्ता बनवण्यास सुरुवात केली तर हा रस्ता दलित वस्तीतून जाईल व त्यामुळे बरेच घरे पाडवी लागतील. स. श्री. सावे मोरेश्वर यांनी सूचना मांडली की, सध्या हा रस्ता परिबाजार ते एकनाथनगर असा आहे. केवळ नाल्याची दुरुस्ती करणे बाकी राहिलेले आहे. तसेच पॉलिटेक्निक जागा देईन असे वाटत नाही. तेव्हा केवळ नाल्याची दुरुस्ती केली तरी हा रस्ता उपयोगात येऊ शकेल. शेवटी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद सातारा या गावाला जोडणारा रोड अत्यंत गजबजलेला आहे तरी रस्ता सातारा रोडवरील रेल्वे गेट समोरून मिलिंदनगर, कबिरनगर मुरलीधरनगर ह्या वस्तीतून सरळ पॉलिटेक्निक कॉलेजच्या वस्तीगृहा समोरून रेल्वे स्टेशन ते महात्मा फुलेनगर झेपडपट्टीला जोडण्याबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. (दुरुस्त ठराव क्र. २७ पान नं. ३० पहावे.)

**<u>विषय क्र.</u> २८.** "गाजरगवत निर्मुलन सप्ताह पाळणे"

शहरातील सर्व भागात सध्या गाजर गवताचे अमाप आलेल्या पिकाचे निर्मुलन करणे. त्यासाठी त्या भागात १० पैसे किंवा तसे किलोने महानगरपालिकेने खरेदीकरून शहराबाहेर टाकणे.

सुचक - श्री. नरेंद्र पाटील
अनुमोदक - श्री. अलफखाँ

**<u>ठराव क्र.</u> २८.** स. श्री. सावे मोरेश्वर, स. श्री. घडामोडे मोतीराम, स. श्री. रशिद खान मामु, डॉ. संचेती यांनी सूचित केले की, जर हे गवत १० पैसे किलोने काढावयाचे असेल तर त्याची मोजदाद कोण करणार व तोडणी कोण करणार. तसेच या कामावर

नियत्रंण ठेवण्यासाठी पण एक स्वतंत्र्य यंत्रणा उभी करावी लागेल. त्यापेक्षा टेंडर मागविण्यात यावे त्यात जाळण्याची पण व्यवस्था करावयास पाहिजे. याबाबत विभागीय अधिकाऱ्यांनी त्यांचेकडील कोठे कोठे सदरचे गवत आहे याचा अहवाल मा. आयुक्तांना द्यावा व मा. आयुक्त यांनी याबाबत निर्णय घ्यावा असे डॉ. संचेती यांनी सुचविले.

चर्चेनंतर गाजर गवत निर्मुलन सप्ताह पाळण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे मा. आयुक्तांनी जाहीर केले.

**विषय क्र. २९.** मा. उप आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये मा. आयुक्त, महानगरपालिका यांना रुपये ५,०००/- रुपयापर्यंतची कामे मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. सदरचे अधिकार महानगरपालिका ठरवील त्याप्रमाणे त्यास शासनाची मान्यता घेवूनवाढवू शकतात सदरचा कायदा १९४९ मध्ये तयार करण्यात आला आहे. त्यामानाने आता सदर रकमेचे अधिकार फारच कमी आहेत. तेव्हा ते अधिकार एक लाख रुपयापर्यंत वाढवून त्यास मान्यता देण्यात यावी. म्हणजे त्याप्रमाणे शासनास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**ठराव क्र. २९.** वरील प्रस्तावावर चर्चेस सुरुवात करतांना स. श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी शंका प्रदर्शित केली की, मा. आयुतंना रु. ५,०००/- वरून एक लाख रुपया पर्यंतचे कामे करण्याचे अधिकार वाढवून दिले तर स्थायी समितीस काहीच अर्थ राहणार नाही. स्थायी समितीची सभा ही प्रत्येक आठवड्याला होतेच, तेंव्हा हा ठराव रद्द समजण्यात यावृ यास सृ श्रीृ अजिजउल्ला बेग व स. श्री. रतनकुमार पंडागळे यांनी दुजोरा दिला. आयुक्तांना जर एक लाख रुपयापर्यंत अधिकार वाढवून दिले तर अेकाधिकारशाही निर्माण होवू शकेले अशी शक्यता स. श्री. नरेंद्र पाटील यांनी व्यक्त केली. स. श्री. सावे यांनी सुचित केले की, हा ठराव मांडण्यापूर्वी मा. आयुक्तांशी चर्चा झालेली दिसत नाही. तेव्हा मा. आयुक्ांशी संबंधितांनी चर्चा करून नंतरच हा प्रस्ताव सभगृहात मंजुरीस्तव मांडावा. शेवटी इतर महानगरपालिकेत असे अधिकार प्रदान केले आहेत काय याची माहिती घेवून नंतरच हा प्रस्ताव सभागृहात मंजुरीस्तव मांडावा. शेवटी इतर महानगरपालिकेत असे अधिकार प्रदान केले आहेत काय याची माहिती घेवून नंतर सदरचा प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३०.** महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर 'अकौंटस् कोड' सध्या चालू नाहीत. महानगरपालिका लेखा अधिनियमासाठी शासकीय स्तरावर कार्यवाही चालू आहे. तोपर्यंत नगरपालिका अकौंटस् कोड मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमास अधिन राहून लागू करण्यात यावे जेणेकरून आर्थिक बाबीत सुसुत्रता ठेवता येईल. प्रस्ताव सादर.

**ठराव क्र. ३०.** ही बाब प्रशासकीय आहे. तेंव्हा मा. आयुक्तांनी त्यांच्या लेव्हलवर याचा निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३१.** सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री. बी. आर. पवार मुख्यलेखा परिक्षक यांच्या प्रती नियुक्तीवरील कालावधीत शासन निर्णय क्र. परसे-१०८७/पक्र/२१३/८७-कोण-३, मंत्रालय मुंबई दि. ९ जुलै १९८७ नुसार एक वर्षाकरिता होता. हा प्रतिनियुक्तावरील कालावधी दि. १०-०८-८८ रोजी संपत आहे.

तरी श्री. बी. आर. पवार, मुख्य लेखा परिक्षक यांच्या सेवेची महानगरपालिका औरंगाबाद करिता आणखी एक वर्षाकरिता आवश्यकता आहे. तरी

प्रिनियक्तीचा कालावधी एक वर्षांनी म्हणजे दिनांक १०-०८-८९ पर्यंत वाढविणेचे मंजुरीस्तव सादर.

**चर्चा** वरील प्रस्तावावर चर्चेत भाग घेतांना स. सौ. लता दलाल यांनी विचारणा केली की, श्री. बी. आर. पवार यांचा कालावधी दि. १०-०८-८८ ला संपला. तेंव्हा हा एक महिण्याचा कालावधी सभागृहाने मान्य केला आहे काय त्याचा खुलासा करण्यात यावा. स. श्री. गिल एकबालसिंग यांनी उप आयुक्तांनी इतरांना प्रतिनियुक्तीवर न बोलावता श्री. पवार यांनाच प्रतिनियुक्तीवर ठेवण्यात यावे असे का लिहिले याचाही खुलासा करावा. मा. उप आयुक्तांनी खुलासा केला की, महाराष्ट्र लेखा विभागाच्या वर्ग-१ च्या कोणत्याही अधिकाऱ्यांची सेवा या पदाकरिता चालू शकते. मात्र महानगरपालिकेचे काम ठप्प होवू नये यासाठी महानगरपालिका सेवेत असलेले श्री. पवार यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाने वाढविण्याचा हा प्रस्ताव आहे. तसेच श्री. पवार यांचा कालावधी १० ऑगस्टला संपला तेव्हाच्या सर्वसाधारण बॅठकीत केवळ स्थायी समिती सभासदांच्या निवडणूकीत एकेच विषय असल्यामुळे हा विषय इतर विषयांबरोबर चर्चेला ठेवता आला नाही.

**ठराव क्र. ३१.** चर्चेनंतर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. बी.आर. पवार मुख्य लेखा परिक्षक यांचा महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाने महणजे दि. १०-०८-८९ पर्यंत वाढवून देण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते. असे ठरले.

**विषय क्र. ३२.** कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांनी प्रस्ताव दिला की, औरंगाबाद शहरातील वितरण व्यवस्थेची पुनर्रचना टप्पा-१ करिता पैशाची आवश्यकता आहे. चालू आर्थिक वर्षाअखेर होणारा अपेक्षित खर्च विचारात घेता खुल्या बाजारातून कर्ज घेणे आवश्यक आहे. त्याकरिता खालीलप्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

"महानगरपालिका औरंगाबाद वरील योजनेच्या कामासाठी खुल्या बाजारातील रक्कम रु. ३२३.१० लक्ष महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिसःरण मंडळाच्या सध्याच्या प्रचलित अटी नियमानुसार एवढे कर्ज पुरवठा करण्यासाठी अर्ज करण्योच या सभेत एकमताने ठरले"

कर्जाच्या अटी खालीलप्रमाणे असून मान्य करण्यात येत आहेत.

१) कर्ज दहा सारख्या वार्षिक हप्त्यात परत करण्यात येईल व कर्जाचा हप्ता दरवर्षी एक जून रोजी देय असेल.
२) उर्वरित कर्जावर व्याजाचा दर हा दरसाल दर शेकडा १२% असेल हा व्याजाचा दर, दर ०.५० पैसे/ रु.१००/- रास असलेल्या गॅरंटी फिसला धरून आहे.
३) व्याज हे दरवर्षी १ जून व १ डिसेंबर रोजी देय असेल.
४) उशिरा परतफेड केलेल्या कर्जावर व व्याजावर २% द.सा.द.शे. जास्तीचे व्याज आकारले जाईल.
५) महानगरपालिका वरील अटी मान्य असल्याचा सर्वसाधारण सभेचा ठराव घेईल.
६) महानगरपालिका मजहाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिसःरण मंडळा बरोबर रु. १०/- च्या स्टँप पेपरवर प्रचलित अटीनुसार कर्ज बद्दलचा करार करेल.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ३२.** स. श्री. कुमावत अविनाश यांची सूचना केली की, पाण्याचा प्रश्न बिकट असल्यामुळे हा ठराव मंजुर करणे योग्य. सभागृहात या सूचनेस सर्व स. सदस्यांनी आपली अनुमती असल्याचे सुचविले. कार्यकारी अभियंता यांनी मांडलेला प्रस्ताव खालीलप्रमाणे सभागृहात सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

कर्जाच्या अटी खालीलप्रमाणे असून मान्य करण्यात येत आहेत.

१) कर्ज दहा सारख्या वार्षिक हप्त्यात परत करण्यात येईल व कर्जाचा हप्ता दरवर्षी एक जून रोजी देय असेल.

२) उर्वरित कर्जावर व्याजाचा दर हा द. सा. द. शे. १२% असेल हा व्याजाचा दर दर ०.५० पैसे/ रु.१००/- रास असलेल्या गॅरंटी फिसला धरून आहे.

३) व्याज हे दरवर्षी १ जून व १ डिसेंबर रोजी देय असेल.

४) उशिरा परतफेड केलेल्या कर्जावर व व्याजावर २% द.सा.द.शे. जास्तीचे व्याज आकारले जाईल.

५) महानगरपालिका वरील अटी मान्य असल्याचा सर्वसाधारण सभेचा ठराव घेईल.

६) महानगरपालिका मजहाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिसःरण मंडळाबरोबर रु. १०/- च्या स्टँप पेपरवर प्रचलित अटीनुसार कर्ज बद्दलचा करार करेल.

**<u>विषय क्र.</u> ३३.** जलनिसःरण अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शिवशंकर कॉलनी गारखेडा येथे ड्रनेज लाईन टाकणेबाबत रक्कम रु. २,८५,१५०/- चे अंदाजपत्रक तयार केले आहे. परंतु नियोजित शहर विकास आराखड्यात सदरील क्षेत्र शैक्षणिक क्षेत्र म्हणून नमूद केलेले आहे. परंतु सदरील किकाणी अनधिकृत वसाहत झालेली आहे. तरी सदरील क्षेत्र रहिवासी क्षेत्र रहिवासी क्षेत्र म्हणून बदलून घेतल्याशिवाय अनिधिकृत वसाहतीत काम करणे हितकारक व नियमानुसार होणार नाही करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्र.</u> ३३.** वरील प्रस्तावावर चर्चेत स. श्री. कुमावत अविनाश यांनी सूचना मांडली की, हा भाग शैक्षणिक असला तरी येथे अनधिकृत बांधकामे होऊन मोठ्या प्रमाणावर हा भाग आता रहिवाशी झालेला आहे. तेव्हा तो रहिवाशी म्हणून जाहीर करावा. स. श्री. मनमोहनसिंग ओबेराय व डॉ. संचेती यांनी विचार मांडले की, या भागात जर ड्रेनेज व पाईप लाईन टाकली तर लोकांना त्याचा फायदा तर मिळेलच पण त्याच बरोबर महानगरपालिकेला उत्पन्नही मिळेल. स. श्री. सावे मोरेश्वर यांनी उप सूचना मांडली की, औरंगाबाद शहरात १९६८ साली जी ड्रेनेज योजना राबविली होती ती आजही अस्तित्वात आहे. बहुतेक ड्रेनेज मध्ये वाळु, माती जाऊन ते बंद पडलेले आहेत. ते ही दुरुस्त करण्यात यावेत. चर्चेनंतर शेवटी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवशंकर कॉलनी, गारखेडा येथे ड्रेनेज लाईन टाकण्याकरिता बनवण्यात आलेल्या रक्कम रु. २,८५,१५०/- च्या अंदाज पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, तसेच सदरचा झोन शैक्षणिक क्षेत्रातून रहिवासी क्षेत्रात बदलण्यासाठी ही मंजुरी दिली जाते. तसा फेरबदल विकास योजनेत करावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> ३४.** भडकलगेट ते मिलकॉर्नर या ३० मि. रुंद रस्त्याचे पूर्वेकडिल रस्त्यात बाधित होणारी जागा यापूर्वी संपादन करण्यात आली असून त्याचा निवाडा ही जाहिर झालेला आहे. तसेच सदर रस्त्याचे पश्चिमेकडील पोलिस अधिक्षक यांचे कार्यालय आणि निवासस्थानामध्ये जी जागा सदर रस्त्यात बाधित होत होती त्या जागेचा ताबाही

घेण्यात आला आहे. आता पश्चिमेकडील सदर रस्त्यात जी जागा बाधित होत आहे ती जागा संपादन केल्यास रेल्वे स्टेशन ते दिल्लीगेट हा रस्ता ३० मि. रुंदीचा होईलच. शिवाय सदर व्ही. आय. पी. रस्ता असल्याने भडकल गेट ते मिलकॉर्नर या रस्त्याचे पश्चिमेकडील (निवाडे जाहिर झालेले आणि सरकारी जागा वगळून) रस्त्यात बाधित होणारी जागा संपादन करण्याची मंजुरी देण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ३४.** प्रस्ताव मा. महापौर यांनी सभागृहापुढे ठेवला चर्चेत स. श्री. चंद्रकांत खैरे यांनी सूचना मांडली की, ही जागा एकदा संपादित केल्यानंतर जर या जागेवर अतिक्रमणे आली तर त्याची जबाबदारी महानगरपालिका अधिकाऱ्यांवर ठेवण्यात यावी. स. श्री. अलफखाँ यांनी सूचित केले की, जागा संपादित करतांनाच जर रोडचे काम व रोडच्या बाजूस पाणी वाहून जाण्यासाठी गटर बांधले तर संभाव्य अतिक्रमणे टाळता येतील. स. श्री. रशिदखाँ मामु यांनी सूचना मांडली की, रस्त्यावर समोरच एक दर्गा आहे तेंव्हा दर्गा सुरक्षित ठेवून पॉवर हाऊसची उपलब्ध जागा ताब्यात घेण्यात यावी. चर्चेनंतर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भडकल गेट ते मिलकॉर्नर या ३० मि. रुंद रस्त्याच्या पशिमेकडील (निवाडे जाहिर झालेली व सरकारी जागा वगळून) रस्त्यात बाधित होणारी जागा संपादन करण्याची मंजुरी सर्वानुमते देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी असे ठरले. तसेच भूसंपादनानंतर लगेच संपादित भुखंड विकसित करण्यात यावा, म्हणजे अतिक्रमणे होणार नाहीत याची दक्षताही घेण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ३५.** **२०** मिटर रस्ता रुंदिकरण खडकेश्वर पुल ते बळवंत मोफत वाचनालय या रस्त्यापैकी सुमारे ८०% जागा संपादन करून रस्त्याच्या विकासही करण्यात आला आहे. परंतु खडकेश्वर पुल ते बळवंत मोफत वाचनालय औरंगपूरा पर्यंत काही मालमत्ता अद्याप संपादन करावयाची आहे. सदर रस्त्यावरील रहदारी लक्षात घेता खडकेश्वर पुले ते बळवंत मोफत वाचनालय, औरंगपुरा या रस्त्यात बाधित होणारी मालमत्ता (यापूर्वी संपादन न केलेल्या) जागा संपादित करण्याची मंजुरी देणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ३५.** सभागृहासमोर प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवल्यानंतर चर्चेत स.श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, संपादित केल्या गेलेल्या जागापैकी कित्येक जागांचा ताबा आजही महानगरपालिकेकडे घेण्यात आलेला नाही. संबंधित जमीन मालकास पैसे देतानांच त्या जागेचा ताबाही महापालिकेकडे घेण्यात यावा या सूचनेस स. श्री. चंद्रकांत खैरे यांनी अनुमोदन दिले. मा. महापौरांनी खुलासा केला की, स. श्री. ओबेराय व श्री. खैरे यांच्या सुचनेवर जरूर विचार केला जाईल. तथापि प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **२४** मिटर रस्ता रुंदीकरणात ज्या मालमत्ता (या पूर्वी संपादन न केलेल्या) बाधित होतात त्या संपादित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

**<u>विषय क्र.</u> ३६.** २४ मिटर रुंद अमरप्रित हॉटेल, जालना रोड ते बीड डायव्हर्शन रोड या रस्त्यापैकी सुमारे ५०% जागा वाटीघाटीने संपादित करण्यात आली असून प्रत्यक्ष रस्ताही तयार करण्यात आला आहे. तसेस अमरप्रित हॉटेल ते जि. के. पाटील यांच्या घरापर्यंत आणि तजमुल हुसेन यांचे स. न. १० ते शहानुरमियाँ दर्गा या रस्त्याची भुमी संपादनाची कार्यवाही यापूर्वीच करण्यात आली असून त्यावर प्रगती पथावर आहे. तेसच बीड

डायव्हर्शन रोड हा पूर्ण झालेला असून त्यावर रहदारी चालू झालेली आहे. आणि सदर रस्त्यास जालना रोडहून जुळणारा हा एकमात्र रस्ता असून शहानुरमियाँ दर्गा ते बीड डायव्हर्शन रोड या रस्त्यात बाधित झालेली जागा संपादन केल्यास अमरप्रित हॉटेल ते बीड डायव्हर्शन रोडपर्यंत हा रस्ता रहदारीच्या दृष्टीने आणि शहानुरमिया दर्गाच्या परिसरात सध्या होत असलेल्या कॉलनीच्या विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. करिता शहानुरमियाँ दर्गा ते बीड डायव्हर्शन रोडपर्यंत रस्त्यात बाधित होणारी जागा संपादन करण्याची मंजुरी देणेबाबत सादर करण्यात येत आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ३६.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे २४ मिटर रुंद शहानुरमियाँ दर्गा ते बीड डायव्हर्शन रोडपर्यंत बाधित होणारी जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ३७.** सुभेदारी गेस्ट हाऊसच्या पूर्वेस मंजूर विकास योजने अंतर्गत आरक्षण क्रमांक ३२ "खुली जागा" महानगरपालिकेने संपादन केली असून प्रत्यक्ष जागेवर कंपाउंड वाल "भागरा" बांधली आहे. परंतु सदर आरक्षणास लागून असलेली आणि ३० मिटर रुंद रस्त्यात बाधित होत असलेली जागा संपादन न केल्यामुळे सदर आरक्षणाचा विकास करणे अडचणीचे झाले आहे. सदर आरक्षणाच्या योग्य विकास होण्यासाठी ३० मिटर रुंद रस्त्यामध्ये आणि दिल्ली गेट वाहतुक बेट (आयलँड) मध्ये बाधित होत असलेली जागा संपादन करणे आवश्यक आहे. करिता उपरोक्त जागा संपादन करण्यास मंजुरी देणेबाबत सादर करित आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ३७.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्रमांक ३२ ला लागून असलेली ३० मिटर रुंद रस्त्यामध्ये बाधित होत असलेली व दिल्ली गेट वाहतुक बेट (आयलँड) मध्ये बाधित होत असलेली जागा आरक्षण क्र. ३२ चा विकास करण्याकरिता संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ३८.** जालना रोड ते इंदिरानगर पर्यंत १८ मी. रुंद रस्ता वाटाघाटीने ताब्यात घेऊन प्रत्यक्ष जागेवर रस्ता तयार करण्यात आला आहे. परंतु इंदिरानगर बायजीपुरा स. न. २७ ते टाकळकर कॉलनीपर्यंत सदर रस्त्याची जागा ताब्यात न घेतल्यामुळे सदर रस्ता पूर्ण झालेला नाही. सदर रस्ता पूर्ण झाल्यास टाकळकर कॉलनी, बायजीपुरा ते जालना रोड हा मार्ग तेथील रहदारीच्या दृष्टीने सोयीस्कर होईल. करिता सदर रस्त्याची शिल्लक राहिलेली जागा इंदिरानगर बायजीपुरा स. न. २७ ते टाकळकर कॉलनी बायजीपुरा या १८ मिटर रुंद नियोजित रस्त्यात बाधित झालेली जागा संपादन करण्याचे मंजुरीस्तव सादर करीत आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ३८.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाकळकर कॉलनी ते बायजीपुरा ते जालना रोड हा मार्ग रहदारीच्या दृष्टीने सोयीस्कर व्हावा म्हणून इंदिरानगर बायजीपुरा स. न. २७ ते टाकळकर कॉलनीपर्यंत या नियोजित १८ मिटर रुंद रस्त्यात बाधित होणारी जागा संपादन करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय</u> ३९.** भावसिंगपुरा गावठाण, भावसिंगपुरा झोपडपट्टी, नंदनवन कॉलनी, न्यु शांतीपुरा, शांतीपुरा वस्ती आणि परिसरांच्या नागरिकांना येण्याजाण्यासाठी महानगरपालिकेचा अधिकृत रस्ता अस्तित्वात नाहीृ सदर परिसरातील लोकांना सध्या अस्तित्वात असलेल्या कॅन्टोनमेंट बोर्डाच्या रस्त्याचा वापर करावा लागतो. सदर लोकांची गैरसोय दूर करण्यासाइी मंजूर विकास योजनेतील १५ मि. रुंद नियाजित रस्ता न्यु. शांती निकेतन कॉलनी ते मराठवाडा विद्यापीठ मुख्य रस्त्यापर्यंत मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज या रस्त्यात बाधित झालेली जागा संपादन करण्याचे मंजुरीस्तव सादर करण्यात येते. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ३९.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा गावठाण. भावसिंगपुरा झोपडपट्टी, नंदनवन कॉलनी, न्यु शांतीपुरा वस्ती आणि परिसराच्या लोकांना येण्या जाण्यासाठी महानगरपालिकेचा अधिकृत रस्ता मिळावा यासाठी मंजूर विकास योजनेतील १५ मि. रुंद रस्ता न्य शांती निकेतन कॉलनी ते मराठवाडा विद्यापीठ मुख्य रस्त्यापर्यंत मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज या रस्त्यात बाधित झालेली जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ४०.** मंजुर विकास योजना अंतर्गत १५ मी. रुंद जालना रोड ते मोतीकारंजा दर्गा मार्गे अभिनय टॉकिज पर्यंतचा रस्ता संपादन करून प्रत्यक्ष जागेवर रस्त्याचा विकासही करण्यात आला आहे. परंतु मोतीकारंजा दर्गा नाला ते मोतीकारंजा मुख्य रस्ता यामध्ये सुमारे चार मिळकती संपादन केल्यास मोतीकारंजा दर्गा ते जालना रोडपर्यंत रस्ता तयार होईल आणि सध्या मोंढा व जाफरगेट रस्त्यावरील असलेली रहदारी बहुअंशी कमी होईल. करिता सदर रस्ता पूर्ण होण्यासाठी मोतीकारंजा नाला ते मोतीकारंजा दर्गा मुख्य रस्त्यापर्यंत बाधित होणारी जागा संपादन करण्याचे मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ४०.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोंढा व जाफरगेट रस्त्यावरील रहदारी कमी व्हावी यासाठी मोतीकारंजा नाला ते मोतीकारंजा दर्गा मुख्य रस्त्यापर्यंत विकास योजने अंतर्गत १५ मी. रुंद रस्त्यात बाधित होणाऱ्या मिळकती संपादित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ४१.** खडकेश्वर पुल ते एम.पी. लॉ कॉलेज या मंजुर विकास योजनेतील १५ मि. रुंद रस्त्यापैकी सुमारे ७० ते ८० टक्के जागा संपादित करण्यात आली असून रस्त्याचा विकासही करण्यात आला आहे. शिवाय स्वातंत्र्य सैनिक कॉलनी जवळील पुलाचे बांधकामही जवळपास पूर्ण झालेले आहे. परंतु नागेश्वर मंदिराच्या मागील सदर रस्त्यात बाधित होणारी काही मालमत्ता अद्याप संपादन झालेल्या नाहीत. जर सदरील रस्त्यामधील मिळकती संपादित झाल्यास खडकेश्वर पुल ते एम. पी. लॉ कोलजे हा रहदारीच्या दृष्टीने उपयुक्त रस्ता होईल. शिवाय बलवंत मोफत वाचनालय ते एम. पी. लॉ कॉलेज या रस्तयावरील रहदारी मोठ्या प्रमाणात कमी होईल. करिता १५ मी. रुंद नियोजित रस्ता स्वातंत्र्य सैनिक कॉलनी (नागेश्वरवाडी) ते खडकेश्वर पुल पर्यंतचा रस्त्यात बाधित जागा संपादन करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ४१.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूर विकास योजनेतील १५ मी. रुंद रस्ता स्वातंत्र्य सैनिक कॉलनी (नागेश्वरवाडी) ते खडकेश्वर पुल या रस्त्यात बाधित होणारी मालमत्ता / जागा संपादन करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ४२.** सिडको एम.आय.डि.सी. चिकलठाणा, नारेगांव चिकलठाणा गांव आणि इतरत्र ठिकाणी जाण्यासाठी शहागंज ते रोशनगेट हा सिटी बसचा मार्ग असून तसेच सदरील परिसरातील नागरिकांचा हा येण्या-जाण्याचा एकमेव मार्ग असल्याने त्या ठिकाणी रहदारी जास्त आहे. शिवाय चंपा मस्जिद ते रोषनगेट हा सध्या अस्तित्वात असलेला रस्ता पुरेसा नसल्याने सदर ठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब सदर रस्ता बंद करणे आवश्यक आहे. करिता १२ मी. रुंद चंपा मस्जीद शहाबाजार ते रोषनगेट या रस्त्यात बाधित होणारी जागा संपादन करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ४२.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको, एम. आय.डी.सी. चिकलठाणा, नारेगांव चिकलठाणागांव आणि इतरत्र ठिकाणी जाण्यासाठी शहागंज ते रोषनगेट हा सिटी बसचा मार्ग असून सदर परिसरातील नागरिकांचा हा येण्याजाण्याचा एकमेव मार्ग आहे. करिता चंपा मस्जीद शहाबाजार ते रोषनगेट हा सध्या अस्तित्वात असलेला रस्ता पुरेसा नसल्याने १२ मी. रुंद चंपा मस्जीद शहाबाजार ने रोषनगेट या रस्तयात बाधित होणारीजागा संपादन करण्याण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ४३.** औरंगपुरा माजीमंडई येथील पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून औरंगपुरा ते देना बँक या रस्त्यामध्ये बाधित होणारी काही मिळकतीचा ताबा घेवून रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. परंतु औरंगपुरा ते नेहरू भवन या रस्त्यात आणखी काही मालमत्ता ताब्यात न घेतल्यामुळे सदर रस्ता सध्या रहदारीसाठी उपयोगी पडत नाही. नेहरू भवन ते ते हायकोर्टपर्यंत हा सरळ रस्ता असल्याने त्या रस्त्याचे जास्त महत्त्व आहे. जर सदर १२ व १५ मीटर रुंद रस्त्यात बाधित होणाऱ्या मिळकती संपादन केल्याने सदर रस्ता रहदारीस उपयुक्त ठरेल. करिता सदर रस्त्यात शिल्लक राहिलेली आणि रस्त्यात बाधित होणारी जागा संपादन करण्याचे मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ४३.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपुरा ते नेहरूभवन या १२ व १५ मिटर रुंद रस्त्यात बाधित होणरी जागा संपादित करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ४४.** १२ मिटर रुंद रस्ता किराणा चावडी पोलिस चौकी ते चौराह या रस्त्याची भुमी संपादनाची कार्यवाही प्रगती पथावर आहे. तसेच उपरोक्त प्रस्ताव क्र. १७ नुसार मोतीकारंजा नाला ते मोतीकारंजा मुख्य रस्त्यापर्यंत या रस्त्याची भुमी संपादनाची कार्यवाही करण्याचे योजिले आहे. तसेच सुभेदारी गेस्ट हाऊस ते मंजुरपुरा (ड्रीमलँड लॉज) पर्यंत हा रस्ता पूर्वीच तयार करण्यात आला आहे. सुभेदारी गेस्ट हाऊस ते जालना रोड मार्गे शहागंज (गांधी पुतळा) चौराह, मोतीकारंजा, रोकडिया हनुमान कॉलनी हा महत्त्वपूर्ण रस्ता तयार करण्यासाठी या रस्त्यात राहिलेली चौराह ते मोतीकारंजा येथील बाधित होणारी मालमत्ता संपादन करणे आवश्यक आहे. आणि तो संपादित केल्यानेच सदर रस्ता उपयुक्त

ठरेल. करिता सदर रस्त्यात राहिलेली चौराह ते मोतीकारंजा या रस्त्यात बाधित होणारी मालमत्ता संपादन करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ४४.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १२ मिटर रुंद सुभेदारी गेस्ट हाऊस ते जालना रोड मार्गे शहागंज (गांधीपुतळा) चौराह मोतीकारंजा, रोकडिया हनुमान कॉलनी हा महत्त्वपूर्ण रस्ता तयार करण्यासाठी चौराह ते मोतीकारंजा या रस्त्यात बाधित होणारी मालमत्ता संपादित करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ४५.** औरंगाबाद महानगरपालिकेचे दुकान केंद्र सध्या महानगरपालिकेच्या विश्रामगृहात (पूर्वेस) आहे. तसेच सदर दुकान केंद्रासमोर महानगरपालिकेने दुकान केंद्र बांधण्यासाठी जागा संपादित केली असून सदर ठिकाणी दुकान केंद्र बांधण्यासाठी कार्यवाही चालू आहे. तसेच महानगरपालिकेच्या विश्रामगृहाच्या दुकान केद्रास लागून रेल्वे स्टेशन परिसरातील भाजी मंडई महानगरपालिकेने बांधलेली आहे. त्यामुळे सदर ठिकाणी अस्तित्वात असलेला रस्ता पुरेसा नाही. तसेच त्या ठिकाणच्या दुकानदाराची सदर रस्ता रुंद करण्याची मागणी आहे. वरील सर्व परिस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेच्या १२ मिटर रुंद रस्त्यात रेल्वेस्टेशन भाजी मंडई ते श्री. अब्दुल अजिज कॉन्ट्रक्टर यांच्या घरापर्यंत बाधित होणारी सर्व मालमत्ता संपादन करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ४५.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टशन भाजी मंडई ते अब्दुल अजिज कॉन्ट्रक्टर यांच्या घरापर्यंत १२ मिटर रुंद रस्त्यात बाधित होणाऱ्या मालमत्ता संपादित करण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ४६.** शहराच्या दाट लोकवस्तीच्या दृष्टीने नारळीबाग आणि परिसराचे क्षेत्र जवळजवळ मध्यभागी आहे. तसेच शहराच्या दाट लोकवस्तीच्या दृष्टीने सर्व नागरिकांना जवळ आणि सोयीस्कर होईल. आणि मध्यभागी राहिल असा एकही बगीचा, खेळाचे मैदान, पार्किंग इ. सध्या अस्तित्वात नाही. ही कमी दूर करण्यासाठी शासनाने मंजुर विकास योजनेत खेळाचे मैदान, बगीचा इ. ची तरतूद केली आहे. तसेच शासनाने नुकतेच घेतलेला निर्णय क्र. टीपीएस/३०८१/६००/ सीआर-५५/युडी-६, दिनांक १८ ऑगस्ट ८७ अन्वये वरील आरक्षण किरकोळ फेरबदल करून खालील आरक्षणे व त्यात असलेल्या निरनिराळ्या रुंदीचे नियोजित रस्त्याची मंजुरी दिलेली आहे. सदर क्षेत्र दाट लोकवस्तीच्या मध्यभागी असल्याने शिवाय शहराच्या मुख्य बाजारपेठेजवळ असल्याने लोकांच्या आवश्यक गरजेच्या पूर्ततासाठी आणि सदर ठिकाणी होत असलेल्या अनाधिकृत बांधकामास आळा घालण्यासाठी आणि सदर आरक्षणे आणि रस्त्याची जागा संपादन केल्याने झालेल्या बेघरांसाठी पुनर्वसनाच्या दृष्टीने याची ठिकाणी २.३८ हेक्टर (सुमारे ५ एकर २ गुंठे) जागा राखून ठेवल्याने तेथील बाधित लोकांचा पुनवर्सनाचा प्रश्न निर्माण होणार नाही. तसेच सदर क्षेत्र शहराच्या दाट लोकवस्तीच्या मध्य ठिकाणी असल्याने सदर क्षेत्राचा पर्यावरणाच्या दृटीने विकास होणे आजच्या काळाची गरज आहे. या सर्व बाबींचा विचार केल्याने सदर आरक्षणे आणि त्यास लगत असलेल्या रस्त्यांची बाधित झालेली जागा संपादन करणे आवश्यक असल्याने आ.क्र.१०/अ,१३/अ,१३/ब, १४/अ ची जागा बेघरांसाठी घरे बांधण्यासाठी आ.क्र.१३/क (भागशः) मुलांसाठी खेळाचे मैदान, आ.क्र.१२/ई पार्कींग, आ.क्र.१४ बगीचा व

खेळाचे मैदान तसेच या सर्व आरक्षणात असलेले संलग्न रस्त्यात बाधित झालेल्या जागेचे भुमी संपादन करण्याची मंजुरीसाठी सादर.

**ठराव क्र. ४६.** प्रस्तावात दर्शविल्यानुसार सहाय्यक संचालक नगर रचना यांनी सदरील भागाचा नकाशा सभागृहास दाखविला. सदरील नकाशा पाहिल्यानंतर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.१०/अ, १३/अ, १३/ब, १४/अ ची जागा विकास योजनेच्या अंमलबजावणीमुळे बेघर होणाऱ्यांकरिता घरे बांधण्यासाठी, आ. क्र. १३/क (भागशः) मुलांसाठी खेळाचे मैदान, आ.क्र. १३/ई पार्किंगसाठी आ.क्र. १४ बगीचा व खैळाचे मैदान तसेच या सर्व आरक्षणात असलेले संलग्न रस्त्यात बाधित झालेल्या जागेचे भूसंपादन करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.
(दुरुस्त ठराव क्र. ४६ पान नं. ३० वर पहावे)

**विषय क्र. ४७.** अर्जदार श्री. आर. पी. नाथ यांनी त्यांच्या मालकीची असलेली मोहल्ला गारखेडा येथील स. न. ५०, ५१, ५२, ५३/१, यामध्ये मंजुर विकास योजनेचे प्रस्ताव आहेत आणि सदर विकास योजनेस १० वर्ष पूर्ण झाल्यानंतरही मनपाने उपरोक्त प्रस्तावांचा विकास न केल्याने त्या संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२७ अन्वये महानगरपालिकेत दि.०६-०७-८८ रोजी वरिल प्रस्तावाने बाधित होणारी जागा वाटाघाटीने संपादन करण्याबाबत नोटीस दिली आहे. उपरोक्त कलमानुसार नोटीसच्या तारखेपासून सहा महिण्याच्या आंत नोटीसमध्ये नमूद केलेले सर्व्हे नंबर मधील मंजुर विकास योजनेच्या प्रस्तावांची भूमी संपादनाची कार्यवाही भूसंपादन कायद्यानुसार किंवा वाटाघाटीने संपादन करणे आवश्यक ठरते. मुदतीच्या आंत जर वरील दोन्हींपैकी एकही कार्यवाही न केल्यास वरील विकास योजनेच्या प्रस्तावाने बाधित झालेली जागा आपोआप प्रस्तावातुन वगळून रहिवास विभागात सामिल होते. अर्जदाराच्या नोटिसमध्ये उल्लेख केलेल्या जागेत आ.क्र.१६२ प्राथमिक शाळा व खेहाचे मेदान (भागशः) आरक्षण क्र. १६० खुली जागा (भागशः) आ.क्र.१६६ दुकान केंद्र (भागशः) आरक्षण क्र. १६१ हायस्कूल आणि खेळाचे मैदान (भागाशः) तसेच १५,२४ आणि ४५ मिटर रुंद रस्त्यात बाधित होत आहे. तसेच अर्जदाराची जागा वरिल विकास प्रस्तावाने अंशतः बाधित होत असल्याने आणि त्याच हद्दिपर्यंत जागा संपादन केल्याने उद्देशाची पूर्तता होत नाही. तसेच गारखेडा आणि त्याच परिसरातील झपाट्याने होत असलेला विकास आणि तेथील नागरिकांची गरज लक्षात घेता अर्जदाराची जागा ज्या प्रस्तावाने बाधित होते तो संपूर्ण आरक्षणाची जागा त्यास असलेल्या संलग्न रस्त्यासह संपादन करणे जरूरीचे वाटते. करिता आ.क्र.१६० खुली जागा, आ.क्र. १६१ हायस्कूल व खेळाचे मैदान आ.क्र.१६४ आरोग्य केंद्र आ.क्र.१६५ वाचनालय, आ.क्र.१६६ दुकान केंद्र या सर्वांची जागा संपादन करण्याच्या (वाटाघाटाने किंवा भूमी संपादनाने याच्या खुलाशासह) मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. ४७.** प्रस्तावानंतर चर्चेत स. श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी सूचना मांडली की, भुसंपादनाची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्या मार्फत केली तर वेळ बराच लागेल. तेव्हा मनपाने स्वतःच भुसंपादनाची कार्यवाही करावी. गारखेडा आणि त्या परिसरातील झपाट्याने होत असलेली विकास आणि तेथील लोकांची गरज लक्षात घेता प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन.न. ५०,५१,५२,५३/१ मधील आ. क्र. १६० खुली जागा, आ.क्र. १६१ हायस्कूल व खेळाचे मैदान, आ.क्र.१६४ आरोग्य केंद्र, आ.क्र.१६५ वाचनालय, आ.क्र.१६६ दुकान केंद्र यासाठी जागा खाजगी तडजोडीने आणि जागेच्या मालकीबाबत वाद

नसल्यास आणि मनपा ठरविल ती किंमत संबंधित जमीन मालकास मान्य असल्यास संपादित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ४८.** महापालिकेने मो. पडेगांव येथे सरकारी जागेत कत्तलखान्याचे स्थलांतर केले आहे. तसेच त्या ठिकाणी तात्पुरती व्यवस्था करून कत्तलखानाही सुरू केलेला आहे. परंतु नाशिक रोडकडून कत्तलखान्यापर्यंत सध्या रस्ता नाही त्यामुळे कत्तलखान्याशी संबंधित असलेल्या लोकांना सध्या रस्ता अस्तित्वात नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे. तसेच पडेगांव येथील पावर हाऊसपर्यंत सुमारे १२ मी. रुंदीचा डांबरी रस्ता उपलब्ध आहे. सदर रस्त्यापासून कत्तलखान्यापर्यंत स. नं. ८ ही खाजगी जागा वगळाता बाकीची जागा महापालिकेस हस्तांतर केलेली सरकारी जागा आणि हस्तांतर न केलेली ग. नं. ९ ही सरकारी जागा उपलब्ध असल्याने स. नं. ८ ह्या खाजगी जागेखेरीज इतर जागेवर रस्ता तयार करणे अडचणीचे नाही. परंतु ग. नं. ८ मधील रस्त्यासाठी जागा संपादन करणे अत्यावश्यक आहे. करिता नाशिक रोडकडून कत्त्लखाण्यापर्यंत १२ मिटर रुंद रस्ता तयार करण्यासाठी (नॉन डि.पी.) ग.न. ८ मधील रस्त्यात बाधित होणाऱ्या जागा सदर रस्ता त्वरेने पूर्ण होण्यासाठी वाटाघाटीने संपादन करणे उचित राहील. तरी ग. नं. ८ मधील रस्त्याची जागा वाटाघाटीने किंवा भुमी संपादनाने संपादन करावी याच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ४८.** प्रस्तावावर चर्चेत स. श्री. कुमावत अविनाश यांनी निदर्शनास आणून दिले की, जुन्या कत्तलखाण्यात अद्यापही जनावरांच्या कत्तली होतात. तेव्हा ही जुनी इमारतच पाडून टाकण्यात यावी. स.सौ. लता दलाल यांनीही या मतास अनुमोदन दिले. स. श्री. अलफखाँ यांनी सूचना मांडली की, या जुन्या जागेत शाळा सुरू करण्यात यावी. व यासाठी कुरेश जमातीतील लोकांशी बोलणी करण्यात यावी. या सुचनेस स. श्री. रशिदखॉ मामु व श्री. पेरकर यांनी आपली अनुमती दर्शविली.

शेवटी चर्चेनंतर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाशिक रोडकडून कुत्तलखाण्यापर्यंत १२ मिटर रुंद रस्ता तयार करण्यासाइी (नॉन डी. पी.) ग. न. ८ मधील रस्त्याची जागा संपादन करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ४९.** महानगरपालिका अंतर्गत सर्व हॉटेल्स यांची पाहणी करून त्यांना ए,बी,सी,डी प्रकारची श्रेणी देवून हॉटेल्सचे वारंवार निरिक्षण होवून स्वच्छता व इतर बाबतीत नियत्रंण राहण्याबाबत.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे
अनुमोदक - श्री. मोतीराम घडामोडे.

**<u>ठराव क्र.</u> ४९.** वरील प्रस्तावावर चर्चेत भाग घेतांना स. श्री. मोतीराम घडामोडे विचार मांडले की, औरंगाबाद शहर हे आज मराठवाड्याची राजधानी असलेले शहर आहे. तेव्हा प्रत्येक हॉटेलला ग्रेड देण्यात यावेत. श्री. अलफखाँ यांनी सूचना मांडली की, शॉप ॲक्टप्रमाणे सर्व हॉटेल्सवर शासनाचे नियंत्रण आहे, महानगरपालिकेचे नाही. त्यामुळे हा प्रस्ताव बरोबर नाही. स. श्री. अजीज जहागिरदार यांनी सूचना मांडली की, लायसन्सींग ॲथॉरिटी मनपा नसल्यामुळे आपणास असे ग्रेड देवून हॉटेल्सवर योग्यरित्या नियंत्रण ठेवता येणार नाही. यावर स. श्री. चंद्रकांत खैरे यांनी उपसूचना मांडली की, मनपाने याबाबत आपली स्वत:ची नियमावली बनवावी. शॉप ॲक्ट मनपाकडे आल्यानंतरच या ठरावावर

विचार करणे जास्त योग्य राहिल असे विचार स. श्री. अलफखॉ यांनी मांडले तेंव्हा हा ठराव राखून ठेवावा अशी सूचना स. श्री. चंद्रकांत खैरे यांनी मांडली.

चर्चेनंतर हॉटेल्सना परवाना देण्याचे अधिकार महापालिका नसल्यामुळे आपण हॉटेल्सना ग्रेड देवू शकणार नाही. ही बाब शासनाच्या अधिकारातील आहे म्हणून सर्वानुमते हा प्रस्ताव फेटाळण्यात येतो.

**विषय क्र. ५०.** महापालिकेचे सर्व मालमत्ता कराचे प्रकरणे जे जे काही कोर्टात रेगाळत पडलेले आहेत ते ताबडतोब निकाली कसे काढता येतील व दुसऱ्या पध्दतीने ते कसे सोडविता येतील यासाठी एक सुसुत्रता आणण्याकरिता एक समिती नेमावी व सर्व कोर्टातील प्रकरणे लवकरात लवकर कसे संपतील याबाबत.

सुचक - श्री. कचरू नवपुते
अनुमोदक - श्री. मोतीराम घडामोडे

**ठराव क्र. ५०.** वरील प्रस्तावावर स. श्री मोतीराम घडामोडे यांनी प्रतिपादित केले की, स्थायी समितीत मा. आयुक्तांनी निवेदन केले होते की, सध्या कोर्टात एक कोटी रुपयांच्या मालमत्ता कराबाबत प्रकरणे चालू आहेत. तेव्हा या प्रकरणात एक समिती नेमून सामोपचाराने ही प्रकरणे मिटवावीत. स. श्री. अजिज जहागिरदार यांनी सूचना मांडली की, समझोता न्यायालयातच करण्यात यावा यावर मा. महापौरांनी संबंधिताशी विचार विनिमय करून नंतर निर्णय घेण्यात येईल अशी घोषणा केली.

**विषय क्र. ५१.** पूर्वी मुंबई दुकाने व आस्थापने कायदा १९४८ खालील प्रत्येक दुकानाचे नुतनीकरण परवाना नगरपालिका अंतर्गत होता. परंतु जून १९८१ मध्ये हा कायदा शासकीय कामगार विभागाकडे समाविष्ट करण्यात आला.

सध्या या कायद्यामधील परवाने व निरिक्षणाचे कार्य मुंबई महापालिकेत चालूच असून अजुनही इतर महानगरदपालिकेत हा कायदा समाविष्ट आहे. मग आपल्या महानगरपालिकेतर्फे सुध्दा या कायद्याची अंमल बजावणी झाली पाहिजे. या बाबत आपण शासनांशी चर्चा करून योग्य निर्णय घेणे बाबत. कारण ह्या अशा १७००० दुकानांशी महापालिकेचा प्रत्यक्ष संपर्क राहील व परवाना फिसद्वारे महापालिकेस उत्पन्न मिळेल.

सुचक : मोरेश्वर सावे
अनुमोदक : चंद्रकांत खैरे
दिनांक : १३-०९-८८

**ठराव क्र. ५१.** प्रस्तावावर चर्चेत भाग घेतांना स. श्री. सावे यांनी खुलासा केला की, दुकाने परवाना व परवाना नुतनीकरण या गोष्टी जर महापालिकेच्या कार्यक्षेत्रात आल्या तर महापालिकेचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढ होण्यास मदत होईल. स. श्री. अजिज जहागिरदार व स. श्री. अलफखॉं यांनीही सूचना मांडली की, महापालिकेचे उत्पन्न वाढावे यासाठी व परवाना नुतनाकरणावरती योग्यरित्या देखरेख ठेवता यावी यासाठी हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

चर्चेनंतर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई दुकाने व आस्थापने कायदा १९४८ खालील दुकानाचे परवाना नुतनीकरणाचे अधिकार महापालिकेस मिळावेत यासाठी शासनाशी पत्रव्यवहार करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५२.** इतर महानगरपालिकेप्रमाणे महापालिकेतील मुख्य नेत्यास म्हणजे १) सभागृह नेता, २) विरोधी पक्ष नेता यांना सर्व ज्या ज्या प्रकारची सोय (फॅसिलिटी) देण्यात यावी व त्याचप्रमाणे दोन्ही नेत्यांस दोन वाहने (कार) लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावे याबाबत.

सुचक - सौ. लता दलाल
अनुमोदक - एकबालसिंग गिल
दिनांक - १३-०९-८८

**ठराव क्र. ५२.** वरील प्रस्तावावर मा. उप महापौरांनी सूचना मांडली की, अन्य महापालिकेतील सभागृह नेत्यास व विरोधी पक्ष नेत्यास अशा प्रकारच्या सवलती देण्यात आलेल्या आहेत काय याची माहिती मागवून घ्यावी. स. सौ. दलाल म्हणाल्या की, वाहने मिळाली तर विरोधी पक्ष नेत्यास व सभगृह नेत्यास शहरांच्या विविध भागांना भेटी देता येतील तसेच विकास विषयक कामांची पण पाहणी करता येईल.

चर्चेनंतर अर्थसंकल्पातील तरतूद पाहुन व मा. आयुक्तांशी चर्चा करून येत्या ८-१० दिवसांत निर्णय घेतला जाईल व तसे स. सभासदांना कळविले जाईल असे मा. महापौरांनी जाहीर केले.

**विषय क्र. ५३.** मोंढा नाका चौक (सिंधी कॉलनी) या चौकास श्री संत कवराराम चौक नांव देण्याबाबत.

सुचक - प्रदिप दत्त
अनुमोदक - अविनाश कुमावत

**ठराव क्र. ५३.** रस्त्यांना व चौकांना नावे देण्याबाबत एक समिती नियुक्त करण्याचे ठरले आहे. त्यासमितीत याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५४.** माजी नगरसेविका सौ. शकुंतला बोरसे यांचे दिनांक ०३-०९-८८ रोजी दु:खद निधन झाले. त्यांना श्रध्दाजंली अर्पण करणेबाबत.

सुचक - विठ्ठल पेरकर
अनुमोदक - अजिमखान दादामिया
दिनांक - १३-०९-८८

**ठराव क्र. ५४.** सभेच्या सुरुवातीसच स्व. कवी श्री. कमर इकबाल व माजी नगरसेविका सौ. शकुंतलाबाई बोरसे यांना दोन मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली वाहण्यात आली आहे.

**विषय क्र. ५५.** बलवंत मोफत वाचनालय चौक यास "महात्मा फुले चौक" नांव देण्याबाबत व त्या चौकापासून ते नविन रोड देना बँकेपर्यंतच्या रस्त्यास "महात्मा फुले रोड" नामकरण करण्याबाबत.

सुचक - चंद्रकांत खैरे
अनुमोदक - मोरेश्वर सावे
दिनांक - १३-०९-८८

**ठराव क्र.** ५५. रस्त्यांना व चौकांना नावे देण्याबाबत जी समिती स्थापन करण्यात येणार आहे ती समिती याबाबत निर्णय घेईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.** ५६. शहागंज येथील ठोक भाजीपाल्याचे मार्केट तेथून हठविण्यात यावे. कारण त्यामुळे रहदारीस फार अडथळा होतो. कोणत्याही प्रकारचे उत्पन्न माहापालिकेला त्या भाजीपाला ठोक मार्केटकडून प्राप्त होत नाही. तेंव्हा ते मार्केट तेथून हटविण्यात यावे.

सुचक - नारायण मोहन
अनुमोदक - विठ्ठल पेरकर
दिनांक - १३-०९-८८

**चर्चा** प्रस्तावावर चर्चेत स. श्री. अलफखॉ यांनी खुलासा केला की, पूर्वी साईट नं. ४६ ची जागा भाजी मार्केटसाठी संपादित केलेली होती. पूर्वी असेही ठरले होते की, या जोगेवर अद्यावत मार्केट बनविण्यात यावे. हे मार्केट येथून हटवू नये. यावर स. श्री. नारायण मोहन यांनी सूचना मांडली की, फक्त ठोक भाजीचे मार्केटच येथून हटविण्यात यावे. चिल्लर मार्केट तेथेच असू द्यावे स. श्री. अलफखॉ यांनी सूचना मांडली की, मार्केट कमिटी मार्केट यार्ड बनविणारच आहे. तेव्हा मार्केट यार्ड बनेपर्यंत हे मार्केट येथेच असू द्यावे. स. श्री. अजिजउल्ला बेग यांनी सूचना मांडली की, शहागंज मधून हे भाजी मार्केट हठवून इतरत्र नेण्यात आले तर भाज्यांचे भाव वाढतील व त्याची झळ गोरगरिबांनाच बसेल. स. श्री. घडामोडे यांनी सूचना मांडली की, बरेचसे व्यापारी सिडकोत हे मार्केट घेऊन जाण्यास तयार आहेत. तेव्हा सिडकोत एखादी जागा बघण्यात यावी. मा. उपमहापौरांनी सूचना मांडली की, ठोक व्यापारी पण नविन मार्केटमध्ये जाण्यास तयार आहेत. पण तेथे सर्व सुविधा नसल्यामुळे ते नविन जागेत जात नाहीत. तेव्हा मार्केट कमिटीस विनंती करनण्यात यावी की, त्यांनी भाजी मार्केटसाठी लागणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. स. श्री. सावे यांनी सूचविले की, मार्केट कमिटी बरोबर पत्रव्यवहार करत असतांना त्यांना या कामासाठी वेळेचे बंधनही घालून देण्यात यावे.

**ठराव क्र.** ५६. चर्चेनंतर शेवटी मार्केट कमिटीकडे एक चार किंवा पाच सदस्यांचे शिष्टमंडळ पाठवून प्रकरणात निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.** ५७. सिल्लेखाना जवळ पंजाब व सिंध बँक चौकास "शिवाजी चौक" म्हणून यापूर्वीच मा. माजी मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे हस्ते त्यावेळी घोषित करण्यात आले होते. तरी सुध्दा महापालिके तर्फे अधिकृत घोषित करून त्या चौकास "शिवाजी चौक" म्हणून व त्या चौकापासून ते लक्ष्मण चावडी (जाफरगेट) पर्यंत रस्त्यास "शिवाजी रोड" नांव देण्यात यावे.
सुचक - विठ्ठल पेरकर
अनुमोदक - सुदाम वाघमारे
दिनांक - १३-०९-८८

**<u>ठराव क्र.</u> ५७.** रस्त्यांना व चौकांना नावे देण्याबाबत जी समिती स्थापन करण्यात येणार आहे ती समिती याबाबत निर्णय घेईल असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> ५८.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३० व औरंगाबाद महानगरपालिका नियम क्र. ६७ अन्वये विशेष समिती स्थापन करण्याचे प्रस्ताव स. श्री. अलफखाँ यांनी सुचविले असता त्यात चार समित्या १७-०९-८८ च्या सभेच्या अजेंडामध्ये दिल्या आहेत.

तरी नियम क्र. ६७ प्रमाणे ६ समित्या स्थापन करणे व बाकी दोन्ही समित्यांची कार्यकक्षा निश्चित करणे, बाकी दोन समित्या खालीलप्रमाणे

१) विधी समिती
२) शहर सुधार समिती

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | अजिजउल्ला बेग |
| अनुमोदक | - | एकबालसिंग गिल |
| दिनांक | - | १४-०९-८८ |

**<u>ठराव क्र.</u> ५८** मा. महापौरांनी खुलासा केला की, या मुद्यावर अगोदरच चर्चा झालेली आहे व समित्याचे कार्यक्षेत्र व त्यांचे अधिकार ठरविण्यासाठी प्रथम एक समिती निर्माण करावी असे ठरले आहे करिता सदरील प्रस्तावाची आवश्यकता वाटत नाही असे ठरले.

**<u>विषय क्र.</u> ५९.** एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या हस्ते किंवा मंत्र्याच्या हस्ते उस्मानपुरा येथील संत एकनाथ रंगभुमीच्या वास्तुचे उद्घाटन करण्याचा अट्टाहास सोडून द्यावे व हे पूर्ण झालेले नाट्यगृह जनतेसाठी खुले करावे व औरंगाबादच्या जनतेला मनोरंजनाचा आनंद लुटू द्यावा.

उद्घाटनासाठी साहित्यीक कलाप्रेमी व नाटकाचि जाण असणारी व्यक्ती बोलवावी.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | सौ. लता दलाल |
| अनुमोदक | - | श्री. केशव सोनवणे |
| दिनांक | - | १२/०९/८८ |

**<u>चर्चा</u>** वरील प्रस्तावावर चर्चेत भाग घेतांना सौ. दलाल यांनी सुचित केले की, संत एकनाथ नाट्यगृह ही वास्तु आज सुसज्ज स्वरुपात असून फक्त या वास्तुचे उद्घाटन न झाल्यामुळे आपण येथे आज कोणतेही कार्यक्रम घेवू शकत नाही. तेव्हा केवळ मंत्र्याच्याच हस्ते उद्घाटनाचा हट्ट न धरता पु. ल. देशपांडेसारखे साहित्यीक नाटककार यांना बोलावून या वास्तुचे उद्घाटन करण्यात यावे. तसेच उद्घाटन सभारंभासाठी आयोजित केलेल्या संयोजक समिती सदस्यांनी आपण आपल्या पदांचे राजीनामे दिलेले आहेत. तेव्हा उद्घाटनानिमित्त स्थापन होणाऱ्या समितीत लोकप्रतिनिधींना ही स्थान देण्यात यावे अशी सूचना स. श्री. नरेंद्र पाटील यांनी केली. स. श्री. ओबेराय यांनी खुलासा केला की, अद्यापही ही वास्तु तशी पूर्ण झालेली नाही. बाहेरील रोडचे काम अद्यापही चालू आहे. तेव्हा उद्घाटन हे केवळ एखाद्या व्यक्तींसाठी रुकलेले नाही.

स. श्री. चंद्रकांत खैरे यांनी सूचना मांडली की, शहराचे प्रथम नागरिक या नात्याने मा. महापौरांच्या हस्तेच या वास्तुचे उद्‌घाटन करण्यात यावे. राजकारण्यांनी कलेच्या क्षेत्रात लुडबूड करू नये. या स. श्री. घडामोडेंच्या विधानास स. श्री. नरेंद्र पाटील व स. श्री. ओबेराय यांनी जोरदार आक्षेप घेतला. स. श्री. घडामोडे त्यांनी त्यांचे शब्द मागे घ्यावेत अशीही त्यांनी मागणी केली. स. श्री. सावे यांनी मा. महापौरांना विनंती केली त्यांनी लवकरात लवकर उद्‌घाटनाची तारीख जाहिर करावी.

**ठराव क्र. ५९.** चर्चेनंतर मा. महापौरांनी सुचविले की, मा. मुख्यमंत्री श्री. शरदरावजी पवार हे २९ सप्टेंबर ८८ रोजी संत एकनाथ रंगमंदिराचे उद्‌घाटन करण्यासाठी औरंगाबादला येत आहेत. तेव्हा सदरील वास्तुचे उद्‌घाटन मा. मुख्यमंत्र्याचे हस्ते करण्यात येईल असे मा. महापौरांनी जाहिर केले.

**विषय क्र. ६०.** औरंगपुरा भाजी मंडई, औरंगपुरा बस स्थानक (एस. बी. कॉलेजच्या बाजुस) अशा सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र्य प्रसाधनगृहे बांधावीत.

सुचक - सौ. लता दलाल
अनुमोदक - श्री. केशव सोनवणे
दिनांक - १३/०९/८८

**ठराव क्र. ६०.** वरील प्रस्तावावर मा. महापौर यांनी सूचना दिली की, सदस्यांना मांडावयाचे प्रस्ताव हे आपल्यापक्षनेत्या मार्फतच मांडावेत हा प्रस्ताव स्थायी समितीच्या अधिकार कक्षेतला असल्यामुळे तो वगळण्यात येतो. सदरील प्रस्तात स्थायी समितीत ठेवून निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**विषय क्र. ६१.** गणपती विसर्जनाच्या वेळी सर्व वाहने स्वातंत्र्य सैनिक कॉलनी मार्गे जातील तेंव्हा स्वातंत्र्य सैनिक कॉलनीचा नविन झालेल्या पूलाच्या मार्गावर रस्ता वाहतुकीसाठी योग्य करावा व त्या मार्गावर लाईटची व्यवस्था करण्यासाठी कायमस्वरुपी लाईट पोल उभारावेत. तसेच शहरात गणपती उत्सवात रात्रभर लाईट चालू राहतील याची दक्षता घ्यावी व प्रत्येक वॉर्डात ट्युब लाईट चालू आहेत की नाही याची ताबडतोब पाहणी करावी.

सुचक - सौ. लता दलाल
अनुमोदक - श्री. केशव सोनवणे
दिनांक - १२/०९/८८

**चर्चा** प्रस्तावावर स. श्री. ओबेराय यांनी सूचना केली की, विद्यूत उपकरणांचा साठा सर्व विभागात समप्रमाणात वाटण्यात यावा व अधिकाऱ्याचे गट बनवून रात्री इन्स्पेक्शन करण्यात यावे व बंद असलेले लाईट त्वरित दुरुस्त करण्यात यावेत. मा. उप महापौरांनी सूचना मांडली की, महापालिकेचा एक कनिष्ठ अभियंता व एम.एस.ई बी. चा एक कनिष्ठ अभियंता असे गट करून या विभागवार कार्यक्रम बनवून कार्यवाही करण्यात यावी. स. डॉ. संचेती व स. सौ. दलाल यांनी तक्रार केली की, वारंवार सूचना देवूनही बंद असलेले विद्युत दिवे चालू केले जात नाहीत वा ट्युबचा स्टॉक संपल्याचे नेहमीच सांगितले जाते. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात.

**<u>ठराव क्र.</u> ६१.** चर्चेनंतर मा. महापौरांनी खुलासा केला की, श्री. विसर्जन विहिरीचा रस्ता २२ सप्टेंबरलासुरू करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत व उत्सव काळात या रस्त्यावर रोषणाई करण्याचे काम पण करण्यात येईल असे ठरले.

**<u>विषय क्र.</u> ६२.** क्रांतीचौक येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या जागी झालेली दुरावस्था अनेक वेळा उप आयुक्तांना सांगुनसुध्दा कमी झालेली नाही. तेव्हा त्याठिकाणी रोषणाई सुरू करावी. चांगल्या प्रकारची झाडे लावावीत व महाराजांचा भगवा ध्वज लावावा. तेव्हा या गोष्टीची ताबडतोब पूर्तता करावी.

सुचक - सौ. लता दलाल.
अनुमोदक - केशव सोनवणे
दिनांक - १२/०९/८८

**<u>चर्चा</u>** प्रस्तावावर चर्चेत भाग घेतांना स. श्री. जावळे प्रकाश व बंडु प्रधान यांनी सूचना मांडली की, क्रांती चौकात अथवा इतर चौकात रोषणाई करण्यास वा कारंजे चालू करण्यात कोणतीच हरकत नाही मात्र चौकात कोणताही ध्वज लावण्यात येवू नये. जयंती वगैरे सारख्या प्रसंगी मात्र हा ध्वज लावण्यात यावा व परत काढून घेण्यात यावा.

**<u>ठराव क्र.</u> ६२.** चर्चेनंतर सर्वानुमते असे ठरले की, जेव्हा जेव्हा जयंतीसारखे कार्यक्रम होतात तेव्हा ध्वज लावण्यात यावा. क्रांतीचौका बरोबरच शहरातील इतर चौकात बंद अवस्थेत असलेली कारंजी पण सुरू करण्यात यावीत असे ठरले.

**<u>विषय क्र.</u> ६३.** मराठवाडा युनिव्हर्सिटीमध्ये महानगरपालिकेच्या वतीने सिनेट सदस्यांच्यासाठी विद्यमान श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव यांचे नांव प्रस्तुत करीत आहे.

सुचक - श्री. अलफखाँ
अनुमोदक - श्री. बंडु गोविंदराव प्रधान
दिनांक - १२/०९/१९८८

**<u>चर्चा</u>** वरील प्रस्तावावर चर्चेत भाग घेतांना स. सौ. दलाल यांनी आक्षेप घेतला की, १२/०९/१९८८ ही नॉमिनेशन फॉर्म भरण्याची शेवटची तारीख होती याची आम्हास त्या दिवशी ३.४५ वाजेपर्यंत कल्पना नव्हती. नॉमिनेशन फॉर्मची शेवटची तारीख माहित नसल्यामुळे वेळेवर आम्हास फॉर्म भरता आले नाहीत. विद्यापीठाने हे पत्र महापालिकेस ०७/०९/१९८८ ला पाठविलेले असतांनाही जाणून बुजून एका ग्रुपला अंधारात ठेवले गेले आहे. स. श्री. अलफखाँ यांनी खुलासा केला की, ही सिनेट सदस्याची निवड महापालिकेतच स्वतःची एक सभा बोलावून करावयाची आहे. मात्र तत्पूर्वी विद्यापीठाने ठरविलेल्या तारखेंपूर्वी नॉमिनेशन फॉर्म विद्यापीठाकडे भरलेले असले पाहिजेत.

मा. आयुक्तांनी खुलासा केला की, यामध्ये पक्षपाताची कोणतीही भावना नाही. मी स्वतः विद्यापीठास दिनांक १३/०९/१९८८ ला पत्र पाठविले आहे. या पत्रात मी नमूद केले आहे की, हा निवडणूकीचा कार्यक्रम ठरविण्यापूर्वी विद्यापिठाने महापालिकेस कळवावयास पाहिजे होते. यावर मा. श्री. सावे, स. श्री. चंद्रकांत खैरे व सौ. दलाल यांनी

या निवडणूकीस व महापालिकेचा सदस्य सिनेटवर पाठविण्यास आक्षेप घेतला व पुढे होणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस महापालिका जबाबदार असेल असे निवेदन केले.

**<u>ठराव क्र.</u> ६३.** चर्चेनंतर स. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव यांना मराठवाडा विद्यापीठ सिनेटवर पाठविण्याच्या प्रस्तावास बहुमताने मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ६४.** सिडको, एन-६ स्मशानभुमी व स्मशानमारुती स्मशानभुमी या दोन स्मशानभुमींची आधुनिक पध्दतीने निसर्गरम्य व्यवस्था व्हावी.

सुचक - श्री. मोतीराम घडामोडे
अनुमोदक - श्री. विठ्ठल पेरकर

**<u>ठराव क्र.</u> ६४.** वरील प्रस्तावासंबंधात स. श्री. घडामोडे यांनी जे पत्रक छापले होते त्याचे प्रकाशन करण्याची विनंती मा. महापौरांना केली. मा. महापौरांनी या छापील पत्रकाचे प्रकाशन केले व त्याच्या प्रती सभागृहात वाटण्यात आल्या. यातील काही भाग स. श्री. घडामोडे यांनी वाचून दाखविला.

सदरील छा ापील पत्रक सभागृहात ऐनवेळी प्रस्तुत करण्यात आले.

पुरवणी विषयपत्रिका क्र. २ चर्चेस घेत असतांना स. डॉ. संचेती स. श्री. जैस्वाल, स. श्री. सावे यांनी मा. महापौरांना विनंती केली की ही विषयपत्रिका वृत्तपत्रात प्रसिध्द न केल्याने तसेच बहुतेक स. सदस्यांना ती आजच मिळाल्याने सर्वांना या विषयपत्रिकेचा अभ्यास करता आलेला नाही. तेव्हा ती पुढच्या सभेत चर्चेस घेण्यात यावी.

मा. महापौरांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून राहिलेली पुरवणी विषयपत्रिका क्र.२ पुढील बैठकीत चर्चेस घेतली जाईल असे सांगून ४.४५ वाजता सभा संपल्याचे जाहीर केले "जन-गण-मन" या राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/ |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

### *सर्वसाधारण सभा दि. १८ ऑक्टोंबर, १९८८ चा कार्यवृत्तांत*

दि. १८ ऑक्टोंबर, १९८८ मंगळवार रोजी सकाळी ११.०० वाजता अलंकार नाट्यगृहात मा. महापौर, डॉ. श्री. शांताराम काळे यांच्या अध्यक्षेतखाली सभेस सुरुवात झाली.

या सर्वसाधारण सभेस खालील स. सदस्य, कार्यालयीन अधिकारी वर्गासह उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसनखान कासीम खान, | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजितउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ७) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ८) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ९) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| १०) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| ११) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १२) | मा. श्री. म. आयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १३) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १४) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १५) | मा. श्री. नारायण मोहनराव | --//-- |
| १६) | मा. श्री. स. अहमद एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | |
| १७) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १८) | मा. श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| १९) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २०) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २१) | मा. श्री. अब्दुल रशीद खा (मामू) अ. हमीद खान | |
| २२) | सौ. दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २३) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २४) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २५) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २६) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २७) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २८) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| २९) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३०) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३१) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३२) | मा. श्री. मानकापे नामदेवराव शामराव | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३३) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३४) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | --//-- |
| ३५) | मा. श्री. अलफखाँ हुसैन खाँ | --//-- |
| ३६) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ३७) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ३८) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ३९) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | --//-- |
| ४०) | मा. श्री. शिंदे मधूकरराव माणिकराव | --//-- |
| ४१) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस | --//-- |
| ४२) | मा. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ४३) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ४४) | मा. श्री. गोडसे आनंद जगदिश | --//-- |
| ४५) | मा. श्री. जहागिरदार अजिज मुख्तार | --//-- |
| ४६) | मा. श्री. मोटे रामकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ४७) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ४८) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ४९) | मा. श्री. हाळनारे गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५०) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५१) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५२) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

सभेस 'वंदे मातरम्' या गीतानंतर सुरुवात झाली. मा. महापौर ह्यांनी सदरील सभेमध्ये कार्यक्रम पत्रिका अनुसार काम होईल असे निवेदन केले. स. सदस्य श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी वार्डाच्या काही प्रश्नांकडे मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे असे प्रतिपादन केले. यावेळी स. सदस्य श्री. गंगाधर गाढे यांनी सुचविले की, सभागृहाचे लक्ष मला अतिमहत्त्वाच्या विषयाकडे वेधावयाचे आहे. आपले लोकप्रिय आमदार श्री. अमानुल्ला मोतीवाला यांना भिषण अपघात झाल्याने काही सदस्य पुण्यास गेले आहेत व काही निघण्याचे तयारीत आहेत. तेव्हा आजची सभा पुढे ढकलण्यात यावी. स. सदस्य श्री. अलफखान ह्यांनी त्यास अनुमोदन देवून सांगितले की, आमदारांच्या प्रकृतीची सर्वांना काळजी वाटत असून सभागृह सदस्यांची मनस्थिती ठिक नाही. त्यामुळे आजची सभा पुढे ढकलणे उचित राहील.

स. सदस्य श्री अविनाश कुमावत व सौ. लता दलाल यांनी प्रतिपादन केले की, आमदार मोतीवाला यांना दिर्घाआयुरोग्य लाभो असी आमचीही प्रार्थना आहे पण त्यासाठी सभा स्थगित ठेवू नये. किमान ५/६ ठराव चर्चेला घेण्यात यावे. स. सदस्य श्री. रशिदखॉ यांनी सुचित केले की, लोकप्रतिनिधी विषयी असा मतभेद असणे योग्य नाही, तेव्हा सभागृहाचा धिक्कार करतो व बहिष्कार टाकतो असे सांगून सदस्य श्री. रशिदखाँ ह्यांनी सभात्याग केला. स. सदस्य श्री. मोरेश्वर सावे ह्यांनी सुचविले की, आम्ही सदस्यांच्या भावनांशी सहमत आहोत. सभासदांनी टोकाची भाषा वापरू नये त्यासाई सारासार विचार करून उगाच गैरसमज पसरवू नये, इतरांना कदाचित माहित नसेल म्हणून सांगतो की, आमदार मोतीवाला यांना नगरला सर्व प्रथम शिवसेनेच्या कार्यकर्त्यांने रक्तदान केले. तेंव्हा भावनांचे खोटे प्रदर्शन करू नये. स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी "तुम्ही खोटे

कोणाला म्हणतात हो?" असे विधान करताच उभयपक्षी शाब्दीक चकमक झाली. यावेळी स. सभासद श्री. नारायण फत्तेलष्कर ह्यांनी सभासदांना उद्देशून अपशब्द वापरले.

मा. महापौर स. सदस्यांना शांत राहण्यासाठी आवाहन केले दरम्यानचे काळात स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील ह्यांनी सभागृहात माफी मागितली यावेळी स. सदस्य श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी स. सदस्य श्री. फतेलष्कर ह्यांनी सुध्दा सभागृहाची माफी मागावी. त्यांच्या प्रवृत्तीचा आम्ही निधेध करतो असे प्रतिपादन केले. यावेही आरोप प्रत्यारोपास सुरुवात झाली. स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील ह्यांनी मागणी केली की, मी समजूतदारपणा दाखवून सभागृहाची माफी मागितली, तेंव्हा तुम्ही ही समजूतदारपणा दाखवून माफी मागावी.

मा. महापौर ह्यांनी प्रतिपादन केले की, स. सदस्य श्री. फत्तेलष्कर ह्यांनी सभागृहाचा अवमान केला आहे. तेव्हा स. सभासदांनी सभागृहाची माफी मागणेस हरकत नसावी. यावर स. सदस्य श्री. कचरू नवपुते ह्यांनी सुचविले की, सभागृहाचा अवमान प्रथम स. सदस्य श्री. रशिदखॉ ह्यांनी केला आहे. तेव्हा त्यांनीही प्रथम सभागृहाची माफी मागावी स. सदस्य श्री. नारायण फत्तेलष्कर ह्यांनी मी माफी मागणार नाही असे निक्षून सांगितले. यावर मा. महापौर ह्यांनी स. सदस्य श्री. फत्तेलष्कर ह्यांचे सदस्यात्व या सभेपुरते रद्द केल्याचे जाहिर केले. तत्पूर्वी श्री. फत्तेलष्कर सभागृहाबाहेर पडले होते.स. सदस्य श्री. बंडु प्रधान व श्री. रतनकुमार पंडागळे ह्यांनी मागणी केली की, संबंधितास कडक शिक्षा व्हावी. अन्यथा अर्वाच्य भाषा करण्याची प्रथा रुढ होईल. या सभागृहाने लोकशाहीचे विडंबन पाहिले आहे, ज्यामुळे साऱ्या देशात आपला अपमान झाला, मतपेट्या पळविण्यात आल्या, परंतु संबंधितावर कार्यवाही नाही त्याला प्रत्यत्तर म्हणून स. सदस्य सौ. लता दलाल ह्यांनी गतकालीन घटना उकरून काढण्यात अर्थ नाही.

स. सदस्य श्री. मोरेश्वर सावे आणि चंद्रकांत खैरे ह्यांनी मा. महापौरांना विचारणा केली की, स. सदस्य श्री. फत्तेलष्कर ह्यांना कोणत्या कायद्याने सभागृह सोडण्यास सांगितले याचा खुलासा व्हावा. यावर मा. महापौरांनी सुचविले की, अनेक वेळा कायदे बघावेच लागतात असे नाही, तथापि सभा कामकाज नियमावली २(१) या कायदेशिर तरतुदीचे वाचन करून दाखविले आणि सभागृहास विनंती केली की, आमदार मोतीवाला यांची प्रकृती अत्यवस्थ असल्याने सभागृह सदस्य सभागृह कामकाज चालविण्योच मनस्थितीत नाहीत, तेव्हा आजची सभा पुढे ढकलण्यात येते असे जाहीर केले. सभेशेवटी "जन-गण-मन" हे राष्ट्रगीत झाले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/ |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०३/११/१९८८ रोज गुरुवार सकाळी ११.०० वाजता भरलेल्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत**

मा. महापौर डॉ. शांताराम काळे यांचे अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक ०३/११/१९८८ रोजी सकाळी ११.०० वाजता अलंकार सभागृह येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये अधोलेखित स. सभासद, अधिकारी वर्गासह उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसनखान कासीम खान, | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ६) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ७) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ८) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| ९) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १०) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| ११) | मा. श्री. नारायण मोहनराव फत्तेलष्कर | --//-- |
| १२) | मा. श्री. स. अहमद एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | |
| १३) | मा. श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| १४) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| १५) | मा. श्री. अब्दुल रशीद खान अ. हमीद खान | --//-- |
| १६) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| १७) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| १८) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| १९) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २०) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २१) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २२) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| २३) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| २४) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| २५) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| २६) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | --//-- |
| २७) | मा. श्री. अलफखाँ हुसैन खाँ | --//-- |
| २८) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| २९) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ३०) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ३१) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | --//-- |
| ३२) | मा. श्री. शिंदे मधूकरराव माणिकराव | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३३) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस | --//-- |
| ३४) | मा. श्री. ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ३५) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ३६) | मा. श्री. गोडसे आनंद जगदिश | --//-- |
| ३७) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ३८) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ३९) | मा. श्री. हाळनारे गिरजाराम नानाराव | --//-- |
| ४०) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ४१) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ४२) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

वंदे मातरम् या गिताने सभेस सुरुवात झाली.

स. सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी प्रस्ताव मांडला की, शहराचे लाडके नेते आमदार श्री. अमानुल्ला मोतीवाला यांचे दु:खद निधन झाल्यामुळे औरंगाबाद शहरवासिय दु:खमग्न झाले आहेत. तेव्हा या लाडक्या तरुण तडफदार नेत्यास सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करून आज सभा तहकुब करण्यात यावी.

स. सभासद श्री. गंगाधर गाढे, श्री. चंद्रकांत खैर, श्री. मोरेश्वर सावे, श्रीमती लता दलाल यांनी प्रस्तावात अनुमोदन देवून समयोचित विचार मांडले.

औरंगाबाद शहराचे आमदार श्री. अमानुल्ला मोतीवाला आणि त्यांचे सहप्रवासी व मित्र श्री. राजु फेरवाणी यांचे अपघाती निधन झाल्यामुळे सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. उभयंताचे कुटुंबियांवर कोसळलेल्या आपत्तीस ही सभा सहभागी होत आहे.

स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी प्रस्ताव मांडला की, सभागृहाचे सदस्य श्री. नामदेव शामराव मानकापे यांचे वडिल श्री. शामरावजी मानकापे यांचे वृध्दापकाळामुळे निधन झाले असून सभागृहातर्फे शामरावजी मानकापे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. स. सभासद श्री. अ. रशिदखाँ यांनी त्यास अनुमोदन दिले.

सभागृहाचे सदस्य श्री. नामदेव मानकापे यांचे वडिल श्री. शामराव मानकापे यांचे वृध्दापकाळामुळे निधन झाल्यामुळे श्री. शामरावजी मानकापे यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर मा. महापौर यांनी सभेचे कामकाज तहकुब करण्यात आल्याचे जाहिर केले.

शेवटी "जन-गण-मन" हे राष्ट्रगीत झाले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**_दिनांक ०७ नोव्हेंबर १९८८ रोजी येथे भरलेलया औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत_**

सोमवार, दिनांक ०७/११/८८ रोजी दुपारी २.०० वाजता नेहरू भवन येथे महापौर, डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली. या सभेस पुढील सन्माननिय सभासद उपस्थित होते.

सभासदांची उपस्थिती रजिष्टरप्रमाणे ५९ होती.

वंदे मातरम् या गिताने सभेस सुरुवात झाली.

**विषय क्र. ६५.** मराठवाडा विद्यापीठ कार्यकारीणीसाठी (सिनेट) महापालिकेतील विद्यमान सभासदांमधून एक प्रतिनिधी नियुक्त करणे.

**ठराव क्र. ६५.** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मराठवाडा विद्यापीठ कार्यकारीणीसाठी (सिनेट) महापालिकेतील विद्यमान सभासदांमधून एका प्रतिनिधीची नियुक्ती करण्याबाबत गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्यात आले. मतमोजणी नंतर ३२ विरुध्द २७ मतांनी सन्माननीय सभासद श्री. धनंजय गंगाखेडकर यांची औरंगाबाद महानगरपालिका विद्यमान सभासदातून मराठवाडा विद्यापीठ कार्यकारीणीसाठी (सिनेट) निवड झाल्याचे मा. महापौरांनी घोषित केले. राष्ट्रगीत झाल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

### दिनांक १८/११/१९८८ रोज शुक्रवार सकाळी ११.०० वाजता भरलेल्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

दिनांक १८/१०/८८ आणि ०३/११/८८ रोजी अनिवार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आलेली औरंगाबाद महानगर पालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक १८/११/१९८८ रोजी शुक्रवार सकाळी ११.१५ वाजता मा. महापौर श्री. शांताराम काळे यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली या सभेमध्ये खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसनखाँ कासीमखाँ, | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ७) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ८) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ९) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| १०) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| ११) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १२) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १३) | मा. श्री. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १४) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १५) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १६) | मा. श्री. नारायण मोहनराव फत्तेलष्कर | --//-- |
| १७) | मा. श्री. स. अहमद एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | |
| १८) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १९) | मा. श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| २०) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २१) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २२) | मा. श्री. अ. रशीदखाँ (मामू) अ. हमीदखाँ | --//-- |
| २३) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २४) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २५) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २६) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २७) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २८) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २९) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३०) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३१) | मा. श्री. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३२) | मा. श्री. फैयाजखान अहमदखान | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३३) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३४) | मा. श्री. बी. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३५) | मा. श्री. हुसेन स. अहमद | --//-- |
| ३६) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३७) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३८) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३९) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | --//-- |
| ४०) | मा. श्री. अलफखाँ हुसैन खाँ | --//-- |
| ४१) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४२) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४३) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४४) | मा. श्री. अजीमखॉ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४५) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | --//-- |
| ४६) | मा. श्री. शिंदे मधूकरराव माणिकराव | --//-- |
| ४७) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस | --//-- |
| ४८) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ४९) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ५०) | मा. श्री. गोडसे आनंद जगदिश | --//-- |
| ५१) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ५२) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५३) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५४) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५५) | मा. श्री. हाळनारे गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५६) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५७) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५८) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

सभेच्या सुरुवातीस 'वंदे मातरम्' हे गीत म्हटल्यानंतर मा. महापौर यांनी निवेदन केले की, खालील दोन मुद्दे सभागृहाच्या विचारार्थ मांडत आहे. त्यावर सभागृहाने निर्णय घ्यावा.

१) सभागृह अन्य कार्यक्रमासाठी आरक्षित केले असल्यामुळे आजच्या सभेचे कामकाज ३.०० वाजेपर्यंत घेता येईल.
२) आज शुक्रवार असलयामुळे मुस्लीम सदस्यांच्या लेखी विनंतीवरून धार्मिक कामासाठी १.०० ते २.०० या वेळात सभेचे कामकाज थांबविण्यात येईल व परत २ ते ३ वाजेपर्यंत सभा पुढे सुरू राहील.

यावर आजची सभा १.०० वाजताच स्थगित करावी. परंतु धार्मिक कारणांसाठी सभा तहकूब करता येत नाही. यापुढे असा पायंडा पाडु नये. असे स. सभासद श्री. मोरश्वर सावे यांनी सुचविले.

मागच्या सभेच्या वेळी स. सभासद श्री. रशिदखान मामू यांनी "सभागृहाचा धिक्क़ार करतो" असे विधान केले होते. त्यावेळी झालेल्या चर्चेतुन श्री. फत्तेलष्कर यांचे सदस्यत्व मा. महापौरांनी एक दिवसांसाठी रद्द केले होते. तेव्हा श्री. फत्तेलष्कर यांचे प्रमाणेच स. सभासद श्री. रशिद खान मामु यांना पण शासन व्हावे. असे

स. सभासद श्री. अविनाश कुमावत यांनी सुचविले. यावर शहर लोकप्रतिनिधी मा. आमदार मोतीवाला हे अत्यावस्थ होते तेव्हा भावनेच्या भरात मी काही विधान केले असेल, तर मी सभागृहाची माफी मागतो असा खुलासा स. सभासद श्री. रशिदखान मामु यांनी केला.

स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे यांनी सूचना केली की, ७ तारखेची सभा खेळीमेळीच्या वातावरणात नेहरू भवन येथे पार पडली, तेव्हा यापुढे सर्वसाधारण सभा नेहरू भवन येथेच घेण्यात याव्यात. यास स. सभासद श्री. चेनकरण संचेती यांनी अनुमोदन देवून खुलासा केला की, नेहरू भवन किंवा संत एकनाथ रंगमंदिर मध्ये सभा घेण्यात याव्यात.

मा. महपौर यांचेशी चर्चा झाली त्यावेळी आपण गाद्या टाकून टाऊन हॉल येथे सभा घेऊ असा खुलासा केला होता, तेव्हा टाऊनहॉल येथे बैठक्क का घेऊ नये अशी विचारणा स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे यांनी केली असता, येत्या १/२ महिण्यात टाऊन हॉलचे काम पूर्ण होईल व पुढील बैठका टाऊन हॉलमध्ये घेता येतील, असा खुलासा मा. महापौर यांनी केला.

स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी सूचना मांडली की, मा. महापौर यांनी मांडलेल्या पहिल्या सूचनेशी आम्ही सहमत आहोत. मात्र धार्मिक कारणांसाठी सभा तहकुब करून वेगळा पायंडा पाडु नये, अशा प्रकारच्या सभा तहकुबीस आमचा विरोध राहिल. तेंव्हा अधिकारी व सदस्य यांच्यावेळेचा अपव्य होऊ नये म्हणून ही सभा १.०० वाजेपर्यंतच चालविण्यात यावी. राहिलेले विषय दुसऱ्या दिवशी चर्चेत घ्यावेत.

सभागृहामध्ये सदस्यांनी एकमेकांच्या धर्माचा आदर करावा, कोणाच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. धार्मिक कामासाठी आम्ही भिक मागितली नाही. आजच्या सभेचे कामकाज चालू राहिले तरी आम्ही नमाजला जाणार. अशा प्रसंगी सभा चालू केली तर आम्हीही यापुढे सहकार्य करणार नाही. असे विचार मा. उपमहापौर यांनी मांडले.

मा. उपमहापौर यांचे विधान योग्य नाही. तेव्हा आमची पहिली सूचना आम्ही मागे घेत आहोत. ही सभा ३.०० वाजेपर्यंत चालेल. ज्यांना धार्मिक कार्यासाठी जावयाचे असेल त्यांना जाता येईल, आम्ही निर्मळ मनाने पहिला निर्णय दिला होता. परंतु उपमहापौरांनी त्याचा गैरअर्थ काढला हे योग्य नाही. अशा प्रवृतीचा आम्ही निषेद करतो, असे स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे, श्री. मोरेश्वर सावे व श्री. प्रदिप दत्त यांनी प्रतिपादन केले.

उपमहापौर हे पद जबाबदारीचे आहे. त्या पदावर बसून अशा विषयाला जातीय रंग देणे योग्य नाही याचा आम्ही निषेद करतो. त्यांनी सभागृहाची माफी मागावी नसता, आम्ही सभात्याग करू असा खुलासा स. सभासद श्री. चंद्रकांत खैर व श्रीमती लता दलाल यांनी केला.

सभागृहातील चर्चा लक्षात घेता स. सभासद श्री. गंगाधार गाढे यांनी सूचना मांडली की, सभागृहाची शांतता कायम राखण्यासाठी सदस्यांनी टोकाची भूमिका घेऊ नये व आजच्या कामकाजास सुरुवात करावी.

मागील सभेच्या वेळी 'वंदे मातरम्' गीताच्या प्रस्तावाबाबत सुध्दा उपमहापौर यांनी टोकाची भूमिका घेतली होती व आजही ते टोकाची भूमिका घेत आहेत. हे योग्य नाही. तेंव्हा उपमहापौर यांनी सभागृहाची माफी मागावी. यासाठी आम्ही मा. महापौर यांना निर्णय घेण्यासाठी २.०० मिनिटाचा अवधी देत आहोत. तेव्हा महापौरांनी त्यांचा निर्णय सभागृहास द्यावा, नसता महापौरांना घेराव घालावा लागेल असा इशारा स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे , श्रीमती लता दलाल, श्री. मोतीराम घडामोडे यांनी दिला.

विरोधी पक्ष जर अशाप्रकारे जातीयवादाला प्रोत्साहन देत असेल तर यापुढे आम्ही सहकार्याची भूमिका ठेवणार नाही. तेंव्हा दोंन्ही बाजूने खेळीमेळीच्या वातावरणात काम करावे असे आवाहन स. सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी केले.

सभागृहातील वाढता गोंधळ लक्षात घेता मा. महापौर यांनी ११.४० वाजता ही सभा एक तासासाठी तहकूब करण्यास येते व ही सभा १२.४० वाजता याच सभागृहात पुन्हा सुरु करण्यात येईल असे जाहीर केले.

तहकुब करण्यात आलेली सभा १२.४० वाजता पुन्हा सुरु झाल्यानंतर मा. महापौर यांनी सूचना केली की, एक वेळी एकच सभासद बोलेल. एकापेक्षा जास्त सभासदांनी बोलण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची सभागृहाने नोंद घ्यावी. कोणत्याही धार्मिक भावना अथवा जातीयवाद करण्याचा उपमहापौराचा उद्देश नव्हता. तेव्हा हा विषय येथेच संपवावा आणि कामकाजास सुरुवात करावी असेही ते म्हणाले.

विकास विषय कार्यात आम्ही नेहमीच सहकार्य करू परंतु महापौरांनी उपमहापौरांच्या वक्तव्यावर पांघरून घालण्याचा प्रयत्न करू नये. उपमहापौरांनी त्यांच्या विधानाबाबत सभागृहाची माफी मागितल्याशिवाय पुढील कामकाज सुरू करू नये अशी मागणी. स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे व श्री. मोरेश्वर सावे यांनी केली.

विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षावर दबाव आणत आहे. सभेचे कामकाज चालू देणार नाही हे स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे यांचे वक्तव्य योग्य नाही तेव्हा मा. महापौरांनी विषय पत्रिकेवरिल कामकाज सुरू करावे अशी मागणी स. सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी केली.

खेळीमेळीच्या वातावरणात सभागृहाचे कामकाज चालावे अशी आमचीही इच्छा आहे. पण स. सभासद श्री. फत्तेलष्कर यांचे सभासदत्व त्यांच्या वक्तव्याबाबत रद्द होऊ शकते तर मग उपमहापौरांचे वक्तव्यावर नियमाप्रमाणे का कार्यवाही करण्यात येऊ नये, म्हणून त्यांनी सभागृहाची माफी मागावी अशी मागणी स. सभासद श्रीमती लता दलाल यांनी केली.

मा. उपमहापौर यांनी आपल्या पूर्वीच्या वक्तव्यावर पुन्हा खलासा केला की, आपण एका ठिकाणी बसलो आहोत तेंव्हा सर्वांनी एक दुसऱ्याच्या धर्माचा आदर करावा. विरोधासाठी विरोध ही भूमिका विरोधी पक्षाची राहणार असेल तर आम्ही सुध्दा सहकार्य करणार नाही. शब्दाचा विपरित अर्थ काढून सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करू नये. मी जे विधान केले त्याचा गैरअर्थ घेणे योग्य नाही.

मा. उपमहापौर यांच्यावरील खुलासाने विरोधी पक्षाचे समाधान न झाल्यामुळे विरोधी पक्ष सदस्यांनी उपमहापौर यांनी सभागृहाची माफी मागावी अशी आग्रहाची भूमिका कायम ठेवल्याने सभागृहात अशांतता निर्माण झाली व सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य झाले. त्यामुळे मा. महापौर यांनी सभागृहाच्या बहुमताने ठरले की, दुपारी १.०० वाजता आजची सभा दिनांक १९/११/८८ च्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे. ही सभा दिनांक १९/११/१९८८ रोजी याच सभागृहात सकाळी ११.०० वाजता पुन्हा सुरू होईल असे घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

***दिनांक १९/११/१९८८ रोज शनिवार भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत***

शुक्रवार दि. १८/११/८८ रोजी दुपारी १.०० वाजता तहकुब करण्यात आलेली औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक १९/११/८८ रोज शनिवार सकाळी ११.०५ वाजता अलंकार नाट्यगृह येथे मा. महापौर, डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. या सभेस पुढील सनमाननीय सदस्य, अधिकारी वर्गासह उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसनखाँ कासीमखाँ, | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ७) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ८) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ९) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| १०) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| ११) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १२) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १३) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १४) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १५) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १६) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | --//-- |
| १७) | मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| १८) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १९) | मा. श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| २०) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २१) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २२) | मा. श्री. अ. रशीदखान अ. हमीदखान | --//-- |
| २३) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २४) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २५) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २६) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २७) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २८) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २९) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३०) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३१) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३२) | मा. श्री. फैयाजखान अहमदखान | --//-- |
| ३३) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३४) | मा. श्री. बी. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३५) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | --//-- |
| ३६) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३७) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३८) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३९) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | --//-- |
| ४०) | मा. श्री. अलफखाँ हुसैन खाँ | --//-- |
| ४१) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४२) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४३) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४४) | मा. श्री. अजीमखॉ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४५) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | --//-- |
| ४६) | मा. श्री. शिंदे मधूकरराव माणिकराव | --//-- |
| ४७) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस | --//-- |
| ४८) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ४९) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ५०) | मा. श्री. गोडसे आनंद जगदिश | --//-- |
| ५१) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ५२) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५३) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५४) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५५) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५६) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५७) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५८) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

सभेची सुरुवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

**<u>विषय क्र.</u> ६५/१ -** दिनांक १७ सप्टेंबर, १९८८ रोजी झालेल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत कायम करणे.

**<u>ठराव क्र.</u> ६५/१ -** विषय क्र. २६ अन्वये विषय समित्या स्थापन करणे व त्यांची कार्यकक्षा निश्चित करण्याबाबत ज्या समितीची स्थापना करण्यात आली ती योग्य नाही. यामध्ये विरोधी पक्षाचा फक्त एकच सभासद आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. असे स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी सुचित केले असता आधाडीतील प्रत्येक घटकाचा एक सभासद आणि विरोधी पक्ष नेते अशा प्रकारे समिती स्थापन करण्याचे ठरले होते. असा खुलासा मा. महापौर यांनी केला असता, स. सभासद श्री. सावे यांनी त्यास विरोध नोंदविला. त्या मा. महापौरांनी मान्यता दिली.

विषय क्र. ३७ अन्वये आरक्षणक्र. ३२ खुली जागा या आरक्षणाचे विकासासाठी ३० मिटर रुंदीच्या रस्त्यात बाधित होणारी जागा संपादन करण्याच्या

प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्यांच्या हक्काला मुकणार असून बेघर होईल. काही अपरिहार्य कारणास्तव मी मागील सभेस उपस्थित नसल्यामुळे या विषयावर आपले विचार मांडु शकलो नाही. तेव्हा या विषयाला मंजुरी दउेण्यापूर्वी संबंधित अधिकारी व मा. आयुक्त यांच्याशी चर्चा केल्यानंतर यावर निर्णय घेण्यात यावा असे स. सभासद श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी सुचविले असता स. सभासदांनी संबंधित अधिकारी व मा. आयुक्त यांचेशी चर्चा करून त्यांच्या उपसूचना मांडण्यास परवानगी देण्यात येते असे मा. महापौर यांनी सुचविले.

याशिवाय दिनांक १७/०९/८८ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. २७ व ४६ मध्ये अनवधानाने सर्वानुमते मंजुरी देण्यात येते असा उल्लेख करण्यात आलेला असल्यामुळे वरील दोन्ही ठरावाचे ऐवजी दुरुस्त ठराव खालीलप्रमाणे वाचावेत असे सर्वानुमते ठरले.

**दुरुस्त**

**<u>ठराव क्र.</u> २७ -** चर्चेत सदस्य श्री. गिरजाराम हाळनोर यांनी सुचविले की, एकनाथनगर पासून जर हा रोड तयार करण्यात आला तर जास्त योग्य राहिल. स. सदस्य श्री. जावळे यांच्या म्हणण्याप्रमाणे जर हा रस्ता बनवण्यास सुरुवात केली तर हा रस्ता दलित वस्तीतुन जाईल व त्यामुळे बरीच घरे पाडावी लागतील. स. सदस्य श्री. सावे मोरेश्वर यांनी सूचना मांडली की, सध्या हा रस्ता पीरबाजार ते एकनाथनगर असा आहे. केवळ नाल्याची दुरुस्ती करणे बाकी राहिलेले आहे, तसेच पॉलिटेक्नीक कॉलेज जागा देईल असे वाटत नाही. तेव्हा केवळ नाल्याची दुरुस्ती केली तरी हा रस्ता उपयोगात येऊ शकेल. शेवटी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वानुमते असे ठरले की, प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करावा.

**दुरुस्त**

**<u>ठराव क्र.</u> ४६ -** प्रस्तावात दर्शविल्यानुसार सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी सदरील भागाचा नकाशा सभागृहास दाखविला. सदरील नकाशा पाहिल्यानंतर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आ. क्र.१०/अ, १३/अ, १३/ब, १४/अ ची जागा विकास योजनेच्या अंमलबजावणीमुळे बेघर होणाऱ्याकरिता घरे बांधण्यासाठी आ.क्र.१३/क (भागशः) मुलांसाठी खेळाचे मैदान, आ. क्र.१३ई पार्किंगसाठी, आ.क्र.१४ बगीचा व खेहाचे मैदान याकरिता आरक्षित असल्याचे सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी सांगितले प्रस्तावावरून चर्चा होऊन असे ठरले की, या परिसरातील विकास योजनेचे प्रस्ताव स. सभासद समजावून घेतील, जागा पाहणी करतील व त्यानंतर हा ठराव मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवला जाईल. असे सवा्रनुमते ठरले अशी दुरुस्ती करण्यात येते.

यानंतर दिनांक १७ सप्टेंबर, १९८८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ६६/२ -** जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला की, शासनाचे पत्र क्र.सासम/१०८८/७० दिनांक ०१/०१/८८ अनुसार महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित होणाऱ्या विविध पुस्तके वाचकांना ना नफा ना तोटा या तत्वावर उपलब्ध करून दिले जातात. त्यावर जकात माफी देण्यास विनंती केली आहे. महानगरपालिका जकात नियम १९८४ चे कलम ५ मधील जकात माफीच्या वस्तुंच्या यादीत उपरोक्त पुस्तकांचे नांव नस्लयाने त्यात १५ व्या क्रमांकाची वाढ करण्यास मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४९ अनुसार स्थानिक वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन काढून त्याबाबत आक्षेप व सूचना मागविण्यात आल्या असता, कुणाचेही सूचना, आक्षेप प्राप्त झाले नाहीत. तरी वैधानिक कार्यवाहीसाठी प्रस्ताव विचारास्तव व मान्यतेस्तव सादर. [दिनांक ०६/०८/८८ चे स्थायी समिती चे ठराव क्र. १९५ अन्वये सुचविलेल्या पुस्तकावर जकात माफिची शिफारस केली आहे.]

**संवाद** दिनांक १८/११/८८ च्या सभेत नियमाप्रमाणे "जन-गण-मन" हे राष्ट्रगीत न झाल्यामुळे उपस्थित सदस्यांपैकी महापौर, उपमहापौर पदाची निवड करून लोकशाही पध्दतीने जवळपास ९ ठराव दि. १८/११/८८ ला मंजूर केले आहेत. तेव्हा मंजूर झालेले ठराव नोंदवून पुढचे कामकाज सुरू करावे. अशी सूचना स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे व श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली असता मा. महापौरांना सभा तहकुब करण्याचा हक्क आहे व त्या नियमाप्रमाणे मा. महापौर यांनी सभा दि. १९/११/८८ रोजी ११.०० पर्यंत तहकुब केल्याची घोषणा केली. आणि त्या आदेशाचे पालन सर्वांनी करणे आवश्यक असून स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे सभा होवून शकत नाही. असा खुलासा स. सभासद श्री. अलफखाँ हुसेनखाँ यांनी केला. माझे सहकारी मित्रांनी काही उदाहरणे देवून सभा योग्य होती असे सुचविले आहे. परंतु मा. महापौर यांनी १.०० वाजता सभा तहकुब करण्यात आल्याची घोषणा केल्यानंतर अशा प्रकारे बेकायदेशीरपणे सभा घेणे योग्य नाही. त्यांनी राष्ट्रगीत म्हण्ण्यास वेळ दिला नाही तेव्हा ही सभा बेकायदेशिर ठरवून पुढील कामकाज सुरू करावे असा खुलासा स. सभासद श्री. गंगाधर गाढे व श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी केली असता मा. महापौर यांनी राष्ट्रगीत म्हणण्यापूर्वी गाऊन उतरविल्यामुळे राष्ट्रगीत म्हणण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. नागरिकांची कामे व्हावीत या उद्देशाने ठराव पास करण्यात आले आहेत. तेव्हा मंजूर करण्यात आलेल्या ठरावाचा निश्चितच विचार करावा अशी सूचना स. सभासद सौ. लता दलाल यांनी मांडली.

दिनांक १८/११/८८ च्या सभेत दुपारी १.०० ते २.०० सभा बंद करावी असा विचार आला तेव्हा स. सभासद श्री. सावे यांनी दुपारी १.०० वाजता सभा तहकुब करावी असे सुचविले. ११.४० वाजता तहकुब करण्यात आलेली सभा १२.४० वाजता पुन्हा सुरू झाली तेव्हा तीच चर्चा झाली. वाद चालू असतांना मला असे दिसले की, यातून काही निर्णय होणार नाही. म्हणून परिस्थिती नुसार दुपारी १.०० वाजता सभा तहकुब केली. घेराव घातल्यानंतर एकाही सभासदाने जन-गण-मन या राष्ट्रीगीताबाबत विचार मांडले नाहीत. तेव्हा कालची सभा योग्य रितीनेच तहकुब झालेली आहे. असा खुलासा मा. महापौर यांनी केला.

**ठराव** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाचे पत्र क्र. सासंत्र/१०८८/७०/ दिनांक ०१/०१/८८ नुसार महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित होणारी विविध पुस्तके वाचकांना ना नफा ना तोटा या त्वावर उपलब्ध करून दिली जात असल्यामुळे महानगरपालिका जकात नियम १९८४ चे कलम ५ मध्ये साहित्य व संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांच्या नावाचा समावेश करू जकात माफी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७/३ -** मोहल्ला वाहेद कॉलनी जिनिंग फॅक्टरी रोड येथे १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत रक्कम रुपये १३,८७२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. परंतु सदरील वसाहत अनाधिकृत असल्यामुळे सदरील ठिकाणी

नागरी सुविधा पुरविणे बाबतचे प्रकरण निर्णयास्तव सादर. [दि. ११/०८/८८ चे स्थायी समिती ठराव क्र. २११ अन्वये प्रकरण सर्वसाधारण सभेत ठेवून निर्णय घ्यावा असे ठरले.]

**<u>ठराव क्र.</u> ६७/३ -** प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रस्तुतचा प्रस्ताव स्थायी समितीचे अख्त्यारित्या असल्याने योग्य त्या निर्णयासाठी स्थायी समितीकडे परत वाढविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. यापुढे स्थायी समितीचे अख्त्यारित असलेले प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडण्यात येऊ नयेत.

**<u>विषय क्र.</u> ६८/४ -** कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनिसःरण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरामध्ये अद्याप बरेच कुंडीचे संडासाचे रुपांतर जलभौधमध्ये रुपांतर झालेले नाही, आर्थिक परिस्थितीमुळे बरिच गरीब जनता हे जलनिसःरण वाहिनीस जोडू शकत नाहीत. सुलभ इंटरनॅशनल महाराष्ट्र शाखा यांचे सहकार्याने केंद्र शासन, भंगी मुक्ती योजना अंतर्गत कुंडीचे संडासाचे रुपांतर करून ते जोडण्यास अनुदान देते. हे अनुदान ५०% आहे. त्या अनुदानाचा उपयोग करून ही योजना औरंगाबाद महानगरपाकिलेमध्ये राबविण्याचे ठरल्यास येत्या ३ वर्षात ५,००० (अंदाजे) संडासाचे रुपांतर करता येईल. प्रत्येक संडासास एकूण रुपये २,१९०/- रुपयापर्यंत खर्च अपेक्षित धरून या वर्षासाठी १००० संडास रुपांतरीत करता येतील व त्यास रु. २१,९०,०००/- खर्च येईल. त्यातील ५०% केद्र शासन देईल व उरलेले २५% त्या घर मालकाने रोख भरावे. योजना मान्यतेसाठी सादर [यावर दि.११/०८/८८ चे ठराव २४५ अन्वये स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.]

**<u>ठराव क्र.</u> ६८/४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुलभ इंटरनॅशनल महाराष्ट्र शासन यांचे सहकार्याने केंद्र शासन भंगी मुक्ती योजनेअंतर्गत ५०% अनुदान मिळणार असल्यामुळे उरलेल्या ५०% पैकी २५% महापालिकेचे अनुदान या तत्वावर प्रत्येक संडासास रु. २१९०/- याप्रमाणे या वर्षात औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत १००० संडासाचे रुपांतर करण्यासाठी रक्कम रु. २१,९०,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. घरमालकांनी २५% सहभाग रोख भरावा असे ठरले.

**<u>विषय क्र.</u> ६९/५ -** मो. शहानुरवाडी येथील शहानुरमियाँ दरगाहच्या पूर्वेस शिवराज कॉलनीचा विकास पूर्ण झाला असून, त्यास लगत असलेल्या इतर कॉलनीचे घरे बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून येत्या २/३ वर्षात पूर्ण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर परिसरातील लोकांना गारखेडा, जवाहर कॉलनी, जालना रोड ठिकाणी येण्यासाठी सुलभ रस्ता अस्तित्वात नसल्यामुळे तेथील लोकांची गैरसोय होत आहे. सदर गैरसोय दूर होण्यासाठी, तसेच शहानुरवाडी येथील शिवराज कॉलनी ते गुरुकृपा कॉलनीपर्यंतच्या खालील रस्त्यांच्या जागेत जवळपास सर्व रेखांकन मंजुर झाल्याने सदर रस्त्याची खुली जागा उपलब्ध असल्याने, सदर रस्त्याचा विकास करणे लवकर करण्यास अडचणीचे जाणार नाही. मात्र संबंधित जमिन मालकास जागेचा मोबदला द्यावा लागेल. करिता शिवराज कॉलनी शहानुरवाडी ते गुरुकृपा कॉलनी शहानुरवाडी या १८ मीटर रुंद नियोजित (उत्तर दक्षिण) रस्त्याची जागा संपादन करणेबाबत मंजुरीसाठी सादर करीत आहे.

**<u>ठराव क्र.</u> ६९/५ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. शहानुरवाडी येथील शहानुरमियाँ दर्गाच्या पूर्वेस विकसित झालेल्या शिवराज सोसायटी व त्या लगतच्या अन्य सोसायटीतील

नागरिकांना गारखेडा, जवाहरकॉलनी, जालना रोड इ. ठिकाणी येण्यासाठी सुलभ रस्त्याची आवश्यकता असल्यामुळे शिवराज कॉलनी शहानुरवाडी ते गुरुकृपा कॉलनी शहानुरवाडी या १८ मीटर रुंद नियोजित (दक्षिण-उत्तर) रस्त्याची जागा संपादन करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> ७०/६ -** मो. येथील स. नं. ६० वेलकमनगर ते दिपनगर शहानुरवाडी मार्गे उल्कानगरी या १८ मी. रुंद नियोजित रस्त्यापैकी बहुतांशी रस्त्याचा विकास तेथील रेखांकन मंजूर असल्याने करण्यात आला आहे. परंतु सदर रस्त्यापैकी काही जागा वादग्रस्त असल्याने सदर ठिकाणच्या रस्त्याचे विकास करता आले नाही. शहनुरवाडी गारखेडा परिसरातील लोकांना जवाहर कॉलनी जालना रोड, उस्मानपुरा इ. ठिकाणी येण्या-जाण्यासाठी सुलभ असा रस्ता अस्तित्वात नाही. सदर रस्त्यापैकी बहुअंशी रस्त्याचे काम झाल्यामुळे आणि या ठिकाणच्या लोकांची गरज लक्षात घेता गुरुकृपा कॉलनी जवळील स. नं. ६० गारखेडा ते सहकार नगर (दिपनगर) मार्गे उल्कानगरी या १८ मीटर रुंद नियोजित रस्त्याचे जागेचे भुमीसंपादन करण्याबाबत मंजुरी मिळणेस्तव सादर करीत आहे.

**<u>ठराव क्र.</u> ६९/६ -** प्रस्तावात दर्शविलप्रमाणे शहानुरवाडी गारखेउा परिसरातील नागरिकांना जवाहर कॉलनी, जालना रोड, उस्मानपुरा इ. ठिकाणी येण्याजाण्यासाठी सुलभ रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी गुरुकृपा कॉलनी जवळील स. नं ६० गारखेउज्ञ ते सहकारनगर (दिपनगर) मार्गे उल्कानगरी या १८ मीटर रुंद नियोजित रस्त्याची जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> ७१/७ -** बीबीचा मकबरा हा एका ऐतिहासिक वास्तु असून एक "पर्यटक केंद्र" आहे. तसेच या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांसाठी आणि पहाडसिंगपुरा, बेगमपुरा, जयसिंगपुरा, घाटी, आरिफ बाग इ. परिसरातील लोकांसाठी बगीचा नाही. वरिल सर्वांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मंजूर विकास योजनेतील "आरक्षण क्र. २१७" बगीचा साठी असलेली जागा संपादन करण्याची मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्र.</u> ७१/७ -** प्रस्तावादत दर्शविल्याप्रमाणे बिबी का मकबरा या ऐतिहासिक वास्तुला भेट देण्यासाठी येणारे पर्यटक आणि पहाडसिंगपुरा, बेगमपुरा, जयसिंगपुरा, घाटी, आरिफ बाग इ. परिसरातील नागरिकांची गरज पूर्ण करण्यासाठी आरक्षण क्र. २१७ बगीचा या क्षेत्रासाठी राखीव असलेली जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स. सभासद श्री. स. हुसने स. अहमद यांचे सुचनेप्रमाणे दर्गा /मस्जीद याची जागा वगळता येईल काय याची संबंधित अधिकाऱ्यांनी पडताळणी करावी. असे मा. महापौर यांनी सुचविले.

**<u>विषय क्र.</u> ७२/८ -** मो. अजबनगर येथील न. भु. मा.क्र. १४३४३ च्या उत्तरेस (प्रकाश लॉजच्या समोर) महानगरपालिकेची प्राथमिक शाळा आहे. तसेच सदर ठिकाणी अस्तीत्वात असलेला रस्ता शाळेच्या दृष्टीने आणि तेथील नागरिकांच्या रहदारीच्या दृष्टीने पुरेसा नाही. सदर रस्त्यात एकच बांधीव मालमत्ता असून बाकीची जागा खुली आहे. शिवाय इतर रस्ते विकासित केल्यानंतर पैठणगेटकडील येणारी वाहने, जालना रोडवर जाण्यास सुलभ होईल.

करिता पैठण रोडकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यापासून ते दुधडेअरी लगत असलेल्या रस्त्यापर्यंत असलेल्या ९ मी. रुंद रस्त्याची जागा संपादन करण्याच्या मंजुरीस्तव सादर करीत आहे.

**ठराव क्र. ७२/८ -** संपादन करण्यात येणाऱ्या जागेच्या मोबदल्यात मालमत्ता धारकांस पर्यायी जागा देता येईल काय? ही स. सभासद श्री. पेरकर यांची सूचना विचारात घेवून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट कडील येणारी वाहने जालना रोडवर जाण्यास सुलभ होण्याच्या दृष्टीने पठेणगेटकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यापासून दूध डेअरी लगत असलेल्या रस्त्यापर्यंत ९ मीटर रुंदीच्या रस्त्याची जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३/९ -** गुलमंडी ते सिटी चौक पोलिस स्टेशन मार्गे रंगारगल्ली आणि सिटीचौक पोलिस स्टेशन ते पावर हाऊस य १५ मीटर रुंद रस्त्याची भुमी संपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली असून अनुक्रमे मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ व मा. राज्यमंत्री नगर विकास खाते यांच्या स्विय सचिवांनी दिलेल्या स्थगित आदेशामुळे (स्टे ऑर्डर) सदर रस्त्याचा विकास तूर्त स्थगित आहे. परंतु सिटी चौक पावर हाऊस ते किलेअर्क (काला दरवाजा) रस्त्याच्या जागेचे भुमी संपादनाची कार्यवाही न केल्यामुळे वरिल रस्त्याचा विकास केल्यानंतर ही सदर रस्ता पूर्ण होणार नाही. करिता गुलमंडी ते किलेअर्क मार्गे रंगारगल्ली हा महत्त्वपूर्ण रस्त पूर्ण करण्यासाठी सिटी चौक पावर हाऊस ते किलेअर्क (काला दरवाजा) या १५ मीटर रस्त्याची जागा संपादन करणे जरुरीचे असल्यामुळे सदर रस्त्याची भुमी संपादन करण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद** गुलमंडी ते चौक मार्गे रंगारगल्ली हाच रस्ता अद्याप सुरू झालेला नाही. तेव्हा सिटी चौक पावर हाऊस ते किलेअर्क (काळा दरवाजा) हा रस्ता रुंद करून काय उपयोग? माजी प्रशासकांचे कालावधीत गुलमंडी ते चौक या रस्तयात बाधीत होणाऱ्या मालमत्ताचे मालक ३५ 'जागा देण्यास तयार होते तेव्हा ४०' ऐवजी ५०' रस्ता तयार करण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेराय व श्री. चंद्रकांत खैरे यांनी केली.

**ठराव क्र. ७३/९ -** स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांचे सूचनेप्रमाणे "मा राज्यमंत्री, नगर विकास खाते यांच्या स्वीय सचिवांनी दिलेल्या स्थगिती आदेशामुळे (स्टे ऑर्डर)" या वाक्यात मा. राज्यमंत्री, नगर विकास खाते यांच्या स्थगिती ओदशामुळे अशी दुरुस्ती करून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलमंडी ते किलेआर्क मार्गे रंगारगल्ली हा महत्त्वपूर्ण रस्ता पूर्ण करण्यासाठी सिटी चौक पावर हाऊस ते किलेआर्क (काला दरवाजा) या १५ मीटर रुंद रस्त्याची जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७४/१० -** औरंगाबाद मंजुर विकास योजनेत मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालय व निवासस्थानाच्या पूर्वेस, तसेच मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे कार्यालया जवळील मस्जीद व त्यास लगत असलेली निवासस्थान शिवाय दिल्लीगेट येथील पेट्रोल पंपाच्या ठिकाणी असलेली जागा "सार्वजनिक निम सार्वजनिक" [पब्लिक सेमी पब्लिक] वापरासाठी दर्शविली आहे, जी नकाशात हिरव्या रंगाच्या रेषेने आणि अे.बी.सी. अक्षराने दर्शविण्यात आली आहे. मा. आयुक्त यांचे कार्यालय आणि निवासस्थानाच्या पूर्वेस गणेश कॉलनी, आलगिर कॉलनी आणि इतर अनेक अनधिकृत घरे विकसित झालेली आहेत. तसेच मा. जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील मस्जीद आणि त्या

ठिकाणचे वाचनालय आणि निवास्थान शिवाय दिल्लीगेट येथील पेट्रोल पंप हे सर्व काढून त्या ठिकाणी वरील उद्देश [परपज] पूर्ण करणे शक्य नसल्याने आणि त्या ठिकाणच्या लोकांना अत्यावश्यक गरजा उदा. पाणी विज, गटारी, रस्ते इ. पुरविण्याच्या कामात अडचण निर्माण होवू नये म्हणून वरल हिरव्या रंगाने आणि अे. बी. सी. अक्षराने दिर्शविलेले क्षेत्र मुं. प्रां. व. न. र. अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करून "सार्वजनिक व निम सार्वजनिक वापरातून वगळून" "रहिवास भागात" सामील करण्याचे मंजुरी आणि पुढील नियमाप्रमाणे कार्यवाही करून शासनास मंजुरीसाठी सादर करण्याचे मंजुरीसाठी सादर.

**संवाद -** गणेश कॉलनी, आलमगिर कॉलनी या भागात शाळा / दवाखाना / बगीचे इ. सुविधा उपलब्ध नाहीत तसेच या भागातील नागरिकांना बांधकाम परवानगी ना हरकत प्रमाणपत्र मिळत नाहीत. फक्त सहा नागरिकांना बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. तेव्हा या भागातील नागरिकांना बांधकाम परवानगी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावेत, तसेच शाळा दवाखाने, उद्याने या नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी सूचना स. सभासद श्री. मुजीबखान यांनी मांडली

ज्या भागात ४०% पेक्षा जास्त लोकवस्ती झाली आहे असा भाग इतर झोनमधून वगळून रहिवाशी झोन करण्यात हरकत नाही. असे विचार स. सभासद श्री. अलफखॉं हुसेनखॉं व स. हुसेन स. अहमद यांनी मांडले.

विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कोषागार अशा प्रकारची महत्त्वाची शासकीय कार्यालये असलेल्या भागातील "सार्वजनिक निम सार्वजनिक" या आरक्षणातील जागा रहिवाशी भागात सामील न करता मुळ आरक्षण कायम ठेवण्यात यावे या विषयाचे संबंधीत नकाशाची पाहणी केली असता नमूद केल्याप्रमाणे नकाशात कोठेही हिरवा रंग, अे/ बी/ सी क्षेत्राचा निश्चित बोध अशा अनेक त्रुटी दिसतात. तेव्हा योग्य दुरुस्ती नंतरच ठराव सादर करावा अशी सूचना स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी केली.

**ठराव क्र. ७४/१० -** स. सभासदांनी केलेल्या सूचना विचारात घेवून योगय त्या दुरुस्त्या करण्यात याव्यात व त्याप्रमाणे औरंगाबाद विकास योजनेत मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालय व निवासस्थानाच्या पूर्वेस तसेच मा. जिल्हाधिकारी कार्यालया जवळील मस्जीद व त्या लगत असलेली निवासस्थाने शिवाय दिल्लीगेट येथील पेट्रोल पंपाच्या ठिकाणी "सार्वजनिक निम सार्वजनिक" [पब्लिक सेमी पब्लिक] वापरासाठी दर्शविलेली जागा गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी आणि इतर अनाधिकृत वसाहती विकसित झाल्यामुळे या बागेचा उद्देश पूर्ण करणे शक्य नसल्यामुळे वरिल दुरुस्तीसह वरिल क्षेत्र मुंबई प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करून "सार्वजनिक / निम सार्वजनिक" वापरातून वगळून 'रहिवास भागात' समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५/११ -** बागशेजंग ही वस्ती आकाशवाणी केंद्र आणि सिंधी कॉलनी यांच्या मागे अनाधिकृतरित्या विकसित झालेली आहे. सदर वस्तीचे क्षेत्र सुमारे ४० ते ४५ हेक्टर असून या ठिकाणी बहुअंशी घ्झरे बांधण्यात आलेली आहेत. मंजूर विकास योजनेत सदर क्षेत्र "शैक्षणिक विभाग" म्हणून दर्शविल्याने या क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांच्या अत्यावश्यक गरजा उदा. पाणी, लाईट, गटारी, रस्ते इत्यादी पुरविणे अडचणीचे जात असून त्या ठिकाणी नियमाप्रमाणे विकास परवानगी देता येत नाही. या सर्व बाबी लक्षात घेवून सदर

क्षेत्र "रहिवास विभागता" सामिल करण्याविषयी प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही पूर्ण करून अंतिम मंजूरी मिळणेसाठी पूर्वीच्या प्रशासक, महानगरपालिका, औरंगाबाद ंयानी पत्र क्रमांक एएमसी/टीपीएस/१००४३/१९८३ दिनांक १३/१२/८३ अन्वये शासनास पाठविला होता.

वरिल प्रस्तावामधील स. नं. १० (भागशः) व स. नं. १९ (भागशः) च्या हद्दी पर्यंतचे क्षेत्र "रहिवासी विभागात" सामील करण्याबाबतची मंजुरी शासनाने निर्णय क्र. टीपीएस-३०८२/१६९१/सीआर-२३२/मावि-६ दिनांक १७ एप्रिल, ८५ अन्वये दिली आहे. तथापि वरील अनाधिकृत वस्तीचा बराच मोठा भाग अद्यापही "शैक्षणिक विभागातच" असल्याने वरील कलमान्वये पुन्हा कार्यवाही करून शासनास फेरविचार करण्याविषयी प्रस्ताव पाठविण्याबाबत मंजुरीसाठी सादर करीत आहे.

**संवाद -** आकाशवाणी आणि सिंधी कॉलनी यांच्यामागे विकसित झालेल्या क्षेत्रात काही ठिकाणी रिकामी जागा उपलब्ध आहे. त्या ठिकणीही २० फुट x ३० फूटचे प्लॉट पाडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा या भागातील अविकसित भागची जागा ताबडतोब संपादन करण्याचा विचार व्हावा अशी उपसुचना स. सभासद श्री. अविनाश कुमावत व श्री. मोरेश्वर सावे यांनी मांडली.

**ठराव क्र. ७५/११ -** आकाशवाणी केंद्र आणि सिंधी कॉलनी यांचे मागील शैक्षणिक विभाग दर्शविलेल्या बागशेरजंग भागात अनाधिकृतरित्या बहुतांशी घरे बांधण्यात आल्यामुळे या भागाचा झालेला विकास लक्षात घेता बागशेरजंग भागातील शैक्षणिक विभाग म्हणून दर्शविलेले क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक वनगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रहिवास क्षेत्रात रुपांतरीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या क्षेत्रातील अविकासित भागाची पाहणी करून खुल्या जागा तात्काळ संपादन करण्याचा निर्णय घेतला जाईल. असे मा. महापौर यांनी सुचविले.

**विषय क्र. ७६/१२ -** गेल्या दशकात औरंगाबाद शहराचा विकास जलद गतीने झालेला असून लोकसंख्याही दुप्पटीने वाढलेली आहे. शिवाय सध्या शहराचा विकास जलद गतीने होत आहे. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेने मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा आणि विविध आरक्षणांचा विकास करण्याचे काम हाती घेतलेले आहे. सदर विकास करण्यासाठी भुमी संपादनाच्या वेळी रस्त्यात आणि आरक्षणात काही काही लोकांची घरे पूर्णतः किंवा त्यांचा घराचा मोठा भाग ताब्यात घ्यावा लागेल, आणि त्यामुळे अशी लोक बेघर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कायद्यात अशा लोकांचे पुनवर्सन करणे बंधनकारक नसले तरी माणूसकिच्या दृष्टीने त्यांची योग्य ती पर्यायी व्यवस्था करणे जरूरीचे आहे. करिता सदर लोकांच्या पुनर्वसनासाठी चिकलठाणा, शहानुरवाडी, इटखेडा, मिटमिटा आणि हर्सूल या गावात प्रत्येकी सुमारे पाच हेक्टर जागा संपादन करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद -** विकास आराखड्याची अंमलबजावणीच्या वेळी बेघर होणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसनासाठी संपादन करावयाच्या जागेत, शक्य तो जास्तीत जास्त सरकारी जमिन कशी उपलब्ध करता येईल याचा प्रथम विचार करण्यात यावा आणि त्या नंतरच खाजगी मालकिच्या जमिनीचा विचार करावा अशी सूचना सन्माननीय सभासद श्री. नरेंद्र पाटील व श्री. चंद्रकांत खैरे यांनी केली. तसेच विकास आराखड्यातील कामाबाबत मागील सभेत मंजुरी देण्यात आली आहे. तेव्हा त्या कामाचे प्रगतीचा खुलासा व्हावा अशी मागणी सन्माननीय सभासद श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी मांडली.

**<u>ठराव क्र.</u> ७६/१२ -** सन्माननीय सभासदांच्या सुचनेचा विचार करून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजुर विकास योजनेतील रस्त्याच्या आणि विविध आरक्षणाच्या विकास कामासाठी संपादन केलेल्या जागेमुळे बेघर झालेल्या लोकांचे पुनर्वसनासाठी चिकलठाणा, शहानुरवाडी, ईटखेडा, मिटमिटा आणि हर्सूल या गावात प्रत्येकी सुमारे ५ हेक्टर जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> ७७/१३ -** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, सन १९८८-८९ मध्ये दोन नविन आरोगय केंद्रे औरंगाबाद शहरात आरोग्य सेवा देणेसाठी निर्माण करावी. यासाठी लागणारा खर्च अंदाजपत्रकात तरतूद केली आहे. या दोन आरोगय केंद्रापैकी (१) औरंगपुरा येथे (२) जवाहर कॉलनी येथे ज्या ठिकाणी महानगरपालिकेची वास्तु बांधून तयार आहे येथे सुरू करण्यास मंजुरी द्यावी. तसेच वरिल दोन आरोगय केंद्रासाठी लागणारा अधिकारी व कर्मचारी वृंद खालील प्रमाणे नविन पदे निर्माण करण्यात यावीत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | वैद्यकीय अधिकारी | वेतनश्रेणी | ६००-११५० | २ (दोन) |
| २) | मित्रक | -//- | २९०-५४० | २ (दोन) |
| ३) | परिचारिका | -//- | २९०-५४० | ४ (चार) |
| ४) | नोंदणी सहाय्यक | -//- | २००-२८० | २ (दोन) |
| ५) | सेवक स्त्री / पुरुष | -//- | २००-२८० | ४ (चार) |

वरिल प्रमाणे पदे निर्माण करून वरिल ठिकाणी आरोग्यकेंद्र सुरु करण्यास मान्यता द्यावी, यावर येणारा खर्च अंदाजे २ लाख 'सार्वजनिक दवाखाने' या शिर्षाखाली अंदाज पत्रकातील रकमेतून करण्यासाठी मंजुरी द्यावी. मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद</u> -** शहरात अनेक स्लम वसाहती आहेत. त्यांचा सर्व्हे करून त्या ठिकाणी प्राथमिक आरोग्याची सेवा उपलब्ध करून देण्यात यावी असे ठरलेले आहे. तेव्हा स्लम भागाचाही विचार करण्यात यावा या कामासाठी रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी मान्यता मिळालेली आहे. बेगमपुरा भागात जागा उपलब्ध असल्यामुळे त्या ठिकाणी आरोग्य केंद्र सुरू करावे तेव्हा अशा प्रकारे एकाच वेळी सर्व आरोग्य केंद्राची सुरुवात होईल अशी व्यवस्था करावी त्याच बरोबर याकामी लागणाऱ्या कर्मचारी वर्गाचाही विचार व्हावा अशा सूचना सन्माननिय सभासद श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. सायन्ना, श्री. अजितकुमार शेळके, श्री. गंगाधर गाढे, श्री. बंडु प्रधान श्री. नरेंद्र पाटील यांनी केल्या.

जवाहर कॉलनी आणि औरंगपुरा भागात आरोग्य केंद्राच्या इमारती बांधून तयार आहेत या दोनही आरोग्य केंद्रामुळे जवळपासच्या नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध होणा ार आहे याशिवाय या आरोगय केंद्राकरिता अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद असल्यामुळे इतर बाबींचा विचार न करता या दोन्ही ठिकाणी आरोगय केंद्र उघडण्यास मंजुरी देण्यात यावी असा खुलासा सन्माननीय सभासद श्री. चंद्रकांत खैरे, श्री. मोरेश्वर सावे व श्रीमती लता दलाल यांनी केला.

**<u>ठराव</u> ७७/१३ -** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी स्लम भागातील आरोग्य सेवा / रुग्णवाहिका / आवश्यक कर्मचारी वर्ग (पात्रता स्त्रि, पुरुष) इत्यादी बाबीचे सविस्तर निवेदन

आठ दिवसांचे आत सादर करावे आणि त्यानंतर सदर प्रस्ताव पुढच्या सभेत ठेवण्यात यावा असे मा. महापौर यांनी सुचविले.

**<u>विषय क्र.</u> ७८/१ -** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र (नागरी विभाग) वृक्ष संवर्धन अधिनियम १९७५ चे कलम ३ अनुसार वृक्ष प्राधिकरण समितीचे गठण करणे आवश्यक आहे.

ह्या समितीत कमीत कमी पाच व जास्तीत जास्त १५ सभासद असतील. या समितीचे अध्यक्ष मा. महापौर, औरंगाबाद महानगरपालिका हे असतील.

या करिता वृक्ष प्राधीकरण समितीचे गठण करणेकरिता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीकरिता सादर.

**<u>ठराव क्र.</u> ७८/१ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र (नागरी विभाग) वृक्ष संवर्धन अधिनियम १९७५ चे कलम ३ अनुसार कमीत कमी ५ व जास्तीत जास्त १५ सभासद असलेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचे गठण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ७९/२ -** "महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात स्वतंत्र्य शिक्षण मंडळाची स्थापना व्हावी."

याबाबतीत १) मुंबई महानगरपालिका प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ प्रकरण दोन भाग ३(२) तसेच मुंबई म. न. पा. अधिनियम १९४९ चे अवलोकन करून शासनास त्वरित प्रस्ताव पाठवावा.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | रशिदखाँ (मामू) |
| अनुमोदक | - | श्री. मोहसीन अहमद |
| दिनांक | - | १३/१०/८८ |

**<u>ठराव क्र.</u> ७९/२ -** प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ चे प्रकरण दोन अंतर्गत भाग-३, (२) अन्वये शिक्षण मंडळ स्थापना करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरचे शिक्षण मंडळास संमती देणे बाबत शासनास विनंती करण्यात यावी.

मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा १९४७ अन्वये महाराष्ट्रातील काही भाग वगळून शिक्षण मंडळ स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तद्अनुषंगाने शासनास विनंती करण्यात येते की, १९४७ प्राथमिक शिक्षण अधिनियम अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस देखील शिक्षण मंडळ स्थापन करण्याची संमती द्यावी.

**<u>विषय क्र.</u> ८०/३ -** महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात उपशिक्षण अधिकाऱ्याचे पद निर्माण करावे व हे पद महानगरपालिकेतील जेष्ठ शिक्षिका मधून भरणे.

कारण महानगरपालिकेच्या शाळेतील शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी योग्य व्यवस्थापनासाठी व सर्व शाळेंना भेटी देण्यासाठी, शाळेतील अडीअडचणी सोडविणे, शिक्षकांचे योग्य ते प्रश्न सोडविणे त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांना नविन शैक्षणिक धोरणाची माहिती करून देणे या बाबत.

सुचक - श्री. प्रभाकर विधाते,
अनुमोदक - श्री. प्रदिप जैस्वाल
दिनांक - १४/१०/८८

**<u>ठराव क्र.</u> ८०/३ -** प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे महानगरपालिका शिक्षण विभागात उप शिक्षण अधिकाऱ्याचे पद निर्माण करणे ही प्रशासकीय बाब असल्याचे सदरचे पदनिर्मितीनंतर या पदासाठी शासनाकडून आवश्यक ते अनुदान उपलब्ध होईल किंवा कसे ह्या बाबतीत सविस्तर खुलासा मागवावा.

शासनाने आवश्यक ते अनुदान देणेस संमती दिल्यास, सदस्ये उप शिक्षणाधिकारी हे पद निर्मितीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. योग्य ती वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> ८१/४ -** महाराष्ट्र हौसिंग बार्ड, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या म.न.पा. हद्दित असलेल्या वस्त्या (कॉलन्या), म.न.पा. ने हस्तांतरित करून घेवून तेथील नागरिकांना प्राथमिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच म.न.पा. चा कर सुध्दा वसूल करून सोईसुध्दा त्या ऐवजी द्यावेत या बाबत.

सुचक - श्री. गिरजाराम हाळनोर
अनुमोदक - श्री. शंकरराव मगर
दिनांक - १४/१०/८८

**<u>संवाद</u> -** हौसिंग बोर्डाने या वसाहतीतील नागरिकांकडून विकास खर्चाची रक्कम वसूल केली आहे काय? हा विकास खर्च हौसिंग बोर्डाने वसूल केला असेल तर नागरी सुखसोयी उपलब्ध करून देण्याची नैतिक जबाबदारी हौसिंग बोर्डाचीच आहे. याच प्रमाणे सिडकोचाही प्रश्न पुढे उपस्थित होईल तेव्हा या सर्व बाबींचा विचार वरूनच त्यावर पूर्ण निर्यण झाल्याशिवाय अशा वसाहती महानगरपालिककेने ताब्यात घेवू नये असे विचार सन्माननीय सभासद श्री. गंगाधर गाढे, श्री. अलफखाँ यांनी मांडले असता हौसिंग बोर्डाच्या वसाहतीतील गाळेधारकांकडून महानगरपालिकेतर्फे कर वसूल केला जातो. पण संबंधीतांनी विकास खर्च भरलेला नाही. म्हणून नागरी सुविधा उपलब्ध करून द्यावयाच्या नाहीत असा विचार करणे योग्य वाटत नाही, तेव्हा प्रशासनाने यात योग्य ती दुरुस्ती करून असा वाद निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी आणि नागरी सोयी उपलब्ध करून द्याव्यात अशी सूचना सन्माननीय सभासद श्री. मोतीराम घडामोडे, श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी केली.

**<u>ठराव क्र.</u> ८१/४ -** हौसिंग बोर्डाच्या वसाहतीत नागरी सोई उपलब्ध करून देण्याबाबत हौसिंग बोर्ड यांचेशी झालेला करार विकास खर्चाची रक्कम हौसिंग बोर्डाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरणा बाबतची कार्यवाही या बाबतची सत्यता जाणून घेतल्यानंतर सदर प्रस्तावावर पुढील सभेत निर्णय घेण्यात येईल असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय क्र.</u> ८२/५ -** नागपुर येथील ट्रॉफिक ट्रान्पोर्टेशन युनिट औरंगाबाद येथे हलविण्यात यावे याबाबत.

सुचक - श्री. मोरेश्वर सावे
अनुमोदक - श्री. विठ्ठल पेरकर
दिनांक - १४/१०/८८

**ठराव क्र.** ८२/५ - नागपुर येथील ट्रॉफिक ट्रान्पोर्टेशन युनिट औरंगाबाद येथे हलविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.** ८३/६ - २०' x ३०' च्या प्लॉटला बांधकाम परवानगी देणेबाबत. - कारण असे औरंगाद शहरामध्ये ४०% प्लॉट २०' x ३०' चे असून आपण जर त्यांना परवानगी देत गेल्यास म.न.पा. स आर्थिक उत्पन्न वाढेल व लोकांची गैरसोय होणार नाही व त्यामुळे अनाधिकृत बांधकामास आळा बसेल. बाबत.

सुचक - श्री. शंकरराव मगर
अनुमोदक - श्री. प्रदिप जैस्वाल
दिनांक - १४/१०/८८.

**ठराव क्र.** ८३/६ - प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व नियमास अधिन राहून २०'x३०' च्या प्लॉटला बांधकाम परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.** ८४/७ - औरंगाबाद किंवा इतर महानगरपालिकेतील द्वितीय श्रेण व तृतीय श्रणी कर्मचाऱ्यांची बदली इतर महानगरपालिकेत उदा. ठाणे, पिंपरी चिंचवड, अमरावती, नाशिक, सोलापुर, कोल्हापुर वगैरे वगैर अशा महापालिकेतून इतर महानगरपालिकेतच होत राहावी, त्या बद्दल नगरपालिकस प्रशासन, मंत्रालय किंवा नागरी विकास खाते किंवा संचालक स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचे विचारार्थ पाठविण्याबाबत.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे
अनुमोदक - श्री. मोरेश्वर सावे.

**ठराव क्र.** ८४/७ - प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील द्वितीय व तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांची इतर महापालिकेत बदली करण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.** ८५/८ - महापालिकेचा सर्व खर्च सध्या कुठल्याही प्रकारच्या ऑडिट शिवाय केला जातो. ए. जी. किंवा लोकल फंड ऑडीच्या दोन्हीही प्रकारापैकी कोणतेही ऑडिट अस्तित्वात नाही. त्यामुळे सर्वसाधारण खर्चावर कुठल्याही प्रकारचा अंकुश अस्तित्वात नाही सर्व संबंधीत मंडळीच्या हिताच्या दृष्टिने अशा प्रकारचे ऑडिट होणे किंवा असणे हत्यावश्यक आहे. तरी वरिल प्रमाणे शासनाकडून मागणी करून महानगरपालिकेच्या खर्चाला ऑडिट आवश्यक करण्याची मागणी करण्यात यावी.

सुचक - श्री. मोरेश्वर सावे
अनुमोदक - श्री. चंद्रकांत खैरे
दिनांक - १४/१०/८८

**ठराव क्र.** ८५/८ - प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेच्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाकडून नियमाप्रमाणे ऑडिट करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ८६/९ -** जे वकिल वर्ग महापालिकेतर्फे काम करतात त्यांची सर्वांची नेमणूक लोक नियुक्त महानगरपालिका अस्तित्वात येण्यापूर्वीची आहे. तरी त्यामध्ये बदल होणे आवश्यक असून महापालिकेचे हित संरक्षण योग्य तऱ्हेने होण्याकरिता योग्य अशा विधीज्ञाची नेमणूक होणे आवश्यक आहे. तरी पूर्वीच्या नेमणूका रद्द करून योग्य अशा विधीज्ञांची (वकिलांची) निवड व नेमणूक व्हावी.

सुचक - श्री. मोरेश्वर सावे.
अनुमोदक - श्री. चंद्रकांत खैरे.
दिनांक - १४/१०/८८.

**<u>ठराव क्र.</u> ८६/९ -** सध्या महापालिकेत कार्यरत असलेल्या विधीज्ञांना मार्च ८९ पर्यंत नेमणूक देण्यात आलेली आहे. ती लक्षात घेता प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेचे हितसंरक्षण योग्य तऱ्हेने होण्याकरिता १ एप्रिल १९८९ पासून नवीन विधिज्ञाची नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ८७/१० -** कविवर्य वि. वा. शिरवाडकर उर्फ "कुसुमाग्रज" यांना साहित्य क्षेत्रातील भारतातील सर्वोच्च असा "ज्ञानपीठ" पुरस्कार मिळाला आहे. मराठी माणसाच्या दृष्टीने ही अभिमानाची गोष्ट आहे. तेव्हा आपल्या महानगरपालिकेतर्फे त्यांचा अभिनंदानाचा ठराव पास करावा व "गर्जा जय जयकार" सारखी राष्ट्रगितांच्या दर्जाची कविता लिहिणाऱ्या या कवीचा महानगरपालिकेने नागरी सत्कार करावा.

सुचक - श्री. सुभाष परदेशी.
अनुमोदक - श्री. चंद्रकांत खैरे.
दिनांक - १४/१०/८८.

**<u>ठराव क्र.</u> ८७/१० -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे "ज्ञानपीठ" पुरस्कार विजेते कविवर्य श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ "कुसुमाग्रज" यांचा आणि त्याच बरोबर इतर विविध क्षेत्रातील नामवंतांचा नागरी सत्कार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ८८/११ -** चौक पोलिस स्टेशन ते गुलमंडी मार्गे मछली खडक डी. पी. रोडची जागा संपादन करणेबाबत.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे.
अनुमोदक - श्री. विठ्ठल पेरकर.
दिनांक - १४/१०/८८.

**<u>ठराव क्र.</u> ८८/११ -** सदर रस्ता व्यापारी पेठेतील असल्यामुळे बाधित होणाऱ्या मालमत्त संपादनासाठी नियामाप्रमाणे अदा करावयाच्या मोबदल्याचा विचार करता अन्य कामासाठी पैसा अपुरा पडू नये ही बाब लक्षात घेवून संपादनाची कार्यवाही तूर्त रद्द करण्यात यावी आणि या बाबतचा पूर्ण अभ्यास करून त्यावर चर्चा करता येईल असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> ८९/१२ -** उस्मारपुरा-पिर बाजार समोर डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ एक भव्य असे उद्यान (गार्डन) तयार करण्याबाबत.

सुचक - १) श्री. मनमोहनसिं ओबेराय
२) श्री. किशोर थोरात

अनुमोदक - १) श्री. गिरजाराम हाळनोर
२) श्री. बंडु प्रधान.
दिनांक - १३/१०/८८ व १४/१०/८८

**<u>संवाद</u> -** या भागात राहणाऱ्या नागरिकांची उद्यानाची गरज लक्षात घेवून प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. या उद्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव देण्यात यावे अशी मागणी बहुसंख्य सभासदांनी केली असता सदर जागेची मालकी शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालयाची असून या जागेचा समावेश शैक्षणिक क्षेत्रात होत आहे. पूर्वी या जागेवर मुरलीधरनगर झोपडपट्टी होती. जानेवारी, १९७६ मध्ये सदर झोपडपट्टी उठविण्यात आली परंतु तेथे अद्यापही डॉ. बाबासाहेब आंबेडकरचा पुतळा आहे. तेव्हा सदरचा प्रस्ताव नामंजुर करावा अन्यथा सभात्याग करावा लागेल असा खुलासा सन्माननिय सभासद श्री. प्रकाश जावळे यांनी केला.

**<u>ठराव क्र.</u> ८९/१२ -** बहुसंख्य सभासदांची मागणी लक्षात घेता उस्मानपुरा पिर बाजार समोरिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ एक उद्यान तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या उद्यानास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव देण्यात यावे तत्पुर्वी सदर जागेच्या मालकी हक्काबाबत योग्य ती पडताळणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. वरिल ठरावाच्या निषेधार्थ स. सभासद श्री. प्रकाश जावळे यांनी सभात्याग केला.

**<u>विषय क्र.</u> ९० -** वार्ड क्रमांक ३ मध्ये तळेश्वर कॉलनी समोर खुले मैदान आहे व त्या खुल्या जागेत आपल्या टाऊन प्लॅनिंगच्या नकाशा मध्ये बाग (गार्डन) दाखविलेले आहे. तरी त्या जागेत छोट्या मुलांसाठी बाग बनविण्याची व्यवस्था करावी, व त्या भागाचे वैभव वाढविण्यास बाग लवकर बनवावे.

सुचक - श्री. प्रभाकर विधाते.
अनुमोदक - श्री. नारायण फत्तेलष्कर
दिनांक - १४/१०/८८

**<u>ठराव क्र.</u> ९० -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. (३) येथील तळेश्वर कॉलनी समोरील नगर रचना विभागाच्या विकास आराखड्यात उद्यानासाठी आरक्षित असलेल्या जागेवर उद्यान तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ९१ -** रेल्वे स्टेशन बाजार परिसरातील साधना लॉजच्या पूर्व बाजूला जी सार्वजनिक कार्यक्रमासाठी वापरण्यात येणारी जागा व १९७० च्या नगरपालिकेच्या काळात गार्डनसाठी रिझर्व म्हणून ठेवलेली जागा पुन्हा ताब्यात होवून ती सर्व जनतेस "एक गार्डन समाज मंदिर बांधून" मुक्त करण्याबाबत.

सुचक - श्री. आनंद गोडसे.
अनमोदक - श्री. चंद्रकांत खैरे.
दिनांक - १४/१०/८८.

**<u>ठराव क्र.</u> ९१ -** प्रस्तावात दर्शविलेली जागा अंजुमन बुऱ्हानी दर्गा ट्रस्ट डोणगांव यांच्या मालकीची असल्याने या भागातील नागरिकांसाठी समाज मंदिर / उद्यान यासाठी लागणारी जागा शक्य तितक्या लवकर उपलब्ध करून देण्याबाबतचा सविस्तर अहवाल पुढील सभेपर्यंत सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> ९२ -** स्थायी समिती ठराव क्र. २९०/दिनांक १७/०८/८८ अन्वये सिडको, पुष्पनगरी, बेगमपुरा, उस्मानपुरा याही ठिकाणी स्थित स्मशान भुमीसाठी स्माशान जोगी या जमातीतील प्रत्येकी एक या प्रमाणे चौकीदार नियुक्त करणेस्तव सर्वानुमते मंजुरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्र.</u> ९२ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको, पुष्पनगरी, बेगमपुरा, उस्मानपुरा इत्यादी ठिकाणी असलेल्या स्मशान भुमीसाठी स्मशान जोगी जमातीतील प्रत्येकी एक याप्रमाणे चौकीदार नियुक्त करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ९३ -** कृषि उत्पन्न बाजार समिती यांचे दि. १८/०७/८८ चे पत्रकानुसार आणि महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ अन्वये औरंगाबाद महानगर पालिकेने नियुक्त लोकप्रतिनिधी (सदस्य) मधून एक प्रतिनिधी निवडून कृषि उत्पन्न बाजार समितीवर सदस्य म्हणून पाठविणे आवश्यक आहे. विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्र.</u> ९३ -** सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत खैरे यांनी कृषि उत्पन्न बाजार समितीवर महापालिकेच्या प्रतिनिधी पाठविण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. विठ्ठल पेरकर यांचे नांव सुचविले त्यास स. सभासद श्री. प्रदिप जैस्वाल व श्री. मोरेश्वर सावे यांनी अनुमोदन दिले. तसेच सन्माननीय सभासद श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी डॉ. चेनकरण संचेती यांचे नांव सुचविले व त्या श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी अनुमोदन दिले.

एका जागेसाठी दोन उमेदवारांची नांवे सुचविण्यात आल्यामुळे मा. महापौर यांनी हात वर करून मतदान घेण्याची सूचना केली असता. स. श्री. विठ्ठल पेरकर यांना २८ तर डॉ. चेनकरण संचेती यांना २९ मते पडली.

उपरोक्त मतमोजणी प्रमाणे २९ विरुध्द २८ मतांनी डॉ. चेनकरण संचेती यांची औरंगाबाद महानगरपालिके तर्फे कृषि उत्पन्न बाजार समितीवर महापालिका प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित करण्यात आले. त्यास बहुमताने मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्र.</u> ९४ -** मा महापौर यांचे अध्यक्षतेखाली आज दिनांक ०७/१०/८८ रोजी खाली निर्दिष्ट सदस्यांचे उपस्थितीत संपन्न झाली.

१) श्री. डॉ. शांताराम काळे.
२) श्री. अलफखॉन हुसेन खान.
३) श्री. डॉ. चेनकरण संचेती.
४) श्री. चंद्रकांत खैरे.

५) श्री. मनमोहनसिंग ओबेराय.

प्रस्तावित बैठकित अधी निर्दिष्ट सहा समित्यांना देण्यात येणाऱ्या अधिकाराबाबत विचार विनिमय होऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये नियमावली तयार करण्यात आली असून त्या विषय समित्यांचे अधिकार व कर्तव्ये नमुद केली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (२) व (६) अन्वये खालील नमूद केलेल्या विषय समित्यांना त्यांचे अधिकार व कार्यक्षेत्र ठरविणे बाबत शिफारस केली आहे. सदरच्या विषय समित्या खालील प्रमाणे आहेत.

अ) स्थापत्य समिती - सार्वजनिक बांधकाम समिती.
ब) वैद्यकिय सहाय्य आणि आरोग्य समिती.
क) विधी समिती, कायदा, महसूल आणि सर्वसाधारण प्रयोजन समिती.
ड) शहर सुधारणा व सुधार समिती.
इ) माध्यमिक पूर्व प्राथमिक शाळा आणि तांत्रिक समिती.
फ) गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती.
१) स्थापत्य समितीचे कार्यक्षेत्र (सार्वजनिक बांधकाम समिती)
१) नगर स्थापत्य प्रमुख यांचा विभाग व तत्संबंधी सर्व प्रश्न.
२) मार्ग, भवने, पाणीपुरवठा आणि जलाशाळा (वॉटर वर्क्स) खुली मैदाने व उद्याने, अग्निशामक दल, कर्मशाला यांत्रिकी स्थापत्याची शाखा आणि स्थापत्य विभागातील इतर कामे.
३) सार्वजनिक सुरक्षितता आणि सुखसोयी संबंधी इतर प्रश्न.
४) भुमी आणि जिंदगी विभाग व तत्संबंधी सर्व प्रश्न.
५) कामाची तपासणी आणि आवश्यकता वाटेल त्यांचे महापालिका आयुक्त यांच्याकडून निवेदने मागविणे.

**स्थापत्य समितीचे अधिकार व कामे**

| कलम | अधिकार किंवा काम यांचे स्वरुप | अधिकार प्रदानाच्या मर्यादेसंबंधी शेरे |
|---|---|---|
| ४५(१)<br>७० | १. नगर स्थापत्य प्रमुख या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या समितीच्या किंवा उपसमितीच्या वृत्तांतील उतारा मागविण्यात आणि अशा समिती किंवा उपसमिती संबंधी विवरण पत्र, हिशोब पत्रक, किंवा प्रती वृत्त मागविण्याचा अधिकार समितीच्या कामापुरता अंतिम. | समितीच्या कामापुरता अंतिम. |
| ७६(१) | मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार | समितीच्या |
| ७९(सी) | कलम क्र. ७९ चे (९) (बी) (डी) (इ) यांना पत्र राहुन महानगरपालिकेची मालमत्ता भाड्याने देणे, विकणे अथवा इतर मार्गाने तिची विल्हेवाट लावणे, या करिता मान्यता देण्याचा अधिकार. | |
| १५४(१) | महानगरपालिकेने गटारे, जलनिसःरण अथवा मल प्रवाहाची विल्हेवाट करण्याची साधने व कामे वगैरे ताब्यात द्यावी. याकरिता महापालिका आयुक्त यांना संमती देण्याचा आधिकार. | |

| | | |
|---|---|---|
| १७६(ए) | जलनिस:रक व मैला वाहतुकीची गटारे | |
| संकेत | सोडणेची जागा ठरविण्याचा अधिकार. | |
| १८८(२) | काही विशिष्ट कामे महानगरपालिकेच्या न्यायानेच करावीत, अशा बाबत सर्वसामान्य स्वरुपाचा अथवा विशेष आदेश देण्याचा अथवा प्रस्ताव मान्य करण्याचा अधिकार. | |
| १८९(२) | जलशाळा इ. बांधण्याला संमती देण्याचा अधिकार | |
| १९४(१) | जलशाळेशी संबंध असलेल्या कामांना अनुज्ञा देण्याचा अधिकार | |
| १९६(२) | विनामुल्य पाणीपुरवठाकरिता जलशाळा बांधण्याचा महापालिका आयुक्त यांना अनुज्ञा देण्याचा अधिकार | |
| १९६(३) | विनामुल्य पाणीपुरवठाकरिता असलेली पुरवठ्याची सामने बंद करण्याचा अधिकार | |
| १९६(४) | मुळ देणगी म्हणून मिळालेल्या रकमेतून बांधण्यात आलेल्या आणि नंतर बंद करण्यात आलेल्या पाणी पुरवठ्याची साधने सार्वजनिक उपयुक्ततेच्या कामाकरिता वापरावी असा आदेश देण्याचा अधिकार. | |
| २०३(२) | आक्षेप मागविण्यात आल्यानंतर ते विचारात घेवून एखादा संपूर्ण सार्वजनिक पत्र अथवा त्याचा भाग कायमचा बंद करण्याचा अधिकार. | |
| २०५ | नविन पत्र आखणे आणि तयार करणे. आणि त्यांच्या व्यायासंबंधी करार करणेबाबत महापालिका आयुक्त यांना अनुज्ञा देण्याचा अधिकार. | |
| २०६(१) | निरनिराळ्या वर्गाच्या सार्वजनिक रस्त्यांची किमान रुंदी ठरविण्याचा अधिकार. | |
| २०७ | भुयारी मार्ग किंवा पुल वगैरे ताब्यात घेण्याचा, बांधण्याचा ा किंवा त्यात काही फेरबदल करण्याचा महापालिका आयुक्त यांना अनुज्ञा देण्याचा अधिकार. | |
| २०८(१) | काही विशिष्ठ प्रकारच्या रहदारी करिता सार्वजनिक पंथाच्या वापराला बंदी करण्याकरिता मान्यता देण्याचा आधिकार. | |
| २०९(१) (बी) | पंथाच्या प्रमाणित रेषेच्या बाहेरील जागा संपादन करण्यास मान्यता देण्याचा अधिकार. | |
| २४९(१) (सी) | सार्वजनिक पथ प्रकाशित करण्याची साधने ठरविण्याचा अधिकार. | |

| २. वैद्यकीय सहाय्य आणि आरोगय समितीचे कार्यक्षेत्र | | |
|---|---|---|
| | १.महानगरपालिकेची बाह्य औषधालये, रुग्णालये (सांसर्गिक रोगांचे रुग्णालय धरून) प्रसुतीगृहे, वैद्यकीय आणि शुश्रुषा गृह आणि ज्या वैद्यकीय संस्थाना महानगरपालिका आर्थिक मदत करते, त्या संबंधीचे सर्व प्रश्न. | |
| | २. आरोग्य विभाग - रस्ते सफाई, कचरा वाहतुक (स्थापत्य समितीच्या अधिकारात येणाऱ्या तांत्रिक विभागासंबंधी प्रश्न सोडून) धूरन आणि तत्संबंधी इतर सर्व प्रश्न. | |
| | वैद्यकीय सहाय्य आणि आरोग्य समितीचे अधिकार व कामे | |
| ४५(३) | आरोग्य प्रमुख : | |
| | | |
| कलम | अधिकार किंवा काम यांचे स्वरुप | अधिकार प्रदानाच्या मर्यादेसंबंधी शेरे |
| ६४ | पिसाळलेली कुत्री चावल्यामुळे औषधोपचार घेणाऱ्या गरिब माणसाचे पालन-पोषण आणि उपचार याकरिता खर्च करण्याचा अधिकार. | |
| ७० | या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या एखाद्या समितीच्या किंवा उपसिमितीच्या वृत्तांतातील उतारा मागविण्याचा आणि अशा समिती किंवा उपसंबंधी संबंधी विवरण पत्रक हिशोब पत्रक किंवा प्रतीवृत्त मागविण्याचा अधिकार. | समितीच्या कामापुरता अंतिम |
| २९४(१) | आयुक्ताने जेथे विशिष्ट प्रसंगी लोक मोठ्या संख्येत जमतात असे कोणतेही देऊळ, मठ, मशिद, थडगे किंवा धार्मिक पुजेअर्चेची किंवा शिक्षणाची कोणतीही जागा यांच्या जवळपास जत्रा किंवा उत्सव भरण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही जागेत स्वच्छता राखण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी खास व्यवस्था केली पाहिजे मग ती कायमची असो कि तात्पुरती असो. | |
| २९४(२) | महापालिकेने आरोग्य रक्षण विषयक केलेल्या खास व्यवस्थेच्या व्यथा प्रित्यर्थ घ्यावयाची रक्कम ठरविण्याचा अधिकार. | |
| ३२१(१) | प्रेतांची विल्हेवाट लावण्याकरिता योग्य आणि सोयीस्कर अशा इतर जागा ठरविण्याचा अधिकार. | |
| ३२२ | प्रेतांची विल्हेवाट लावण्याकरिता नविन जागा देण्याची किंवा अनुज्ञा नाकारण्याचा महापालिका आयुक्त यांना अधिकार देण्यास संमती देण्याचा अधिकार. | |
| ३२८(१) | महानगरपालिकेच्या नविन मंड्या आणि नविन पशुवध गृहे यांचे तरतूद महापालिका आयुक्त यांनी करण्याबाबत अनुज्ञा देण्याचा अधिकार. | |
| ३२८(२) | महापालिका कत्तलखाने व पशु आवारे ही शहरात किंवा (राज्य) शासनाच्या मंजुरीने शहराबाहेर ठेवता येतील. | |
| ३२९ | महापालिका मंड्या आणि पशुगृहे इत्यादी बंद करण्याचा | |

| | | |
|---|---|---|
| | अधिकार. | |
| ३३०(१) | महानगरपालिकेच्या मंड्यात विक्री करण्यात येणाऱ्या मालाची (बाहेर) विक्री बंद करण्यास मान्यता देण्याचा अधिकार. | |
| ३३०(२) | पोट-कलम (१) अन्वये दिलेली कोणतीही नोटीस तसेच मंजुरी घेऊन कोणत्याही वेळी आयुक्तस रद्द करता येईल किंवा तीत फेरबदल करता येईल. | |
| | | |
| **३. विधी समितीचे कार्यक्षेत्र - (विधी महसूल व सर्वसाधारण उद्देश समिती)** | | |
| १. | महापालिकेच्या कारभारासंबंधी, महानगरपालिका व अधिनियम आणि इतर अधिनियम, पोट नियम, विनियम, नियम यातील तरतुदीच्या अर्थ लावण्या बाबत आणि त्यामधील सुधारणाबाबत उपस्थित होणारे प्रश्न. | |
| २. | कर आकारणी व कर संकलन विभाग. | |
| ३. | निवडणूका विषयक प्रश्न | |
| ४. | आयात कर विभाग. | |
| ५. | गणना विभाग. | |
| ६. | अनुज्ञा पत्र (परवाना विभाग) (आरोग्य आणि आरोग्येतर) | |
| ७. | दुसऱ्या विशेष समित्यांच्या कक्षेत येणारे सर्व संकिर्ण प्रश्न. | |
| | | |
| **विधी समितीचे अधिकार व कामे** | | |
| कलम | अधिकार किंवा काम यांचे स्वरुप | अधिकार प्रदानाच्या मर्यादेसंबंधी शेरे |
| ३(३) | महानगरपालिका चतु:सिमेतील बदल. | |
| ३२ | इतर स्थानिक प्राधिकारी अथवा प्राधिकाऱ्यांच्या गटाबरोबर संयुक्त व्यवहार अथवा कामे करण्याकरिता त्यांच्याशी संयुक्त होण्याचा अधिकार. | |
| ४५(१) | प्रमुख अर्थन्विक्षक, नगरसचिव, महानगरपालिका. | |
| (२)(३) | उपायुक्त [डेप्युटी म्युनिसिपल कमिशनर] महापालिका सहाय्यक आयुक्त आणि (असिस्टंट म्युनिसिपल कमिशनर) यांच्या नेमणूका करण्याचा अधिकार. | |
| ६०(१) | महापालिकेने दिलेल्या निवासस्थानात अधिकारी व कर्मचारी यांनी राहण्याबाबत अटी आणि शर्ती सुचविण्याचा अधिकार. | |
| ६०(१) (बी) | महापालिका आयुक्त यांनी महापालिकेच्या जागा रिकाम्या करून घेण्याबाबत मान्यता देण्याचा अधिकार | |
| ७० | या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या एखाद्या समितीच्या किंवा उप समितीच्या वृत्तांतातील उतारा मागविण्याचा आणि अशा समिती किंवा उपसमिती संबंधी विवरण पत्रक, हिशोब पत्रक किंवा प्रतिवृत्त मागविण्याचा अधिकार | समितीच्या कामापुरता अंतिम |
| ८०(२) | मालमत्तेवरील हक्का संबंधीच्या निर्णयाबाबत दिवाणी दावा लावण्याचा अधिकार. | |

| | | |
|---|---|---|
| ८१ | आपली मालमत्ता हस्तांतरित केलेली आहे, अशा मालकाविरुध्द अथवा ज्याच्याकडे ती हस्तांतरित झाली आहे, अशा विरुध्द करारांची कार्यवाही करण्याचा अधिकार. | |
| १३२(२) | सरकारी मालमत्तेचे मुल्यमापन कण्याकरिता (महाराष्ट्र) शासनाने केलेल्या नियुक्ती बद्दल आपले सहमत व्यक्त करण्याचा अधिकार. | |
| २८५(३) | स्वयंसेवक अग्निशामक दल म्हणून कोणत्याही व्यक्ती समुहाला मान्यता देण्याचा आणि त्याकरिता अटी ठरविण्याचा अधिकार. | |
| ३८६(२) | अनुज्ञापत्रे (लायसन्स) अथवा लिखित अधिकार पत्रे या करिता आकारावयाच्या शुल्काचे दर ठरविण्याचा अधिकार. | |
| ४२२(१) | दंडाधिकाऱ्यांच्या जागा निर्माण करण्याबाबत संमती देण्याचा अधिकार. | |
| ४५४ | नियम करण्याचा अधिकार. | |
| ४५५(३) | नियमांच्या अधिक प्रगटीकरणाची रित ठरविण्याचा अधिकार. | |
| ४५८ | उप नियम करण्याचा अधिकार. | |
| ४८१(१) | एखादा विशिष्ट दावा दाखल करणे आणि चालविणे किंवा कसे हे ठरविण्याचा अधिकार. | |
| | | |
| **४. शहर सुधारणा समितीचे कार्यक्षेत्र (सुधारणा समिती)** | | |
| १. | शहराच्या सर्वसाधारण सुधारणा संबंधी तसेच निर्देशक योजना (मास्टर प्लॅन) नगर रचना योजना, औद्योगिक वसाहती, गृहनिर्माण योजना या संबंधीचे सर्व प्रश्न. | |
| | शहर सुधारणा समितीचे अधिकार व कामे. | |
| कलम | अधिकार किंवा कामे यांचे स्वरुप | अधिकार मर्यादेसंबंधी शेरे |
| ७० | या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या समितीच्या किंवा उप समितीच्या वृत्तांतातील उतारा मागविण्याचा आणि अशा समिती किंवा उप समिती संबंधी विवरण पत्रक हिशोब पत्रक किंवा प्रतीवृत्त मागविण्याचा अधिकार. | |
| ७६(१) | मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार | समितीच्या कार्यक्षेत्रातील |
| २७०(१) (बी)(१) | महापालिका आयुक्त यांनी काढलेल्या अधिसुचनेला [नोटीफिकेशन] पसंती देण्याचा अधिकार | |
| | खोका टपरीधारकांचे अर्जाप्रमाणे नगर रचना अधिकारी यांचे अभिप्राय घेवून मंजुरी देणे. | |
| ५. | माध्यमिक, पूर्व-प्राथमिक व तांत्रिक शाळा समितीचे कार्यक्षेत्र | |
| | माध्यमिक, पूर्व-प्राथमिक व तांत्रिक शाळे संबंधीचे सर्व प्रश्न | |

| | | |
|---|---|---|
| ६. | गलिच्छ वस्ती सुधारणा, घर बांधणी व समाज कल्याण समितीचे कार्यक्षेत्र | |
| | गलिच्छ वस्ती सुधारणा, घर बांधणी व समाज कल्याण समितीचे सर्व प्रश्न. | |

**ठराव क्र. ९४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मु. प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमावलीत नमूद केल्याप्रमाणे य अधिनियमातील कलम ३०(२) व (६) अन्वये विशेष समितीना प्रदान करण्यात यावयाचा अधिकार व कार्यक्षेत्रास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. ठाणे मनपाने या कामासाठी तयार केलेल्या उपविधीच्या प्रत सभासदांच्या माहितीस्तव उपलब्ध करून देण्यात यावी. या उपविधीनुसार स. सभासदांनी काही दुरुस्त्या अथवा सूचना सुचविल्यास त्याप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ९५ -** औरंगाबाद शहरातील अंधाराचे साम्राज्य संपविण्यासाठी विद्युत विभागात सहा झोनकरिता सहा क. अभियंताची पदे निर्माण करून क. अभियंता प्रत्येक झोनकरिता स्ट्रीट लाईट इन्चार्ज म्हणून नेमणे.

सुचक - अजिजउल्ला बेग.
अनुमोदक - एकबालसिंग गिल.
दिनांक - १४/०९/१९८८.

**ठराव क्र. ९५ -** शहरातील विद्युत व्यवस्थेसाठी महापालिकेतर्फे लवकरच हैड्रॉलिक ट्राली खरेदी करण्यात येत असल्यामुळे दर्शविलेली पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ९६ -** मोहल्ला बेगमपुरा येथील मकबरा व बेगमपुरा कॉर्नरवर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळा उभारण्यात यावा.

सुचक - अजितकुमार शेळके.
अनुमोदक - अजिजउल्ला बेग.
दिनांक -

**ठराव क्र. ९६ -** शहरातील रस्त्यांना थोर व्यक्तींची नावे देणे व चौकात थोर व्यक्तीचे पुतळे उभे करण्याबाबत निश्चित करण्यात आलेल्या उप-समितीपुढे सदर प्रस्ताव ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ९७ -** औरंगाबाद शहरामध्ये आपल्या महानगरपालिकेचे जितके दुकाने आहेत. त्यामध्ये मागासवर्गीयांना राखीव दुकाने दिली पाहिजेत. त्यामुळे मागासवर्गीय सुध्दा व्यवसायामध्ये जे मागे आहेत. ते इतर व्यापाऱ्या बरोबर येवू शकतील. ज्यामुळे थोड्याफार प्रमाणामध्ये त्यांच्यामध्ये उन्नती होईल. दलितांची आर्थिक परिस्थिती आजही फार हालाकीची आहे. ज्यामुळे ते एकतर पगडी किंवा टेंडर भरु शकत नाही. किंवा ॲडव्हान्स सुध्दा देवू

शकत नाही. एक तर त्यांच्याकडे पैसा नसतो, आणि पैसा नसल्यामुळे ते दुकाने घेऊ शकत नाही. ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांनी चार ते पांच दुकाने घेतले आहेत. त्यामुळे ते गल्लेलठ्ठ होत आहेत. गरिब / गरिबच राहत आहे. तेव्हा साहेबांनी मागासवर्गीयांना व दलितांना राखीव दुकाने ठेवावेत आणि त्यांच्याकडे पैसा नसल्यामुळे त्यांच्याकडून टप्याटप्प्यांनी पैसे घ्यावेत.

सुचक - बंडु प्रधान
अनुमोदक - किशोर थोरात
दिनांक - १३/०९/१९८८.

**<u>ठराव क्र.</u> ९७ -** सन्माननीय सभासद श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी मांडलेली उपसुचना लक्षात घेता औरंगाबाद शहरात महानगरपालिका मालकिची दुकाने भाड्याने देतांना सर्व स्थरातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाच्या सुशिक्षित बेकार तरुणांना प्राधान्य देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ९८ -** जालना रोड अत्यंत नादुरुस्त झाला असून तो तातडीने आठ दिवसाचे आंत व पुर्नबाधणी करण्यासाठी सुरू करावा व त्यासाठी हा ठराव अनुक्रमाने चर्चेस घ्यावा. या रोडसाठी स्थायी समितीचे अधिकार सुध्दा याच बैठकीत सर्वसंमताने उपयोगात आणावेत. नसता घरणे धरण्याशिवाय पर्याय नाही.

सुचक - मोतीराम घडामोडे.
अनुमोदक - अविनाश कुमावत.
दिनांक - १३/०९/१९८८.

**<u>ठराव क्र.</u> ९८ -** दिनांक १ डिसेंबर, १९८८ पासून जालना रोड रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्यात येईल. असा खुलासा मा. महापौर यांनी केली.

**<u>विषय क्र.</u> ९९ -** हॉटेल पंचवटी (पद्मपुरा) ते कर्णपुरा देवीचे मंदिर या मार्गाचे डांबरीकरण करण्यात यावे. महापालिकेने कॅन्टोनमेंट बोर्डाचे सहकार्याने हे डांबरीकरण करावे.
सुचक - विनय पालीवाल
अनुमोदक - सावे मोरेश्वर
दिनांक - १३/०९/१९८८

**<u>ठराव क्र.</u> ९९ -** प्रस्तावात दर्शविलेल्या रस्त्याचे खडीकरणाचे काम नुकतेच पूर्ण झाले असून डांबरीकरणाचे कामाचे अंदाजपत्रकास व दरपत्रकास स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. त्याप्रमाणे लवकरच डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात येईल असा खुलासा मा. महापौर यांनी केला.

**<u>विषय क्र.</u> १०० -** प्रत्येक वार्डाच्या किरकोळ कामाच्या खर्चासाठी विभागीय अधिकारी (झोन ऑफिसर) यांना रुपये पांच हजारापर्यंत (५०००/-) खर्च करण्याची अनुमती द्यावी.

सुचक - विधाते प्रभाकर सिताराम.
अनुमोदक - जयवंत ओक.
दिनांक - १३/०९/१९८८.

**<u>ठराव क्र.</u> १०० -** सर्वानुमते असे ठरले की, नियमाप्रमाणे विभागीय अधिकारी (झोनल ऑफिसर) ह्यांना अशा प्रकारचे अधिकार प्रदान करता येत नसल्यामुळे सदर प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**<u>विषय क्र.</u> १०१ -** शहरात सध्या मटनाची खुली आम विक्री होत आहे. ती बंद दुकानात व परवाना धारकास विक्री करण्याची परवानगी असावी.

सुचक - जयवंत ओक.
अनुमोदक - प्रदिप जैस्वाल.
दिनांक - १३/०९/८८.

**<u>ठराव क्र.</u> १०१ -** मटन आणि बीफ परवाना प्राधिकरणाने प्रस्तुतचे प्रकरणी जातीने लक्ष घालून शहरात मटन किंवा बिफची उघड्यावर विक्री होणार नाही ह्याची दक्षता घ्यावी. त्यासाठी नियमोल्लंघन होणार नाही हे पहावे असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> १०२ -** चिकलठाणा हे गांव महापालिके अंतर्गत आले आहे. परंतु अद्यापही त्या गावात ड्रेनेजची लाईन नाही. तरी ड्रेनेज लाईनसाठी मंजुरी द्यावी.

सुचक - कचरू चंद्रभान नवपुते.
अनुमोदक - सुभाष परदेशी.
दिनांक - १३/०९/१९८८.

**<u>ठराव क्र.</u> १०२ -** औरंगाबाद महापालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या १८ खेड्यांना जलनिस:रण योजना लागू करण्याच्या दृष्टीने ६५ कोटी रुपये खर्चाची योजना शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आली आहे. तरी पण चिकलठाणा / पडेगांव अशा १८ खेड्यांसाठी स्वतंत्र्यरित्या जलनिस:रण योजना तयार करता येईल काय त्यासाठी किती खर्च येईल याबाबत कार्यकारी अभियंता यांनी सविस्तर टिप्पणी तयार करून सभागृहासमोर सादर करावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> १०३ -** पुणे महानगरपालिका प्रमाणेच श्री. गणेशोत्सव विसर्जन मिरवणूकीतील प्रत्येक गणपती मंडळास महापालिकेतर्फे पुष्पहार व श्रीफळ देवून त्यांचे स्वातग प्रथम नागरिक श्री. गणेश महासंघाच्या पदसिध्द या नात्याने माननीय महापौरांनी करावे.

सुचक - चंद्रकांत खैरे.
अनुमोदक - प्रदिप जैस्वाल.
दिनांक - १३/०९/१९८८.

**<u>ठराव क्र.</u> १०३ -** गणेश उत्सव नुकताच पार पडल्यामुळे या प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता नाही असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> १०४ -** नगरसेवकांचे मानधन पिपरी चिंचवड सारखे मिळावे.

सुचक - म. रशिद खान (मामू).
अनुमोदक - मोतीराम घडामोडे.
**<u>ठराव क्र.</u> १०४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिके प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचा नगर सेवकांना मानधन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> १०५ -** आयुक्तांनी भेटण्यासाठी नगरसेवकांना ठराविक दिवसाचे बंधन नसावे. सोमवार ते शुक्रवार त्यांना मुक्त असावा. इतकेच नव्हे तर अत्यावश्यक बाबींसाठी घरीसुध्दा वेळ मिळावा.

सुचक - म. रशिद खान (मामू).
अनुमोदक - मोतीराम घडामोडे.
दिनांक - १३/०९/१९८८.

**<u>ठराव क्र.</u> १०५ -** सदर प्रस्ताव सभागृहाचे कामकाजातून वगळण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> १०६ -** औरंगाबाद शहराच्या लोकसंख्येत उर्दू भाषा बोलणारे आणि त्यांचे लिखान व वाचन करणारे लोक जास्त संख्येत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने या शहरात "अल्पसंख्यांक शहर" म्हणून मान्यता दिली आहे.

नगरपालिका असतांना दिनांक ०५/१२/७८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव क्र. २५३ ऐनवेळेच्या प्रस्ताव म्हणून वरिल ठराव मांडण्यात आला होता. यावर मे. अध्यक्षांनी सुचविले की, स्थायी समिती क्र. १०५ अन्वये कार्यालयात येणाऱ्या उर्दू अर्जाची उत्तरे उर्दूमध्ये देण्यात यावीत तसेच विषय समितीच्या विषय पत्रिकांची एक प्रत उर्दूमध्ये देण्यात यावी. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली होती. परंतु आतापर्यंत वरिल ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही. तरी ताबडतोब अंमलात आणावी. नसता वरिल ठराव आजच्या बैठकित मंजूर करून लवकरात लवकर अंमलबजावणी व्हावी.

सुचक - मोहंमद अयुब जहागिरदार.
अनुमोदक - स. अ. एकबालोद्दिन.
दिनांक - १४/०९/१९८८.

**<u>ठराव क्र.</u> १०६ -** आवश्यक त्या दुरुस्तीसह पुढील सभेमध्ये सदर प्रस्ताव सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> १०७ -** प्रगती पथावर औरंगाबाद शहरात गरिब व मध्यमवर्गीय नागरिकांना शहराअंतर्गत प्रवास करण्याकरिता कमी दराचे शहर बस वाहतुक हेच एकमेव साधन आहे. या बसेसमध्ये नेहमीच गर्दी असल्याने स्त्रियांना प्रवास करणे अत्यंत कठिण झालेले आहे.

विशेषतः शाळा व कॉलेजच्या मुलींना हा भास नेहमीच होत असल्याची तक्रार केली जाते. स्त्रियांना मान सन्मान दिला जात नाही. उलट त्यांना अत्यंत क्लेशजनक परिस्थितीत बसमध्ये धक्के बुक्के खात प्रवास करावा लागतो. त्याचप्रमाणे त्या अपरिचित पुरुषा बरोबर अत्यंत संकोचाने बसावे लागते. शहर बसच्या कमी खर्चाचा दुसरा कोणताच मार्ग नसल्याने गरिब आणि मध्यम वर्गीय स्त्रियांना व मुलींना अत्यंत लाजीरवाने आवस्थेत हा बस प्रवास करावा लागतो. ही अत्यंत खेदजनक व संतापजनक बाब आहे.

स्त्रियांना मान सन्मानाने बसमधून निसंकोच प्रवास करता यावा या हेतूने आपणास निवेदन करतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने एक विशेष सदंर्भात ठेवून महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री यांच्याकडे पाठवून स्यिांकरिता शहर बसमध्ये स्वतंत्र्य रिझर्व शिटांची व्यवस्था करावी अशा प्रकारची उत्तम व्यवस्था आंधप्रदेश, हैद्राबाद, तामिळनाडू, मद्रास, दिल्ली इत्यादीच्या शहरातील सिटी बस सर्व्हिसमध्ये स्त्रियांकरिता जी विशेष व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करावे व औरंगाबाद शहर बसमध्ये त्याहीपेक्षा उत्तम व्यवस्था करावी.

सुचक - मोहंमद अय्युब जहागिरदार.
अनुमोदक - स. अ. एकबालोद्दिन.
दिनांक - १४/०९/१९८८.

**<u>ठराव क्र.</u> १०७ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंध्र प्रदेशातील हैद्राबाद, तामिळनाडूतील, मद्रास आणि दिल्ली येथील शहर वाहतुक बसमध्ये ज्याप्रमाणे स्त्रियांसाठी स्वतंत्र्य कक्षाची व्यवस्था आहे. त्याप्रमाणे किंबहुना त्याहुनही अधिक अशा प्रकारची व्यवस्था औरंगाबाद शहर बस वाहतुकीमध्ये स्त्रियांसाठी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १०८ -** सिटी नंबर २३० मधील कम्युनिटी सेंटरसाठी राखीव आहे. जी जागा तळेश्वर मंदिर ट्रस्टने ०८/०२/१९८४ रोजी बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालयास दान दिलेली आहे. बेगमपुऱ्याच्या शैक्षणिक विकासासाठी ही जागा कम्युनिटी सेंटर बदलून शैक्षणिक झोन करण्यात यावा हीच विनंती.

सुचक - अजितकुमार शेळके.
अनुमोदक - नरेंद्र पाटील, अजीज जहागिरदार.
दिनांक - १४/०९/१९८८.

**<u>ठराव क्र.</u> १०८ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपुऱ्याच्या शैक्षणिक विकासासाठी शिट नं.२३० मधील "कम्यनिटी सेंटरसाठी राखीव असलेली जागा" या सदरातून वगळून शैक्षणिक झोनमध्ये रुपांतरित करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १०९ -** महापालिकेच्या वरच्या मजल्यावर जातांना जी घाण दुर्गंधी येते तिचा बंदोबस्त करावा तसेच शहरातील सर्व मुताऱ्या घाण झालेल्या आहेत त्यांची साफसफाई करून घाण पाण्याची योगय विल्हेवाट लावावी. व रोगराई टाळावी.

सुचक - सौ. लता दलाल.
अनुमोदक - केशव सोनवणे.
दिनांक - १२/०९/१९८८.

<u>**ठराव क्र.**</u> **१०९ -** सदरिल प्रस्ताव सभागृहाच्या कामकाजातून वगळण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.

<u>**विषय क्र.**</u> **११० -** नागेश्वरवाडी वॉर्डमध्ये कसबेकरच्या दुकानासमोर डिव्हायडेशन (विभाजक) करावे व होणारे अपघात टाळावेत.

<u>**ठराव क्र.**</u> **११० -** सदरिल प्रस्ताव सभागृहाच्या कामकाजातून वगळण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.

<u>**विषय क्र.**</u> **१११ -** महानगरपालिकेच्या वतीने रोड मोठा करणेकरिता त्या भागातील नागरिकांची घरे पाडण्यात येवून त्यांना त्या घराचा मोबदला म्हणून सिडको एन-६ भागात नगरपालिकेच्या वतीने घरे देण्यात आली होती व त्या घरांचा ५००/- रुपये हप्ता देखील नगरपालिकेच्या वतीने भरण्यात आला होता. व एकास नौकरी देण्याचे आश्वास दिले होते.

परंतु घरे दिल्यानंतर आजपावेतो त्या घरांची रक्कम नगरपालिकेने सिडकोकडे भरली नसल्याने संबंधीत नागरिकांना पैसे भरणेकरिता सिडकोने तगादा लावला आहे. तरी मे. साहेबांनी स्थायी समितीत नागरिकांची उर्वरित रक्कम सिडकोकडे जमा करणेकरिता प्रस्ताव ठेवण्यात यावा ही विनंती.

- गंगाधर गाढे.

<u>**ठराव क्र.**</u> **१११ -** प्रस्तावाचे सूचक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाजातून प्रस्ताव वगळण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

राष्ट्रगीत झाल्यावर सभागृहाचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

***दिनांक १९/११/१९८८ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत***

शनिवार, दिनांक १९/११/८८ रोजी सकाळी १.०० वाजता आयोजित करण्यात आलेली औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सायंकाळी ५.३० वाजता अलंकार नाट्यगृह येथे मा. महापौर, डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. या सभेमध्ये पुढील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसनखॉं कासीमखॉं, | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ७) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ८) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ९) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| १०) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| ११) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १२) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १३) | मा. श्री. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १४) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १५) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १६) | मा. श्री. नारायण मोहनराव फत्तेलष्कर | --//-- |
| १७) | मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| १८) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १९) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २०) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २१) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २२) | मा. श्री. अ. रशीदखान अ. हमीदखान | --//-- |
| २३) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २४) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २५) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २६) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २७) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २८) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २९) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३०) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३१) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३२) | मा. श्री. फैयाजखान अहमदखान | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३३) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३४) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३५) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | --//-- |
| ३६) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३७) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३८) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३९) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | --//-- |
| ४०) | मा. श्री. अलफखाँ हुसैन खाँ | --//-- |
| ४१) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४२) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४३) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४४) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | --//-- |
| ४५) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस | --//-- |
| ४६) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ४७) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ४८) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ४९) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५०) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५१) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५२) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५३) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

"वंदे मातरम्" या गीताने सभेस सुरुवात झाली.

**<u>विषय क्र.</u> ११२ -** मा. आयुक्त यांच्या शिफारशीनुसार, सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री. ए. एस. डुघरेकर, उप आयुक्त यांचा प्रतिनियुक्ती कालावधी शासन निर्णय क्र. अेएमसी/१३९७/१४०१/सीआर-१५४/मवि-२१, मंत्रालय, मुंबई दि. १५, फेब्रुवारी, १९८८ नुसार एक वर्षाकरिता आहे. उप आयुक्त श्री. डुघरेकर यांची नियुक्ती दिनांक १०/१२/१९८७ पासून झाली आहे. सदर प्रतिनियुक्ती कालावधी दिनांक ०९/१२/८८ रांजी संपत आहे.

करिता श्री. ए. एम. डुघरेकर, उप आयुक्त यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पुन्हा एक वर्षाने म्हणजे दि. ०९/१२/८९ पर्यंत वाढविण्याबाबत विचारार्थ व निर्णयासाठी सादर.

**<u>संवाद</u> -** सभागृह नेता श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी उप- आयुक्ती श्री. अ. मो. डुघरेकर यांना मुदतवाढ देण्यास विरोध दर्शवून उपआयुक्त या जागेवर नविन अधिकाऱ्याची मागणी करावी अशी सूचना मांडली असता सन्माननीय सभासद श्री. नरेंद्र पाटील यांनी त्यास अनुमोदन दिले.

औरंगाबाद महापालिकेच्या निवडणूक काळात उप आयुक्ती श्री. अ. मो. डुघरेकर यांनी योग्य प्रकारे कामगिरी केल्यामुळे अशा कार्यक्षम अधिकाऱ्यास किमान एक वर्षाची तरी मुदतवाढ देणेस हरकत नसावी अशी सूचना विरोधी पक्ष नेता श्री. चंद्रकांत खैरे

यांनी मांडली असता त्यास सन्माननीय सभासद श्री. मोतीराम घडामोडे व श्रीमती लता दलाल यांनी अनुमोदन दिले.

**<u>ठराव क्र.</u> ११२ -** प्रस्तावित विषयांवर प्राप्त झालेल्या सूचनांवर हात वर करून मतदान घेण्यात येईल. असे मा. महापौर यांनी सुचविले असता विरोधी पक्ष सदस्यांनी "पोल पोल" व "एकाधिकार शाहीचा धिक्कार असो" अशा घोषणा दिल्या, यावेळी आघाडीच्या सर्व सभासदांनी हात वर करून उप आयुक्त श्री. अ. मो. डुघरेकर यांना मुदवाढ देण्यास विरोध नोंदविला.

यानंतर मा. महापौर यांनी १९ विरुध्द २८ मतांनी उपआयुक्त श्री. अ. मो. डुघरेकर यांना मुदतवाढ नाकारण्यात आल्याचे घोषित केले.

**<u>विषय क्र.</u> ११३ -** औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार नगर भुमापन क्र. १८०८८, १८०८९, १८०९०, १८०९१, १८०९२, २०१८३, २०१८४ / भाग,२०१८५/भाग, १८०५६,/ भाग ह्या जमिनी आरक्षण क्रमांक ८९ "खुली जागा" म्हणून आरक्षित आहेत. यापैकी न. मु. क्र. २०१८३,१८०९०,१८०९१, या जमिनीचा भुसंपादन अधिनियमान्वये अंतिम निवाडा जाहीर झाला असून न. भु. क्र. १८०९० व १८०९१ चा महानगरपालिकेस विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक यांचे कडून ताबा मिळालेला आहे. तसेच न. भु. क्र. २०१८३ चा ताबा घेण्याची कार्यवाही सुरू आहे. या आरक्षणातील न. भु. क्र. १८०९२ च्या मालक श्रीमती जेठलिया यांना सदर जागा संपादन करून त्यांना मोबदला द्यावा किंवा त्यांची जागा आरक्षणातून वगळावी अशा प्रकारची खरेदी सूचना (परचेस नोटीस) दिली आहे. सदर खरेदी सूचना प्रमाणे ही जागा संपादन करणे आवश्यक झाले आहे. तसेच नगर भुमापन क्र. १८०९२,१८०८८,१८०८९,१८०५६/भाग, २०१८४/भाग आणि २०१८५ भाग या जमिनी जोपर्यंत संपादन होत नाही. तोपर्यंत एकूण आरक्षण क्रमांक ८९ "खुली जागा" या जागेचे परिणामकारक वापर करता येणार नाही. या दृष्टीने देखील सदर आरक्षणातील उरलेल्या जमिनी म्हणजेच न. भु. क्र. १८०९२, १८०८८, १८०८९, १८०५६/भाग, २०१८४/भाग, आणि २०१८५/भाग चे भुसंपादन रकणे जरूरी आहे. करिता या जमिनीचे भुसंपादनास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्र.</u> ११३ -** सविस्तर टिप्पणीसह सदर प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा असे मा. महापौर यांनी घोषित केले.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## दिनांक १७/१२/१९८८ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत

शनिवार, दिनांक १७/१२/८८ रोजी सकाळी ११.०० वाजता अलंकार नाट्यगृह येथे मा. महापौर, डॉ. शांताराम काळे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरूवात झाली. या सभेमध्ये पुढील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसनखाँ कासीमखाँ, | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ७) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ८) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| ९) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १०) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| ११) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १२) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १३) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १४) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १५) | मा. श्री. नारायण मोहनराव फत्तेलष्कर | --//-- |
| १६) | मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| १७) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| १८) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| १९) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २०) | मा. श्री. अ. रशीदखान अ. हमीदखान | --//-- |
| २१) | श्रीमती दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| २२) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २३) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २४) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २५) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २६) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २७) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| २८) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| २९) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३०) | मा. श्री. फैयाजखान अहमदखान | --//-- |
| ३१) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३२) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३३) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३४) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३५) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३६) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३७) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | --//-- |
| ३८) | मा. श्री. अलफखाँ हुसैन खाँ | --//-- |
| ३९) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४०) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४१) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४२) | मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४३) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | --//-- |
| ४४) | मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | --//-- |
| ४५) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस | --//-- |
| ४६) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ४७) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ४८) | मा. श्री. गोडसे आनंद जगदिश | --//-- |
| ४९) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ५०) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५१) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५२) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५३) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५४) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५५) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५६) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली.

**विषय क्र. ११४ -** दिनांक १८ अणि १९ नोव्हेंबर, १९८८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभांचा इतिवृत्तांत कायम करणे.

**संवाद -** दिनांक १८ आणि १९ नोव्हेंबर, १९८८ च्या सभेचा इतिवृत्तांत कायम करणेपूर्वी खालीलप्रमाणे बदल करणे आवश्यक असल्याबाबत स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी सूचना केली.

१) विषय क्र. ८८ मध्ये "अन्य कामासाठी पैसा अपुरा पडू नये ही बाब लक्षात घेवून संपादनाची कार्यवाही तुर्त रद्द करण्यात यावी" या ऐवजी अन्य कामासाठी पैसा अपुरा पडू नये ही बाब लक्षात घेवून संपादनाची कार्यवाही तुर्त स्थगित करण्यात यावी अशी नोंद घेण्यात यावी.

विषय क्र. ९८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे १ डिसेंबरला जालना रोड दुरुस्तीचे काम सुरू झाले नाही तेव्हा त्या निर्णयाबाबतही विचार व्हावा. तसेच दि. १८ रोजी तहकुब करण्यात आलेली सभा दि. १९/११/१९८८ ला सुरू झाली असता स. सभासद श्री. मधूकर शिंदे सभेस उपस्थित होते. पण उपस्थित सभासदांच्या नावांमध्ये संबंधीताच्या नावाचा समावेश नाही याचाही खुलासा व्हावा.

स. सभासद श्री. एकबालसिंग यांनी सुचविले की, ठराव क्र. ११३/२ बाबत या सभेत निर्णय घेण्याचे ठरले होते. साईट नं. ८९ या ठिकाणी महापालिका मालकीची भरपूर मोकळी जागा उपलब्ध आहे. तेंव्हा साईट क्रमांक ८९ ची जागा आरक्षणातून वगळण्यात यावी. यावर स. सदस्य श्री. मोरेश्वर सावे व श्री. चंद्रकांत खैरे यांनी खुलासा केला की, संबंधीत अधिकारी आज सभागृहात उपस्थित नाही. तेंव्हा यावर पुढील सभेत निर्णय घ्यावा.

यावेळी सन्माननीय सभासद श्री. स. हुसेन स. अहमद यांनी विषय क्र. ९० मध्ये उद्यान तयार करतांना अस्तित्वात असलेल्या कबरिंना धोका होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अशी दुरुस्ती करण्याची मागणी केली असता सन्माननीय सभासद श्री. अजितकुमार शेळके यांनी आरक्षित जागा कोणती यांसबंधी खुलासा करण्यात यावा अशी मागणी केली. तसेच सन्माननीय सभासद श्री. अजिजउल्ला बेग यांनी सदर प्रकरणी प्रत्यक्ष साईट बघीतल्यानंतरच निर्णय घेण्यात यावा अशी मागणी.

**<u>ठराव क्र.</u> ११४ -** सन्माननीय सभासदांचे विचार लक्षात घेता विषय क्र. ८८ मध्ये "अन्य कामासाठी पैसा अपुरा पडु नये ही बाब लक्षात घेऊन संपादनाची कार्यवाही तुर्त रद्द करण्यात यावी" "या ऐवजी" अन्य कामासाठी पैसा अपुरा पडु नये ही बाब लक्षात घेवून संपादनाची कार्यवाही तुर्त स्थगित करण्यात यावी" आणि विषय क्र. ९० व ११३ च्या प्रकरणी "प्रत्यक्ष पाहणी करून निर्णय घेतला जाईल" या दुरुस्त्यासह दिनांक १८ आणि १९ नोव्हेंबर १९८८ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचा इतिवृत्तांत कायम करण्यात आल्याची घोषणा मा. महापौर यांनी केली. त्या सर्वानुमते मंजुरी देण्यात यावी.

**<u>विषय क्र.</u> ११५ -** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे नियम ९५ अन्वये महानगरपालिकेचे अंदाजपत्रक आयुक्तांनी महानगरपालिका ठरविल त्या त्या तारखे पूर्वी स्थायी समितीस व सर्व साधारण सभेसमोर सादर करावयास पाहिजे.

सन १९८९-९० सालाचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करून सादर करणेसाठी सर्वसाधारण सभेने तारखेचे वेळापत्रक मान्य करून देने आवश्यक आहे.

महानगरपालिकेने विहित केलेल्या नमुन्यात खाली दर्शविल्याप्रमाणे अंदाजपत्रक सादर करणेचे दृष्टीने खाली दर्शविलेले वेळापत्रकास स्थायी समितीने ३०/११/१९८८ चे सभेत मान्यता दिलेली आहे.

१) सर्व विभाग प्रमुखांनी अंदाजपत्रकास आवश्यक असलेली माहिती लेखा विभागास सादर करणे. ५ जानेवारी, १९८९.

२) लेखा विभागाने मा. आयुक्त यांचेकडे अंदाजपत्रक तयार करून सादर करणे. दि. २५ जानेवारी, १९८९.

३) आयुक्तांनी स्थायी समितीसमोर अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर करणे. दि. ५ फेब्रुवारी, १९८९.

४) स्थायी समितीचे अंदाजपत्रक तपासून त्यास मान्यता देणे. दि. १५ फेब्रुवारी १९८९ पूर्वी.

५) स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकाच्या प्रती सर्व स. सदस्यांना सादर करणे. दि. २८ फेब्रवारी १९८९ पूर्वी.

६) सर्वसाधारण सभेपुढे वार्षिक अंदाजपत्रक सादर करणे व त्यास मान्यता देणे. दि. १५, मार्च ८९ पूर्वी.

तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे चॅप्टर ११ प्रमाणे जे कर महानगरपालिकेने लावले आहेत व त्यात सुधारणा करणेची आवश्यकता आहे./असल्यास तसेच नविन टॅक्स लावावयाचे असल्यास संबंधीत विभागाने त्वरित कार्यवाही करून त्यास नियम ९९ प्रमाणे स्थायी समितीची मान्यता १ फेब्रुवारी, १९८९ पूर्वी घेण्यात यावी. [स्थायी समिती सभा दिनांक ३०/११/८८/ ठराव क्र. ६३० अन्वये मान्यता देवून सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.] प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. ११५ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम ९५ अन्वये सन १९८९/९० या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक खालील दर्शविलेल्या तारखेपूर्वी स्थायी समिती मार्फत सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) सर्व विभाग प्रमुखांनी अंदाजपत्रकास आवश्यक असलेली माहिती लेखा विभागास सादर करणे. ५ जानेवारी, १९८९.

२) लेखा विभागाने मा. आयुक्त यांचेकडे अंदाजपत्रक तयार करून सादर करणे. दि. २५ जानेवारी, १९८९.

३) आयुक्तांनी स्थायी समितीसमोर अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर करणे. दि. ५ फेब्रुवारी, १९८९.

४) स्थायी समितीचे अंदाजपत्रक तपासून त्यास मान्यता देणे. दि. १५ फेब्रुवारी १९८९.

५) स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकाच्या प्रती सर्व स. सदस्यांना सादर करणे. दि. २८ फेब्रवारी १९८९ पूर्वी.

६) सर्वसाधारण सभेपुढे वार्षिक अंदाजपत्रक सादर करणे व त्यास मान्यता देणे. दि. १५, मार्च ८९ पूर्वी.

तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे चॅप्टर ११ प्रमाणे जे कर महानगरपालिकेने लावले आहेत त्यात सुधारणा करणेची आवश्यकता असल्यास किंवा नविन कर लावावयाचे असल्यास त्यासंबंधी संबंधीत विभागाने कार्यवाही करून नियम ९९ प्रमाणे दिनांक १ फेब्रुवारी, १९८९ पूर्वी स्थायी समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही पूर्ण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११६ -** मा. आयुक्त यांच्या शिफारशीनुसार सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री. अे. व्ही. धारूरकर, कार्यकारी अभियंता यांचा प्रतिनियुक्ती कालावधी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस:रण मंडळ पत्रक क्र. एलओओ/५०८३/३६८४१ पार्ट-२-आ-१, १९ वा मजला नविन प्रशासन इमारत मंत्रालय समोर मुंबई दि. २१/१२/८७ नुसार, एक वर्षाकरिता म्हणजे नियुक्ती दिनांक ०१/०१/८८ पासून होता. हा प्रतिनियुक्ती वरिल कालावधी दि.३१/१२/८८ रोजी संपत आहे.

तरी. श्री. अे. व्ही. धारूररकर, कार्यकारी अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी पुनः दोन वर्षांनी म्हणजे दि. ३१/१२/९० पर्यंत वाढविण्याबाबत विचारार्थ व निर्णयासाठी सादर.

**<u>ठराव क्र.</u> ११६ -** सभागृह नेता यांनी कार्यकारी अभियंता या पदासाठी श्री. अे. व्ही. धारूरकर यांना दोन वर्षा ऐवजी एक वर्ष मुदतवाढ देण्याची सूचना मांडली, विरोधी पक्ष नेता यांनी त्यास अनुमोदन दिले असता सर्वानुमते असे ठरले की, कार्यकारी अभियंता या पदासाठी श्री. अे. व्ही. धारूरकर यांचा प्रतिनियुक्ती कालावधी दोन वर्षा ऐवजी एक वर्षासाठी वाढविण्यात यावा. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ११७ -** मा. आयुक्त यांच्या शिफारशीनुसार, सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री. बी. अे. चौधरी, शहर अभियंता यांची प्रतिनियुक्ती शासन निर्णय क्र. अेएमसी.१२८८/१०५/सीआर-१३/नवि-२१/दिनांक १३ जून, ८८ नुसार २१/०१/८८ पासून करण्यात आली होती. हा प्रतिनियुक्ती वरील एक वर्षाचा कालावधी दिनांक २१/०१/८९ रोजी संपत आहे.

तरी. बी. ए. चौधरी, शहर अभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दोन वर्षाने म्हणजे दि. २१/०१/९१ पर्यंत वाढविण्याबाबत विचारार्थ व निर्णयासाठी सादर.

**<u>ठराव क्र.</u> ११७ -** स. सभासद श्री. अविनाश कुमावत यांनी शहर अभियंता या पदासाठी श्री. बी. ए. चौधरी यांना दोन वर्षाऐवजी एक वर्ष मुदतवाढ देण्याची सूचना मांडली. स. सभासद श्री. नरेंद्र पाटील यांनी त्यास अनुमोदन दिले. सर्वानुमते असे ठरले की, शहर अभियंता या पदासाठी श्री. बी. ए. चौधरी यांचा प्रतिनियुक्ती कालावधी दोनऐवजी एक वर्षासाठी वाढविण्यात यावा. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> ११८ -** दिनांक १९/११/८८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत महानगदरपालिकेच्या लेख्यांची तपासणी बाबतचा अहवाल आगामी सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याबाबत सूचना करण्यात आली होती.

महानगरपालिकेच्या लेख्याचे परिक्षण मुख्य लेखा परिक्षकांमार्फत करण्यात येते. महानगरपालिका अस्तित्वात येण्यापूर्वी नगर परिषदेचे लेखे स्थानिक विधी लेखा विभागातर्फे करण्यात येत असत.

महापालिकेच्या लेख्यावर १९८३ ते आतापावेतो २२८ लेखा परिच्छेद काढण्यात येवून ते संबंधीत विभागाकडे अनुपालनार्थ पाठविण्यात आले असता एकूण ९२ परिच्छेदांचे अनुपालन प्राप्त होवून ५७ परिच्छेद वगळण्यात आले आहेत. १७१ परिच्छदांचे अनुपालन प्राप्त होणे आहे. त्याचा पाठपुरावा चालू आहे.

विभागवार लेखा परिक्षणाची स्थिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभागाचे नांव | लेखा परिक्षण पूर्ण केल्याचे वित्तीय वर्ष |
|---|---|---|
| ०१ | आस्थापना विभाग १ व २ | १९८५-८६. |
| ०२ | लेखा विभाग | १९८६-८७. |
| ०३ | सार्वजनिक बांधकाम विभाग. | १९८४-८५. |
| ०४ | सार्वजनिक पाणीपुरवठा | १९८४-८५. |
| ०५ | जलनिस:रण विभाग | १९८४-८५. |
| ०६ | गलिच्छ वस्ती सुधारणा | १९८६-८७. |
| ०७ | यांत्रिकी विभाग | १९८३-८४. |

| | | |
|---|---|---|
| ०८ | आरोग्य विभाग | १९८५-८६. |
| ०९ | मालमत्ता अधिकारी | १९८४-८५. |
| १० | जकात विभाग | १९८६-८७. |
| ११ | शिक्षण विभाग | १९८४-८५. |
| १२ | झोन कार्यालय १ ते ६ | १९८६-८७. |
| १३ | भांडार विभाग | - |
| १४ | वाचनालय | १९८५-८६. |
| १५ | विद्युत विभाग | - |

सध्या लेखा परिक्षण विभागात फक्त चार कर्मचारी आहेत. ते फारच अपुरे आहेत. कर्मचारी वृंदात वाढ करण्याचा प्रस्ताव वेगळा सादर करण्यात येत आहे. विचारार्थ सादर.

**संवाद -** सभागृहापुढे ठेवण्यात आलेला ठराव अपूर्ण स्वरुपाचा आहे. त्यात प्रत्येक विभागाच्या परिच्छेदाचा उल्लेख नाही, तो उल्लेख व्हावा, त्यानंतर यावर विचार व्हावा, तसेच त्यात अनुपालनाचे परिच्छेदाचा सुध्दा समावेश असावा इत्यादी माहिती पुढील सभेत मिळणार असेल तरच या प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी. त्यासाठी काल मर्यादा निश्चित करावी असा खुलासा स. सदस्य श्री. मोरेश्वर सावे यांनी केला.

सभागृहापुढे ठेवण्यात आलेल्या प्रस्तावावरून बऱ्याच विभागांचे लेखा परिक्षण अद्याप बाकी असल्याचे दिसते. विशेषतः यांत्रिकी व जकात विभागाचे लेख परिक्षण बरेच बाकी आहे. ही बाब खेदाची आहे. असा खुलासा स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी केला असता सभासदांच्या मागणी प्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करण्याची मागणी स. सभासद श्री. अजिजउल्ला बेग यांनी केली. या प्रस्तावाबरोबर कर्मचाऱ्यांच्या वाढीचा वेगळा प्रस्ताव जोडलेला नाही असा खुलासा स. सदस्य श्री. कचरू नवपुते यांनी केला असता महानगरपालिकेच्या ज्या ज्या विभागात कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे त्या बाबींचा सविस्तर अभ्यास करून एकत्र ठराव सभागृहा पुढे ठेवण्यात येईल, असा अभिप्राय मा. आयुक्तांनी दिला असल्याचा खुलासा लेखाधिकारी यांनी केला.

**ठराव क्र. ११८ -** स. सभासदांच्या सुचनांप्रमाणे आवश्यक त्या दुरुस्तीसह सदर प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा. यासाठी सन्माननीय सभासदांच्या लेखी सूचना संबंधीत अधिकाऱ्यांशी हस्तगत कराव्यात असे मा. महापौर यांनी घोषित केले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ११९ -** ॲक्ट्राय नियम क्र. २९ अनुसार सदर नियमाचा भंग करून शहरात येणाऱ्या मालावर नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या ॲक्ट्रॉय करा व्यतिरिक्त ५००/- रु. दंड आकारण्यात यावा. या नियमात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

ॲक्ट्रॉय नियम २९ मध्ये दर्शविण्यात आलेल्या ५००/- रुपये दंडाच्या ऐवजी एकूण रक्कमेच्या १० पट दंड आकारण्यात यावा.

सुचक - श्री. अलफखाँ हुसेनखाँ.
अनुमोदक - श्री. सय्यद हुसेन स. अहेमद.
दिनांक - १६/११/१९८८.

**<u>संवाद</u> -** ठरावात नमूद केल्याप्रमाणे दहा पट जकात वसुलीची पध्दत अंमलात आणल्यास व्यापाऱ्यांना विना जकात माल शहरात आणण्याची हिंमत होणार नाही अशी सूचना स. सदस्य श्री. अलफखाँ यांनी केली असता स. सदस्य श्री. स. हुसैन स. अहमद यांनी त्यास अनुमोदन दिले.

ठराव मंजुर करण्यास आक्षेप नाही, पण त्यापूर्वी जकात नियमावली १९८४ च्या पान १२ वरिल कलम २९ मध्ये दुरुस्ती करावी लागेल त्यास मंजुरी मिळाल्यानंतरच हा ठराव मंजुर करता येईल. तेव्हा कलम २९ मध्ये आवश्यक ती दुरुस्ती होईपर्यंत सदर ठराव स्थगित ठेवून प्रथम कलम २९ प्रमाणे दुरुस्त ठराव ठेवण्यात यावा. अशी सूचना स. सदस्य श्री. सावे मोरेश्वर यांनी केली असता, मुळ ठरावात कलम २९ च्या दुरुस्तीची मागणी करण्यात आल्याचा खुलासा स. सदस्य श्री. अलफखाँ यांनी केला. जकातसाठी तयार करण्यात आलेल्या उपविधीत दुरुस्ती करण्याबाबतचा ठराव मांडण्यात येवून त्यास मंजुरी देण्यात यावी अशी मागणी स. सदस्य श्री. अजिजउल्ला बेग यांनी केली, त्यावेळी विधी सल्लागार यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३९८ सभागृहास वाचून दाखविला व माहिती दिली.

जकात उपविधीमध्ये दुरुस्ती करण्याचा ठराव मंजुर करण्यात यावा. त्याप्रमाणे शहरातील व्यापाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात म्हणेज कार्यालय आणि व्यापारी या दोन्ही बाजुंनी सुधारणा होण्यास मदत होईल. अशी सूचना सभागृहनेता यांनी केली याचे वेळी कलम ३९८ अन्वये आतापर्यंत अशाप्रकारे किती जकात वसूल करण्यात आली याची सविस्तर माहिती देण्याची मागणी स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली असता, संबंधीत अधिकारी यावेळी सभागृहात नसल्यामुळे पुढील सभेत याबाबत खुलासा करण्यात येईल असे मा. महापौर यांनी सुचविले. दरम्यान जकात चुकवून शहरात माल आणणाऱ्या व्यापाऱ्यांकडून ज्याप्रमाणे दहापट रक्कम वसूल करण्यात येणार आहे त्याप्रमाणे संबंधीत कर्मचाऱ्यावरही नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी स. सदस्य श्री. रशिदखाँ (मामू) यांनी केली.

जकात नाक्यांना रात्री १२.०० नंतर भेटी दिल्या असता जकात कर्मचारी झोपलेले आढळले याच वेळी नशा केलेली व्यक्ती वाहनांकडून जकात वसूल करतांना आढळली. नाक्यावर लाल लाईट नसतो, थंडी असल्यामुळे कर्मचारी वर्ग नाक्यातच बसतो अशी अनेक कारणे आढळली. तेंव्हा याबाबत पुढील सभेच्या वेळी सविस्तर खुलासा करण्याची मागणी स. सदस्य श्री. अविनाश कुमावत यांनी केली असता स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे, श्री. रशिदखाँ (मामू), अविनाश कुमावत यांच्या सूचनांवर विचार करण्यात येईल असे मा. महापौर यांनी सूचविले.

**<u>ठराव क्र.</u> ११९ -** कार्यालयाचे विधी सल्लागार स. सदस्य श्री. अलफखाँ व श्री. मोरेश्वर सावे यांनी एकत्र विचार विनिमय करून सदर प्रस्तव सविस्तर माहितीस्त्व सभागृहापुढे ठेवण्यात यावा असे मा. महापौर यांनी घोषित केले, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्र.</u> १२० -** नारेगांव वार्ड क्र. (९) येथील १९८०/८१ मध्ये जिल्हा परिषदेकडून तयार करण्यात आलेला शाळेचा हॉल हा सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. पर्यायी शाळेची इमारत तयार केल्यामुळे सध्या बंद आहे.

तरी हा हॉल नागरिकांच्या सोईसाठी समाज मंदिर म्हणून घोषित करावा आणि खालील सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

१) लाईन २) नळ ३) पंखा ४) दुरुस्ती.

सुचक - श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी.
अनुमोदक - श्री. चंद्रकांत खैरे.
दिनांक - १५/११/८८.

**<u>संवाद</u> -** जिल्हा परिषदेकडून तयार करण्यात आलेला शाळेचा हॉल कायम स्वरुपात महानगरपालिकेच्या ताब्यात आहे काय? तसेच नारेगांव येथे समाज मंदिर आहे का? या बाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करण्याची मागणी स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी केली असता मालमत्त अधिकारी सभागृहात नाहीत तेव्हा पुढील सभेत माहिती देण्यात येईल असा खुलासा सहाय्यक आयुक्त-२ यांनी केला यावर आजच्या सभेसाठी जबाबदार अधिकारी सभागृहात उपस्थित नाहीत तेव्हा संबंधीतांना तशी परवानगी देण्यात आली होती काय? आणि त्यासाठी काय तरतूद आहे याचा खुलासा करण्याची मागणी स. सदस्य श्री. जावळे यांनी केली यावेळी जालना रोडचे अतिक्रमण मोहिमेचे काम हाती घेण्यात आल्यामुळे आजच्या सभेत उपस्थित राहता येणार नसल्याबाबतची सुचना मा. आयुक्त यांनी विरोधी पक्षनेता, सभागृहनेता आणि मा. महापौर यांना केली आहे असा खुलासा मा. महापौर यांनी केला. आजच्या सभेत जालना रोड बाबतचा ठराव असल्यामुळे मा. आयुक्त आजच सभागृहात नाहीत, अधिकारी गैरहजर आहेत हे योग्य नाही, हा सभागृहाचा अपमान आहे. मा. महापौरांचा खुलासा योग्य वाटत नाही असा आरोप स. सदस्‍ श्री. मोतीराम घडामोडे यांनी केला. स. सदस्यांचा आरोप योग्य नसून त्यांनी तो मागे घ्यावा अशी सूचना मा. महापौर यांनी केली.

**<u>ठराव क्र.</u> १२० -** संपूर्ण माहितीस्तव सदर प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा अशी सूचना मा. महापौर यांनी केली. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्र.</u> १२१ -** हर्सूल येथे सन १९८३-८४ च्याकाळात एक आरोग्य केंद्र मंजूर झाले होते. परंतु असे समजते की, हर्सूल येथे इमारत नसल्यामुळे तो दवाखाना औरंगाबाद शहरात कुठल्या तरी भागात चालू आहे.

तरी त्या दवाखान्यात लागणारी पुरेशी इमारत हर्सूल येथे उपलब्ध आहे. तरी त्याठिकाणी हर्सूल आरोग्य केंद्र चालविण्यात यावे.

तसेच हर्सूल येथे जवळच सेंट्रल जेल, डेअरी फार्म व ग्रामीण भागातील काही गावाचे लोकांची नेहमीच ये-जा असल्याने त्याची देखील गैरसोय दूर होईल.तरी ताबडतोब आरोग्य केंद्र हर्सूल येथे चालू करावे.

सुचक - श्री. तुळशीराम भगुरे.
अनुमोदक - श्री. नरेंद्र पाटील.
दिनांक - २५/१०/८८.

**<u>संवाद</u> -** हर्सूल येथील दवाखाना शहरात कुठेतरी हलवला म्हणजे नेमका कुठे? तसेच ग्रामीण भागासाठी फिरते रुग्णालय सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्याचे पुढे काय झाले याबाबत खुलासा करण्याची मागणी स. सदस्य श्री. अविनाश कुमावत

यांनी केली. यावेळी जकात अधिक्षक, आरोग्य वैद्यकीय अधिकारी सभागृहात उपस्थित नाहीत हे योग्य नाही. यापुढे सर्व संबंधितास सभागृहात उपस्थित राहण्याचा सूचना देण्यात याव्यात अशी सूचना स. सदस्य श्री. चंद्रकांत खैरे व प्रदिपकुमार दत्त यांनी केली. सभागृहामध्ये अधिकारी उपस्थित नसल्यामुहे सभेचे कामकाज बंद करण्याची मागणी स. सदस्य श्री. अजिज जहागिरदार यांनी केली. तेव्हा आरोग्या सारख्या निकडीच्या विषयाला थट्टेचे स्वरुप न देता त्यावर योग्य निर्णय घेण्याची मागणी स. सदस्य श्री. सायन्ना यांनी केली. यावेळी अधिकारी नाहीत म्हणून ठराव पुढे न ढकलता तो मंजूर करावा आणि हर्सूल येथे त्वरित दवाखाना सुरू करावा अशी मागणी स. सदस्य श्री. भगुरे व बंडू प्रधान यांनी केली.

**<u>ठराव क्र.</u> १२१ -** हर्सूल व आजुबाजुच्या नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन मंजूर झालेला दवाखाना का हलवला, याबाबत त्वरित चौकशी करून निर्णय घेण्यात येईल असे मा. महापौर यांनी घोषित केले त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्र.</u> १२२ -** औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दित महानगरपालिकेचे अद्ययावत स्टेडियम बांधणेबाबत.

सुचक - श्री. नरेंद्र पाटील.
अनुमोदक - श्री. अलिमबेग मिर्झा कलिम बेग.

**<u>संवाद</u> -** प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शहरात अद्ययावत स्टेडियम बांधण्यासाठी आवश्यक त्या जागेची निवड, ठराव मंजुर करतानांच करण्यात यावी. यावेळी चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत उपलब्ध असलेल्या महापालिका मालकीच्या २२ एकर जमिनीचा विचार करण्यात यावा अशी सूचना स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी केली. शहरात स्टेडियम तयार करतांना ठाणे महानगरपालिकेने तयार केलेल्या स्टैडियमचा विचार करण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे यांनी केली. यावर आपले विचार मांडतांना स. सदस्य श्री. गंगाधर गाढे म्हणाले की, शहराच्या विकासाचे अनेक ज्वलंत प्रश्न आहेत. शिक्षणासारख्या मुलभूत हक्काच्या क्षेत्रात शाळेसाठी मनपा मालकीच्या स्वतःच्या इमारती नाहीत. म.न.पा. शाळंचे निकाल अत्यंत कमी दर्जाचे लागत असल्यामुळे शहरातील नागरिकांची मुले महानगरपालिकेच्या शाळांऐवजी खाजगी शाळेत शिक्षण घेत आहेत. तेव्हा प्रथम महानगरपालिका शाळांसाठी स्वतःच्या मालकीच्या इमारती उभारणे, शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता वाढविणे आणि अन्य विकास विषयक कामे यावर विचार करण्याची आजची खरी गरज आहे. तेव्हा या बाबींची पूर्तता झाल्यानंतर स्टेडियम उभारण्याचा विचार करण्यात यावा.

शहराच्या सोयीसाठी झोन पाडण्यात आलेले आहेत. तेव्हा प्रत्येक झ ोनकरिता एक खेळाचे मैदान आणि जिमॅनस्टिक हॉलची व्यवस्था करण्याचा विचार करावा असा खुलासा स. सदस्य श्री. स. हुसैन स. अहमद यांनी केला. प्रस्तावाबाबत आपले विचार मांडतांना स. सदस्य श्री. बंडू प्रधान म्हणाले की, मराठवाड्याचे नेतृत्व करू शकेल असा एकही खेळाडू अद्याप तयार झालेला नाही. तेव्हा शहरात स्टेडियम तयार करण्याचा प्रस्ताव मंजूर करावा. स. सदस्य श्री. मोहसीन अहमद यांनी सूचना मांडली की, क्रीडा विषयक कामासाठी केंद्र शासनाकडून ५०% अनुदान मिळते त्याचा विचार करण्यात यावा.

मा. महापौर म्हणाले की, स. सदस्य श्री. गंगाधर गाढे यांची सूचना योग्य असून त्यावर काय उपाय करता येईल याचा जरूर विचार करण्यात येईल.

**<u>ठराव क्र.</u> १२२ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महापालिका हद्दित महानगरपालिकेचे अद्ययावत स्टेडियम बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १२३ -** शहरातील जालना रोडवर सेंॅ फ्रांसीस शाळेपासून चिकलठाणा गांवासाठी सोडीयम व्हेपरचे दिवे लावणे बाबत.

सुचक - श्री. नरेंद्र पाटील.
अनुमोदक - श्री. अलिमबेग मिर्झा कलिम बेग.

**<u>संवाद</u> -** या ठरावाला आमचा पाठिंबा आहे. परंतु जालना रोडची दुरुस्ती आणि दुभाजकाचे काम पूर्ण झाल्यानंतरच या रस्त्यावर सोडियम व्हेपरचे दिवे बसविण्यात यावेत अशी सूचना स. सदस्य श्री. मोरेश्वर सावे यांनी केली.

**<u>ठराव क्र.</u> १२३ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील जालना रोडवर सेंट फ्रान्सीस शाळेपासून चिकलठाणा गावापर्यंत सोडियम व्हेपरचे दिवे लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १२४ -** महाराष्ट्र शासनाने मुंबई व इतर काही महानगरपालिका "रेशनिंग एरिया" म्हणून जाहीर केलेले आहे, रेशनिंग एरिया जाहिर केल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे कार्ड धारकांना धान्य पुरविण्याची जबाबदारी शासनावर येते. आजच्या महागाईच्या काळात शहरातील सर्व सामान्य नागरिकास स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत त्यांच्या नित्याच्या गरजे इतके धान्य, तेल व साखरेचा पुरवठा होत नाही त्याला आर्थिक झळ पोहोचते हे सर्व पाहता या सभागृहास अशी मागणी करतो की, औरंगाबाद महानगरपालिका शासनाने रेशनिंग एरिया म्हणून जाहीर करावा व त्यासाठी सर्वांनी आपली शक्ती पणाला लावावी. वेळ पडल्यास सर्व नगरसेवक एकमताने अंदोलनही करावे लागले तर करावे. आमचे सर्व नगरसेवक त्याला पाठिंबा देतील.

तरी हा ठराव मंजुर करून नागरिकांच्या दैनंदिन गरजेचा विचार व्हावा अशी सभागृहास विनंती.

सुचक - श्री. शंकरराव मगर.
अनुमोदक - श्री. जयवंत ओक.
श्री. वाघमारे एस बी.
दिनांक - ९ डिसेंबर, १९८८

**<u>ठराव क्र.</u> १२४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त धान्य दुकानांवर त्यांच्या नित्याच्या गरजे इतके धान्य, तेल व साखरेचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनास इतर महापालिकेप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका रॅशनिंग एरिया म्हणून जाहीर करण्याबाबत शिफारस करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १२५ -** सर्व शहरात व सिडको, हडको भागात पाणी पुरवठा व्यवस्था कोलमडून पडलेली आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही. वेळोवेळी विद्युत पुरवठा होत नाही असे पुरक कारण दिले जाते. तेव्हा निदान एक वेळ भरपूर दाबाने व नियमित पाणी पुरवठा करण्याची सर्वतोपरी व्यवस्था महापालिका प्रशासनाने करावी.

सुचक - श्री. मोतीराम घडामोडे.
अनुमोदक - सौ. लता दलाल.
दिनांक - १३/१२/१९८८.

**<u>संवाद</u> -** सध्या शहरात अनियमित पाणी पुरवठा होत आहे या बाबीची झळ विशेषतः सिडको / हडको रहिवाश्यांना जास्त प्रमाणात बसते याची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता लाईट नाही किंवा अन्य पुरक कारणे सांगितली जातात. यावर उपाय म्हणून पर्यायी व्यवस्था करण्याची सुचना मा. आयुक्तांनी मान्य केली, पण अद्याप अशी व्यवस्था झाली नाही. सिडको येथील एन-५ या भागातील पाण्याची वेळ तर दररोज बदलत असते. त्यामुळे या भागास राहणाऱ्या नागरिकांचे फार हाल होत आहेत. तेव्हा एकाच ठराविक वेळेस योग्य पाणी पुरवठा होईल अशी व्यवस्था करण्याची मागणी स. सदस्य श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली. यावर आपले विचार मांडतांना स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील म्हणाले की, सिडको प्रशासनाने या भागात प्लॉस्टिकपाईप टाकले आहेत ती पाईप लाईन नेहमीच नादुरुस्त होते, तेव्हा ही पाईप लाईन बदलणे आवश्यक आहे. या भागात नेहमीच अपुरा पाणी पुरवठा होत आहे.

पाणी पुरवठ्याच्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा होत असतांना संबंधित अधिकारी आज उपस्थित नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे, याचा निषेद करण्यात येतो. अनेक ठिकाणी नागरिक नळाला इलेक्ट्रीक मोटार बसवितात पण या गोष्टीकडे संबंधीत अधिकारी दुर्लक्ष करतात. आज ही परिस्थिती आहे, तर उन्हाळ्यात नागरिकांचे किती हाल होतील याचा विचार करावा. त्यावेळी मोर्चे आदी अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागेल. तेंव्हा या बाबीचा गंभीर विचार करावा व वेळीच उपाय करावेत असे विचार स. सदस्या सौ. लता दलाल यांनी मांडले.

लोकसंख्येच्या दृष्टीने अस्तीत्वात असलेले लहान जलकुंभ हे अपुऱ्या पाणी पुरवठ्याचे मुळ कारण आहे. बन्सीलालनगर येथील गिरणीचे आवारात जलकुंभ बांधतांना या बाबीचा विचार करावा. शहरातील मुळ पाईप लाईनवर अनेक नळ कनेक्शन देण्यात आले आहेत. त्यामुळे पाणी पुरवठ्यात व्यत्यय येतो. या बाबीला प्लंबर सर्वतोपरी जबाबदार आहेत असा आमचा जाहीर आरोप आहे. प्रशासकांचे काळात १५,००० अनाधिकृत नळ कनेक्शन उघडकिस आले आहेत. त्यावेळी हाती घेण्यात आलेल्या मोहिमेप्रमाणे पुन्हा शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिम सुरू करावी. आणि प्रतयेक वसाहतीस ठराविक वेळेस व योग्य प्रमाणात पाणी पुरवठा कसा होईल याचा खुलासा करावा अशी मागणी स. सदस्य री. मोरेश्वर सावे यांनी केली.

यावर विचार मांडतांना सभागृह नेते म्हणाले की, एकाच वेळी पाणीपुरवठा होईल अशी व्यवस्था करावी. ज्याच्याकडे नोकर नाहीत अशा नागरिकांना ऑफिस कामाला जाण्यास व्यत्यय येतो. अशा वार्डातील नागरिकांच्या अनेक तक्रारी आहेत.

नळ कनेक्शन मंजूर करतांना मिटरसाठी १००/- रुपये घेतले जातात पण प्रत्यक्ष मिटर पुरविले जात नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा. आणि मिटर पुरवठा करण्यात येणार नसेल तर रु. १००/- ची सक्ती करण्यात येवू नये तसेच यापूर्वी जमा

करून घेण्यात आलेली मिटरची रक्कम परत करण्यात यावी अशी मागणी स. सदस्य श्री. अजितकुमार शेळके यांनी केली.

**<u>ठराव क्र.</u> १२५ -** पैठण येथे २ तास पाणी पुरवठा खंडित झाला तर शहरात आठ तास पाणी पुरवठ्यात विस्कळीतपणा येतो. लवकरच सिडको भागात नविन दोन टाक्या सिडको प्रशासनाकडून बांधून मिळतील यातुन मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल. येत्या उन्हाळ्यात शहर वासियांना पाण्याचा त्रास होणार नाही. नेहमी नेहमी खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठ्यावर उपाय म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून स्वतंत्र विद्युत लाईन घेता येईल काय किंवा विद्युत जनित्र घ्यावे काय याचा विचार करण्यात येईल, असा खुलासा मा. महापौर यांनी केला. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्र.</u> १२६ -** मुकुंदवाडी येथे बहुतांशी शेतकरी राहत असल्यामुहे त्यांना जनावरे कोंडवाड्यात घालण्यासाठी चिकलठाण्याला जावे लागते. पर्यायी त्यांचा वेळ जावून गैरसोय होते. तेव्हा कुकुंदवाडी येथे कोंडवाड्याची व्यवस्था करावी.

सुचक - श्री. सुभाष परदेशी.
अनुमोदक - श्री. महादेव सुर्यवंशी.
दिनांक - १२/१२/८८.

**<u>संवाद</u> -** या विषयांवर विचार मांडतांना स. सदस्य श्री. बंडू प्रधान म्हणाले की, महानगरपालिका अंतर्गत एकूण १८ खेडे आहेत, मुकुंदवाडी प्रमाणे प्रत्येक खेड्यासाठी कोंडवाड्याची व्यवस्था करावी लागेल व त्रासही होईल. या सुचनांना स. सदस्य श्री. इकबालसिंग गिल यांनी अनुमोदन दिले.

मुकुंदवाडी ते चिकलठाणा हे अंतर बरेच असल्यामुळे मुकुंदवाडी येथे पकडण्यात आलेली दहा जनावरे चिकलठाण कोंडवाड्यात नेईपर्यंत फक्त दोनच जनावरे शिल्लक राहतात. तेव्हा मुकुंदवाडी येथे कांडवाडा बांधण्याचे ठरावास मंजुरी देण्यात यावी. असा खुलासा स. सदस्य श्री. कचरू नवपुते यांनी केला.

**<u>ठराव क्र.</u> १२६ -** सदर प्रस्ताव पुढील सभेत सविस्तर माहितीस्तव ठेवण्यात यावा असे मा. महापौर यांनी घोषित केले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्र.</u> १२७ -** महानगरपालिका स्वतंत्र्य प्रिटींग प्रेसची व्यवस्था करावी. जेनेकरून महानगरपालिकेचा खर्च वाचेल व काही सुशिक्षित बेकरांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटेल.

सुचक - श्री. सुभाष परदेशी.
अनुमोदक - श्री. मोतीराम घडामोडे.
दिनांक - १२/१२/१९८९.

**<u>संवाद</u> -** कार्यालयासाठी एक वर्षाकरिता लागणारा प्रिटींगचा खर्च आणि स्वतंत्र्य प्रेस व त्यासाठी लागणारा नोकरवर्ग यांच्या खर्चाचा ताळमेळ योग्य वाटत असल्यामुळे महानगरपालिकेतर्फे प्रेस सुरु करणे योग्य वाटते. अशी सूचना स. सदस्य श्री.

मोतीराम घडामोडे यांनी केली. यावर विचार मांडतांना स. सदस्या श्रीमती लता दलाल म्हणाल्या की, स्वतंत्र्य प्रेस उभा केल्याने दहा/बारा बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल. तेव्हा ठराव मंजूर करण्यात यावा.

प्रेससाठी लागणारा खर्च स्टेशनरी यांचा विचार करून तो योग्य वाटत असल्यास ठरावास मान्यता देण्यात यावी असे विचार स. सदस्य श्री. रशिदखाँ (मामू) यांनी मांडले असता अशा प्रकारे स्वतंत्र्य प्रेसची व्यवस्था इतर महानगरपालिकेतही आहे काय याचा विचार करण्यात यावा. अशी सूचना स. सदस्य श्री. बंडू प्रधान यांनी मांडली.

**<u>ठराव क्र.</u> १२७ -** स्वतंत्र्य प्रेस उभारण्यास किती खर्च येईल सध्याच्या पध्दतीने काम करून घेतलयास त्यापेक्षा कमी खर्च येतो काय? इतर महानगरपालिकेमध्ये स्वतंत्र्य प्रेसची व्यवस्था आहे काय? याबाबतची सविस्तर माहिती लेखाधिकारी यांनी उपलब्ध करून सदर प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा असे मा. महापौर यांनी घोषित केले, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्र.</u> १२८ -** पाणी बिल प्रशासकांच्या काळात जनतेची मते डावलून एकतर्फी दिडशे रुपयांवरून चारशे रुपयांपर्यंत वाढविण्यात आले आहे. तेंव्हा ही वाढ अन्यायी आहे. ती कमी करून वार्षिक रुपये २४०/- ते ३००/- करावे. म्हणजे महिण्याकाठी रुपये ३३.३३ ऐवजी पाणी बील रुपये २० ते २५ असे होईल.

सुचक - श्री. मोतीराम घडामोडे.<br>
अनुमोदक - श्री. सुभाष परदेशी.<br>
दिनांक - १२/१२/१९८८.

**<u>संवाद</u> -** संबंधीत विषयाचे अधिकारी सभागृहात नसल्यामुळे या ठरावांवर पुढच्या सभेत विचार करण्यात यावा अशी सूचना स. सदस्य श्री. इकबालसिंग गिल यांनी केली असता सभागृह नेता यांनी त्यास अनुमोदन दिले. यावर खुलासा करतांना स. सदस्य श्री. मोरेश्वर साव`म्हणाले की, सर्व तऱ्हेने योग्य असाच प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे, तेव्हा त्यास मंजुरी देण्यात यावी.

शहरातील जनता सहकार्याने वागते आहे गैरसोय सहन करते ही बाब या प्रसंगी विचारात घेतली पाहिजे. पाणी पट्टीत वाढ करतांना प्रशासकांनी व्यापारी बुध्दी वापरली ती योगय वाटत नाही. ज्यांना ज्यांना आपण पाणी पुरवठा करतो त्या सर्वांची नोंद कार्यालयाच्या रजिस्टर वर आहे की नाही याचा विचार करावा असे स. सदस्य श्री. मोरेश्वर सावे म्हणाले असता पाणी पुरवठ्यासंबंधी अंदाजपत्रकातील गेल्या तीन वर्षातील जमा खर्चाच्या आकडेवारिचा हवाला देऊन जादा पाणी देणे, पाईन लाईनची दुरुस्ती व नविन लाईन टाकणे, मोठ्या टाक्या बांधणे या सर्व बाबींचा विचार केला तर पाणी पट्टी कमी करणे योग्य होणार नाही, तेंव्हा याबाबत अधिकाऱ्यांकडून संपूर्ण माहिती घेऊन प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा असे स. सदस्य श्री. अलफखाँ व श्री. मनमोहनसिंग यांनी सुचविले. यावर खुलासा करतांना स. सदस्य श्री. मोतीराम घडामोडे म्हणाले की, पाणी पुरवठ्याच्या बाबतीत व्यापारी दृष्टीकोन ठेवून चालणार नाही. शासन सुध्दा पाणी आणि मिठ या नित्याच्या गरजेवर कर वाढ करत नाही, तेंव्हा काटेकोरपणे वसूल करावी. नफा नुकसानीचा विचार न करता ठराव मंजुर करावा यावेही सन्माननीय सदस्य श्री.

अजितकुमार शेळके यांनी आर्थिक परिस्थितीचा विचार करता शासनाकडून सबसिडी मिळते काय? याचा विचार करून तसे प्रयत्न करण्यात यावेत अशी सूचना मांडली.

**<u>ठराव क्र.</u> १२८ -** पाणी पुरवठ्यासाठी महापालिकेला अंदाजे ६०-७० लाखाचा तोटा प्रतिवर्षी सहन करावा लागतो. तरी पण सर्वसामान्य जनतेस सहकार्य करावयाचेचे आहे. स.सदस्य श्री. सावे यांनी मांडलेली बाजू योग्य आहे या कामी सर्वाच्या सहकार्याची आवश्यकता आहेच तेंव्हा पाणी पुरवठ्याच्या बाबत कोणत्या सहकार्याची आवश्यकता आहेच तेंव्हा पाणी पुरवठ्याच्या कोणत्या कारणांनी तोटा येतो, त्याचा शोध घेऊन तो तोटा किती कमी करता येईल या बाबत अधिकाऱ्यांशी चर्चा करून सदर प्रस्ताव पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा असे मा. महापौर यांनी घोषित केले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

यावेळी मागील प्रत्येक सभेमध्ये अशी अनेक आश्वासने देण्यात आली आहेत पण त्यांची पूर्तता मात्र झाली नाही तेंव्हा हा विषय पुढील सभेत अग्रक्रमाने घेण्यात येणार असेल तरच आमचे समाधान होईल अशी सूचना स. सदस्य श्री. मोरेश्वर सावे यांनी केली.

**ऐन वेळेचे प्रस्ताव**

**<u>विषय क्र.</u> १२९ -** महापालिकेने बेटरमेंट चार्जेस स्थायी समिती ठराव क्र. ३७०, अ दिनांक २६/९/८८ अन्वये वाढविला आहे. त्याची मुदत दि. ३१/१२/८८ रोजी संपत आहे. शहरातील जनतेच्या आग्रही मागणी वरून दि. ३१/०३/८९ पर्यंत मुदत वाढविण्यात यावी. प्रस्ताव सभागृहापुढे सादर.

सुचक - श्री. अजिज जहागिरदार.
अनुमोदक - श्री. मोरेश्वर सावे.

**<u>ठराव क्र.</u> १२९ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जनतेची आग्रही विनंती लक्षात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. ३७० अ दि. २८/०९/८८ अन्वये दि. ३१/१२/८८ पर्यंत विकास खर्च जमा करण्यास देण्यात आलेली मुदत दि. ३१/०३/१९८९ पर्यंत वाढविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

राष्ट्रगित झाल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

***दिनांक १७ जानेवारी १९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत***

मंगळवार, दिनांक १७ जानेवारी १९८९ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. महापौर, डॉ. शांताराम काळे यांचे अध्यक्षतेखाली नगर भवन (टाऊन हॉल) येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी व खालील सन्माननीय सभासद सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसनखाँ कासीमखाँ, | उपमहापौर |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ७) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ९) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| १०) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| ११) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १२) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १३) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १४) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १५) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १६) | मा. श्री. नारायण मोहनराव फत्तेलष्कर | --//-- |
| १७) | मा. श्री. जावेद हसनखाँ कासिमखॉ | --//-- |
| १८) | मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| १९) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| २०) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २१) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २२) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २३) | मा. श्री. अ. रशीदखान अ. हमीदखान | --//-- |
| २४) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २५) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २६) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २७) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २८) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २९) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| ३०) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३१) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३२) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३३) | मा. श्री. फैयाजखान अहमदखान | --//-- |

३४) मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग --//--
३५) मा. श्री. बी. मोहसीन अहमद बशीर अहमद --//--
३६) मा. श्री. स. हुसेन स. अहमद --//--
३७) मा. श्री. मगर शंकर जिजाराम --//--
३८) मा. श्री. मानकापे नामदेव शामराव --//--
३९) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी --//--
४०) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलॉन --//--
४१) मा. श्री. अलफखॉं हुसैन खॉं --//--
४२) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी --//--
४३) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव --//--
४४) मा. श्री. अजिमखॉं दादामिया अ. रहेमान --//--
४५) मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ --//--
४६) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव --//--
४७) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. --//--
४८) मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग --//--
४९) मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन --//--
५०) मा. श्री. गोडसे आनंद जगदिश --//--
५१) मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार --//--
५२) मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम --//--
५३) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम --//--
५४) मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव --//--
५५) मा. श्री. हाळनारे गिरजाराम नानाराव --//--
५६) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव --//--
५७) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल --//--
५८) मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान --//--

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली.

**<u>विषय क्र.</u> १३० -** दिनांक १७ डिसेंबर, १९८८ रोजी झालेल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत कायम करणे.

**<u>संवाद</u> -** दिनांक १७/१२/८८ च्या इतिवृत्तांतावर चर्चा करतांना स. सभासद श्री. तुळशीराम भगुरे म्हणाले की, ठराव क्र. १२९ अन्वये काय कार्यवाही झाली याचा खुलासा करण्यात यावा. हर्सूल येथे मंजुर झालेले आरोग्य केंद्र जिन्सी येथे चालू असल्याचे समजते. हे आरोग्य केंद्र सन १९८४ मध्ये मंजूर झालेले आहे. त्या वेळी आरोग्य केंद्रासाठी लागणारी आवश्यक ती जागा उपलब्ध आहे. तेव्हा या भागातील नागरिकांच्या आरोग्य सोयीसाठी उपलब्ध असलेल्या जागेवर आरोग्य केंद्र त्वरित सुरू करावे.

यावर खुलासा करतांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणाले की, ५०,००० लोकवस्तीसाठी एक आरोग्य केंद्र याप्रमाणे दिल्लीगेट ते हर्सूल या भागातील नागरिकांना एक आरोग्य केंद्र असावे. सन १९८४ मध्ये हर्सूल भागासाठी मंजूर झालेल्या आरोग्य केंद्राकरिता आवश्यक इमारत उभारण्याचा हर्सूल येथे प्रयत्न केला असता, त्याठिकाणी काही अडचणी निर्माण झाल्या. म्हणून हे अरोग्य केंद्रशासनाकडून मिळणारे

अनुदान परत जावू नये या उद्देशाने शहरात सुरू करण्यात आले आहे. या आरोग्य केंद्रासाठी सिडको प्रशासनाने रु. १/- ने भाड्याने जागा देण्यास मान्यता दिली आहे. यावर मा. महापौर यांनी खुलासा केला की, हर्सूल येथील नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष पाहणी करून नविन केंद्र उभारणीस किती जागा लागेल, यावर पुढील सभेत विचार केला जाईल.

स. सभासद, श्री. मोरेश्वर सावे यांनी सुचविले की, इतिवृत्त ठराव क्र. ११९ च्या निर्णयाप्रमाणे सदर विषय आजच्या सभेत नाही. तसेच विषय क्रमांक १२८ आजच्या बैठकीत अग्रक्रमाने चर्चीला जाईल असे आश्वासन मा. महापौरांनी दिले होते. त्यावरही खुलासा व्हावा. यावर खुलासा करतांना मा. महापौर म्हणाले की, विषय क्रमांक ११९ बाबब नियुक्त करण्यात आलेल्या समितीने प्रथम आपला अहवाल तयार करून सभागृहापुढे ठेवावा, म्हणजे त्यावर निर्णय घेता येईल. आणि विषय क्र. १२८ वर स. सभासद आणि अधिकारी यांचेशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

सभासद श्री. मधूकर शिंदे यांनी विचारणा केली की, दि. १२ जाने, ८९ रोजी दोन ठराव पाठवले होते. ते आजच्या पुरवणी विषय पत्रिकेवर नाहीत तेंव्हा खुलासा व्हावा. यावर खुलासा करतांना मा. महापौर म्हणाले की, सभासदांनी दिलेले प्रश्न स्थायी समितीच्या अधिकारातील असल्याने विरोधी पक्षनेत्यांच्या संमतीने वगळण्यात आले आहेत.

स. सभासद श्री. अविनाश कुमावत, श्री. चंद्रकांत खैरे यांनी सुचविले की, विषय क्र. ११४ मध्ये स. सभासद श्री. एकबालसिंग यांनी सुचविल्याप्रमाणे यात फक्त आरक्षण क्र. ८९ असा उल्लेख आहृे त्यामुळे निश्चित जागा कोणती याचा उल्लेख नाही. तेंव्हा आरक्षण क्रमांका बरोबर वार्ड क्रमांक व मोहल्याचा खुलासा करण्यात यावा. तसेच आरक्षण क्र. ८९ च्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करावी. त्यामुळे याठीकाणी संपादन करावयाची जागा अस्तित्वात आहे काय किंवा त्यावर अतिक्रमण झाले काय हे दिसेल. यावर खुलासा करतांना सहाय्यक संचालक, नगररचना म्हणाले की, साईट क्र. ८९ ही हायकोर्टाच्या मागील बाजूस कोकणवाडी या ठिकाणी आहे. विकास आराखड्यात आरक्षित केलेल्या जागांना साईट नंबर दिलेले असतात, त्यात सर्वे नंबरचा उल्लेख नसतो. या विषयची संपूर्ण माहिती नकाशे सोबत आणलेले आहेत, ते बघून स. सभासदांचे समाधान होईल असे वाटते किंवा प्रत्यक्ष जागा पहाणी करता येईल. ही जागा संपादन करण्याचा प्रस्ताव नोव्हेंबरमध्ये आला होता.

स. सभासद श्री. एकबालसिंग गिल व श्री. नरेंद्र पाटील यांनी मागणी केली की, मागील तीन महिण्यापासून या ठरावावर चर्चा होत आहृे सर्व सभासदांना सह. संचालक, नगर रचना यांनी याबाबत माहिती दिली आहे. तेव्हा यावर त्वरित निर्णय घेण्यात यावा.

यावेळी स. सदस्या, श्रीमती लता दलाल यांनी सुचविले की, मागील सभेच्या वेळी सचिवांवर हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल केला होता. परंतु त्याची नोंद इतिवृत्तात घेतलेली नाही. तेंव्हा त्याची नोंद इतिवृत्तात घेण्यात यावी. यावर खुलासा करतांना मा. महापौर म्हणाले की, हक्कभंग ठराव दाखल करतांना आपण सचिवांचा निषेध केलेला आहे. तेव्हा हक्कभंग ठरावाचा प्रश्न येत नाही. इतिवृत्तामध्ये विषय पत्रिकेवरिल ठरावाची नोंद घेतली जाते. तसेच साईट नं. ८९ बाबत खुलासा करतांना मा. महापौर यांनी सूचविले की, साईट नं. ८९ ची पाहणी करण्यात यावी आणि या जागेवर अतिक्रमण झाले नसेल व जागा अस्तित्वात असल्यास ठराव मंजूर करण्यात येईल.

स. सभासद श्री. यादव अशोक सायन्ना व श्री. एकबालसिंग गिल, श्री. अजिज जहागिरदार यांनी खुलासा केला की, या ठरावावर बरीच चर्चा झालेली आहे, तेंव्हा अश प्रकारे अटी घालण्याची आवश्यकता नाही ही बाब लक्षात घेऊन त्यास मंजुरी द्यावी.

स. सभासद श्री. मोरेश्वर साव व श्री. मोतीराम घडामोडे यांनी खुलासा केला की, आपण इतिवृत्त मान्य करित आहोत. इतिवृत्त मान्य करतांना त्यात फक्त दुरुस्तीची मागणी करता येते. इतिवृत्त मंजुरी नंतर पाणी प्रश्नाप्रमाणे यावरही निर्णय घेण्यात यावा.

स. सभासद श्री अलफखाँ हुसेन खॉ व सभागृह नेता यांनी सुचविले की, इतिवृत्त कायम करतांना यात काही दुरुस्ती करावयाची आहे काय यावरच चर्चा करावयास पाहिजे. आरक्षण क्र.८९ बाबतची जागा, नकाशा व अन्य माहिती अधिकाऱ्यांनी सोबत आणलेली आहे यावर विचार करण्यात यावा. एखाद्या ठरावाबाबत सविस्तर माहिती आवश्यक असल्यास स. सभासदांनी संबंधीत अधिकाऱ्यांशी कार्यालयात चर्चा करून माहिती उपलब्ध करून घ्यावी.

स. सभासद, श्री. अलफखॉ यांच्या मताशी आम्ही सहमत आहोत. मागिल बऱ्याच ठरावावर अद्याप निर्णय घ्यावयाचे बाकी आहे. असा खुलासा स. सभासद श्री. नरेंद्र पाटील व श्री. मोतीराम घडामोडे यांनी केला.

दरम्यानच्या काळात सभागृहात काही फोटो काढण्यात आल्याचे निदर्शनास आले. तेंव्हा संबंधितांनी अशा प्रकारची परवानगी घेतली होती काय किंवा त्यांना तशी परवानगी दिली आहे काय आणि परवानगी दिली नसेल तर फोटोग्राफरच्या कॅमेऱ्यातील रोल काढून घेण्यात यावेत. फोटो काढणे नियमाबाह्य आहे. तसेच पोलिसांना सभागृहात येण्यास मनाई करण्यात यावी. अशी सूचना स. सभासद श्री. मोरेश्वर सावे, विरोधी पक्ष नेता व श्री. प्रदिप जैस्वाल यांनी केली. याबरोबर सुरक्ष जवानांना पत्रकार कक्षात पाठवून फोटो घेण्याबद्दल मनाई केली व त्यांना रोल काढून घेण्याच्या सूचना दिल्या त्याचप्रमाणे ते सभागृहात येण्या बद्दलही सुरक्षा जवानांकडून सूचना देण्यात आल्या.

त्यानंतर सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी खुलासा केला की, साईट क्र. ८९ बाबत सविस्तर कल्पना दिलेली आहे. आरक्षित जागेपैकी ८५% भाग महापालिकेच्या ताब्यात आहे. फक्त पाच प्लॉट म्हणजेच १/२ एकर जागा ताब्यात घ्यावयाची आहे. यावर जागेचे आवार्डही जाहीर झालेले आहेत. महापालिकेने संपादित केलेल्या ८५% जागेला मुख्य रस्त्यावर ॲप्रोच होण्यासाठी उर्वरित पाच भूखंड संपादित करणे आवश्यक आहे. म्हणजेच या ८५% संपादित जागेवरून मुख्य रस्त्यावर ये-जा करणे सोईचे होईल. यावर स. सभासद, श्री. मोरेश्वर सावे यांनी उपसूचना मांडली की, साईट क्र. ८९ बाबत स. सभासद श्री. अलफखॉ हसेनखाँ श्री. एकबालसिंग गिल, विरोधी पक्ष नेता आणि त्या वॉर्डाचे नगरसेवक व अधिकारी यांनी पाहाणी करून पुढील बैठकीत अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात याव्यात यावर मा. महापौर यांनी खुलासा केला की, स. सभासदांच्या वरील उपसूचनेत सभागृहनेता यांचा समावेश करून संबंधितांना सदर जागेची पाहणी करून पुढील बैठकीत ठराव मांडावा मा. महापौराच्या सुचनेवर स. सभासद डॉ. चेनकरण संचेती व श्री. यादव अशोक सायन्ना व एकबालसिंग गिल यांनी सूचविले की, हा निर्णय योग्य नाही.

मागील सभेमध्ये जालना रोडबाबत मी निवेदन करत असतांना या रोडचे काम १ डिसेंबरला सुरू होईल, असा खुलासा करण्यात आला होता परंतु अद्याप पर्यंत तयावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. असा खुलासा स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली असता, जालना रोडचे काम शक्य तितक्या लवकर पूर्ण व्हावे

अशी तुमच्या प्रमाणेच आम्हालाही कळकळ आहे. काम सुरू झाले नाही, म्हणून आपण माझी प्रत्यक्ष भेटही घेतलेली आहे. जालना रोड अद्यापही सार्वजनिक बांधकाम विभागाचे ताब्यात आहे या रोडचे कामासाठी सदर खात्याला जागतिक बँकेकडून कर्ज मिळाल्याची माहिती नुकतीच मिळाली आहे. आणि त्यानुसार लवकरच या कामाला सुरुवात होईल असा खुलासा मा. महापौर यांनी केला.

स. सदस्या श्रीमती लता दलाल यांनी सूचविले की, हक्कभंग ठरावाची नोंद इतिवृत्तात व्हावी असा मी पुन्हा आग्रह धरते. यावर खुलासा करतांना मा. महापौर म्हणाले की, आज सभागृहात सचिव उपस्थित नाहीत ते आल्यानंतर यावर आपण निर्णय घेवू.

स. सभासद श्री. अजितकुमार शेळके यांनी सूचविले की, ठराव क्र. ११४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे इराव क्र. ९० च्या उद्यानाची आरक्षित जागा कोणती या संबंधी खुलासा करण्यात यावा. या ठिकाणी उद्यानासाठी दोन साईट विकास आराखड्यात दर्शविलेल्या आहेत. त्यापैकी निश्चित जागा कोणती याचा खुलासा व्हावा. यावर खुलासा करतांना सहाय्यक संचालक, नगर रचना म्हणाले की, बीबीच्या मकबऱ्यासमोरील पश्चिम बाजूची केंद्र शासनाच्या मालकीची जागा महापालिकेस उद्यान उभारणीसाठी मिळणार आहे.

नाशिक महापालिकेप्रमाणे औरंगाबाद प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये महापालिका जकात कर्मचारी पाठवून या कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वाहनांवर जकात भरली किंवा नाही यांची तपासणी करून जाकात न भरलेल्या वाहनांकडून जकात वसूली करण्याची कार्यवाही करण्यात यावी. यामुळे वाहनांच्या अधिकृत विक्रेत्यांनी आयात केलेल्या वाहनांवर पूर्ण जकात भरली किंवा नाही याचा निश्चित बोध होईल. वहान खरेदी करणारे अधिकृत विक्रेते उदा. २० वाहनांची खरेदी केल्यानंतर फक्त १० गाड्यांची जकात भरतात अशी माहिती मिळाली आहे अशी सूचना स. सभासद श्री. रशिदखान (मामू) यांनी केली यावर खुलासा करतांना जकात अधिक्षक म्हणाले की, प्रादेशिक परिवहन कार्यालयात नोंदणी होणाऱ्या वाहनांचे खरेदीदार आणि विक्रेते यांची माहिती घेण्याचे काम कार्यरत आहे तसेच या कार्यालयाकडून नोंदणी होणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांबाबत लेखी माहिती मागविण्यात आली आहे.

दिनांक १७/१२/८८ च्या सभेच्या इतिवृत्तात "राष्ट्रगीत झाले म्हणजे सभा संपली असे नाही" अशी नोंद घ्यावयास पाहिजे होती ती आलेली नाही.तेंव्हा तशी नोंद दि. १७/१२/८८ च्या इतिवृत्तात घेण्यात यावी अशी सूचना स. सभासद श्री. आनंद गोडसे यांनी केली.

स. सभासद, श्री. मोतीराम घडामोडे यांनी सुचविले की, इराव क्र. १२५ अन्वये पाणी पुरवठ्या बाबत काय कार्यवाही करण्यात आली याचा अधिकऱ्यांनी खुलासा करावा. यावर खुलासा करतांना कार्यकारी अभियंता तथा प्रभारी उपआयुक्त म्हणाले की, ठरावात नमूद केल्याप्रमाणे विस्कळीत होणाऱ्या पाणी पुरवठ्या बाबत योग्य निर्बंध घालण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठा व जलनिस:रण विभागाचे अधिक्षक अभियंता कार्यकारी अभियंता व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अधिकारी यांचेशी एकत्रितरित्या चर्चा करून पुढील बैठकीत तदअनुषंगाने आवश्यक तो अहवाल सभागृहात ठेवला जाईल. मंजूर झालेला ठराव आणि श्हरातील नागरिक यांच्या तर्फे शासनास एक निवेदन देऊन या बाबत योग्य उपय योजण्याची कार्यवाही करावी लागेल.

इतिवृत्तावर चर्चा करतांना त्यात कोणत्या प्रकारची दुरुस्ती करणे आवश्यक आहे या एकाच बाबीवर वस्तुतः चर्चा होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे या इतिवृत्तात नमूद करण्यात आलेल्या ठरावावर आवश्यक त्या दुरुस्त्या सभासदांनी सुचवाव्यात

एवढा एकच उद्देश इतिवृत्त कायम करतांना असतो तो लक्षात घेताना त्याप्रमाणे चर्चा योग्य असल्याचे मा. महापौर यांनी सांगितले असता असे इतिवृत्त १५ दिवसात तयार करावे, म्हणजे त्यात काही सुधारणा करणे आवश्यक असल्यास दुरुस्त करणे सोयीचे होईल. असे स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी केले.

**<u>ठराव क्र.</u> १३० -** दिनांक १७ डिसेंबर, १९८८ रोजी संपन्न झालेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

**<u>संवाद</u> -** ठराव क्र. १२८ मध्ये हा विषय अग्रक्रमाने चर्चेला घेतला जाईल असा उल्लेख आहे. तेव्हा त्यात नमूद केल्याप्रमाणे पाणीपुरवठ्या सारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर अग्रक्रमाने चर्चा व्हावी अशी विनंती स. सभासद, श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली असता पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाबाबत सभागृहाचे दुमत नाही या विषयास पुढच्या सभेत अग्रक्रम देवून चर्चा करण्यात येईल असा खुलासा मा. महापौर यांनी केला.

अग्रक्रम याचा अर्थ इतिवृत्त मंजूर झाल्या नंतर पाणी पुरवठ्याच्या प्रश्नावर चर्चा व्हावी असाच होत असल्याने या प्रश्नाबाबत प्रथम चर्चा व्हावी असा आग्रह स. सभास, श्री. मोरेश्वर सावे, श्री. मोतीराव घडामोडे, सौ. लता दलाल यांनी धरला. तेंव्हा मा. महापौर यांनी सभासदांना त्यांचे विचार मांडण्यास परवानगी दिली यावर विचार मांडतांना स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे म्हणाले की, १५० रुपयांवरून ४०० रु. पर्यंत वाढविण्यात आलेली पाणीपट्टी रु. २००/- किंवा ३००/- करण्यात यावी. यावेळी खुलासा करतांना प्रभारी उपआयुक्त तथा कार्यकारी अभियंता म्हणाले की, शहराच्या पाणीपुरठ्यासाठी महानगरपालिकेला वार्षिक दोन कोटी सत्तर लाख रुपये खर्च होतो. त्याप्रित्यर्थ पाणीपट्टी स्वरुपात नागरिकांकडून एक कोटी सत्याहत्तर लाख रुपये वसूल होतात, म्हणजेच पाणी पुरवठ्यासाठी महापालिकेला रुपये ९० लाख जादा द्यावे लागतात. सध्या आहे ही पाणीपट्टी कमी केल्यास त्यात फार मोठ्या प्रमाणावर फरक पडेल.

महापालिका सध्या शहरात एक वेळ पाणी पुरवठा करीत आहे तो बऱ्याच वेळा खंडित होतो पूर्वी महापालिका दोन वेळा पाणीपुरवठा करत होती. सध्या पूर्वी प्रमाणे दोन वेळा पाणी पुरवठा होत नसतांनाही अशा प्रकारे केलेली पाणी पट्टीची वाढ नागरीकांना जाचक ठरत आहे. तेंव्हा पाणी पट्टीचे दर कमी करण्यात यावेत. एक वेळ पाणीपुरवठा होत असल्यामुळे येणारातोटा महापालिकेला सहन करावा लागेल. सध्या शहरात अनेक विना परवाना नळ कनेक्शन आहेत प्लंबर व अधिकारी यांचे संगनमत झाले तर शहरात विना परवाना नळ कनेक्शन होऊ शकणार नाहीत त्यामुळे कमी वसूल होणाऱ्या पाणीपट्टीतही वाढ होईल या व अन्य सर्व बाबींचा सारासार विचार करून जनतेला कमीत कमी पाणीपट्टी कशी आकारता येईल हे पहावे.

पाणीपुरवठ्याच्या बाबतीत महानगरपालिकेला सहन करावा लागणारा तोटा लक्षात घेता ही बाब पालिकेला आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखी नाही. या प्रश्नावर विचार करीत असतांना सभागृह पालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणार नसेल तर नागरिकांना विनामुल्य पाणी पुरवठा करणे सोईचे होईल. असे विचार स. सभासद श्री. मनमोहनसिंग ओबराय यांनी मांडले.

पाणीपट्टी संबंधी विचार करीत असतांना मिटरसाठी घेण्यात येणारी अनामत रक्कम रु. १००/- कमी करता येईल काय या बाबतीत विचार व्हावा अशी मागणी स. सभासद श्री. अजिजउल्ला बेग व श्री. अजितकुमार शेळके यांनी केली.

शहराच्या पाणीपुरठ्याबाबत विचार करतांना अंदाजपत्रकातील तरतूद येणारा खर्च, वसूल होणारी रक्कम या सर्व गोष्टींचा ताळमेळ लावणे आवश्यक आहे. पुणे, मुंबई व इतर महापालिकांमध्ये करमुल्य योग्य किंमतीवर १%, २%, अशा प्रकारे १०%, पर्यंत पाणीपट्टी वसूल केली जाते. त्याप्रमाणे औरंगाबाद शहरातही करमूल्य योग्य किंमतीवर पाणीपट्टी आकारता येईल काय याचा विचार करण्यात यावा. पाणीपट्टी मध्ये सवलत देणे योग्यच होईल असा खुलासा स. सभासद, श्री. अलफखाँ हुसेनखान यांनी केला.

शहरातील विना परवानगी नळ कनेक्शनच्या बाबतीत चौकशी करण्याची मागणी केली होती. अर्धा इंच नळ कनेक्शन मंजूर असतांना मुळतः पाऊन इंची नळ कनेक्शन देण्यात आले आहेत. विना परवानगी नळ कनेक्शन बाबत व अशा नळ कनेक्शन बाबत झोन कडून सर्वे झाला असून त्याच्या याद्याही तयार करण्यात आल्या आहेत. तेंव्हा या बाबत चौकशी करून पाणीपट्टी मध्ये येणारा तोटा भरून काढता येईल असे विचार स. सभासद, श्री. मोहसीन अहेमद यांनी मांडले असता अशा प्रकारचे विनापरवाना नळ कनेक्शन आणि मंजूर नळ कनेक्शन व्यतिरिक्त ज्यादा व्यासाचे नळ कनेक्शन शोधून काढल्यानंतर पाणीपट्टी मध्ये सवलत देण्याबाबत विचार करण्यात यावा असा खुलासा सभागृह नेता यांनी केला. यावर आपले विचार मांडतांना स. सभासद श्री. गंगाधर गाढे म्हणाले की, शहरातील बडे नागरिक आणि बिल्डर्स यांच्याकडे अशा प्रकारे विना परवानगी नळ कनेक्शन आहेत. विना परवानगी कनेक्शन करणारे प्लंबर आणि चोरून पाणी घेणारे नागरिक यांच्याविरुध्द स्वतंत्र यंत्रणा उभारून ठोस अशा प्रकारची कार्यवाही करण्यात यावी याच वेळी बेगमपुरा भागातील विट भट्टीधारक महापालिकेची मुख्य जलवाहिनी तोडून त्यातून पाणी घेत असल्याची कल्पना संबंधीत अधिकाऱ्यांना देवूनही अद्याप कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्याची तक्रार स. सभासद श्री. प्रभाकर विधाते यांनी केला.

सभागृहाने ६ महिन्या पूर्वीच मालमत्ता कर कमी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा परिस्थितीत पाणीपट्टी कमी करणे योग्य होणार नसल्यामुळे पाणीपट्टी आहे तीच ठेवण्यात यावी असे विचार स. सभासद श्री. नरेंद्र पाटील यांनी मांडले असता नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्न असल्यामुळे आणि दोन वेळे ऐवजी एक वेळसुध्दा महानगरपालिका नागरिकांना योग्य प्रकारे पाणी पुरवठा करू शकत नसल्यामुळे या बाबत त्वरित निर्णय घेण्या यावा, तयावर विचार करण्यासाठी एक कमिटी कायम करण्यात यावी असे विचार स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी मांडले.

यावर आपले विचार मांडतांना स. सभासद, श्री. रतनकुमार पंडागळे म्हणाले की, शहरातील विना परवानगी नळ कनेक्शन बाबत चर्चा करण्या ऐवजी अशा नळ कनेक्शनची माहिती असलेल्या सभासदांनी लेखी स्वरुपात माहिती कळवावी म्हणजे त्यावर निर्णय घेता येईल व सध्या असलेली पाणीपट्टी कायम ठेवण्यात यावी. यावेळी पाणीपट्टी बाबत केवळ चर्चा करण्यापेक्षा या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर त्वरित निर्णय घेण्याची मागणी स. सभासद श्री. नरेंद्र पाटील व मोतीराम घडामोडे यांनी केली.

**<u>ठराव</u> -** पाणी पुरवठा हा जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असल्याने याबाबत सभगृहास दुमत नाही. तरी पण महापालिकेच्या आर्थिक बाबीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. पाणीपट्टी मध्ये महापालिकेला तोटा कशामुळे येतो याचाही विचार करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर शहरातील विनापरवानगी नळ कनेक्शन आणि सार्वजनिक खाजगी नळाच्या तोट्या नसल्यामुळे वाया जाणारे पाणी कसे थांबता येईल याचाही विचार करणे आवश्यक आहे. तेंव्हा विनापरवाना नळ कनेक्शन, वाया जाणारे पाणी याचा अभ्यास करून अहवाल

तयार झाल्यानंतर निर्णय घ्यावा लागेल. तेंव्हा अशा प्रकारचा अभ्यास करण्यासाठी पुढील स. सभासदांची एक कमेटी स्थापन करण्यात येते.

स. सभासद, सभागृहनेता श्री. मनमोहनसिंग ओबेराय, स्थायी समिती सभापती, श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. धनंजय गंगाखेडकर, श्री. गंगाधर गाढे, श्री. नरेंद्र पाटील, श्री. मो. ईस्माईल, श्री. अलफखॉ हुसेनखॉ, विरोधी पक्षनेता श्री. चंद्रकांत खैरे, श्री. मोरेश्वर सावे, श्री. मोतीराम घडामोडे, श्री. प्रदिप जैस्वाल आणि सौ. लता दलाल त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> १३१ -** मा. आयुक्त यांच्या शिफारशी नुसार, सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री. आर. के. पिंगळे, सहाय्यक आयुक्त (रोहयो) आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांची प्रतिनियुक्ती उपआयुक्त महानगरपालिका औरंगाद या पदावर शासन निर्णय क्र. डीपीटी-११८८/७१२१/ई-१ मंत्रालय, मुंबई -३२ / दिनांक २२/१२/८८ अन्वये रुजू झाल्याच्या तारखे पासून प्रथम दोन वर्षाकरिता करण्यात आलेली आहे.

तरी श्री. आर. के. पिंगळे यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दोन वर्षाकरिता मान्य करून श्री. आर. के. पिंगळे, महानगरपालिका सेवेत रुजू होतील त्या दिवसापासून दोन वर्षाचा कालावधीस मंजुरी देणे विचारार्थ व निर्णयासाठी सादर.

**<u>ठराव क्र.</u> १३१ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सहाय्यक आयुक्त, (रो.ह.यो.) श्री. आर. के. पिंगळे यांची रुजू होण्याच्या तारखेपासून दोन वर्षाकरिता ओरंगाबाद महानगरपालिकेत उपआयुक्त या पदावर प्रतिनियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १३२ -** मा. आयुक्त यांच्या शिफारशी नुसार सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री. यु. बी. देशमुख उप अभियंता पाणीपुरवठा यांची प्रतिनियुक्ती महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस:रण मंडळ, मुंबई यांचे आदेश क्र. एल. ओ ओ / १०८५/(४९) आ-१/, दिनांक १०/०५/८८ अन्वये दिनांक २८/०२/१९८९ पर्यंत वाढविण्यात आला होता. त्यामुळे त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधीस दि. २८/०२/८९ रोजी ४ वर्ष पूर्ण होत आहेत.

शासनाच्या निर्णयानुसार ४ वर्षानंतर कर्मचाऱ्यास प्रतिनियुक्तीवर ठेवणे आवश्यक असेल तर त्या प्रतिनियुक्तीस मा. मुख्यमंत्री यांची परवानगी आवश्यक आहे. विशेष बाब म्हणून मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची मंजुरी मिळेल अशा अपेक्षेवर प्रतिनियुक्तीवर पुढील एक वर्षाकरिता दिनांक २८/०२/९० पर्यंत ठेवण्यासाठी ठराव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> १३२ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा उप अभियंता श्री. यु. बी. देशमुख यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २८/०२/८९ नंतर पुढील एका वर्षाकरिता विशेष बाब म्हणून मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडून मंजुरी मिळेल या आशेवर वाढवून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषयक्र.</u> १३३ -** मा. आयुक्त यांच्या शिफारशी नुसार सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री. आर. के. सदावर्ते, लेखाधिकारी यांची प्रतिनियुक्तीचा वाढीव कालावधी संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे पत्र क्र. बिलेसे/२२८८/२१६९/ प्रशासन-रा-

दिनांक ०३/०५/८८ अन्वये दिनांक ३१/०१/८९ पर्यंत एक वर्षाकरता वाढविण्यात आला आहे. हा प्रतिनियुक्ती वरील ३ वर्षाचा कालावधी दिनांक ३१/०१/८९ रोजी संपत आहे.

तरी श्री. आर. के. सदावर्ते, लेखाधिकारी यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाने म्हणजे दिनांक ३१/०१/९० पर्यंत वाढविण्याबाबत विचारार्थ व निर्णयासाठी सादर.

**<u>ठराव क्र.</u> १३३ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लेखाधिकारी, श्री. आर. के. सदावर्ते यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ३१/०१/८९ पासून पुढील एक वर्षाकरिता वाढवून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १३४ -** मा. आयुक्त यांच्या शिफारशीनुसार सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री. व. आ. आंबेकर शिक्षणाधिकारी यांची प्रतिनियुक्ती शासन निर्णय क्र. एस. ए. टी-३१८६/१३२३/४६३/८६ प्र. शा.३, दिनांक २१/०७/८७ नुसार नियुक्ती दिनांक २५/०९/८७ पासून करण्यात आली होती. हा प्रतिनियुक्ती वरील एक वर्षाचा कालावधी दिनांक २४/०९/८८ रोजी संपला आहे. त्यांची बदली शासन सेवेत झाल्यामुहे त्यांना दिनांक १५/१२/८८ रोजी मध्यान्हा नंतर कार्यमुक्त करण्यात आले.

तरी श्री. व. आ. आंबेकर शिक्षणाधिकारी यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक २५/०९/८८ ते १५/१२/८८ पर्यंत महानगरपालिकेतील सेवाकाळ प्रतिनियुक्तीस मंजुरी देणे. विचारार्थ व निर्णयासाठी सादर.

**<u>ठराव क्र.</u> १३४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिक्षणाधिकारी श्री. व. आ. आंबेकर यांचा दिनांक २५/०९/८८ ते १५/१२/८८ पर्यंतचा प्रतिनियुक्तीचा कालावधी महापालिकेमधील प्रतिनियुक्ती सेवाकाळ म्हणून संबोधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> १३५ -** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, महानगरपालिकेतर्फे सन १९८८-८९ मध्ये औरंगाबाद शहरात आरोग्य सेवा देण्यासाठी दोन नविन आरोग्य केंद्रे अनुक्रमे १) औरंगपुरा २) जवाहर कॉलनी येथे ज्या ठिकाणी महापालिकेची वास्तु बांधून तयार आहेत तेथे आरोग्य केंद्रे सुरू करण्यासाठी मंजुरी द्यावी. तसेच आरोग्य केंद्रासाठी लागणारा कर्मचारी वृंदाची खालीलप्रमाणे नविन पदे निर्माण करण्यासाठी मान्यता द्यावी.

| अ.क्र. | पदनाम | अर्हता | वेतनश्रेणी | पदे |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी | एम. बी.बी.एस. | ६००-११५० | २ |
| ०२ | मिश्रक | डी. फार्मसी व नोंदणीकृत | २९०-५४० | २ |
| ०३ | ए. एन. एम. | ए. एन. एम. ट्रेनिंग | २९०-५४० | ४ |
| ०४ | नोंदणी लिपिक | सातवी पास | २००-२८० | २ |
| ०५ | ड्रेसर | सातवी पास ड्रेसिंग प्रमाणपत्र | २२०-२८० | २ |
| ०६ | सेवक | - | २००-२८० | ४ |

वरील प्रमाणे पदे निर्माण करून (आरोग्य केंद्रे सुरू करण्यास मान्यता द्यावी. यावर येणारा अंदाजे खर्च रु. २ लाख सार्वत्रिक दवाखाने या शिर्षकाखाली करण्यासाठी मंजुरी देण्यात यावी मंजुरीस्तव सादर.)

**संवाद -** या विषयावर आपले विचार मांडतांना स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे म्हणाले की, आरोग्य केंद्रांची उभारणी करत असतांना शहरातील सर्व भागाच्या आरोग्य केंदांचा विचार करण्यात यावा ही बाब लक्षात घेऊन या प्रस्तावावर निर्णया घेण्यात यावा. योवळी औरंगपुरा व जवाहर कॉलनी येथील स्टाफ मंजूर करतांना हर्सूल आरोग्य केंद्राच्या स्टाफचाही विचार करण्यात यावा असे स. सभासद श्री. तुळशिराम भगुरे यांनी सुचविले.

नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचारी वर्गामध्ये स्त्रि अथवा पुरुष कर्मचारी भरण्यात येतील याचा बोध होत नाही तेंव्हा तसा स्पष्ट उल्लेख असावा अशी मागणी स. सभासद श्री. अजिजउल्ला बेग यांनी केली.

यावर आपले विचार मांडतांना स. सभासद, श्री. गंगाधर गाढे यांनी सुचविले की, यापूर्वीच्या सभेमध्ये शहरातील ज्या-ज्या भागांमध्ये आरोग्य केंद्रांची निकड आहे अशा भागांचा सर्व्हे करून त्याचा अहवाल सभागृहात दाखल करण्यात यावा असे ठरले होते, परंतु तशा प्रकारचा अहवाल सादर न करता संबंधित अधिकारी आरोग्य केंद्रे उभारणे बाबत पक्षपाती धोरणाचा अवलंब करीत आहेत ही बाब योग्य नाही. यावर आपले विचार मांडतांना स. सदस्या सौ. लता दलाल म्हणाल्या की, केवह सेनेचा वॉर्ड असल्यामुळे या विषयाला सभागृहात विरोध होत आहे. वस्तुतः या दोन्ही आरोग्य केंद्रांच्या इमारती बांधून तयार आहेत म्हणून पक्षाचा विचार न करता या आरोग्य केंद्रांसाठी स्टाफ मंजूर करण्यात यावा यावर खुलासा करतांना स. सभासद श्री. गंगाधर गाढे म्हणाले की, हा पक्षपातीपणा करत नसून अधिकारी वर्ग पक्षपातीपणा करीत आहे असे मला सुचवावयाचे आहे. मागील सभेमध्ये संबंधित अधिकाऱ्यांना शहराचा सर्व्हे करून ज्या-ज्या ठिकाणी आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे त्या बाबतचा अहवाल दाखल करण्याबाबत सूचना देवूनही संबंधित अधिकाऱ्याने अशा प्रकारचा अहवाल अद्याप दाखल केलेला नाही. असा खुलासा मा. महापौर यांनी केला.

स. सभासद श्री. नरेंद्र पाटील म्हणाले की, हा ठराव यापूर्वीच मंजूर झाला असतांनाही ती पुन्हा या विषय पत्रिकेवर कसा ठेवण्यात आला याचा सचिवांनी खुलासा करावा.

चर्चेत भाग घेत असतांना स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे श्री. अलफखाँ हुसेनखाँ म्हणाले की, आम्ही कोणत्याही प्रकारचा पक्षपात केला पाही सेना सदस्यांनी आरोपाचे खंडन करावे स्थायी समिती मध्ये सेनेचा एकही सीाासद नसतांना ९०% सेनेच्या वॉर्डातील कामांना मंजुरी दिलेली आहे. याचा विचार करता अशा प्रकारचे आरोप करणे योग्य होणार नाही. यावेही मा. महापौर यांनी खुलासा केला की, स. सदस्या सौ. लता दलाल आपण स्थायी समिती सभापतींवर पक्षपातीपणाचा जो आरोप केला आहे तो योग्य नाही. याबाबत आपण एखादे उदाहरण दाखवावे. आरोग्य केंद्र सुरू करण्यास आमचे दुमत नाही पण याचा आरोग्य केंद्रासारखी शहरातील इतर भागतही आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे काय याची संपूर्ण माहिती संबंधित अधिकाऱ्याकडून मागविण्यात आली होती. स. सभासद श्री. भगुरे यांचे सूचनेप्रमाणे हर्सूल आरोग्य केंद्रासाठी जागा विकत

घेऊन आरोग्य केंद्र सुरू करावे ही सूचना आणि शहरात एक किंवा दोन किलो मिटरच्या अंतरावर एक आरोग्य केंद्र या प्रमाणे किती आरोग्य केंद्रांची आवश्यकता आहे याची माहिती घेवून तो अहवाल पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा.

यावर खुलासा करतांना स. सभासद श्री. मोरेश्वर सावे म्हणाले की, आपण आडवणूकीचे धोरण स्विकारत आहात अशी अडवणूक करणे योग्य नाही. इतर आरोग्य केंद्राशी या आरोग्य केंद्राचा काहीही संबंध नाही. तेंव्हा या आरोग्य केंद्राच्या कर्मचारी वर्गाला मंजुरी देऊन इतर आरोग्य केंद्रासाठी वेगळा ठेवण्यात यावा यावेळी स. सभासदांनी अडवणूकीचे स्पष्टीकरण द्यावे अशी मागणी मा. महापौर यांनी केली. मागील सभेमध्येच संपूर्ण माहिती द्यावी अशी मागणी केली होती.

स. सभादांनी वापरलेले शब्द योग्य नाहीत हे का घडत आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी योग्य वेळी माहिती सादर केली असती तर आज ही परिस्थिती उद्भवली नसती. तेंव्हा आरोग्य वैद्यकीय अधिकार यांच्या पक्षपाती धोरणाची चौकशी करण्याची मागणी स. सभासद, श्री. गाढे यांनी केली. त्यास स. सभासद श्री. भगुरे यांनी आपला पाठींबा दर्शविला.

कार्यालयात नेमणूक करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या वेळी निवड समितीवर महापौर, उपमहापौर व इतर दोन सभासदांचा समावेश करण्यात यावा या सूचनेचे विरोधी पक्षनेते यांनी स्वागत केले.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केला की, औरंगपुरा आणि जवाहर कॉलनी येथील आरोग्य केंद्रे मा. प्रशासकांचे काळात मंजूर झाली आहेत व त्या प्रमाणे आरोग्य केंद्रासाठी वास्तु पण तयार झाल्या आहेत. या आरोग्य केंद्रासाठी स्टाफ नेमणे आवश्यक आहे वरील प्रस्ताव सादर करतांना मा. आयुक्त यांना सर्व शहराचा विचार करून या पूर्वीच्या सभेत सांगितल्याप्रमाणे माहिती सादर केली होती खर्चाच्या अंदाजाच्या अणुषंगाने दोन आरोग्य केंद्रे ज्यांची वास्तु तयार आहेत त्यांच्या स्टाफच्या मंजुरीसाठी मा. महापौरांच्या संमतीने प्रस्ताव ठेवला आहे व तसेच शासनाच्या आदेशानुसार आणखी ५ आरोग्य केंद्रांसाठी सर्व्हेक्षण व प्रपोजल पाठवणि चालू आहे. सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळाल्याप्रमाणे २ जानेवारी, ८९ ला वॉर्ड क्र. १ पासून फिरते रुग्णालयही सुरू करण्यात आले आहे. या फिरत्या रुग्णालयातर्फे दररोज १००/१५० रुग्णांची तपासणी केली जाते. यावर खुलासा करतांना स. सभासद श्री. मोरेश्वर सावे म्हणाले की, आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी फिरते रुग्णालय सुरू करतांना सर्व सभासदांना त्याची कल्पना दिली नाही तसेच कार्यालयातर्फे परवाच इटखेडा पाणीपुरवठा जलकुंभाच्या उद्घाटणाबाबत काढण्यात आलेल्या निमंत्रण पत्रिकेवर संबंधित वॉर्ड नगर सेवकाचे नांव नव्हेते. हा ठराव सभागृहात मांडत असतांनाच आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी राहिलेल्या पाच आरोग्य केंद्रा बाबतचा आवश्यक ठराव मांडला असता तर हा वाद निर्माण झाला नसता असे स. सभासद श्री. गंगाधर गाढे यांनी सुचविले. फिरते रुग्णालय महिन्यापातून एकदा हर्सूल येथे येथे तेंव्हा आरोग्य अधिकारी यांनी या रुग्णालयातर्फे तपासणी करण्यात आलेल्या रुग्णाची यादी दाखल करावी. अशी मागणी स. सदस्य श्री. तुळशीराम भगुरे यांनी केली.

स. सभासद, श्री. अ. रशिदखान (मामू) यांनी सुचविले की, मलेरिया विभागासाइी २०० जणांची मंजुरी मिळालेली आहे तथापी अद्याप पर्यंत या जागा भरलेल्या नाहीत. त्यामुळे या जागांसाठी मिळणारे अनुदान महापालिकेस मिळाले नाही. यावर खुलासा करतांना स. सभासद. श्री. अलफखाँ हुसेनखान म्हणाले की या जागांना मंजुरी मिळाली

असले तरी शासनाच्या शुन्याधारीत अंदाजपत्रक धोरणामुळे महापालिकेस जागा भरता येणार नाहीत. याचा विचार करून आवश्यक असल्यास तसा ठराव ऐनवेळी मंजूर करून संचालक, आरोग्य सेवा यांची मंजुरी मिळवावी. सभागृहात बरेच ठराव पास केले जातात पण ते शासनाकडे पाठविले जात नाहीत मग ठराव पास करून काय कायदा होतो तेंव्हा या जागा भरण्याच्या दृष्टीने विचार व्हावा अशी सूचना स. सभासद श्री. अ. रशिदखाँ (मामू) यांनी केली.

**ठराव क्र. १३५ -** प्रस्तावात निर्दिष्ट केल्याप्रमाणे औरंगपुरा आणि जवाहर कॉलनी येथील आरोग्य केंद्रासाठी निम्न निर्दिष्ट पदे निर्माण करणेस सर्वानुमते मंजरी देण्यात येते.

| अ.क्र. | पदनाम | अर्हता | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी | एम.बी.बी.एस. | ६००-११५० | २ |
| ०२ | मिश्रक | डी. फार्मसी व नोंदणीकृत | २९०-५४० | २ |
| ०३ | ए. एन. एम. | ए. एन. एम. ट्रेनिंग | २९०-५४० | ४ |
| ०४ | नोंदणी लिपिक | सातवी पास | २००-२८० | २ |
| ०५ | ड्रेसर | सातवी पास ड्रेसिंग प्रमाणपत्र | २२०-२८० | २ |
| ०६ | सेवक | - | २००-२८० | ४ |

तसेच यापुर्वी हर्सूल आरोग्य केंद्रासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी वर्ग जिन्सी येथून हर्सूल या मूळ आरोग्य केंद्रासाठी वर्ग करण्यात यावा आणि जिन्सी आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असलेली निम्नलिखीत पदे निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पदनाम | अर्हता | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी | एम. बी.बी.एस. | ६००-११५० | १ |
| ०२ | मिश्रक | डी. फार्मसी व नोंदणीकृत | २९०-५४० | १ |
| ०३ | ए. एन. एम. | ए. एन. एम. ट्रेनिंग | २९०-५४० | १ |
| ०४ | नोंदणी लिपिक | सातवी पास | २००-२८० | १ |
| ०५ | ड्रेसर | सातवी पास ड्रेसिंग प्रमाणपत्र | २२०-२८० | १ |
| ०६ | सेवक | - | २००-२८० | २ |

प्रस्तुतचे आरोग्य केंद्रासाठी येणारा खर्च सार्वजनिक दवाखाने या अंदाजपत्रकातील शिर्षखाली शालेय आरोग्य या अंदाजपत्रकातील रकमेचे स्थलांतर करून ते सहा सार्वजनिक दवाखाने या शिर्षकाखाली अंदाजपत्रकात समाविष्ट करून रक्कम रु. २५००००/- अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव क्र. १३६ - लेखा परिक्षण अहवाल बाबत माहितीचा प्रस्ताव.**

दिनांक : १७/१२/८८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये औरंगाबाद महानगर पालिकेतील लेख्या वरील लेखा परिक्षणाबाबत चर्चा झाली त्यात मुख्य लेखा परिक्षणकांद्वारे करण्यात आलेल्या लेखा परिक्षणा विष्ज्ञयी माहिती व प्रलंबित काळाचे

लेखा परिक्षणाविषयी माहिती व प्रलंबित काळाचे लेखा परिक्षण ह्या बाबत सविस्तर माहिती सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याविषयी मा. सदस्यांनी सूचविले.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या लेख्याचे लेखा परिक्षण मुख्य लेखा परिक्षकांमार्फत करण्यात येते. त्यांना सहाय्यक म्हणून एक लेखाधिकारी व २ लेखा परिक्षण नेमणूक करण्यात आलेली आहे. दि. ०८/१२/८२ पासून ते दि. ३१/०३/१९८८ पर्यंत काढलेले लेखा परिक्षण मुद्दे त्यावर झालेली कार्यवाही बाबत खाली दर्शविल्याप्रमाणे परिस्थिती आहे.

सर्वसाधारण महानगरपालिकेमध्ये जमा होणाऱ्या रकमेचे (जमा बाजू) व खर्च होणाऱ्या रकमेचे (खर्च बाजू) लेखा परिक्षण होते. प्रशासकांचे काळापासून महानगरदपालिकेतर्फे करण्यात येणाऱ्या खर्चाच्यासर्व संचिका प्रथम मुख्य लेखा परिक्षकांमार्फत तपाणीसाठी पाठविण्यांत येत आहेत. त्यामुळे खर्च करण्यापूर्वीच त्यातील उणिवा दूर करता येतात व त्यामुळे खर्चानंतर त्यावर जास्त आक्षेप रहात नाहीत. पर्यायाने लेखा परिक्षण आक्षेप कमी प्रमाणात राहतात.

| अ.क्र. | विभाग | लेखा परिक्षण झालेला कालावधी | काढलेले परिच्छेद | अनुपालन झालेले परिच्छेद | शिल्लक परिच्छेद |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अस्थापना | ८५-८६ | ११ | - | ११ |
| ०२ | लेखा | ८६-८७ | ५६ | १८ | ३८ |
| ०३ | शहर अभियंता | ८४-८५ | २ | - | २ |
| ०४ | सार्वजनिक पाणीपुरवठा | ८४-८५ | ३ | - | ३ |
| ०५ | जलनिस:रण | ८४-८५ | २ | - | २ |
| ०६ | गलिच्छ वस्ती | ८६-८७ | ५ | - | ५ |
| ०७ | यांत्रिकी | ८३-८४ | ७ | - | ७ |
| ०८ | आरोग्य | ८५-८६ | १ | - | १ |
| ०९ | मालमत्ता | ८४-८५ | २ | १ | १ |
| १० | जकात | ८६-८७ | ८८ | २० | ६८ |
| ११ | शिक्षण | ८४-८५ | २ | - | २ |
| १२ | झोन-१ | ८६-८७ | ६ | ५ | १ |
| १३ | झोन-२ | ८६-८७ | ६ | १ | ५ |
| १४ | झोन-३ | ८६-८७ | ११ | १ | १० |
| १५ | झोन-४ | ८६-८७ | १ | १ | - |
| १६ | झोन-५ | ८६-८७ | ३ | - | ३ |
| १७ | झोन-६ | ८६-८७ | ५ | ५ | - |
| १८ | संकिर्ण | ८२-८३ | ५ | - | ५ |
| १९ | विद्युत | ८२-८३ | ३ | २ | १ |
| २० | भांडार | ८२-८३ | ४ | - | ४ |
| २१ | कर आकारणी | ८२-८३ | ४ | - | ४ |
| २२ | वाचनालय | ८५-८६ | १ | - | १ |
| | | | **२२८** | **५७** | **१७१** |

काही विभागाचे लेखा परिक्षण ८३-८४ पासून प्रलंबित आहेत त्यांचे लेखा परिक्षणाचे काम त्वरित हाती घेण्यात येत आहेत व लेखा परिक्षणास आवश्यक असलेली कागदपत्रे पुरविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करण्यात आलेली आहे.

सन्माननीय सदस्यांनी प्रलंबित लेखा परिक्षण पूर्ण करण्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम तयार करून सादर करणे विषयी सूचना दिल्या होत्या त्या प्रमाणे १९८७-८८ साला पर्यंतचे सर्व विभागाचे लेखा परिक्षण पूर्ण करणेचे दृष्टीने योजना तयार करण्यात येत आहे. लेखा परिक्षणास पुरेसा कर्मचारीवर्ग व संबंधित विभागाने कागदपत्रे पुरविल्यास सहकार्य केल्यास सर्व विभागाचे लेखा परिक्षणाचे १९८७-८८ पर्यंतचे काम मार्च, १९९० पूर्वी करण्यात येईल. त्या करिता कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे.

सध्या काम करीत असलेले २ कर्मचारी फारच कमी पडतात तसेच एक वर्षापासून लेखा अधिकारी (ले.प्र.) चे पदही रिक्त आहे. त्यामुळे लेखा परिक्षणांकडे संपूर्ण लक्ष पुरविता येऊ शकले नाही.

लेखा परिक्षणासाठी सध्या जो कर्मचारी उपलब्ध आहे तो कमी आहे, त्या विभागासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग पुरविण्यांत येईल व ३१ मार्च, १९९० पर्यंत प्रलंबित काळाचे परिक्षण पूर्ण करून घेण्यात येईल.

**संवाद -** स. सभासद, श्री मोरेश्वर सावे म्हणाले की, केवळ स्टाफसाठी काम लांबणीवर पडू नये यासाठी निश्चित असा कालावधी व आवश्यक असलेला कर्मचारीवर्ग कसा पुरविण्यात येईल याचा खुलासा करून नंतरच मंजुरी देण्यात यावी. यावर खुलासा करतांना लेखाधिकारी यांनी सुचविले की, लेखा परिक्षणासाठी आवश्यक असलेला कर्मचारीवर्ग, कार्यालयात ज्या विभागात जादा कर्मचारी आहेत त्या विभागातील कर्मचारी या लेखा परिक्षण कार्यासाठी वर्ग करण्यात येईल असे आश्वासन मा. आयुक्त यांनी दिले असून हा कर्मचारीवर्ग मिळाल्यानंतर मार्च, १९९० पर्यंत लेखा परिक्षणाचे काम पूर्ण करण्यात येईल.

**ठराव क्र. १३६ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रलंबित लेखा परिक्षणाचे कार्य पूर्ण करण्यासाइी आवश्यक असलेला कर्मचारीवर्ग या विभागास तात्काळ देण्यात यावा आणि या कर्मचाऱ्यांकडून महापालिकेतील सर्व विभागांचे लेखा परिक्षण मार्च, १९९० पर्यंत विना विलंब पूर्ण करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३७ -** विधी सल्लागांर यांनी प्रस्ताव मांडला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५८ (४८) अन्वये डुकरे पाळण्या संबंधीचे उपविधी इंग्रजीत तयार करण्यात आले आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १३७ -** विरोधी पक्षनेता यांच्या मागणीनुसार तयार करण्यात आलेल्या उपविधीचे मराठी अनुवाद सर्व सभासदांना उपलब्ध करून दिल्या नंतर यावर निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३८ -** विधी सल्लागार यांनी प्रस्ताव सादर केला की, कलम १२७(२) (क) (१४८) (१) ४५४, ४५७ (७) अन्वये पाळीव कुत्र्यांवर आकारावयाचे करासंबंधीचे नियम इंग्रजीत तयार करण्यात आले आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्र.</u> १३८ -** विरोधी पक्षनेता यांच्या मागणीनुसार तयार करण्यात आलेल्या उपविधीचे मराठी अनुवाद सर्व सभासदांना उपलब्ध करून दिल्यानंतर यावर निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १३९ -** विधी सल्लागार यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (२) (फ) १४९ (१) आणि (१७) अन्वये जाहिरातीवर आकारावयाच्या करा संबंधिचे नियम इंग्रजीत तयार करण्यात आले आहेत विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्र.</u> १३९ -** विरोधी पक्षनेता यांच्या मागणीनुसार तयार करण्यात आलेल्या उपविधीचे मराठी अनुवाद सर्व सभासदांना उपलब्ध करून दिल्यानंतर यावर निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १४० -** विधी सल्लागार यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ४५८(२०) (२१) अन्वये परिसराचा विशिष्ट उद्दिष्टा संबंधी करावयाच्या वापरासंबंधीचे उपविधी इंग्रजीत तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्र.</u> १४० -** विरोधी पक्षनेता यांच्या मागणीनुसार तयार करण्यात आलेल्या उपविधींचा मराठी अनुवाद सर्व सभासदांना उपलब्ध करून दिल्यानंतर यावर निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १४० -** विधी सल्लागार यांनी प्रस्ताव सादर केला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८(३२) अन्वये बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावण्यासंबंधीचे उपविधी इंग्रजीत तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्र.</u> १४१ -** विरोधी पक्षनेता यांच्या मागणीनुसार तयार करण्यात आलेल्या उपविधींचे मराठी अनुवाद सर्व सभासदांना उपलब्ध करून दिल्यानंतर यावर निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>*पुरवणी विषय पत्रिका*</u>

दिनांक : १४/०१/८९

**<u>विषय क्र.</u> १४२ -** महाराष्ट्र शासनाने १९८७ मध्ये जाहीर केले होते की, नव्याने अस्तित्वात आलेल्या महानगरपालिकेच्या आर्थिक स्थिती संबंधी विचार करण्याकरिता एक अभ्यास गठ स्थापन करण्यात येईल परंतु अद्याप अशा अभ्यास गटाच्या रिपोर्ट संबंधी काही कळले नाही. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिका शासनास अशी विनंती करते की, नव्याने अस्तित्वात आलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनाने खास आर्थिक मदत देण्या संबंधी विचार करावा म्हणजे महानगरपालिकेच्या विकास कामांना गती मिळेल.

सुचक - श्री. अलफखाँ हुसेनखाँ.
अनुमोदक - श्री. इकबालसिंग गिल.
दिनांक - १०/०१/१९८९.

**संवाद -** स. सभासद, श्री. अलफखाँ हुसेनखान म्हणाले की, महापालिका स्थापनेस पाच वर्ष पूर्ण झाल्यामुळे शासनाकडून मिळणारे अनुदान पूर्णतः बंद झालेले आहे, त्यामुळे महापालिकेची आर्थिक परिस्थिती कमकुवत झाली असून महापालिकेला आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. महाराष्ट्र शासनाने जाहीर केल्याप्रमाणे नव्याने अस्तित्वात आलेल्या महापालिकांना आर्थिक संकटाशी तोंड द्यावे लागत आहे. अशा महानगरपालिकांना शासनाकडून आर्थिक अनुदान मिळणे आवश्यक आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शाळेसाठी भाड्याने घेण्यात आलेल्या ईमारतीच्या भाड्यापोटी शासनाकडून अद्यापही अनुदान वसूल करण्यात आले नाही. या सर्व बाबींचा विचार करता वरील ठराव मंजूर करून शासनाकडे अनुदान मिळण्यासाठी आग्रह धरणे आवश्यक आहे. यावेळी विरोधी पक्ष नेता यांनी पालिके तर्फे तयार करण्यात आलेल्या १०० कोटींच्या योजनेबाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली.

**ठराव -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने १९८७ मध्ये जाहीर केल्यानुसार नव्याने अस्तित्वात आलेल्या महापालिकांच्या आर्थिक परिस्थिती संबंधीच्या अभ्यास गटाचा अहवाल प्राप्त न झाल्यामुळे नव्याने अस्तित्वात आलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाने खास आर्थिक मदत द्यावी अशी विनंती शासनास करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. यासाठी आवश्यकता भासल्यास शासनाकडे शिष्टमंडळही नेण्यात यावे.

**विषय क्र. १४३ -** सिडको नविन औरंगाबादसाठी महाराष्ट्र शासनाने दि. २२/०२/७३ च्या परिपत्रक क्र. टीपीएस/३०७३-डब्ल्यू/रोमन २ च्या अर्बन स्ट्रक्चर प्लॅन म्हणून जे मंजूर झाले आहे. त्यानुसार सिडकोने आम्हाला जवळपास २००० दुकाने गृहीत धरलेली होती. त्यापैकी १००० दुकाने वेगवेगळ्या नेबरहुडमध्ये व उर्वरित १००० दुकाने "टाऊन सेंटर" व तीन मोठ्या सब सेंटर्स मध्ये विभागून देण्यात येणार होती.

परंतु अद्यापही ही कार्यवाही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे सिडकोच्या जनतेला (१लाख) आपल्या गरजा भागवण्यिासाठी जवळपास १० किलोमिटर पेक्षा जास्त अंतरावर खरेदीसाठी जावे लागते. म्हणून सिडकोने आम्ही सुचवितो त्याप्रमाणे १) टाऊन सेंटर मध्ये २) एन-५ एम व एन-६ या १०० फुट रुंद व दोन्हीकडून १८ व १४ मिटर रुंदीचे रोड असलेल्या जागेवर एक आणि ३) एन-११ च्या शरद हॉटेल समोरील शेडला लागून असलेल्या एन-९ च्या संपूर्ण उत्तर हद्दीपर्यंत तिसरे मोठे मार्केट व्हावे.

ज्यामुळे आम्हा सिडको नागरिकांची अडचण दूर होईल व येथील जनतेचा खरेदीसाठी कराव्या लागणारा खर्चाचा भुर्दंड व वेळ वाचेल. त्याचप्रमाणे १३ नेबरहूड मध्ये जी १००० दुकाने विभागून देण्यात येणार हाती. त्याचीही पूर्तता झालेली नाही. तेंव्हा ती दुकाने सुध्दा पूर्ण होऊन मिळावी असा ठराव मंजूर करून त्याचा महापालिकेने पाठपुरावा करावा.

सुचक - श्री. मोतीराम घडमोडे.
अनुमोदक - श्री. सुभाष परदेशी
दिनांक - ११/०१/८९

**<u>ठराव क्र.</u> १४३ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बाब सिडको प्रशासनाची असल्यामुळे वगळण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> १४४ -** सिडको नविन औरंगाबादसाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक २२/०२/१९७३ च्या परिपत्रक क्र. टीसीएस/३०७३-डब्ल्यू/रोमन २ च्या अर्बन स्ट्रक्चर प्लॅन म्हणून जो मंजूर झाले आहे. त्या नुसार सिडकोने आम्हाला लोकसंख्येच्या प्रमाणात १५% प्राथमिक विद्यार्थी व ७.५% माध्यमिक विद्यार्थी गृहीत धरून ५०० विद्यार्थ्यांसाठी ते ७५० विद्यार्थ्यांसाठी एक या प्रमाणात आज अस्तित्वात असलेलया एक लाख लोकवस्तीला २४ ते २५ प्राथमिक शाळा व १२ ते १३ माध्यमिक शाळा (हायस्कूल्स) देणे कायद्याने बंधनकारक आहे.

परंतु अद्यापही ही बाब सिडकोने पूर्ण केलेली नाही. तेंव्हा येत्या जून, ८९ पूर्वीच या शाळा पूर्ण करून द्याव्यात, व हा ठराव मंजूर करून, सिडको कडून या शाळा पूर्ण करून घेण्यासाठी पाठपुरावा करावा.

सुचक - श्री. मोतीराम घडामोडे.
अनुमोदक - श्री. सुभाष परदेशी.
दिनांक - ११/०१/८९.

**<u>ठराव क्र.</u> १४४ -** प्रस्तावात दर्शविलेली बाब सिडको प्रशासनाची असल्यामुळे वगळण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> १४५ -** औरंगाबाद महानगरपालिकेच्या नगररचना विभागची काम नगर रचना खात्यातील सहाय्यक संचालक व नगर रचनाकार हे शासनाच्या आस्थापनेवर काम करीत असून त्यांचा सर्व खर्च महानगरपालिका करीत आहे. इतर महानगरपालिकेप्रमाणेच स्वतःच्या अस्थापनेवर नगर रचनाकार हे शासनाचे आस्थापने वरील पद रद्द करून त्या पदाचे काम महानगरपालिकेच्या अनुभवी उपअभियंता यांच्याकडून घेण्यात यावे. त्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा तर होईलच शिवाय शहराच्या सर्व परिस्थितीची माहिती असलेला अनुभवी व त्वरेने निर्णय घेणारा अधिकारी मिळेल.

सुचक - श्री. अजिज जहागिरदार.
अनुमोदक - श्री. अजिज शेळके.
दिनांक - १९/१२/८८.

**<u>संवाद</u> -** महानगरपालिकेतील नगररचना विभागात काम करणारे सहाय्यक संचालक, व नगररचनाकार यांचे नियुक्ती बाबत शासनाने विशिष्ट असा दंडक घातलेला आहे. महानगरपालिकेतील उपअभियंता हे या पदावर काम करू शकणार नाहीत औरंगाबाद शहर विकास आराखड्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही त्यादृष्टीने विचार करता संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयाकडे परत करणे योग्य होणार नसून विकास आरखडा आणि सार्वजनिक कामात अडथळा निर्माण होईल याचाही विचार करणे आवश्यक आहे. यावर खुलासा करतांना सहाय्यक संचालक, नगररचना यांनी सुचविले की, शासनाने "अ" वर्ग नगरपालिकांना योग्य सल्ला देण्यासाठी नगररचनाकार यांचे पद निर्माण केलेला आहे. महानगरपालिकेत सहाय्यक संचालक, आणि नगररचनाकार ही पदे असावित अशी कायद्यात

तरतूद नाही. यावर खुलासा करतांना स. सभासद श्री. मोरेश्वर सावे व चंद्रकांत खैरे म्हणाले की, अधिकाऱ्यांनी सभागृहाला अपूर्ण माहिती दिली आहे. याबाबत अन्य महापालिकांकडून माहिती मागविण्यात यावी तोपर्यंत या ठरावास मंजुरी देण्यात येऊ नये, या वेळी स. सभासद, श्री अजिज जहागिरदार व सभागृहनेता यांनी ठराव मतदानास टाकण्याची मागणी केली. त्यानुसार मा. महापौरांनी हा प्रश्न मतदानासाठी टाकला.

**<u>ठराव क्र.</u> १४५ -** मा. महापौरांच्या सुचनेप्रमाणे सदर प्रस्तावास हात वर करून मतदान घेण्यात आले असता ३१ x २७ मतांनी ठराव पास झाल्याचे मा. महापोर यांनी घोषित केले.

**<u>विषय क्र.</u> १४६ -** दिल्लीगेट जवळील तलावाला स्वच्छ करून त्यामध्ये शहरामधील नागरीकांसाठी बोटीची सोय करण्यात यावी.

सुचक - श्री. रशिदखान (मामू)
अनुमोदक - श्री. इकबालसिंग गिल.
दिनांक - १३/०१/८९.

**<u>संवाद</u>** स. सभासद, श्री. धनंजय गंगाखेडकर म्हणाले की, दिल्लीगेट तलाव हा परिसर सिडको प्रशासनाचे ताब्यात येत असला तरी माझ्या वॉर्डाशी याचा संबंध येतो दिल्लीगेट तलावात ड्रेनेजचे व नाल्याचे पाणी सोडल्यामुळे या भागात दुर्गंधी निर्माण झाली असून नागरिकांच्या आरोग्यांस धोका निर्माण झाला आहे. तेंव्हा हा तलाव स्वच्छ करण्याचे काम युध्द पातळीवर हाती घेण्यात यावे. यास स. सभासद श्री. केशव सोनवणे व श्री. मोतीराम घडामोडे यांनी अनुमोदन दिले.

**<u>ठराव क्र.</u> १४६ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तलाव स्वच्छ करून त्यामध्ये शहरातील नागरिकांसाठी बोटीची व्यवस्था करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १४७ -** हर्षनगर येथील व शहरातील सर्व नाल्यामध्ये तसेच खाम नदीमध्ये ड्रेनेजचे पाणी सोडण्यात आले आहे. तरी ते घाण पाणी नाले व नदी मध्ये सोडू नये. ज्यामुळे संभाव्य रोगराईस प्रतिबंध होईल.

सुचक - श्री. रशिदखान (मामू)
अनुमोदक - श्री. इकबालसिंग गिल.
दिनांक - १३/०१/८९

**<u>संवाद</u> -** स. सभासद श्री. अलफखाँ हुसेनखान यांनी सूचना मांडली की, शहरातील ड्रेनेज व नाले दुरुस्तीसाठी मंजूर झालेले वीस लाख रुपयांची रक्कम अधिकाऱ्यांनी इतरत्र खर्च केलेली आहे. त्याचा खुलासा करण्यात यावा तसेच शहरातील नाल्यांच्या दुरुस्ती व गवत काढण्याबाबत वेळोवेळी सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देवूनही अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याची तक्रार स. सदस्या सौ. लता दलाल यांनी केली. खुलासा करतांना कार्यकारी अभियंता तथा प्रभारी उपआयुक्त म्हणाले की, मंजूर रकमेपैकी अंदाजे ८/९ लाख रुपये शिल्लक आहेत. त्या रकमेमधून मार्च अखेर पर्यंत

काही नाल्यांचे काम करून घेता येतील व आता पर्यंत झालेला खर्च हा ड्रेनेज लाईन व नाल्या यांच्या देखभालीसाठीच झाला आहे.

**<u>ठराव क्र.</u> १४७ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्षनगर व शहरातील सर्व नाल्यांमध्ये तसेच खामनदी मध्ये सोडण्यात आलेले ड्रेनेजचे पाणी संभाव्य रोगराईस प्रतिबंध होण्याच्या दृष्टीने त्वरित बंद करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.</u> १४८ -** महानगरपालिके अंतर्गत चालणाऱ्या सर्व आरोगय केंद्र वाचनालय इत्यादी ठिकाणचे कामकाज लोकांभिमुख होऊन उत्कृष्टपणे चालण्याच्या दृष्टीने प्रत्येक भागात एक सल्लागार समिती नेमण्यात यावीृ या समितीवर समाजसेवक, डॉक्टर, वकील व शिक्षक आदींची नियुक्ती करण्यात यावी. प्रत्येक दोन वर्षात नविन समिती नियुक्त करावी.

सुचक - श्री. मोहसीन अहेमद.
अनुमोदक - श्री. हाजी मो. हाफिजोद्दीन.
दिनांक - १३/०१/८९.

**<u>संवाद</u> -** स. सभासद, श्री. मोहसीन अहेमद म्हणाले की, महानगरपालिकेने शहरात विविध नागरी सुविधा (आरोग्य केंद्र, वाचनालय) उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांचे कार्य सुबध्द रितीने चालावे ही बाब लक्षात घेवून संबंधित वॉर्डाचे नगरसेवक यांचे अध्यक्षेतेखाली एक सल्लागार समिती नेमणे आवश्यक आहे. यावर खुलासा करतांना स. सदस्या सौ. लता दलाल म्हणाल्या की, सभागृहाने उपसमित्या तयार केलेल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारे सल्लागार समिती नेमण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद नाही.

**<u>ठराव क्र.</u> १४८ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेतर्फे शहरात चालणाऱ्या सर्व आरोग्य केंद्र, वाचनालये इत्यादी ठिकाणचे कामकाज लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने त्या भागातील नागरिकामधून समासेवक, डॉक्टर, वकील व शिक्षक यांचा समावेश असलेली एक सल्लागार समिती नेमण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून संबंधित वॉर्डाचे नगरसेवक काम पाहतील

**<u>विषय क्र.</u> १४९ -** जिन्सीहून उर्दू वाचनाच्या समोरून जात असलेल्या रोडहून उजव्या हाताने श्री. कन्हैय्या नाटेकर व मिर्झा शाहेद बेग यांच्या घराच्या बाजूने निघालेला रोड सरळ नागसेन कॉलनीला मिळातो तो डी. पी. प्लॅन मध्ये ३० फुटाचा आहे. तो प्रत्याक्षात ३० फुटाचा करणे बाबत शिट नं. ५० सि. स. नं. ९५६० पासून ९४२६ पर्यंत रस्ता.

सुचक - श्री. मोहसीन अहेमद.
अनुमोदक - श्री. रशिदखान मामू.
दिनांक -

**<u>ठराव क्र.</u> १४९ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी उर्दू वानालया समोरून उजव्या हाताने श्री. कन्हैय्या नाटेकर व श्री. मिर्झा वाहेद बेग ह्यांचे घराचे बाजूने निघून नागसेन

कॉलनीस मिळणारा सरळ रस्ता (शिट नं. ५०, सिटी सर्व्हे नं. ९५६० पासून ९४२६ पर्यंत) विकास आराखड्याप्रमाणे ३० फुट रुंद करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५० -** चंपा मस्जीद चा मागून अखलाक सेटच्या घरासमोरून जाणाऱ्या रस्त्याला खास गेटहून रोशनगेट रोडला मिळणाऱ्या रोडला मिळविणे यात फक्त एक घर सि. स. नं. ९६८३ काढावे म्हणजे रोशनगेट रोडवरचा ट्राफिक कमी होईल व या रस्त्यावरून समी कॉलनी, सिध्देश्वर कॉलनीला रहदारी होईल.

सुचक - श्री. मोहसीन अहमद.
अनुमोदक - श्री. रशिदखान (मामू)
दिनांक - ०५/१२/८८

**ठराव क्र. १५० -** प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे रोशनगेट रोड वरची रहदारी कमी होणेच्या दृष्टीने चंपा मस्जीदच्या मागून अखलाक शेटच्या घरासमोरून जाणाऱ्या रस्त्याला खास गेटहून रोशनगेटला मिळणाऱ्या रस्तयावरील सि. स. नं. ९६८३ काढून रोशन गेट रोडला मिळविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१ -** चंपा मस्जीद पासून रोशनगेट पर्यंत रुंदीकरण करणे व रोशनगेटच्या दोन्ही बाजूने रस्ते काढणे.

नविन औरंगाबाद सिडको, हडको व औद्योगिक वसाहती मोठ्या प्रमाणात वाढल्याने व या भागांना सदर रस्ताच रहदारीचा असल्याने या रस्त्यावर रहदारी खूपच वाढली आहे. रोशनगेट फारच अरुंद (१२ ते १५ फुट) असल्याने रहदारीस खुपच त्रास होतो व अपघात देखील होतच असतात म्हणून हे काम फारच अगत्याने असल्याने मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. मोहसिन अहमद.
अनुमोदक - श्री. रशिदखान (मामू)
दिनांक - ०५/१२/८८.

**संवाद -** पुरवणी विषय पत्रिकेतील विकासाबाबतचे सर्वच ठराव नगरसेवकांमार्फत मांडण्यात आल्याचे दिसते. विकास विषयक सर्व ठराव नगररचना विभागाकंडून आवश्यक त्या माहितीसह सभागृहापुढे ठेवणे जरूरीचे आहे. तेंव्हा हे विकास विषयक ठराव नगररचना विभागाकडून का मांडण्यात आले नाहीत याचा खुलासा व्हावा. तसेच यापुढे विकास विषयक बाबींचे ठराव नगररचना विभागामार्फत दाखल करण्यात यावेत अशी सूचना स. सभासद श्री. अजिजउल्ला बेग यांनी मांडली.

**ठराव क्र. १५१ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व औरंगाबादेतील सिडको, हडको आणि औद्योगिक वसाहती यामुळे रोशनगेट या रस्त्यावर (१२ ते १५ फुट) फार मोठ्या प्रमाणात रहदारी वाढली असून अपघातही होतात. म्हणून चंपा मस्जीद पासून रोशनगेट पर्यंतचा रस्ता रुंद करण्यास आणि रोशनगेटच्या दोन्ही बाजूने रस्ता काढण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १५२ -** सि. स. नं. ९३२२ व ९३२१ च्या मधील (नागसेन कॉलनी) ३० फुट रुंदीच्या रस्त्यास सरळ पुढे काढून जिनिंग कॅक्टरी समोरून जागत असलेल्या ८० फुट रुंदीच्या रोडला मिळविणे.

सुचक - श्री. मोहसिन अहमद.
अनुमोदक - श्री. रशिदखान (मामू)
दिनांक - ०५/१२/८८

**<u>ठराव क्र.</u> १५२ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागसेन कॉलनी येथील सि. टी. एस. नं. ९३२२ व ९३२१ च्या मधील ३० फुट रुंदीच्या रस्त्यास सरळ पुढे काढून जिनिंग फॅक्टरी समोरून जात असलेल्या ८० फुट रस्त्यास मिळविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १५३ -** सि. स. नं. ९६७२/१२, १३, १४, व १५ समोरच्या रस्त्यावर अतिक्रमण झालेले असल्यामुळे रस्ता फारच अरुंद झालेला आहे. म्हणून ते अतिक्रमण त्वरित काढून रस्त्याचे रुंदीकरण म्हणजे प्लॅनमध्ये जेवढा आहे तेवढा प्रत्यक्षात करून रहदारीस होत असलेला त्रास दूर करणे.

सुचक - श्री. मोहसिन अहमद.
अनुमोदक - श्री. रशिदखान (मामू)
दिनांक - ०५/१२/८८

**<u>ठराव क्र.</u> १५३ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सि. स. नं. ९६७२/ १२, १३, १४ व १५ समोरच्या रस्त्यावर अतिक्रमणे झाल्यामुळे अरुंद झालेला रस्ता रुंद करण्यासाठी या रस्त्यावरील अतिक्रमण त्वरित काढून विकास आराखड्याप्रमाणे प्रत्यक्ष रस्ता तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १५४ -** औरंगाबाद मंजूर विकास योजनेअंतर्गत आरक्षण क्र. ४३ खुली जागाव आरक्षण क्र. ४५ प्राथमिक शाळा आणि खेळाचे मेदान हे आरक्षणातून वगळून निवास क्षेत्रात सामिल करणे संबंधी.

वरील आरक्षणाची जागा ही कैसर कॉलनी व समी कॉलनी या वसाहीतच्या जागेवर आहे. मागील २० वर्षापासून तेथे वसाहत असून आज या आरक्षणाच्या जागेवर पुर्णपणे विकास झालेला असून खुली जागा शिल्लक राहिलेली नाही.

तसेच या वसाहतीस महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, गटार, ड्रेनेज, डांबरी रस्ते इ. सुखसोई पुरविलेले आहेत. सदर आरक्षणाची जागा आता पूर्णपणे विकसित झालेली असून त्या ठिकाणीसर्व सुखसोई पुरविण्यात येत असल्याने व आता तेथे सुमारे १२०० ते १५०० घरांची वसाहत आलेली असल्याने अशा परिस्थितीत सदर आरक्षणाची जागा वगळणे योग्य राहील. करिता मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. मोहसीन अहमद.
अनुमोदक - श्री. अजिज जहागिरदार.

**<u>संवाद</u>** **-** स. सभासद श्री. मोहसीन अहमद म्हणाले की, कैसर कॉलनी, समी कॉलनी या ठिकाणी गेल्या ३० वर्षापासून वसाहत झालेली आहे. या ठिकाणी आवश्यक त्या नागरी सुखसोई पुरविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे विकास आराखड्यात ठेवलेल्या आरक्षणाचा उद्देश साध्य होणार नाही. यावर खुलासा करतांना सहा. संचालक न. र. म्हणाले की, विकास आराखड्यातील अशा बऱ्याच आरक्षणावर वस्ती झालेली आहे. त्यामुळे आरक्षणातील जागा शिल्लक राहिलेली नाही. याचाही विचार करणे आवश्यक आहे.

**<u>ठराव क्र.</u> १५४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी व समी कॉलनी या ठिकाणी गेल्या २० वसाहत असल्यामुळे आरक्षणाच्या जागेवर खुली जागा शिल्लक राहिलेली नाही तसेच या वसाहतींना महापालिके कडून पाणी, लाईट, गटार, ड्रेनेज रस्ते इ. सुखसोई पुरविण्यात आल्यामुळे विकास आराखड्यात आरक्षण क्र. ४३ खुली जागा आणि आरक्षण क्र. ४५ प्राथमिक शाळा व खेळाचे मेदान यासाठी राखून ठेवलेली जागा या आरक्षणातून वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १५५ -** खासगेटकडून आलेल्या रोडला डिसेंट टेलरच्या दुकानाजवळ रोशनगेच्या मेन रोडला जोडणे (सि. स. नं. १२१०४ शिट नं. ४९ ते सिसनं. १६७९ शिट नं. ४८)

कारण सिध्देश्वर कॉलनी नागसेन कॉलनी व समी कॉलनीच्या लोकांना मेनरोडला येण्यासाठी हाच रोड डी.पी. मध्ये देखील मंजूर केलेला आहे व सोयीस्कर आहे. म्हणून तो रोड रहदारीसाठी मोकळा करणे आवश्यक आहे. ह्या रोडची रुंदी ३० फुट आहे. मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्र.</u> १५५ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्देश्वर कॉलनी, नागसेन कॉलनी व समी कॉलनी येथील नागरिकांना मुख्य रस्त्यावर जाणे सोईचे व्हावे या दृष्टीने विकास आराखड्यातील ३० फुट रुंदीच्या रस्ता खास गेटहून आलेल्या रोडला डिसेंट टेलरच्या दुकानाजवळ (सि. स. नं. १२१०४ शि. नं. ४९ ते सिसनं. ९६७९ शि. नं. ४८ रोशनगेटच्या मेनरोडला जोडण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.)

**<u>विषय क्र.</u> १५६ -** दिल्लीगेट ते अजिंठा जकात नाक्यापर्यंतचा राज्य रस्ता या यामानाने अतिशय अरुंद आहे. या रस्त्याने अजिंठा लेणी पाहण्यास जाणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षात घेवून सभागृहाने ठराव पास करून रस्ता रुंद करण्याची शिफारस संबंधित खात्याकडे करावी.

सुचक - श्री. तुळशिराम भगुरे.
अनुमोदक - श्री. डॉ. चेनकरण संचेती.

**<u>ठराव क्र.</u> १५६ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेट ते अजिंठा जकात नाक्या पर्यंतच्या अरुंद रस्तयावरून अजिंठा लेणी पाहण्यास जाणाऱ्या पर्यटकांची रहदारी लक्षात घेता दिल्लीगेट ते अजिंठा नाक्या पर्यंतचा रस्ता रुंद करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या विषयी संबंधी खात्यास शिफारस करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १५७ -** श्रमिक पत्रकारांना घरे बांधण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे जमीन उपलब्ध करून देणे बाबत.

सुचक - श्री. धनंजय गंगाखेडकर.
अनुमोदक - श्री. चंद्रकांत खैरे.
दिनांक - ०८/१२/८८.

**<u>ठराव क्र.</u> १५७ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रमिक पत्रकारांना घरे बांधण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिके तर्फे जमीन उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.</u> १५८ -** भुतपूर्व नगरपरिषद अस्तित्वात असतांना उर्दू भाषिक सदस्यांना उर्दूतून विषयपत्रिका देण्याचा प्रस्ताव होता. तदअनुषंगाने महानगरपालिकेतील सदस्यांना उर्दू भाषेत विषयपत्रिका देण्याचा प्रस्ताव मंजूर करून अविलंब अंमलबजावणी व्हावी.

सुचक - श्री. अयुब जहागिरदार.
अनुमोदक - श्री. स. अ. एकबालोद्दिन.
दिनांक़ -

**<u>संवाद</u> -** स. सदस्या सौ. लता दलाल म्हणाल्या की, महापालिका सभा कामकाज नियमावली नियम ५ अन्वये सभेचे कामकाज मराठीतून किंवा आवश्यकता असल्यास हिंदी / इंग्रजीतून झालेला असा उल्लेख आहे. या नियमावलीत उर्दूचा उल्लेख नाही. तसेच मराठी ही राजभाषा आहे. यावर खुलासा करतांना मा. महापौर म्हणाले की, सभासदांनी भ्रमाचा भोपळा करू नये. प्रश्न फक्त विषयपत्रिका उर्दूत देण्याचा आहे. त्यावर विचार करावयाचा आहे.

विरोधी पक्षनेता श्री. चंद्रकांत खैरे म्हणाले की, सभागृहामध्ये बहुभाषिक सभासद आहेत त्यात बंगाली भाषेचा सभासदही आहे. अशा प्रकारे ठराव मंजूर केल्यास बंगाली भाषेच्या सभासदाचीही वेगळी मागणी येईल अशा प्रकारच्या ठरावावर एकांगी विचार करून चालणार नाही. तेंव्हा हा ठराव रद्द करावा अशी विनंती करण्यात येते. विरोधी पक्षनेता यांच्या विचारास स. सभासद श्री. प्रदिप दत्त, पदिप जैस्वाल, अविनाश कुमावत, मोरेश्वर सावे, सौ. लता दलाल यांनी अनुमोदन दिले स. सभासद श्री. कचरू नवपुते म्हणाले की, मागील नगरपरिषदेचा ठराव अंमलात आणलाच पाहिजे असे नाही.

आपले विचार मांडतांना सभागृह नेता श्री. मनमोहनसिंग ओबेराय म्हणाले की, आम्ही सर्व हिंदूस्थानी आहोत या ठरावावर विनाकारण वाद घालेणे योग्य नाही. तेंव्हा हा ठराव मतदानास टाकावा. सभागृह नेता यांच्या सूचनेस मा. महापौर यांनी अनुमती दिली. स. सभासद श्री. मोरेश्वर सावे व सौ. लता दलाल यांनी नियमावलीची पायामल्ली होत असल्याचाखुलासा केला. आणि याचा निषेध म्हणून विरोधी पक्षाच्या सर्व सभासदांनी ३.३५ वाजता दोन मिनिटांसाठी सभात्याग केला.

**<u>ठराव क्र.</u> १५८ -** मा. महापौर यांचे सूचनेप्रमाणे सदर प्रस्तावास हात वरू करून मतदान घेण्यात आले असता ३१ X ० मतांनी ठराव पास झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय क्र.</u> १५९ -** मुकुंदवाडी वॉर्डमध्ये स्मशानभूमीची कसल्याच प्रकारची व्यवस्था नाही. तेंव्हा मनपाने स्मशान भूमीची जागा नियोजित करून अद्यावत स्मशानभूमीची व्यवस्था करावी.

सुचक - श्री. सुभाष परदेशी.
अनुमोदक - श्री. कचरू नवपूते.
दिनांक - १२/१२/८८.

**<u>संवाद</u> -** स. सभासद श्री. गंगाधर गाढे म्हणाले की, अशा प्रकारे एकाच स्मशानभूमीचा विचार करणे योग्य होणार नाही. रमानगर येथील स्मशानभूमीच्या व्यवस्थेची मागणी वारंवार करूनही त्यासंबंधीचा ठराव सभागृहापुढे का ठेवण्यात येत नाही याचा खुलासा करण्यात यावा.

वार्ड क्र. १ भिमनगर या भागातही स्मशानभूमी नाही त्याबाबत कार्यालयाने काय कार्यवाही केली. या भागात राहणाऱ्या नागरिकांना विद्यापीठ प्रशासनाकडून अंल्यविधी करण्यास मज्जाव करण्यात येत आहे. त्याची विचार व्हावा अशी मागणी स. सभासद श्री. यादव अशोक सायन्ना यांनी केली असता यावर खुलासा करतांना सहाय्यक संचालक, नगररचना म्हणाले की, विद्यापीठ नियमानुसार या परिसरात अंत्यविधी संस्कार करणे योग्य नसल्यामुळे या परिसरालगत करण्यात येणारे अंत्यविधी संस्कार करणे योग्य नसल्यामुळे या परिसरालगत करण्यात येणारे अंत्यविधी संस्कारास प्रतिबंध व्हावा नसता महानगरपालिका प्रशासनावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल अशा आशयाचे पत्र विद्यापीठाकडून मिळाले आहे.

विशिष्ट स्मशानभूमीचा विचार करणे योग्य होणार नाही. तेंव्हा शहरातील अस्तित्वात असलेलया सर्व स्मशानभूमी आणि शहराच्या विस्ताराप्रमाणे आवश्यक असणाऱ्या स्मशानभमींचा एकत्रितरित्या सर्व्हे करून शहरात अद्यायावत अशा स्मशानभूमी कशा उभारता येतील याबाबत विचार करण्याची आवश्यकता असल्याचे स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे यांनी सुचविले.

**<u>ठराव क्र.</u> १५९ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकुंदवाडी वॉर्डामध्ये महानगरपालिकेतर्फे स्मशानभूमीची जागा निश्चित करून अद्ययावर स्मशानभूमीची व्यवस्था करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

### दिनांक २० फेब्रुवारी, १९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

सोमवार, दिनांक २० फेब्रुवारी, १९८९ रोजी दुपारी १.०० वाजता मा. प्रभारी महापौर श्री. तकी हसनखान कासिमखान, (उपमहापौर) यांच्या अध्यक्षतेखाली नगरभूवन (टाऊन हॉल) येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| २) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ३) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ४) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ५) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ६) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ७) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ८) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| ९) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १०) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| ११) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १२) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १३) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १४) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १५) | मा. श्री. नारायण मोहनराव फत्तेलष्कर | --//-- |
| १६) | मा. श्री. जावेद हसन खान कासिमखान | --//-- |
| १७) | मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| १८) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १९) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २०) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २१) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २२) | मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ. हमीदखान | --//-- |
| २३) | श्रीमती दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| २४) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २५) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २६) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २७) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २८) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २९) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३०) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३१) | मा. श्री. फैयाजखान अहमदखान | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३२) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३३) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३४) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | --//-- |
| ३५) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३६) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३७) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३८) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलॉन | --//-- |
| ३९) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४०) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४१) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४२) | मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४३) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | --//-- |
| ४४) | मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | --//-- |
| ४५) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. | --//-- |
| ४६) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ४७) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ४८) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ४९) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५०) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५१) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५२) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५३) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५४) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५५) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

सभेची सुरुवात "वंदेमातरम" या गिताने झाली.

**विषय क्र. १६० -** दिनांक १७ जानेवारी, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद -** स. सभासद, सर्वश्री यादव अशोक सायन्ना, धनंजय गंगाखेडकर, एकबालसिंग गिल, यांनी सुचविले की, औरंगाबाद महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या खेड्यात अद्याप ड्रेनेजची व्यवस्था पूर्ण झालेली नाही, तेंव्हा या भागात ड्रेनेजची व्यवस्था करण्याबाबत कार्यालयाने काय कार्यवाही केली याचा खुलासा करण्यात यावा. वॉर्ड क्र. १ चे नगरसेवक यांनी मागील सभेमध्ये याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

यावर मा. आयुक्त यांनी खुलासा केला की, कार्यालयाने औरंगाबाद शहर आणि नव्याने समाविष्ट झालेल्या खेड्यांमध्ये जलनिसःरणाची व्यवस्था करण्यासाठी ६५ कोटींची योजना तयार केली असून या योजनेनुसार शहर आणि समाविष्ट झालेल्या नविन खेड्यांमध्ये जलनिसःरण व्यवस्था एकत्रितरित्या पूर्ण करण्याचे काम हाती घेण्यात येईल.

स. सभासद श्री. मोतीराम घडमोडे यांनी मागील सभेत ठरल्याप्रमाणे पाणीपुरवठा व जलनिसःरण विभागाचे अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि

महाराष्ट्र विद्युतमंडळाचे अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेचा अहवाल आजच्या सभागृहात ठेवण्यात येईल काय अशी विचारणा केली.

यावर खुलासा करतांना कार्यकारी अभियंता, (पाणीपुरवठा व जलनिस:रण), म्हणाले की, मागील सभेत ठरल्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठीमध्ये फारोळा येथे ७ लाख रुपये खर्चून विद्युत पुरवठ्या बाबत पर्यायाी व्यवस्था करण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येईल. हे काम पूर्ण झाल्यानंतर शहरास होणाऱ्या पाणीपुरठ्यात होणारा व्यत्यय दूर होईल, मात्र काम पूर्ण करण्यास किमान दोन / तीन महिन्यांचा कालावधी लागेल.

आता पर्यंतच्या सभांमध्ये सभागृहास अशा प्रकारची अनेक आश्वासने देण्यात आली आहेत पण त्यांची पूर्तता मात्र अद्याप झालेली नाही. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांनी सभागृहापुढे केलेला खुलासा लेखी स्वरुपात सभासदांना द्यावा अशी विनंती स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली. या प्रश्नाला दुजोरा देतांना विरोधी पक्षनेते म्हणाले की, सिडको भागाचे नगरसेवकांनी अनेक वेळा सभागृहामध्ये पाणी प्रश्नावर चर्चा घडवून आणली आहे. या भागची पाहणी केली असता, येथील नागरिकांना अत्यंत कमी प्रमाणात पाण्याचा पुरवठा होत आहे, आणि अशा प्रकारे येथील नागरिकांना नेहमीच पाण्याची अडचण निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेवून जनतेच्या मागण्यांचे निवदेनांसह महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांच्याकडे पर्यायाी व्यवस्थेबाबत आग्रह धरून या भागातील नागरिकांच्या अडचणी दूर करण्याचे प्रयन्त करण्यात यावेत, आवश्यकता भासल्यास सभासदांचे एक शिष्ट मंडळ कायम करून या कामी विचार विनिमय व प्रत्यक्ष पहाणी करून अडचणी कशा दूर करता येतील, याचा विचार करण्यात यावा.

सन्माननीय सभागृहनेता यांनी सुचविले की, मागील सभेमध्ये ठराव क्रमांक १४५ अन्वये शासनाच्या आस्थपनेवरील सहाय्यक संचालक व नगररचनाकार ही पदे रद्द करून या पदाचे काम महापालिकेच्या अनुभवी उपअभियंता कडून करून घेणेस मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार शासनाच्या आस्थपनेवरील कार्यरत नगररचनाकार, श्री. कुमावत यांना परत शासनाच्या आस्थपनेवर पाठवावे लागेल. परंतु संबंधितांच्या मुलांची शैक्षणिक अडचण लक्षात घेऊन नगररचनाकार श्री. कुमावत यांना काही कालावधी पर्यंत मुदवाढ देण्यात यावी यावर प्रतिक्रीया व्यक्त करतांना स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी सूचविले की, एखादा ठराव मंजूर केल्यानंतर त्यात ३ महिने पर्यंत बदल करता येत नाही, अशी कायद्यात तरतूद आहे. ठराव पास करतांना आमच्या तर्फे आवश्यक ते सहकार्य जरूर मिळेल तेंव्हा सभागृहापुढे इराव मांडतांना तो विचारपूर्वक मांडला जावा. यावर मा. आयुक्तांनी हा ठराव प्रशासकीय असल्याचे प्रस्तुत केले.

**ठराव क्र. १६० -** दिनांक १७ जानेवारी १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## प्रश्नोत्तरे

स. सभासद, श्री. चेतकरण संचेती यांनी सूचविले की, मी कार्यालयाकडे अनेक प्रश्नांबाबत लेखी माहिती मागितली आहे. मागील सभेमध्ये सभागृहात प्रश्नोत्तराच्या तास रू करण्यात येईल., असे आश्वासनही मा. महापौर यांनी दिले आहे. तेंव्हा मी विचारलेल्या प्रश्नांबाबत सभागृहामध्ये उत्तरे देण्यात यावीत. स. सभासदाची मागणी

लक्षात घेऊन मा. प्रभारी महापौर (उपमहापौर) यांनी सभागृहामध्ये प्रश्नोत्तराचे तासासाठी ००.३० मिनिटांचा वेळ दिला.

स. सभासद श्री. चेनकरण संचेती यांनी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तरे देण्याची प्रथा आहे काय असा प्रश्न विचारला. यावर खुलासा करतांना मा. आयुक्त म्हणाले की, सन्माननीय सभासदांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मा. महापौर व मा. आयुक्त यांची संयुक्त चर्चा झ ााल्यानंतर त्या चर्चेअंती सभासदांनी विचारलेल्या प्रश्न योगय असल्यास नियमाप्रमाणे सभागृहापुढे ठेवण्याचे नियम आहेत.

नियमानुसार सभादांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची तरतूद असेल तर आरोगय विभाग व शहरातील सिग्नल्स, ब्लिंकर्स आणि अन्य माहिती विषयी मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अद्याप पर्यंत का देण्यात आली नाहीत. याचा खुलासा करण्यात यावा. यावर खुलासा करतांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सूचविले की, स. सभासदांनी औषधी खरेदीबाबत माहितीची मागणी केली होती. त्यानुसार औषध खरेदी बाबतची सर्व संचिका महानगरपालिका सचिव यांचे कार्यालयात उपलब्ध असून आपणास आवश्यक असेल ती माहिती सचिवांचे कार्यालयात पाहता येईल असे स. सभासदांना लेखी कळविण्यात आले आहे. यावर प्रतिक्रीया व्यक्त करतांना स. सभासद, श्री. चेनकरण संचेती म्हणाले की, अधिकाऱ्याने केलेला खुलासा योग्य वाटत नाही. अधिकाऱ्याने दिलेल्या पत्राचे उत्तरी मला लेखी स्वरुपात माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी मी कार्यालयाकडे केली आहे. तेंव्हा त्यावर कोणत्याही प्रकारचा खुलासा अद्यापपर्यंत मला मिळालेला नाही. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत अशा प्रकारे उडवा-उडवीची उत्तरे देणे हा सभासदांचा मान का अपमान समजावा.

स. सदस्या, श्रीमती लता दलाल यांनी नगररचना व अन्य विभागाकडून मागविलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. तेंव्हा जी मागितलेली माहिती गोपनिय असेल तर ती देवू नये पण जी माहिती गोपिनीय असेल ती देण्यास कुठल्याही प्रकारची हरकत नसावी अशी तक्रार केली.

आरोग्य विभागाकडून मी विचारलेल्या प्रश्नांची लेखी माहिती का देण्यात आली नाही याचा खुलासा करण्यात यावा. संबंधित अधिकाऱ्यांनी बेजबाबदारपणे उत्तरे दिली आहेत अशी तक्रार स. सभासद, डॉ. चेनकरण संचेती यांनी केली.

शासनाने शुन्याधारित अर्थसंकल्पान्वये कर्मचाऱ्यांची भरती करण्यास बैन लावला आहे. ही वस्तुस्थिती असतांनाही महापालिकेमध्ये कर्मचाऱ्यांची भरती चालू आहे. या सबंधीची माहिती अस्थापना विभागाकडून मागविण्यात आली असतांनाही अद्यापपर्यंत कोणताही खुलासा झालेला नाही. तसेच माहे ऑगस्ट नंतर किती कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आणि आतापर्यंत किती चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती झाली याबाबतही माहिती मागवूनही अद्याप मिळाली नाही. याबाबत प्रत्यक्ष संपर्क साधला असतांना योग्य ती उत्तरे मिळाली नाहीत अशी तक्रार स. सदस्या सौ. लता दलाल यांनी केली.

स. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नोत्तराची एक ठराविक पध्दत ठेवावी त्यासाठी सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा आणि सभासदांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी अशी सूचना स. सभासद श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी मांडली.

कार्यालयाने सभा कामकाजाबाबत तयार केलेल्या नियमावलीत सभासदांचे प्रश्नोत्तराबाबत सविस्तर खुलासा असल्याची माहिती विधी सल्लागार यांनी सभागृहात वाचून दाखविली.

सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पुढील सभेत लेखी स्वरुपात देण्याची संबंधित शाखा प्रमुखांनी व्यवस्था करावी असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**विषय क्र. १६१ -** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४ व ४५७ चे पोट कलम (३) पोटभाग (अ) अन्वये भरावयाच्या वैधानिक जागांवर नेमणूका व गुणवत्ता बाबत महानगरपालिका ठराव क्र. ५८८ दि. ०६/११/८७ अन्वये इंग्रजी प्रारुप नियम मंजूर केले असून त्या बाबत स्थानिक वर्तमानपत्रात व शासकीय राजपत्रात प्रकाशित केलेले होते. दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत वा सूचना महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही. मंजूर केलेले प्रारुप नियम इंग्रजीत असल्यामुळे त्याचा मराठी अनुवाद करून सदरील प्रारुप नियम अंतिम मंजुरीस्तव सादर.

**संवाद -** महानगरपालिकेस नियमाप्रमाणे ज्या जागांवर नेमणूका करण्याचे अधिकार प्राप्त आहेत त्या जागांची पात्रता व वेतनश्रेणी ठरविण्याबाबतचे प्रारुप नियमांचा अभ्यास करण्यासाठी उचित समय देण्यात यावा तद्नंतर आगामी सभेत चर्चा करण्यात यावी अशी सूचना स. सभासद, श्री. मोरेश्वर सावे यांनी केली.

**ठराव क्र. १६१ -** सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्तावावर पुढील सभेमध्ये विचार करण्यात यावा.

**विषय क्र. १६२ -** नृत्यझंकार ह्या संस्थेचा अध्यक्ष, श्रीमती मिरा पाऊसकर ह्यांनी त्यांच्या संस्थेच्या इमारतीसाठी शहरात मध्यवस्थतीत व सुरक्षित जागी महानगरपालिकेचा भुखंड देणे बाबत विनंती केली आहे. पूर्वी ह्या संस्थेस अभिनय टॉकीजजवळ महापालिकेची जागा देण्या बाबतच्या प्रस्तावात मंजुरी मिळालेली होती.

तथापि, त्या जागेचा परिसर सदर संस्थेच्या कार्यासाठी पुरेसा सुरक्षित नसल्यामुळे त्यांनी गारखेडा येथील स. न. ५३ मधील महानगरपालिकेच्या दोन एकर जागेपैकी सुमारे ५००० चौ. फुट. जागा संस्थेस देण्याबाबत विनंती केली आहे. स. नं. ५३, गारखेडा मधील दोन एकर जमीन महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली असून सध्या खुली उपलब्ध आहे. तेंव्हा संस्थेचे सार्वजनिक कार्य लक्षात घेवून त्यांना वरील दोन एकर जागेच्या प्रस्तावित रंखांकनातील भू. क्र. ४ संस्थेच्या इमारतीसाठी वार्षिक भाडेपट्ट्याने देण्यास सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**संवाद -** स. सभागृहनेता, रतनकुमार पंडागळे, अजिजउल्ला बेग, रशिद (मामू) यांनी सूचविले की, अशा प्रकारे संस्थेच्या मागणीवर विचार करणे योग्य वाटत नाही. प्रस्तावित संस्थेस महापालिका भुखंड हस्तांतरित केल्यास अशा प्रकारे शहरातील अन्य संस्थांकडूनही भुखंडाची मागणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेंव्हा याही बाबीचा प्रकार्षाने विचार करणे आवश्यक आहे. एकूण जागेच क्षेत्र लक्षात घेता या ठिकाणी महापालिकेला काही कल्याणकारी किंवा विकास योजना राबविता येतील.

**ठराव क्र. १६२ -** शहरात सार्वजनिक काम करणाऱ्या संस्थांना महापालिकेचे भुखंड भाडेपट्ट्याने देण्या बाबतचा धोरणात्मक निर्णय पूर्ण होईपर्यंत सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.</u> १६३ -** श्री. सतिश प्रकाश लाहोट व श्री. रुपचंद्र आहेर यांना शहागंज भागातील महानगरपालिकेची मिळकत न. भु. क्र. १०२१४ (क्षेत्र १०२ चौ. मि.) ३० वर्षासाठी नोंदणीकृत दस्तऐवजाने (दि. १९/०१/१९८८ क्र. ७४०) भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. परंतु त्या जागेत महानगरपालिकेच्या मच्छीबाजार बांधण्याचा प्रस्ताव असल्यामुळे ती जागा अर्जदार ह्यांनी महानगरपालिकेस समर्पित करून पर्यायीी जागा सादिया टॉकिजच्या पूर्वेकडील न. भू.क्र. १३९१६ पैकी (क्षेत्र १०८ चौ. मी. १२ मी. x ९ मी.) देण्याची विनंती केली आहे. सदर जागा विकास योजनेच्या कोणत्याही प्रस्तावाने बाधित होत नसून खुली उपलब्ध आहे. तरी यापूर्वी अर्जदार यांना शहागंज येथील मासळी बाजाराची जागा ज्या अटीवर देण्यात आली होती. त्याच अटीवर उपरोक्त जागा त्यांना ३० वर्षाच्या मुदतीसाठी भाडेपट्ट्याने देण्याबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी सादर.

**<u>संवाद</u> -** प्रस्तावात दर्शविलेली जागा निश्चित अशोक सायन्ना यांनी केली असता मो. सब्जीमंडी येथील खदान म्हणून ओळखली जागणारी जागा आहे असा खुलासा सहाय्यक संचालक नगररचना यांनी केला.

प्रशासकांचे काळामध्ये मो. सब्जीमंडी येथील महापालिकेच्या जागेवर (खदान) भव्य शॉपिंग सेंटर उभारण्याची योजना मंजूर करण्यात आली आहे. तेंव्हा अर्जदारांना या नियोजित शॉपिंग सेंटर मधील जागा देण्यात येऊ नये त्या जागेवर पूर्वी मंजूर झाल्याप्रमाणे शॉपिंग सेंटर बांधण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. अशी सूचना स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे व श्री. गाढे यांनी मांडली स. सभासदांच्या विचारांशी सहमत असल्याचा खुलासा स. सभासद श्री. अजिजउल्ला बेग व श्री. चंद्रकांत खैरे यांनी केला. आणि उभय अर्जदारांना अन्य ठिकाणी दिर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने जागा देण्याचा विचार करण्यात यावा अशी सूचना केली.

**<u>ठराव क्र.</u> १६३ -** मोहल्ला सब्जीमंडी येथील महापालिका मालकीच्या जागेवर नियोजित अशा भव्य व सुशोभित शॉपिंग सेंटरचे बांधकाम पूर्ण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच अर्जदारांना अन्यय दिर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने पर्यायी जागा देण्याचा विचार करण्यात यावा असे ठरले.

**<u>विषय क्र.</u> १६४ -** कार्यालयाने सिल्लेखाना ते मोंढारस्ता विकास योजनेत संपादित जागे वरील बांधकामे पाडली आहेत व रस्ता रुंदीकरणासाठी जागा ताब्यात घेतलेली आहे. या कार्यवाही अंतर्गत विकास योजनेत बाधित होणारे "संतोषी माता मंदिर" हटविण्यात आलेले असून मंदिराची मुळची जागा रस्त्यासाठी ताब्यात घेण्यात आलेली आहे.

या मंदिराचे पुर्नस्थापनेसाठी पर्यायीी भूखंड नगर भूमापन क्र. १२९७८ च्या पूर्व बाजूचाकार्यालयाच्या मालकीचा खालील चतु:सिमेतील १६१'x२०' (४.५ x ६ मी) आकाराचा भूखंड कायम लिजवर द्यावयाचा आहे. चतु:सिमा

१) पूर्व - मनपा मालकीच्या नाक्याची उर्वरित जागा.
२) पश्चिम - न. भू.क्र. १२९७८
३) दक्षिण - ४.५ मी. स्टेट बँक व नंतर ८० फुट डी. पी., रोड
४) उत्तर - मनपा मालकीच्या नाक्याची उर्वरित जागा.

कार्यालयीन आदेश जा.क्र. मनपा/मामअ/५७७/८९, दि. २५/०१/८९ अन्वये सदरच्या भूखंडाचा ताबा संतोषी माता मंदिराचे पुनरस्थापनेसाठी कायम लिजवर देण्यात आला आहे. विचारार्थ सादर.

**<u>संवाद</u>** - मंदिरासाठी देण्यात येणारी १६'X२०' ची जागा कमी पडते. तेंव्हा या मंदिरासाठी किमान १६'X४०' ची जागा देण्याची मागणी स. सभासद श्री. पांडुरंग भिमाजी पैठणकर यांनी केली असता देण्यात येणाऱ्या जागेचा मंदिराशिवाय अन्य कोणत्याही प्रेयोजनार्थ उपयोग करण्यात येणार नाही याची दक्षात घेणे आवश्यक असल्याचा खुलासा स. सभागृह नेता यांनी केला.

या मंदिराला ज्याप्रमाणे पर्यायी जागा देण्यात येणार आहे त्या प्रमाणे इतर धार्मियांच्या धार्मिक कामांनाही (दर्गा, मस्जिद) पर्यायी जागा देण्याची सूना स. सभासद, श्री. सै. हुसेन सै. अहमद यांनी केली.

**<u>ठराव</u> क्र. १६४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना ते मोंढा या विकास योजनेतील रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी बाधित झालेली "संतोषी माता" मंदिराची जागा संपादन करण्यात आल्यामुळे या मंदिराचे पुर्नस्थापनेसाठी नगर भुमापन क्र. १२९८७ या भूखंडाच्या पूर्व बाजूस कार्यालयाच्या मालकीच्या असलेल्या खालील चतुःसिमेतील १६'X२०' (४.५ मिटर X ६ मिटर) आकाराचा भूखंड "संतोषी माता" मंदिरास कायम लिजवर देण्यास सर्वानुमते कार्यात्तर मंजुरी देण्यात येते. भुखंड चतुःसिमा

१) पूर्व - मनपा मालकीच्या नाक्याची उर्वरित जागा.
२) पश्चिम - न. भू.क्र. १२९७८
३) दक्षिण - ४.५ मी. स्टेट बँक व नंतर ८० फुट डी. पी., रोड
४) उत्तर - मनपा मालकीच्या नाक्याची उर्वरित जागा.

**<u>विषय</u> क्र. १६५ -** सिटी चौक व त्या लगतचा परिसर शहराच्या मुख्य भागात असून त्या ठिकाणी जास्त रहदारी आहे. सिटी चौक पोलिस स्टेशन ते मुख्य पोसट ऑफिस ह्या विद्यमान रस्त्याचे रुंदीकरणासाठी मंजूर विकास योजनेमध्ये ५० फुट रुंद रस्त्याची आखणी करण्यात आलेली आहे.

शहागंज ते भडकलगेट कडे जाणारा हा एक मार्ग वाहतूक जवळचा रस्ता आहे. चौक भागात बहुतांशी या रस्त्यावर दुकाने आहेत व रहदारीही जास्त आहे. तसेच गुलमंडी, औरंगपुरा नेहरूभवन इत्यादी ठिकाणी जाण्यास या रस्त्यावरून पर्यायी विद्यमान रस्ते व विकास योजनेतही रस्त्याची आखणी केलेली आहे. सदरच्या रस्त्याच्या विद्यमान सरासरी रुंदी २५ ते ३० फुट उपलब्ध होते, तसेच या रस्त्याचे रुंदीकरणात दोन्ही बाजूने रस्ता रुंदीकरणासाठी आखणी केलेली आहे. सदर रस्त्यावर रहदारी जास्त असल्याने व वरील बाबींचा विचार करता सदरच्या रस्ता रुंदीसाठी भूसंपादन करून रस्ता रुंदीसाठी भूसंपादन करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव</u> क्र. १६५ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटी चौक ते मुख्य पोस्ट ऑफिस ऐवजी शहगंज ते भडकलगेट पर्यंतच्या रस्त्यावर रहदारी जास्त असल्याने या ५०' रुंद मंजूर विकास योजना रस्त्याची आखणी पूर्ण करण्यासाठी बाधित होणाऱ्या मालमत्तांचे भूसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय</u> क्र. १६६ -** मोहल्ला उसमानपुरा येथे सर्व्हे नं. ५४ ह्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत "रमानगर" नावांने ओळखल्या जाणाऱ्या भागात सध्या बौध्द समाज स्मशान भूमी, विरशैव समाज स्मशान भूमी आणि लिंगायत बुरड समाज स्मशान भूमी कार्यरत आहे. या स्मशानभूमीचा वापर संरक्षित करण्याकरिता व या स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण होऊ नये यासाठी खबरदारीच्या उपाय म्हणून सदर स्मशान भूमींच्या जागा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३२१ प्रमाणे घोषित करून त्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे. या करिता आवश्यक असलेली कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद</u> -** या स्मशान भूमीच्या भागात काही घरे बांधण्यात आलेली आहेत अशी माहिती मिळाली आहे. तेंव्हा तयार झालेल्या घरांची जागा सोडून उरलेल्या स्मशान भूमीच्या जागेचा विचार करण्यात यावा असे स. सभासद श्री. चेनकरण संचेती यांनी सुचविले. यावेळी मागील सभेमध्ये शहरातील अस्तित्वात असलेल्या सर्व स्मशानभूमींचा सर्व्हे करून त्या बाबतचा सविस्तर अहवाल सभागृहापुढे ठेवण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे कार्यालयाने अशा प्रकारे सर्व्हे केला आहे काय अशी विचाराणा स. सभासद, श्री. बंडू प्रधान व श्री. मुजिब आलमशा खान यांनी केली.

रमानगर स्मशानभूमीच्या जागे पैकी काही जागा महापालिकेने नागरिकांना लिजवर दिलेली आहे तेंव्हा लिजवर देण्यात आलेली जागा परत घेण्यात यावी तद्नंतरच या बाबींचा विचार करण्यात यावा अशी मागणी स. सभासद श्री. गंगाधर गाढे यांनी केली.

भीमनगर येथील स्मशान भूमिमध्ये प्रेतांची विल्हेवाट लावण्यास मज्जाव होत असल्याची माहिती गेल्या ४-५ सभेपूर्वीच सभागृहास दिली होती. तेंव्हा यावर कार्यालयाने काय कार्यवाही केली याचा खुलासा करण्यात यावा अशी मागणी स. सभासद श्री. यादव अशोक सायन्ना यांनी केली, असता भीमपूरा भागात स्मशानभूमी असणे आवश्यक आहे, पण अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमी बाबत वाद चालू असल्यामुळे महानगरपालिका प्रधिकरणाने जागा संपादन केल्यास या भागासाठी स्मशानभूमी देता येईल असा खुलासा मा. आयुक्त यांनी केला.

स्मशानी हनुमान, भवानी नगर येथील स्मशानभूमी बाबतही अशाच प्रकारचा वाद चालू आहे तेंव्हा विधी विभागाने यात सातत्याने लक्ष घालून हा वाद कसा मिटवता येईल या विषयी उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच या स्मशानभूमीमध्ये बहुसंख्य प्रेतांची विल्हेवाट लावण्यात येत असल्यामुळे या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सुख सोयीयुक्त कशी सुसज्ज स्मशानभूमी शक्य तितक्या लवकर उभारण्याची आवश्यकता आहे, अशी सूचना स. सभासद श्री. डॉ. चेनकरण संचेती व श्री. चंद्रकांत खैरे यांनी केली.

शहरातील स्मशानभूमीवर होत असलेले अतिक्रमण लक्षात घेता सर्व स्मशान भूमींचे संरक्षणार्थ तार कुंपण / संरक्षित भिंत किंव अन्य उपाय योजना करण्यात यावी अशी सूचना स. सभागृहनेता, श्री. प्रकाश जावळे, श्री. मुजिब अलमशा खान यांनी केली.

**<u>ठराव</u> क्र. १६६ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व्हे नं.५४ येथील रमानगर नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागातील बौध्द समाज स्मशानभूमी, विरशैव स्मशानभूमी आणि लिंगायत बुरुड स्मशान भूमीचा वापर संरक्षित करण्याकरिता व या जागेवर अतिक्रमण होऊ नये यावर खबरदारीचा उपाय म्हणून सदर स्मशानभूमीच्या जागा मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम, १९४९चे कलम ३२१ अन्वये घोषित करून त्यांची आवश्यक ती नोंदणीची कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६७ -** पशुधन विकास अधिकारी, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९८९ या वर्षासाठी खालील दर्शविलेल्या दिवशी :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिवस | २६/०१/१९८९ |
| २. | राम नवमी | १४/०४/१९८९ |
| ३. | महावीर जयंती | १८/०४/१९८९ |
| ४. | स्वातंत्र्य दिवस | १५/०८/१९८९ |
| ५. | गणेश चतुर्थी | ०४/०९/१९८९ |
| ६. | महात्मा गांधी जयंती | ०२/१०/१९८९ |

महानगरपालिका हद्दीतील कत्तलखाने (बिफ मटन) बंद ठेवण्यात यावेत.

तरी वरील दर्शविलेल्या दिवशी शहरातील कत्तलखाने बंद ठेवण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन व मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. १६७ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९८९ या वर्षासाठी महापालिका हद्दितील कत्तलखाने (बिफ मटन) खालील दर्शविलेल्या दिवशी बंद ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिवस | २६/०१/१९८९ |
| २. | राम नवमी | १४/०४/१९८९ |
| ३. | महावीर जयंती | १८/०४/१९८९ |
| ४. | स्वातंत्र्य दिवस | १५/०८/१९८९ |
| ५. | गणेश चतुर्थी | ०४/०९/१९८९ |
| ६. | महात्मा गांधी जयंती | ०२/१०/१९८९ |
| ७. | आंबेडकर जयंती | १४/०४/१९८९ |
| ८. | शिवजयंती | ०७/०५/१९८९ |
| ९. | बौध्द पोर्णिमा | २०/०५/८९ |
| १०. | गोकूळ आष्टमी | ऑगस्ट, १९८९ |

## ***ऐनवेळचे विषय***

**ठराव क्र. १६८ -** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, शेड्युल चॅप्टर दोन, नियम १ (ओ) चे अधिन मी, आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद खालील तातडीचा विषय म्हणून दाखल करतो.

औरंगाबाद शहर विकास योजना (मंजूर १९७५) मधील १०० फुट रुंदीचा रोड, पंचायत समिती (गुलशन महल समोरून) पासून जालना रोडपर्यंत (चंपा मस्जिद, जिन्सी भागातून जाणारा) शहराचे वाहतूक आणि प्रशासकीय दृष्टीकोणातून फार

आवश्यक आहे, म्हणून त्यासाठी आवश्यक जमिनीच्या भुसंपादनासाठी सर्वसाधारण सभेची संमती आवश्यक आहे. विचारार्थ सादर.

**<u>ठराव</u> क्र. १६८ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन- १९७५ मध्ये मंजूर झालेल्या औरंगाबाद शहर विकास योजनेनुसार पंचायत समिती (गुलशन महल समोरून) पासून जालना रोड पर्यंतचा (चंपा मस्जिद जिन्सी भागातून जाणारा) १०० फुट रुंदीचा रस्ता शहराचे वाहतूक आणि प्रशासकीय दृष्टीकोनातून रुंद करणे आवश्यक असल्यामुळे सदर रस्त्यात बाधित होणाऱ्या जमिनिची भूसंपादनाची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या १०० फुट रस्त्यात ज्या मालमत्ता धारकांची जमिन बाधित होत आहे अशा नारिकांना सदर जागेचा मोबदला किंवा शक्य असल्यास पर्यायी जागा देण्याची व्यवस्था केली जावी असे सर्वानुमते ठरले.

# <u>*पुरवणी विषयपत्रिका*</u>

मा. प्रभारी महापौर यांनी पुरवणी विषयपत्रिका सभागृहापुढे विचाराथ ठेवताच सभासदांना देण्यात आलेली पुरवणी विषयपत्रिका दिनांक २० फेब्रुवारी, १९८९ च्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम १ (ज) अन्वये या पुरवणी विषय पत्रिकेवर आजच्या सभागृहात चर्चा करता येणार नाही अशी सूचना स. सभासद, श्री. मोरेश्वर सावे यांनी मांडली त्यास स. सभासद, श्री. मोतीराम घडमोडे यांनी अनुमोदन दिले.

दिनांक २०/०२/१९८९ च्या सर्वसाधारण सभेच्या पुरवणी विषयपत्रिकेसाठी दिलेल्या प्रश्नातील "औरंगाबाद शहरास बी ग्रेड" जाहीर करण्याचा ठराव आजच्या विषयपत्रिकेवर घेणे आवश्यक होते. शहरातील ३०,००० शासकीय कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सचिवांनी वगळल्यामुळे स. सभासद, श्री. रशिदखान (मामू) यांनी दहा मिनिटांकरिता सभात्याग केला.

**<u>विषय</u> क्र. १६९ -** महानगरपालिका कार्यालयातील कर्मचाऱ्यांना आजारोत्तर वैद्यकीय भत्ता (मेडिकल रिम्बर्समेंट) दाखल करणेसाठी औरंगाबाद महानगरपालिका आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्याचे शिफारसपत्र वैद्यकीय उपचार पूर्व नोंद असणे आवश्यक केले आहे. महानगरपालिका आरोग्य केंद्रास अद्यावत उपचार पध्दती उपलब्ध नाही तसेच प्रसुती, गंभीर स्वरुपाचा आजार व तात्कालिक अतिदक्षता ह्यासाठी २४ तासिकांची सेवा उपलब्ध नसल्याने कर्मचाऱ्यांना अन्यत्र इलाज खातर जाणे शिवाय पर्याय नसतो. करिता उक्त जाचक अट रद्द करून शासकीय वैद्यकीय दवाखान्यातील नागरी शल्यचिकित्सक किंवा पंजिकृत एम. बी. बी. एस., एम. डी. धन्वंतरीची प्रमाणपत्रे ग्राह्य समजण्यात यावीत अशी सभागृहास विनंती करीत आहे.

सुचक - श्री. तुळशीराम भगुरे.
अनुमोदक - श्री. मिर्झा अलिम बेग.
दिनांक - २४/०१/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १६९ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रसुती, गंभिर स्वरुपाचे आजार आणि तात्कालिक अतिदक्षता ह्यासाठी औरंगाबाद महानगरपाकेच्या आरोग्य केंद्रामध्ये २४

तासिकांचे सेवा उपलब्ध नसल्यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांना आजारोत्तर वैद्यकीय भत्ता (मेडिकल रिंबर्समेंट) दाखल करणेसाठी लाणारे महानगरपालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे शिफारसपत्र व वैद्यकीय उपचार पूर्व नोंद करण्याची अट रद्द करून अशा प्रसंगी शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील नागरी शल्य चिकत्सक, पंजिकृत एम.बी.बी.एस. किंवा. एम. डी. धन्वंतरीची प्रमाणपत्रे कर्मचाऱ्यांनी दाखल केल्यास मी ग्राह्य समजण्यास व उपायुक्त यांनी या प्रकरणी खुलासा करतांना सांगितले की, सध्या अस्तित्वात असलेल्या उपविधी प्रमाणे हे करणे शक्य होणार नाही. त्यासाठी प्रथम उपविधी बदलावे लागतील. त्यावर उपविधी बदलावेत व ठराव मंजुर करण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय</u> क्र. १७० -** हर्सूल गावात आतापर्यंत कुठल्याही भागात ड्रेनेज लाईन टाकलेली नसून हर्सूल गावातील संडासाची समस्या असून, जेणेकरून सहा सात हजार लोकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे हर्सूल गावात ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी. करिता ताबडतोब ठराव मंजूर करून कारवाई करावी.

सुचक - तुळशिराम भगुरे.
अनुमोदक - ॲड. इकबालसिंग गिल.
दिनांक - ०४/०२/१४९८९.

**<u>ठराव</u> क्र. १७० -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूल गावातील नागरीकांना होत असलेला त्रास लक्षात घेऊन या गावात ड्रेनेज लाईन टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरचा विषयी स्थासी समितीचे कक्षेतील असल्याने जननिस:रण अभियंता यांचे मार्फत स्थायी समिती समोर ठेवण्यात यावा.

**<u>विषय</u> क्र. १७१ -** हर्सूल गावाजवळ मागासवर्गीय लोकांची स्मशान भूमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या लगत आहे. तरी सदरील स्मशान भूमी बद्दल गावातील लोकांची अशी मागणी आहे की, ह्या स्मशान भूमीवर गार्डन तयार करून त्यांना स्मशानभूमीसाठी हर्सूल येथील गायरान ज्याचे स. नं. २१६ किंवा २१५ मध्ये ५ एकर जागा देण्यात यावी व गावातील स्मशानभूमी बंद करावी.

सुचक - भगुरे तुळशिराम छगन.
अनुमोदक - ॲड. इकबालसिंग गिल.
दिनांक - ०४/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १७१ -** हर्सूल गावाततील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ अस्तित्वात असलेल्या मागासवर्गीय लोकांच्या स्मशान भुमीचे उद्यानात रुपांतर करावे व हसूरल येथील गायरान सर्व्हे नं. २१५ व २१६ यातील ५ एकर जागा हर्सूल गावातील मागासर्वीय समाजास स्मशान भूमीसाठी द्यावी किंवा कसे या साठी ५ सन्माननिय सभासदांची समिती स्थापन करण्यात आली. त्या समितीत स. सभासद, श्री. मनमोहनसिंग ओबराय, स. सभासद, श्री. अशोक सायन्ना, स. सभासद श्री. बंडू प्रधान, स. सभासद, श्री. चंद्रकांत खैरे व स. सभासद श्री. मोतीराम घडमोडे व स. सभासद, श्री. गंगाधर गाढे यांचा समावेश करण्यात आला. या समितीने मालमत्ता अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून

जागेची पाहणी करून व जनमताची अजमावणी करून एक आठवड्यात आपला अहवाल सादर करावा. म्हणजे त्यावर पुढील बैठकीत निर्णय घेतला जाईल असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय</u> क्र. १७२ -** गजानन कॉलनी, गारखेडा, औरंगाबाद आरक्षण क्र. १६३/१६९ व १७० परिसरातील स. क्र. १७ सिटीएस क्र. १५२९९, शिट क्र. २९६ या परिसराचे मंजूर विकास योजनेतील आरक्षण रद्द करून त्यास निवास उपयोग विभाग म्हणून जाहीर करण्यात यावा. या संदर्भात नगर परिषद, औरंगाबादने ठराव क्र. २९/ दिनांक ०९/०२/१९८२ रोजी नियोजन व विकास समितीने मंजूर केलेल्या असून तेथील रहिवाशांना शहर भूमापन कार्यालयामार्फत पी. आर. कार्ड देण्यात आले आहे. तेथील रहिवाशांनी औरंगाबाद महानगरपालिकेचे करही भरलेले आहे. जिल्हाधिकारी यांचे तर्फे सिटीएस क्र. १५२९९, शिट क्र. २९६ चा विभाग एन. ए. म्हणून जाहीर केला आहे. सुमारे ५०० चे आसपास प्लॉट धारक असून ९०% प्लॅटस्वर बांधकाम झालेले आहे व सुमारे ७०% लोक आपल्या कुटुंबा समवेत सुखी जीवन जगत आहेत. महानगरपालिकेतर्फे शाळेची सोय उपलब्ध करून दिली आहे. या सर्व बाबींचा सर्वकष विचार करून वरील परिसराचे मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण रद्द करण्यास सर्वानुमते मान्यता देऊन संबंधितांना व शासनास शिफारस करण्यात यावी.

सुचक - श्री. रतनकुमार पंडागळे.
अनुमोदक - श्री. बंडू प्रधान.
दिनांक - ०३/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १७२ -** गजानन कॉलनी, गारखेडा येथील आरक्षण क्र. १६३/१६९ व १७० परिसरातील स.क्र.१७ सिटीएस क्र.१५२९९ शिट क्र. २९६ या परिसराचे मंजूर विकास योजनतील आरक्षण रद्द करून ते निवासी उपयोग विभाग म्हणून जाहीर करण्यास सर्वानुमते मुंरीरी देण्यात येते. सदरील परिसरातील आरक्षण रद्द करून तो भाग निवासी म्हणून जाहीर करण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यात यावी.

**<u>विषय</u> क्र. १७३ -** बेगमपुरा (संभाजीनगर) येथे आर्कायालॉजी विभागाचा पाण्याचा हौद (थत्ते हौद) आहे. हा हौद बेगमपुरा (संभाजीनगर) येथील मुख्य रस्त्यावर आहे. या भागातील बहुसख्य जनावरे याच हौदावर पाणी पिण्यासाठी येतात. त्यामुळे नारिकांस व रहदारीस अडथळा निमा्रण होतो. या भागातील जनावरे जास्त असल्यामुळे त्यांची पाणी पिण्याची व्यवस्था खाम नदी येथे पाण्याचा चर (हौद) बांधून दूर करावी.

सुचक - श्री. अजितकुमार शेळके.
अनुमोदक - श्री. इकबालसिंग गिल.

**<u>ठराव</u> क्र. १७३ -** सदरील प्रस्ताव स्थायी समितीच्या अधिकार कक्षेतील असल्यामुळे तो स्थायी समिती पुढे ठेवून त्यावर योगय ती कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय</u> क्र. १७४ -** बेगमपुरा (संभाजीनगर) येथील जुनी शाळा जी सध्या रिकामी असून तेथे तीन मोठे हॉल आहेत. त्या ठिकाणी बेगमपुरा येाील नागरिकांच्या आरोग्याची सुविधा

उपलब्ध व्हावी या दृष्टीने सुसज्ज आरोग्य केंद्र सुरू करण्यात यावे. या आधी आपण शहरातील बेगमपुरा या भागास प्राधान्य देण्याचे मंजूर केले होते.

सुचक - श्री. अजितकुमार शेळके.
अनुमोदक - श्री. बंडू प्रधान.
दिनांक - ०४/०२/१९८९

**<u>ठराव</u> क्र. १७४ -** बेगमपुरा (संभाजीनगर) येथील शाळेत आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील ठिकाणी आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात यावी व या प्रस्तावास शासनाची मंजुरी मिळे पावेतो या जागेत शाळा चालू ठेवावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय</u> क्र. १७५ -** बेगमपुरा (संभाजीनगर) जयसिंगपुरा, घाटी, विद्यापीठ परिसर या भागामध्ये महानगरपालिकेचे अद्यावत वाचनालय सुरू करण्यात यावे. वाचनालयासाठी बेगमपुरा (संभाजीनगर) येथे मध्यवर्ती ठिकाणी जागा उपलब्ध आहे.

सुचक - श्री. अजितकुमार शेळके.
अनुमोदक - श्री. बंडू प्रधान.
दिनांक - ०४/०२/१९८९

**<u>ठराव</u> क्र. १७५ -** बेगमपुरा (संभाजीनगर), जयसिंगपुरा घाटी, विद्यापीठ परिसर या भागात महापालिकेचे अद्ययावत वाचनालय सुरू करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रथम जागेची पाहणी करून आपला अहवाल सभागृहासमोर पुढील बैठकीत सादर करावा व नंतरच त्यावर निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

पुरवणी विषयपत्रिके वरील राहिलेल्या विषयांवर आगामी सभेत चर्चा होईल असे घोषित करून राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपल्याचे मा. महापौर यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**_दिनांक १८ मार्च, १९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा वृत्तांत_**

शनिवार, दिनांक १८ मार्च, १९८९ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर श्री. शांताराम काळे, यांच्या अध्यक्षतेखाली नगरभूवन येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. या सर्वसाधारण सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्ननिर्दिष्ट स. सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. तकी हसन खान कासिम खान | सदस्य |
| २) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | --//-- |
| ३) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ४) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ६) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ७) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ८) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| ९) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| १०) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| ११) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १२) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १३) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १४) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १५) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १६) | मा. श्री. नारायण मोहनराव फत्तेलष्कर | --//-- |
| १७) | मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| १८) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| १९) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २०) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २१) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २२) | मा. श्री. अ. रशीदखान (मामू) अ. हमीदखान | --//-- |
| २३) | श्रीमती दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| २४) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २५) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २६) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २७) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| २८) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| २९) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३०) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३१) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३२) | मा. श्री. फैय्याजखान अहमदखान | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३३) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३४) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |
| ३५) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | --//-- |
| ३६) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३७) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ३८) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ३९) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलॉन | --//-- |
| ४०) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४१) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४२) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४३) | मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४४) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | --//-- |
| ४५) | मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | --//-- |
| ४६) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. | --//-- |
| ४७) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ४८) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ४९) | मा. श्री. गोडसे आनंद जगदिश | --//-- |
| ५०) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार | --//-- |
| ५१) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५२) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५३) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५४) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५५) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५६) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ५७) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

सभेची सुरुवात "वंदेमातरम" या गिताने झाली.

मा. महापौर यांचे सूचनेप्रमाणे महाराष्ट्राचे भूतपूर्व मुख्यमंत्री तथा राजस्थानचे माजी राज्यपाल, थोर स्वातंत्र्य सेनानी, सहकार महर्षि वसंतदादा पाटील, उत्तर प्रदेशचे भूतपूर्व मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री तथा लोकदल "ब" चे अध्यक्ष हेमवंतीनंदन बहुगुणा आणि शिवाजी हायस्कूलचे भूतपूर्व मुख्याध्यापक मु. ज्ञा. भोसले यांचे दुःखद निधनानिमित्त उपरोक्त दिवंगतांना ०.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास विषयक, कामांना गती देण्याचे उद्देशाने महाराष्ट्र शासनातर्फे विशेष अनुदान मंजूर केल्याबद्दल औरंगाबाद महानगरपालिकतर्फे मा. मुख्यमंत्री श्री. शरदचंद्र पवार ह्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात एकमताने मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. १७६ -** दिनांक २० फेब्रुवारी, १९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद -** स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी सुचविले की, दि. २०/०२/८९ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तातील पा. क्र. ३ वर शहराचे पाणी पुरवठ्या संबंधी उपस्थित केलेल्या प्रश्नावर "कार्यकारी अभियंता" यांचेमार्फत अहवाल देण्यात येईल असे आश्वासन दिले होते." अशी नोंद इतिवृत्तात करण्यात यावी. यावर मा. महापौर यांनी इतिवृत्तात आवश्यक दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या.

शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न ज्वलंत आहे. तेंव्हा त्यासाठी पर्यायी व्यवस्था होणे नगरसेवक सांगतील त्याप्रमाणे त्यांच्या वॉर्डातील विहीरींचा गाळ काढणे आणि आवश्यक त्या ठिकाणी हातपंपाची व्यवस्था करण्यात यावी अशी उपसूचना स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी मांडली. शहरात किती विहिरी आहेत. त्यापैकी किती विहिरींचे पाणी पिण्यासाठी योग्य आहे? याची माहिती कार्यालयाकडे उपलब्ध आहे. ती लक्षात घेऊन अशा विहिरी पुन्हा कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सत्वर कार्यवाही करण्याची सूचना स. सभासद श्री. रतनकुमार पंडागळे यांनी केली. यावेळी प्रत्येक वार्डाच्या लोकसंख्येप्रमाणे किमान पाच हातपंप त्या वॉर्डात देण्याची व्यवस्था करण्याची सूचना स. सभासद श्री. केशव सोनवणे यांनी मांडली. शहराला भेउसावणाऱ्या कमी पाणी पुरवठ्यावर उपाय म्हणून कार्यालयातर्फे टँकरद्वारे विनामूल्य पाणी वितरणासाठी वापरात असलेले टँकरवरील वाहन चालक शहरातील हॉटेल मालक आणि अन्य संस्थांना पाणी विकत असल्याचे निदर्शनास आले असल्याची तक्रार स. सदस्या सौ. लता दलाल यांनी केली. शहराच्या पाणी पुरवठा व्यवस्थेबाबत वेळोवेळी चर्चा होऊनही संबंधित अधिकारी यासंबंधी कोणत्याही प्रकारचे संशोधन करीत नाहीत. तेंव्हा शहरी जीवनाशी निगडीत असलेला पाणी पुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करून त्याबाबतचा योग्य प्रस्ताव सभागृहापुढे मांडणे आवश्यक होते. पण त्यादृष्टीने अधिकाऱ्यांमार्फत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसत नाही. असे विचार स. सभासद श्री. नरेंद्र पाटील यांनी व्यक्त केले.

माझ्या वॉर्डात चार-पाच विहिरी आहेत त्यापैकी एका विहिरीत औषध टाकण्यात आले आहे. तेंव्हा अन्य विहिरीतही अशा प्रकारचे औषध टाकण्याची व्यवस्था करण्यात यावी आणि हीच पध्दती इतर वॉर्डातही अवलंबण्यात येऊन त्या त्या वॉर्डातील पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यात यावा अशी सूचना स. सभासद डॉ. चेनकरण संचेती यांनी मांडली. त्यास स. सभासद श्री. नामदेवराव मानकापे यांनी संमती दर्शविली. शहरातील काही बिल्डर्स आणि हॉटेलमालक यांना महापालिकेतर्फे जादा पाणी पुरवठा होत आहे. तो आणि शहरातील विना परवाना नळ कनेक्शन्स याबाबत कडक कार्यवाही केली तर पाण्याचा प्रश्न सुकर होईल असे विचार स. सभासद श्री. प्रकाश जावळे यांनी मांडले.

कार्यकारी अभियंता यांनी शहराचा सर्व्हे करून प्रत्येक वॉर्डात किती विहिरी आहेत त्यापैकी किती विहिरीचे पाणी पिण्यास योग्य आहे याचा अहवाल १५दिवसांच्या आंत दाखल करावा अशी सूचना मा. महापौर यांनी केली.

पाण्याची झळ नागरिकांना उन्हाळ्याच्या दिवसात जास्त प्रमाणात सोसावी लागणार असल्यामुळे पा. क्र. ३ मध्ये नोंद केल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागातर्फे याबाबत काय कार्यवाही झाली याचा अहवाल सभागृहात देण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे, चंद्रकांत खैरे केशव सोनवणे, मोरेश्वर सावे यांनी केली असता शहराच्या पाणी पुरवठ्याबाबत एकूण ११ लाख रुपयांच्या कामाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिका विभाग आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांच्यातर्फे तयार करण्यात आले असून या कामास लवकरच सुरुवात होईल अशी माहिती मिळाल्याचा खुलासा मा.

महापोर यांनी केला व त्यासंबंधीचा लेखी अहवाल लवकरच सादर करण्यात येईल असे आश्वासन कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी सभागृहास दिले.

मा. आयुक्त आणि अधिक्षक अभियंता (परिसर अभियांत्रिकी) यांच्यात पर्यायाी व्यवस्थेबाबत नुकतीच चर्चा झालेली आहे. ही बाबही लक्षात घेण्यासारखी आहे. उन्हाळा जवळ येत आहे. पाण्याचे संभाव्य टंचाईच्या दृष्टीकोणातून सभासदांची सूचना लक्षात घेण्यासारखी आहे. पर्यायी व्यवस्थेबाबत अधिकारी कार्यरत आहेतच. तेंव्हा या पर्यायाी व्यवस्थेबाबत येत्या १५ दिवसांत काय कार्यवाही झाली यांचा अहवाल कार्यकारी अभियंता यांनी दाखल कराव असे मा. महापौर यानी सूचविले.

मागील सभेमध्ये विषय क्र. १६८ अन्वये पंचायत समिती ते जालना रोडपर्यंत १०० फुट रुंदीचा रस्ता तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यावेळी या विषयासंबंधी विशेष अभ्यास करता आला नाही. या रस्ता रुंदीकरणामुळे एकूण १७०० लोक बेघर आणि १००० लोक बेकार होणार आहेत. याशिवाय रस्ता रुंदीकरणामध्ये तीन मस्जीद आणि एका मंदिराची जागा बाधित होत आहे.

या सर्व बाबींचा विचार केला असता १०० फुटाऐवजी ६० फुट रुंदीचा रस्ता तयार करण्यात यावा अशी मागणी स. सभासद श्री. मोहसिंन अहमद यांनी केली. गणेश कॉलनी आलमगीर कॉलनी भागातील नागरिकांना आणि जिल्हाधिकारी व आयुक्त कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना क्रांतीचौक आणि रेल्वेस्टशन या भागात जाण्यासाठी प्रस्तावात दर्शविलेल्या १०० फुटी रोडची अत्यंत आवश्यकता आहे. या रस्ता रुंदीकरणमध्ये ज्या मालमत्ता बाधित होणार आहेत त्यांना पर्यायी जागा देण्याची व्यवस्था करून हा रस्ता पूर्ण करण्यात यावा अशी मागणी स. सभासद श्री. मुजीब आलमशा खान यांनी केली. औरंगाबाद शहरामध्ये फोर्ट वॉलच्या आंत कोणताही १०० फुटाचा रोड अस्तित्वात नाही. या रस्त्यामुळे अनेक नागरिक बेकार होतील आणि त्यासाठी महापालिकेला जादा प्रमाणात आर्थिक झळ सोसावी लागेल. तेंव्हा या सर्व बाबींचा विचार करून तसेच या रस्ता रुंदीकरणाचे कामी पुन्हा पाहणी करून या १०० फुटी रस्त्याबाबत सर्वकष विचार व्हावा असे विचार स. सभासद श्री. स. हुसेन स. अहमद यांनी व्यक्त केले. पंचायत समिती ते जालना रोडपर्यंत ५०/६० फुटाचा मुळ रस्ता अस्तित्वात आहे. या रस्ता रुंदीकरणामध्ये दोन्ही बाजून फक्त १०/१५ फुट जागा संपादन करावी लागते. शहराचा विकास व्हावा ही भावाना लक्षात घेऊन नियोजित १०० फुटाचा रस्ता तयार करण्यात यावा असे विचार स. सदस्य श्री. मुजीब आलमशा खान यांनी मांडले. रस्ता तयार करावयाचे म्हणजे काही मालमत्ता बाधित होणारच पण अशा प्रकारे विकास आराखड्यानुसार नियाजित रस्ते तयार केल्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. या रस्ता रुंदीकरणामध्ये ज्या नागरीकांच्या मालमत्ता संपादन करण्यात येणार आहेत, त्यांना पर्यायाी जागा देण्यात येईल. तेंव्हा ज्या ज्या वॉर्डामधून नियोजित रस्ता तयार करण्यात येणार आहे त्या त्या वॉर्डच्या नगरसेवकांनी संपादित झालेलया मालमत्ता धारकांना पर्यायाी जागेवर योग्य तऱ्हेने बसवणे आवश्यक आहे. शहराचा विकास आणि नागरिकांची गरज लक्षात घेता पंचायत समिती ते जालना रोड हा नियोजित १०० फुटाचा रोड करणे अत्यंत जरूरी आहे. अस विचार मा. उपमहापौर श्री. तकी हसन खान यांनी माडले. सन १९७५ च्या विकासस आरखड्यामध्ये हा रस्ता १०० फुटाचा दाखवण्यात आला आहे. त्यानुसार प्रशासनाने रस्ता बांधणीचे काम हाती घेण्याचे ठरवले आहे. बाधित होणाऱ्या मंदिर, मस्जिदचा विचार करण्यात येईल असा खुलासा मा. आयुक्त यांनी केला. स. सभासदांच्या मागणीनुसार पंचायत समिती ते जालना रोड पर्यंतचा रस्ता १०० फुटाऐवजी ६० फुटांचा करण्यात यावा त्यासाठी आवश्यक तो ठराव सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करून घेता येईल. असे विचार स. सभासद श्री. अजिजउल्ला बेग यांनी

मांडले. पंचायत समिती ते जालना रोड या १०० फुटांच्या रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या मालमत्ता संपादन करण्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद महापालिकेकडे उपलब्ध आहे काय? या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. तेंव्हा मा महापौर, मा. आयुक्त आणि संबंधित वॉर्डाचे नगरसेवक व सहाय्यक संचालक नगर रचना यांनी एकत्र विचार विनिमय करून या भागाची पाहाणी करावी आणि हा रस्ता १०० ऐजवी ६० फुट करता येईल काय? यावर चर्चा करावी. त्यासाठी आवश्यकता भासल्यास नागरिकांचे विचारही लक्षात घ्यावे अशी सूचना स. सभागृहनेता श्री. मनमोहनसिंग ओबेराय यांनी मांडली. पंचायत समिती ते जालना रोड पर्यंतचा १०० फुट रस्ता तयार करण्यास मागील सभेमध्ये मंजुरी मिळालेली आहे. तेंव्हा त्यात कोणताही बदल न करता कार्यवाही करण्यात यावी अशी सूचना स. सभासद श्री. मुजीब आलमशा खान यांनी मांडली असता स. सभासदाच्या विचाराशी सहमत असल्याचा खुलासा विरोधी पक्ष नेता श्री. चंद्रकांत खैरे यांनी केला सभागृहाच्या सूचनेप्रमाणे नियोजित रस्त्याच्या रुंदीत बदल करण्यासाठी नियमाप्रमाणे कार्यवाही केल्यास किमान ४ ते ५ वर्षाचा कालावधी लागेल. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात नियोजित १०० फुटांचा रस्ता तयार करणे प्रशासनाला आवश्यक वाटते. अशी सूचना मा. आयुक्त यांनी केली. यावेही सभागृह नता सूचनेप्रमाणे नियोजित रस्त्याच्या रुंदीमध्ये बदल करण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी सूचना स. नगरसेवक श्री. मोहसिन अहमद यांनी मांडली असता या रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या मालमत्ता धारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. तेव्हा नियोजित रस्त्याचे रुंदीकरणाबाबत विचार करून लवकर निर्णय घेण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. बंडू प्रधान यांनी मांडली मंजूर झालेल्या ठरावाप्रमाणे संपादित मालमत्ता धारकांची पर्यायी व्यवस्था, धार्मिक स्थानांचा पूर्ण विचार होईल याची मा. आयुक्तांनी खबरदारी घ्याची अशी सूचना मा. महापौर यांनी केली. नियोजित १०० फुटांच्या रस्ता रुंदीकरणामध्ये त्या भागातील नगरसेवकांच्या भावनांचा विचार केला पाहिजे. शहराचा विकास करत असतांना सर्व बाबींचा विचार करून मा. आयुक्त, मा. महापौर यांनी कमीत कमी नागरिकांना विकासाची झळ कशी पोहचेल याचा विचार करून १०० फुट ऐवजी ८०/७०/६० फुटांचा रस्ता कसा करता येईल याचा विचार करावा अशी सूचना स. नगरसेवक श्री. गंगाधर गाढे यांनी केली. मागील सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि कर्मचारी (जे साईटवर काम करतात असे) यांचेशी काही कामानिमित्त भेट घेण्याचा प्रयत्न केला असता संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी साईटवर गेलेत असा खुलासा नेहमी करण्यात येतो. त्यामुळे नागरीकांची कामे पार पाडण्यास विलंब होतो अशी सूचना मांडूनही त्यांची नोंद इतिवृत्तात घेण्यात आली नाही. तेंव्हा ही नोंद घेण्यात यावी अशी सूचना स. सभासद श्री. गिरजाराम हाळनोर यांनी मांडली.

आजच्या सभेची विषयपत्रिका आणि इतिवृत्त पत्रकरांना न मिळाल्यामुळे पत्रकारांनी सभेवर बहिष्कार टाकलेला आहे. तेंव्हा या कामी सचिव आणि जनसंपर्क अधिकारी यांचेवर कायदेशीर कार्यवाही व्हावी आणि त्याचा निषेध करणारा ठराव घेण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. अजिज जहागिरदार यांनी मांडली. यांवेळी सचिव आणि जनसंपर्क अधिकारी यांचे निषेधार्थ पाच मिनिटांसाठी सभात्याग करण्यात येत असल्याच्या विरोधी पक्षनेते यांचे सूचनेप्रमाणे विरोधीा पक्षाच्या सर्व सभासदांनी सभात्याग केला.

**<u>ठराव</u> क्र. १७६ -** पाणी पुरवठ्याचा ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी सिडको विभागातील व इतर वॉर्डातील असलेल्या विहिरीचे पाणी नमुने तपासणी. आवश्यक ठिकाणी हातपंपाची व्यवस्था करणे इत्यादी मनपा प्रशासन पातळीवर व शासन पातळीवर गती देण्यात यावी.

शहराचा भविष्यकाळ लक्षात घेता, सभागृहाची चर्चा बहुमताने तसेच मा. शासनाचा निर्णय मनपा प्रशासनाचे मत एकंदरित अजमविण्यात आले असता, पंचायत समिती ते जालना रोड पर्यंतचा १०० फुट रुंदीचा रस्ता तयार करण्याची सभागृह बहुमताने मान्यता देत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. १६० मध्ये फरोळा येथे ७ लाख रुपये खर्चून विद्युत पुरवठ्याबाबत पर्यायी व्यवस्था करण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येईल. हे काम पूर्ण झाल्यानंतर शहरास होणाऱ्या पाणी पुरवठ्यात येणारा व्यत्य दूर होईल. यानंतर या संबंधिच्या कामाबाबतचा अहवाल कार्यकारी अभियंता (पा. पु.) यांचेकडून देण्यात येईल असे आश्वासन दिले. अशी नोंद घेवून दिनांक २०/०२/१९८९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे अतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

# पुरवणी विषयपत्रिका

## दिनांक १८/०२/१९८९

**विषय क्र. १७७ -** औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत शहर बस वाहतुक महानगरपालिके तर्फे सुरू करण्यात येणे बाबत.

सुचक - नरेंद्र या. पाटील.
अनुमोदक - ॲड. इकबालसिंग गिल.
दिनांक - ०७/०२/१९८९.

**ठराव क्र. १७७ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत शहर बस वाहतुक महानगरपालिकेतर्फे सुरू करण्याबाबत मा. आयुक्त यांनी सविस्तर माहिती द्यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १७८ -** औरंगाबाद महानगरपालिका हद्दित असलेले सिडको उपनगर टाऊन महानगरपालिकेत हस्तांतर करणे बाबत.

सुचक - नरेंद्र या. पाटील.
अनुमोदक - ॲड. इकबालसिंग गिल.
दिनांक - ०७/०२/१९८९.

**संवाद -** सिडको वसाहत अस्तित्वात येऊन बारा वर्ष पूर्ण झालेली आहेत. परंतु सिडको प्रशासनाने सिडको रहिवाशांना नागरी सुखसोयी आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. याशिवाय महापालिका अस्तित्वात येऊन सहा वर्ष पूर्ण झालेली आहेत. तेंव्हा सिडको विभाग महापालिकेने ताब्यात घेणे आवश्यक आहे. याविषयी महानगरपालिका आणि सिडको प्रशासन यांच्यात काही बैठका झाल्या असल्यास त्याची माहिती सभागृहास देण्यात याची अशी सूचना स. सभासद श्री. नरेंद्र पाटील यांनी मांडली. यावर खुलासा करतांना स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे म्हणाले की, सभासदांनी विषय मांडतांना त्या विषयीचा संपूर्ण अभ्यास करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे ऐकीव माहितीवर ठराव मांडणे योग्य होणार नाही.

**ठराव क्र. १७८ -** या संबंधाने मा. आयुक्त यांचेकडे एक बैठक झाली. अशा बैठकीत चर्चा करतांना सिडको येथे नागरी सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठी मनपाला रोड,

मार्केट इ. बाबत किती खर्च करावा लागेल? तसेच सिडको वसाहत ताब्यात घेतल्यामुळे म.न.पा. च्या उत्पन्नात किती भर पडेल याबाबत सविस्तर विचार करून मगच सिडको वसाहत मनपाने ताब्यात घ्यावी असे विचार मा. महापौर यांनी मांडले.

**विषय क्र. १७९ -** क्रांतीचौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याभोवती दररोज कारंजेयुक्त फवारे तसेच, पुतळ्याभावेती विद्युत प्रकाशझोत असावा. त्याचप्रमाणे सभोवतालच्या परिसरातील कंपाऊंड भिंतीवर कुठल्याही प्रकारच्या जाहीरात बाजीवर कायम बंदी टाकण्याबाबत.

सुचक - विठ्ठल पेरकर.
अनुमोदक - सुदाम वाघमारे.
दिनांक - १६/०२/१९८९

**संवाद -** क्रांतीचौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे कंपाउंड वॉलवर विविध प्रकारच्या जाहीराती लिहिण्यात आलेल्या आहेत. अशा जाहीरातींमुळे पुतळ्याचे सौंदर्यात बाधा येत आहे. तेंव्हा त्यास प्रतिबंध करण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे यांनी केली. तसेच या चौकात काही अतिक्रमणे झाली आहेत. ती हटविण्यात यावी अशी मागणी स. सभासद श्री. कचरू नवपुते व श्री. विठ्ठल पेरकर यांनी केली.

**ठराव क्र. १७९ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याभोवती दररोज कारंजेयुक्त फवारे तसेच विद्युत प्रकाशझोत आणि सभोवतालच्या परिसरातील कंपाऊंड वर कुठल्याही प्रकारची जाहीरात लावणेस किंवा लिहिण्यास मज्जाव करण्याबाबतची रितसर कारवाई मा. आयुक्त यांनी करावी. असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**विषय क्र. १८० -** गणेश कॉलनी, आलमगिर कॉलनी हा भाग आता पूर्णतः विकसित झाला असून या परिसरात एकही शासकीय दवाखाना नाही. येथील बहुतांशी नागरिक गरीब व मध्यमवर्गीय असल्यामुळे वेळी अवेळी शहरातील दूरवरच्या दवाखान्यात जावे लागते. महानगरपालिकेचा दवाखाना जिन्सी व बायजीपुरा येथे चालू आहे. तो या भागातील जनतेला फारच दूर पडतो.

तरी गणेश कॉलनी भागात सुसज्ज व अद्यावत असे महानगरपालिकेचे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करावे. म्हणजे या भागातील नागरिकांना आरोग्य विषयक सेवा व सुविधा मिळू शकतील.

सुचक - मुजीब खान.
अनुमोदक - स. हुसेन स. अहमद.
दिनांक - १०/०२१९८९.

**ठराव क्र. १८० -** शहराच्या गरजेनुसार तीन चार आरोग्य केंद्रे अंदाजपत्रकाप्रमाणे उघडण्यात येणार आहेत. तेव्हा आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी गणेश कॉलनी भागात आरोगय केंद्राची सोय उपलब्ध करून देण्याबाबतचा सर्व्हे करून त्यासंबंधीचा अहवाल आगामी बैठकीत सादर करावा असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय</u> क्र. १८१ -** गणेश कॉलनी, आलमगिर कॉलनी भागात बहुतांशी सुशिक्षित नागरिक राहत असलेमुळे नोकरी व्यवसायावरून घरी परतल्यानंतर मनोरंजनाचे साधन उपलब्ध नाही.

तरी या परिसरात महानगरपालिकेचे अद्यावत व सुसज्ज असे वाचनालय सुरू करण्यात यावे. जेणेकरून तेथील नागरिकांच्या ज्ञानात भर पडेल.

**<u>संवाद</u> -** चिकलठाणा येथील वाचनालयात लाईट व इतर बाबींची व्यवस्था नाही. ती त्वरित सुरू करण्यात यावी. अशी मागणी स. सभासद श्री. कचरू नवपुते यांनी केली. वाचनालयात उर्दू पुस्तके फारच कमी असतात. तेंव्हा अंदापत्रकामध्ये उर्दू पुस्तकांसाठी स्वतंत्र शिर्षक ठेवावे अशी सूचना स. सभासद श्री. अब्दुल रशीद खान (मामू) यांनी केली.

**<u>ठराव</u> क्र. १८१ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी, आलमगिर कॉलनी भागात अद्यावत व सुसज्ज असे वाचनालय सुरू करण्याची कार्यवाही करावी असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय</u> क्र. १८२ -** गणेश कॉलनी, आलमगिर कॉलनी या भागात आता फार मोठ्या प्रमाणावर वस्ती वाढली असून या भागात एकही शाळा नसलेमुळे येथील नागरिकांना आपल्या लहान मुलांना शहरात दूरवर शाळेत पाठवावे लागते. मुले, मुली लहान असल्यामुळे व शहरात रहदारी अत्यंत वाढलेमुळे लहान मुलांना शहरातील शाळांमध्ये जाण्याचा त्रास होतो.

तरी गणेश कॉलनी, आलमगिर कॉलनी येथे महानगरपालिकेच्या मराठी व उर्दू माध्यमाची शाळा त्वरित सुरू करावी म्हणजे जनतेचा त्रास वाचेल.

सुचक - मुजीब खान
अनुमोदक - स. हुसेन स. अहमद.
दिनांक - १०/०१/१९८९.

**<u>संवाद</u> -** गणेश कॉलनी भागात शाळा सुरू करण्यास आमचा विरोध नाही. पण अशा प्रकारे शाळा सुरू करतांना त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक शिक्षक वर्गाचाही विचार करण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली. गणेश कॉलनी भागातील नागरिकांची मागणी लक्षात घेता येत्या शैक्षणिक वर्षात त्या भागात शाळा सुरू करावी अशी मागणी स. सभासद श्री. मुजीब अलमशा खान यांनी केली.

**<u>ठराव</u> क्र. १८२ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी, आलमगिर कॉलनी येथे महापालिकेच्या मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळा सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय</u> क्र. १८३ -** महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. एससीएस २८८३/५९४/७ अ दिनांक ०६/०६/१९८५ नुसार महाराष्ट्र शासन महानगरपालिका व गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधीकरणाच्या जमीनीवरील १९८० पूर्वी अस्तित्वात असलेल्या घोषित झोपडपट्ट्यांसाठी "झोपडपट्टी श्रेणीवाद योजना" लागू केली. शासनाच्या निर्णयानुसार १९८० च्या मतदार

यादीतील झोपडी धारकांनाच मुलभूत सुविधा (जमीन धा ारणेची हमी वीज, पाणी पुरवठा, संडास, गटारी रस्ते इ. सोयी) उपलब्ध करून दिल्या जातील. म्हणजे याचाच अर्थ १९८० च्या यादी व्यतिरिक्त १९८८ पर्यंत औरंगाबादेत रहिवासात असलेल्या व्यक्तींना (झोपडपट्टी वासीयांना) वरील सुविधा देण्यात येणार नाहीत.

दरम्यानच्या काळात शासनाने मुंबई महानगरपालिका हद्दीतील १९८५ पर्यंत रहिवासास असलेल्या सर्व झोपडपट्टीवासियांना वरील सुविधांचा लाभ देण्यात येईल असे घोषित केले आहे. यास्तव प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ओरंगाबाद शहरात फेब्रु. १९८९ पर्यंत आलेल्या झोपडपट्टी वासीयांना वरील सुविधांचा लाभ देण्यात यावा. सध्या मतदार यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. तशी शिफारस सदर ठराव मंजूर करून, शासनास करण्यात यावी.

सुचक - रतनकुमार पंडागळे.
अनुमोदक - किशोर थोरात.
दिनांक - ०८/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १८३ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १९८८ पूर्वी अस्तित्वात असलेल्या घोषित झोपडपट्टी व्यतिरिक्त १९८८ पर्यंत औरंगाबाद शहरात रहिवासास असलेल्या झोपडपट्टी वासीयांना दि. ०६/०६/१९८५ च्या शासन निर्णयानुसार "झोपडपट्टी श्रेणीवाढ योजना" नुसार मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याची शिफारस महाराष्ट्र शासनास करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय</u> क्र. १८४ -** सुमारे ५ वर्षापूर्वी माजी प्रशासक महानगरपालिका श्री. सतिश त्रिपाठी यांनी औरंगाबादचे सुप्रसिध्द दिवंगत कवी पद्मश्री सिकंदर अली वज्द यांचे स्मरणार्थ, सिटीक्लब समोरील मनपाच्या जमीनीवर रु. १० लक्ष किमतीचे स्मारक वाचनालय, संशोधन केंद्र व अतिथीगृह बांधण्याचा ठराव मंजूर केला होता. या कामासाठी मनपातर्फे ५ लाख देण्याचेही ठरले होते. परंतु जागेबाबत वाद निर्माण झाल्यामुळे आजपर्यंत सदरची योजना प्रलंबित आहे. यापूर्वी मौलाना आझाद तालिमी संघ संस्थेने औरंगाबाद या संघ संस्थेने जागा दिली होती व त्या जागेवर तत्कालीन राज्यपाल चीफ एअर मार्शल मा. श्री. आय. एच. लतीफ यंचे हस्ते शिलान्यासही बसविण्यात आला होता. परंतु काही कारणास्तव वरील स्मारकाचे बांधकाम होऊ शकले नाही. या योजनेसाठी एक समितीही स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशीवरून या स्मारकाचे स्थान शहराबाहेर नसावे व त्यामुळे जागा अद्याप निश्चित होऊ शकली नाही. मनपातर्फे दरवर्षी रु. ५,००,०००/- (पाच लक्ष) ची तरतूद करण्यात येते. परंतु ती खर्च होऊ शकली नाही. या समितीकडेही सुमारे १ लाख ५० हजार रुपये उपलब्ध आहेत.

याद्वारे असा प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेने आपली जागा देण्याचे यापुर्वीच मान्य केले आहे. त्यामुळे शहरातील जमीन व रु. ३ लक्ष ५० हजार जादा मंजूर करून मनपातर्फे सदर प्रकल्प त्वरित राबवून औरंगाबाद सारख्या ऐतिहासिक शहरात एक नामवंत साहित्यिकाचे स्मारक निर्माण करून साहित्य प्रेमींचे आशिर्वाद घ्यावेत. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक - रतनकुमार पंडागळे
अनुमोदक - बंडू प्रधान
दिनांक - १३/०२/८९

**<u>संवाद</u> -** औरंगाबादचे सुप्रसिध्द दिवंगत कवी पद्मश्री सिकंदर अली वज्द यांचे स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या स्मारकांस महापालिकेतर्फे यापूर्वीच देण्यात आलेले रुपये पाच लाख खर्च झाल्यानंतर पुढील रक्कम देण्याबाबत विचार करण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे यांनी केली. अशा प्रकारचे स्मारक उभारण्यसाठी एक ट्रस्ट कायम करण्यात आलेला आहे. तेंव्हा तया ट्रस्टकडेही स्मारकासाठी निधी असणे आवश्क आहे. तेव्हा असा निधी संबंधित ट्रस्टकडे उपलब्ध आहे काय? हे पहावे अशी सूचना स. सभासद श्री. गंगाधर गाढे यांनी केली.

**<u>ठराव</u> क्र. १८४ -** महापालिकेने औरंगाबादचे सुप्रसिध्द दिवंगत कवी पद्मश्री सिकंदर अली वज्द यांचे स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या स्मारकासाठी रु. पांच लाख देण्यात आलेलेच आहेत. तेंव्हा स. सभासदांच्या सूचनेप्रमाणे चर्चा करून काय निर्णय घेता येईल याचा विचार करण्यात यावा असे. मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय</u> क्र. १८५ -** शासनाच्या नियमानुसार मनपाच्या निव्वळ उत्पन्नाच्या ५% तरतूद कमकुवत घटकांच्या कल्याणावर खर्च झाली पाहिजे. दरम्यानच्या काळात सदर खर्च योग्य रितीने व पूर्णपणे होत नसल्याचे व सदर रक्कम खूपच तुटपुंजी असल्या चे शासनाच्या निदर्शनास आल्याने सव्र महानगरपालिकांनी सदर तरतूद ५% वरून १५% करणेबाबत प्रस्ताव विचारार्थ पाठविला होता. नि. प. नी सदर तरतूद १५% केली आहे. त्याच धर्तीवर मनपा औरंगाबादने सदर तरतूद ५% वरून १५% वर न्यावी. जेणेकरून शहरातील गरीब मागासवर्गीय बांधवांना योजनांचा खऱ्या अर्थाने लाभ होईल व त्यांचे जीवनमान उंचावणेच्या दृष्टीने वरील प्रस्ताव मंजूर करावा.

सुचक - रतनकुमार पंडागळे.
अनुमोदक - किशोर थोरात.
दिनांक - १३/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १८५ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील गरीब मागासवर्गीय बांधवांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने शासनाच्या नियमानुसार महापालिकेच्या निव्वळ उत्पन्नाच्या ५% रकमेची तरतूद कमकुवत घटरकांच्या कल्याणावर खर्च करण्यास अपुरी पडत असल्यामुहे सदर तरतूद ५% वरून १५% पर्यंत वाढविण्याची शिफारस महाराष्ट्र शासनाला करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय</u> क्र. १८६ -** महानगरपालिका औरंगाबादचे माजी प्रशासक श्री. एस. शंकर मेनन यांचे कार्यालावधीत (१९८४-८५) औरंगाबाद शहराच्या उत्तरेस हर्सूल तलावाच्या १५० एकरच्या परिसरात "बुध्दीस्ट सेंटर" ची स्थापना करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता. औरंगाबाद शहराचे स्थान वेरूळ व अजिंठ्याच्या मंगळवेढ्यात असल्याने शहरास ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. तसेच ओरंगाबाद हे शैक्षणिक सामजिक व दलित चळवळीचे कंद्र मानले जाते. दलित विद्वान, कार्यकर्ते यांची एक बैठकही बोलाविण्यात आली होती. परंतु सदर प्रस्तावामध्ये मनपा व शासकीय जमीनीवर बुध्दीस्ट सेंटर व गौतम बुध्दांचा १५० फुटी पुतळा उभारण्याचे ठरले होते. तसा पत्रव्यवहारही विविध संस्थांशी केला होता. जपान, थायलंड, देशांही ही संपर्क साधण्यात येणार होता. म्हणून जपानमधील क्योटी येथील "हरण

अभयारण्या" च्या धर्तीवर हर्सूल परिसरात गौतम बुध्दांचा १५० फुटी पुतळा व हरण अभयारण्या निर्मिती प्रस्तावास मान्यता द्यावी ही विनंती.

सुचक - रतनकुमार पंडागळे.
अनुमोदक - नरेंद्र पाटील.

**<u>संवाद</u> -** औरंगाबाद शहराच्या उत्तरेस हसूरल तलाव परिसरात उभारण्यात येणाऱ्या बुध्दीस्ट सेंटरसाठी संपादन करण्यात येणारी १५० एकर जमीन कोणती यांचा खुलासा व्हावा अशी मागणी स. सभासद श्री. तुळशीराम भगुरे यांनी केली असता या बुध्दीस्ट सेंटरसाठी खाजगी मालकीच्या जमीनी व्यतिरिक्त सरकारी मालकीच्या गायरानाची जास्तीत जास्त जमीन कशी उपयोगात आणता येईल याचा मा. आयुक्तांनी विचार करावा असा खुलासा स. सभासद श्री. गंगाधर गाढे यांनी केला.

**<u>ठराव</u> क्र. १८६ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराच्या उत्तरेस हर्सूल तलावाच्या १५० एकराच्या परिसरात जपान मधील क्योटी येथील हरीण अभयारण्याच्या धर्तीवर गौतम बुध्दाचा १५० फुट उंचीचा पुतळा व हरीण अभयारण्य निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय</u> क्र. १८७ -** साईट नं. ९९ श्री. दौलतराव बंडू शिंदे यांच्या मालकीची जागा प्राथमिक शाळेसाठी आरक्षणामध्ये दाखवलेली आहे. ती जागा आरक्षणातून वगळण्यात यावी.

सुचक - ॲड. इकबालसिंग गिल.
अनुमोदक - अय्युब जाहागीरदार.
दिनांक - १४-०२-१९८९.

**<u>संवाद</u> -** साईट क्र. ९९ ची जागा आरक्षणातून वगळण्यापूर्वी सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी करून निर्णय घेण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. चंद्रकांत खैरे, श्री. विठ्ठल पेरकर यांनी केली.

या जागेवर सन- १६६४-६५ मध्ये परवानगी घेऊन घरे बांधून तयार झाली आहेत या दृष्टीने ही जागा आरक्षण कणे् योग्य होणार नाही. शहर विकास आराखड्यात १९७५ मध्ये मंजुरी मिळालेली आहे. असा खुलासा सहा. संचालक नगररचना यांनी केला. यावेळी अशा प्रकारे सन- १९६४ मध्ये माझ्या वॉर्डातील एका घरास बांधकाम परवानगी दिली आहे. त्यानुसार पायाभरणीचे कामही पूर्ण झाले आहे. मग अशा घरास महापालिका आता बांधकाम परवानगी देणार का? अशी विचारणा स. सभासद श्री. आनंद गोडसे यांनी केली.

**<u>ठराव</u> क्र. १८७ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साईन नं. ९९ प्राथमिक शाळेसाठी आरक्षित करण्यात आलेली श्री. दौलत बंडू शिंदे यांची जागा आरक्षणातून वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय</u> क्र. १८८ -** विषय समित्यांची निवडणूक घेणे.
सुचक - रशीद खान (मामू)
अनुमोदक - अजिजउल्ला बेग.
दिनांक - १५/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १८८ -** सदरील प्रस्तावावर पुढील बैइकीत विचार करण्यात येईल असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय</u> क्र. १८९ -** १९८९-९० सालाकरिता प्रत्येक नगरसेवकाला आपापल्या वॉर्डातील मेंटेनन्स व रिपिअर कामाकरिता एक लाख रुपये खर्च करण्याचे अधिकार देणे किंवा कोटा कायम करणे.

सुचक - अजिजउल्ला बेग.
अनुमोदक - डॉ. चेनकरण संचेती.
दिनांक - १५/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १८९ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगरसेवकांना आपआपल्या वॉर्डातील दुरुस्ती व डागडुजीच्या कामांकरिता सन १९८९-९० साठी रक्कम रु. १,००,०००/- ऐवजी प्रत्येकी रुपये २५,०००/- खर्च करण्याचे अधिकार देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय</u> क्र. १९० -** हर्सूल तलावात मासेचा बी टाकून महापालिकेचे उत्पन्न वाढविणे.

सुचक - अजिजउल्ला बेग.
अनुमोदक - डॉ. चेनकरण संचेती.
दिनांक - १५/०२/१९८९.

**<u>संवाद</u> -** हर्सूल व दिल्लीगेट येथील तलावातील मासळीचे विक्री लिलाव पध्दीतने यापूर्वी करण्यात येत होती. त्यावेळी ज्या गुत्तेदाराची नांवे हा लिलाव मंजूर होईल त्या संबंधीतांकडून या तलावात मासळीचे बीज टाकण्याची पध्दत अवलंबीण्यात येत होती. अशा प्रकारे महापालिकेस उत्पन्न मिळत होते. तेंव्हा महापालिकेच्या उत्पन्नता भर पडेल अशा दृष्टीने विचार व्हावा अशी सूचना स. सभासद श्री. अब्दुल रशिद खान (मामू) यांनी केली. यापूर्वीच्या सभेमध्ये दिल्लीगेट तलावाचे पाण्याचे सिडको विभागातून ड्रेनेजचे पाणी सोडले जात असल्याने या तलावातील पाणी खराब झाल्याबाबतचा विषय चर्चेसाठी आला होता. तेंव्हा त्याविषयी झालेल्या निर्णयानुसार महापालिकेतर्फे सिडको प्रशासनाकडे काय पत्रव्यवहार झाला याचा खुलासा करण्यात यावा अशी मागणी स. सभासद श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी केली. यावर खुलासा करतांना कार्यकारी अभियंता (पा.पु.) म्हणाले की, दिल्लीगेट तलावात सिडको प्रशासनातर्फे ड्रेनेजचे पाणी जात असल्याने या तलावातील पाणी मासळीसाठी योग्य नाही. मागील सभेतील चर्चेनुसार याबाबत सिडको प्रशासनाशी पत्रव्यवहार करून ड्रेनेजचे पाणी दिल्लीगेट तलावाव्यतिरिक्त अन्यत्र सोडण्याची व्यवस्था करण्याबाबत सूचना करण्यात आली आहे. याबाब सिडको प्रशासनाकडून अद्याप कोणताही खुलासा प्राप्त झालेला नाही. सदरील बाबतीत उचित कर्यवाही करण्यात येईल.

**<u>ठराव</u> क्र. १९० -** हर्सूल तलावात मत्स्यबीज न टाकता दिल्लीगेट येथील तलावाचे पाणी स्वच्छ करून त्या ठिकाणी मत्स्यबीज टाकण्याबाबत विचार करण्यात येईल असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>ठराव</u> क्र. १९१ -** आरोग्य विभागाचे व जनतेचे सोयीकरिता आरेगय विभागामध्ये उपसंचालक या पदाची निर्मिती करू हे पद प्रतिनियुक्तीवर भरण्यात यावे.

सुचक - अजिजउल्ला बेग.
अनुमोदक - डॉ. चेनकरण संचेती.
दिनांक - १५/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १९१ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य विभागाकरिता उपसंचालक पदाचे निर्मितीबाबत मा. आयुक्त यांचेशी चर्चा करून सदरील प्रस्तावावार विचार करण्यात येईल असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय</u> क्र. १९२ -** वॉर्ड क्र. ३५ मधील नागसेन कॉलनी लगत सहकारी जिनिंगच्या बाजूस मोकळ्या जागेत पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे, जेणेकरून या भागात राहात असलेल्या अंदाजे १० ते १५ हजार लोकवस्तींची पिण्याच्या पाण्याची सोय होईल व पाण्याचा प्रश्न सुटेल. सदर जागा ही उंच ठिकाणी असल्याने टाकी बांधण्यासाठी योग्य आहे. तरी सदर प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

सुचक - मोहसीन अहमद.
अनुमोदक - तुळशीराम भगुरे.
दिनांक - १५/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १९२ -** सदरील प्रस्ताव स्थायी समितीच्या अधिकारात येत असल्यामुहे याबाबत स्थायी समितीमध्ये निर्णय घेण्यात यावा.

**<u>विषय</u> क्र. १९३ -** वॉर्ड क्र. ३५ मधील न्यु. कॉलनी रोशनगेट शीट व सि. टी. स. नं. ३२९ ६०" x ६०" चा प्लॉट ही सरकारी जागा राणी लक्ष्मीबाई महिला कल्याण मंडळास भाड्याने देणे कारण या संस्थेत निराधार महिलांसाइी विनामुल्य टेलरींग, एम्बा्रयडरी कोर्स शिकवले जाते, ही संस्था सरकारमान्य असून या भागात अन्य कोणतीही संस्था नाही. तेव्हा सदर जागा भाड्याने देण्यात यावी जेणेकरून निराधार महिलांना या संस्थेद्वारे शिकवण दिले जाईल.

सुचक - मोहसीन अहमद.
अनुमोदक - तुळशीराम भगुरे.

**<u>ठराव</u> क्र. १९३ -** प्रस्तावात दर्शविलेले प्रकरण मा. आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १९४ -** औरंगाबाद शहराचा व्याप बघता फारच वाढलेला आहे. त्यासाठी सफाई कामगार अपुरे आहेत. तेंव्हा सफाई कामगारांची त्वरित भरती करावी.

सुचक - बंडू प्रधान.
अनुमोदक - किशोर थोरात.
दिनांक - १५/०२/१९८९.

**ठराव क्र. १९४ -** सदरील प्रकरणी मा. आयुक्त यांनी विचार करुन योग्य तो निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १९५ -** रेल्वेस्टेशन ते भडकलगेट मोठ्या रस्त्यावर व आर. टी. ओ. ऑफिसच्या शेजारी असलेल्या सिटी. स. नं. १९१५२ च्या पहिल्या विकास योजना नकाशात आर २ झोन दर्शविले आहे. व फक्त या पहिला आर-२ झोन केले गेले आहे. त्यामुहे सदरील पट्टीत असलेल्या लोकांची घरे बांधण्याची गैरसोय होत आहे. तरी ह्या पट्टीचा झोन आर-२ ते आर -१ करण्यासंबंधी महाराष्ट्र शासनास मंजूर ठराव द्वारा शिफारस करण्यात यावी.

सुचक - गंगाखेडकर धनंयज.
अनुमोदक - मोहसीन अहमद.

**ठराव क्र. १९५ -** शहरात अशाच प्रकारचा प्रश्न काही भागात निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. तेंव्हा शहर विकास आराखडा मंजुरीचे वेळी प्रसतावातील प्रकरणाचा अन्य प्रकरणा बरोबर विचार करण्यात यावा असे ठरले.

**विषय क्र. १९६ -** जियाओद्दीन लेआऊटच्या महानगरपालिकेच्या नावांने असलेल्या खुली जागेवरचे अतिक्रमण हटविण्यासाठी दि.३०/०९/१९८८ रोजी मा. उपायुक्त यांचे आदेश निघूनही या संबंधित अधिकाऱ्याने जाणूनबजून कार्यवाही केली नाही व तब्बल तीन महिन्यानंतर अतिक्रमण केलेल्या माणसाने स्थगन आदेश प्राप्त केले. ह्यास पूर्णपणे संबंधीत अधिकारी जबाबदार आहे तरी त्याच्या विरुध्द र्कावाही होणे आवश्यक आहे.

जागेचा सि. एस. न. ९६७२/११ शीट नं. ४८ आहे. असे प्रकरण या शहरात घडत आहे. तरी असे कधीच होऊ नये म्हणून सदर प्रस्ताव सादर.

सुचक - मोहसीन अहमद.
अनुमोदक - तुळशीराम भगुरे.
दिनांक - १५/०२/१९८९.

**ठराव क्र. १९६ -** प्रस्तावात दर्शविलेली बाब प्रशासकीय स्वरुपाची असल्याने मा. आयुक्त यांचेशी चर्चा प्रत्यक्ष करून मार्ग काढावा असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**विषय क्र. १९७ -** नागसेन कॉलनी मोहल्ला कैसर कॉलनी येथील लेआऊट मधील सि.स.नं. ९३०५ या खुल्या जागेवर काही खाजगी व्यक्तींची नांवे पी. आर. कार्डला लावण्यात आली आहे. वास्तविक पाहता ले-आऊट मधील खुल्या जागेवर महानगरपालिकेची

मालकी ठरते. त्यामुळे ही खुली जागा महानगरपालिकेच्या नांवे लावण्याची कार्यवाही करण्यात यावी आणि इतर खाजगी मालकांची नांवे कमी करण्याबाबत संबंधीतांना आदेश द्यावेत तसेच या खुल्या जागेवर महानगरपालिकेने कंपाऊंड बांधून गार्डन विकास करावा.

सुचक - मुजीब खान.
अनुमोदक - स. अ. एकबालोद्दिन
दिनांक - १६/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १९७ -** मा. आयुक्त यांनी सदरील प्रकरणी योग्य ती चौकशी करून कार्यवाही करावी. असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय</u> क्र. १९८ -** बेगमपुरा, हनुमान टेकडी सुशोभित, सुंदर करावी व टेकडीवर जाण्यास पायऱ्या बनविणेवर हिल पॉईंट तयार करणे बाबत.

सुचक - चंद्रकांत खैरे.
अनुमोदक - प्रभाकर विधाते.
दिनांक - १६/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १९८ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपुरा, हुनमान टेकडी सुशोभित व सुंदर करण्यासाठी अणि टेकडीवर जाण्यास पायऱ्या बांधून हिल पॉईंट तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देयात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय</u> क्र. १९९ -** हनुमान टेकडी (बेगमपुरा) ते दुसऱ्या बाजूच्या टेकडी पर्यंतचा भाग सुंदर बनवून तिथे असंख्य झाडी लावावी व त्या टेकडीवर क्रेन (पाळणा) बसवावा त्यामुळे पर्यटक व इतर जनतेस त्या सुंदर डोंगराळ भागाचा उपभोग घेता येईल.

सुचक - प्रभाकर विधाते.
अनुमोदक - नारायण फत्तेलष्कर.
दिनांक - १६/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १९९ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हनुमान टेकडी (बेगमपुरा) ते दुसऱ्या बाजूच्या टेकडीपर्यंतचा भाग सुंदर बनवून त्या ठिकाणी वृक्षारोपन योजना राबवून आणि पर्यटक व इतर जनतेस त्या सुंदर डोंगराळ भागाचा उपभोग घेता येईल या दृष्टीने टेकडीवर क्रेन बसविण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय</u> क्र. २०० -** कोकणवाडी वॉर्डातील सार्वजनिक बांधकाम कार्यालयाशेजारून एक रस्ता केसरसिंगपुरा पर्यंत जातो. तेथे रस्त्यामध्येच एक गॅरेज आहे ते गॅरेज हटवून रस्ता नागरीकांसाठी खुला करण्याबाबत.

सुचक - मधुकर शिंदे.
अनुमोदक - गजानन बारवाल.
दिनांक - १६/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. २०० -** कोकणवाडी येथील सार्वजनिक बांधकाम कार्यालयासमोरून केसरसिंगपुरा पर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर असलेले गॅरेज बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणी मा. आयुक्त यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय</u> क्र. २०१ -** निर्गमन शुल्क ४/- रुपयांवरून १०/- रुपये करणेबाबत (एस्कॉट)

सुचक - वाघमारे सुदाम
अनुमोदक - विठ्ठल कोंडाजी पेरकर.
**<u>ठराव</u> क्र. २०१ -** प्रशासकीय बाब असल्यामुळे सदरील प्रकरणी मा. आयुक्त यांनी सभागृहास अहवाल सादर करावा असे मा. महापौर यांनी घोषित केले.

**<u>विषय</u> क्र. २०२ -** जुनाबाजार माळीवाडा - बारुदनगर नाल्याच्या वर समाज मंदिर बाधण्याबाबत.

सुचक - चंद्रकांत खैरे.
अनमोदक - श्री. विठ्ठल पेरकर.
दिनांक - १६/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. १९७ -** सदरील प्रकरण स्थायी समितीचे अखत्यारीत असल्यामुहे याबाबत स्थायी समितीमध्ये निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**<u>विषय</u> क्र. २०३ -** ६ इंची ड्रेनेज लाईन बदलून १२ इंची करणे बाबत.
मो. इंदिरानगर वॉर्ड क्र. ३७ मधील ड्रेनेज लाईन गेल्या तीन वर्षापूर्वी टाकलेली आहे. परंतु ड्रेनेज लाईन मात्र अद्याप चालू नाही आणि अशा मोठ्या वॉर्डात सार्वजनिक संडास सुध्दा बांधलेले नाहीत. त्यामुळे पूर्ण वॉर्डात ड्रेनेज लाईन बंद असल्यामुळे नागरिकांची अडचण होत आहे त्याकरिता ६ इंची लाईन काढून जर १२ इंची लाईन नवीन टाकली तर नागरिकांची गैरसोय दूर होईल.
सुचक - श्री. शंकरराव मगर.
अनुमोदक - श्री. शिवाजी कवडे.
दिनांक - १६/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. २०३ -** सदरील प्रकरण स्थायी समितीचे अखत्यारीत असल्यामुळे याबाबत स्थायी समितीमध्ये निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**<u>विषय</u> क्र. २०४ -** शिवाजी कॉलनी (मुकुंदवाडी) येथे पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे तेथील जनतेला पाण्याचा अत्यंत त्रास होतो. करिता मनपाने शिवाजी कॉलनी येथे जलवाहिनी टाकावी.
सुचक - श्री. सुभाष परदेशी.
अनुमोदक - श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर.
दिनांक - १६/०२/१९८९.

**<u>ठराव</u> क्र. २०४ -** सदरील प्रकरण स्थायी समितीचे अखत्यारीत असल्यामुळे याबाबत स्थायी समितीमध्ये निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**<u>विषय</u> क्र. २०५ -** मुकुंदवाडी मधील शिवाजी कॉलनी, संजयनगर या भागात रोडची कसल्याच प्रकारची व्यवस्था नाही. तेंव्हा मनपाने वरील भागात रोड करून द्यावेत.

सुचक - श्री. सुभाष परदेशी.
अनुमोदक - श्री. चंद्रकांत खैरे.
दिनांक - १६/०२/१९८९

**<u>ठराव</u> क्र. २०५ -** सदरील प्रकरण स्थायी समितीचे अखतयारित असल्यामुळे याबाबत स्थायी समितीमध्ये निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**<u>विषय</u> क्र. २०६ -** महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या कामाच्या वेळा पूर्वीप्रमाणेच दोन शिफ्टमध्ये सकाळी ५.३० ते १०.३० व दुपारी २.३० ते ५.३० पर्यंत ठेवण्यात यावी. कारण त्यामुळे शहर जास्त स्वच्छ व सुंदर ठेवण्याबाबत मदत होईल.

सुचक - श्री. चंद्रकांत खैर.
अनुमोदक - सौ. लता दलाल.
दिनांक - १६/०२/१९८९.

**<u>संवाद</u> -** सफाई कामगारांच्या पूर्वीच्या वेळेत माजी प्रशासकांनी बदल केलेला आहे. दोन शिफ्टमध्ये सफाई कामगारांचे काम ठेवल्यास या कामगारांना वैयक्तिक कामामध्ये अडचणी निर्माण होतात. तेंव्हा सफाई कामगारांच्या वेहेत बदल करण्यास स. सभासद श्री. रतन पंडागळे यांनी विरोध दर्शविला. त्यास स. सभासद श्री. स. अ. एकबालोद्दिन यांनी अनुमोदन दिले.

कार्यालयीन अस्थापनेवर असलेले बहुतांशी सफाई कामगार स्वत: सफाईचे काम न करता त्यांचे जागेवर सफाई कामगारांचे रोजंदारीवरील अनधिकृत अन्य मजूर कामाला लावून कामे करून घेतली जातात. तेंव्हा महापालिका अस्थापनेवर असलेल्या सर्व सफाई कामगारांना ओळखपत्रे द्यावीत अशी सूचना स. सभासद श्री. धनंजय गंगाखेडकर यांनी मांडली. त्यास स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी संमती दिली. शहराचा विस्तार आणि अस्तित्वात असलेली मजुरांची तोकडी संख्या लक्षात घेता सफाई कामगारांच्या संख्येत वाढ करण्यात यावी अशी सूचना स. सभासद श्री. अ. रशीद खान (मामू) यांनी मांडली.

**<u>ठराव</u> क्र. २०६ -** सफाई कामगारांच्या वेळेत बदल करण्याची बाब प्रशासकीय असल्यामुळे याबाबत मा. आयुक्त यांनी सर्वकष विचार करावा असे ठरले.

**<u>विषय</u> क्र. २०७ -** महाराष्ट्रातील सर्व मनपामधून शैक्षणिक बाबतीत उर्दू माध्यमाची शाळा व मराठी माध्यमाची शाळा वेगवेगळी आहेत. याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेमधून करण्यात यावे म्हणजे प्रत्येक माध्यमाचे शिक्षक, हेडमास्टर हे वेगवेगळे

राहू शकतील व शिक्षणाचाही दर्जा सुधारेल. याशिवाय शासनाकडून वेगवेगळी ग्रँटस मिळण्यास मदत होईल की ज्यामुळे दोन विभक्त ग्रँटस मिळाल्यास महानगरपालिकेस आर्थिकचा जास्त फायदा होण्यास मदत होईल.

सुचक - अजिज जहागिरदार.
अनुमोदक - मुजीब आलमशा खान.

**<u>ठराव</u> क्र. २०७ -** मा. आयुक्त यांनी प्रस्तावित प्रकारणी योग्य ती चौकशी करून आगामी बैठकीत अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय</u> क्र. २०८ -** महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेमध्ये राष्ट्रगीत "जन गण मन" बरोबरच "वंदे मातरम्" हे गीत सुध्दा म्हटले गेले पाहिजे याबाबत.

सुचक - चंद्रकांत खैरे.
अनुमोदक - प्रदिप जैस्वाल.
दिनांक - १६/०२/१९८९

**<u>ठराव</u> क्र. २०८ -** शिक्षणाधिकारी यांनी या प्रकरणी अन्य महापालिकांकडून माहिती मागवावी. त्यानंतर यावर विचार करण्यात येईल असे ठरले.

**<u>विषय</u> क्र. २०९ -** मंजूर विकास योजना औरंगाबाद मधील उस्मानपुरा गावठाणा जवळील प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी आरक्षित आरक्षण क्र. ९९ (क्षेत्र सुमारे २ एकर ११ गुंठे) त्या जमीनीवर बरीच घरे पूर्वीपासून अस्तित्वात असल्यामुळे सदर जमीन महानगरपालिकास संपादित करून शाळेसाठी विकसित करणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पूर्व बाजूने पीर बाजाराकडे जाणाऱ्या रस्त्यावर उसमानपुरा मस्जीदच्या दक्षिण बाजूस असलेल्या सदर आरक्षणात काही जुनी घरे अस्तित्वात आहेत व त्यातील एका घरास १९६४ किंवा ६५ मध्ये नगरपालिकेने बांधकाम परवानगी सुध्दा दिलेली आहे. कारण त्या वेळेस विकास योजना तयार व्हावयाची होती. उस्मानपुरा गावठाणात असलेल्या अस्तित्वातील प्राथमिक शाळांची संख्या लक्षात घेता तसेच आरक्षणाखालील जमीन मनपास संपादित करणे व शाळेसाठी विकसित करणे जवळपास दुरापास्त आहे ही बाब विचारात घेता सदर आ. क्र. ९९ "प्राथमिक शाळा" व क्रीडांगण मंजूर विकास योजनेतून वगळणे आवश्यक आहे. म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५० खाली आ.क्र. ९९ ची जमीन वगळून निवास क्षेत्रात समाविष्ट करणेसाठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**<u>ठराव</u> क्र. २०९ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूर विकास योजना औरंगाबादमधील उस्मानुपरा गावठाणाजवळील प्राथमिक शाळा व क्रीडांगणासाठी आरक्षित आरक्षण क्र. ९९ (क्षेत्र सुमारे २ एकर ११ गुंठे) या जमीनीवर पूर्वीपासून बरीच घरे अस्तित्वात असून त्यातील एका घरास १९६४ किंवा ६४ मध्ये नगररपालिकेने बांधकाम परवानगी दिलेली आहे. तसेच उस्मानपुरा गावठाणात अस्तित्वात असलेल्या प्राथमिक शाळांची संख्या लक्षात घेता महापालिकेस आ. क्र. ९९ प्राथमिक शाळा आणि क्रीडांगणाची जागा संपादन करून विकसित करणे दुरापास असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या

कलम ५० अन्वये आरक्षण क्र. ९९ प्राथमिक शाळा व क्रीडांगणासाठी विकास योजनेत आरक्षित केलेली जमीन या आरक्षणातून वगळून निवास उपयोगी क्षेत्रात समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१० -** दि. १७ जानेवारी, १९८९ च्या सर्वसाधारण सभा निर्णयानुसार आरक्षण क्र. ८९ च्या उर्वरित खुली जागा संपादनासंबंधी कायम करण्यात आलेल्या उपसमितीने अभ्यास अहवाल सादर केला आहे की, वर्तमान परिसरात बागेसाठी मुबलक जागा असल्याने सि. स. १८०८८, १८०८९ आणि १८०९२ आदींची उर्वरित जागा आरक्षणातून वगळण्यास हरकत नसावी.

मा. आयुक्त, महानगरपालिका यांनी अभिप्राय दिला आह की, महानगरपालिका प्राधिकारणाने साईट क्र. ८९ अंतर्गतच सि. स. न. २०१८३, १८०९० आणि १८०९१ अगोदरच भूखंड संपादित केले आहेत. त्यामुळे सभोवतालच्या परिसरातील भूखंडाचे आरक्षण वगळणे गहन आहे. शिवाय अशा वगळणीस (डिलिट) मान्यता देण्याची शक्यता नाही. विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २१० -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ८९ च्या वर्तमान परिसरात बागेसाठी मुबलक जागा असल्यने या आरक्षणातील सि. टी. एस. नं. १८०८८, १८०८९ आणि १८०९२ आदींची उर्वरित जागा आरक्षण क्र. ८९ मधून वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २११ -** सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १०४/१० दि. १९/११/१९८८ नुसार महानगरपालिकेतील सभासदांना पिंप्री-चिंचवड महानगरपालिकेप्रमाणे मानधन देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

औरंगाबाद महानगरपालिकेने तयार केलेल्या नियमामध्ये मानधन रु. ३५०/- देण्याची तरतूद आहे. तथापी पिंप्री-चिंचवड महानगरपालिकेच्या सदस्यांना दरमहा रु. ४५०/- मानधन देण्यात येते. म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेने बनविलेले महापालिकेचे नियम १९८७ चे पोटकलम २(अ) मध्ये दरमहा रु. ३५०/- चे ऐवजी दरमहा रु. ४५०/- मानधन देण्यात यावे अशी दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक वर्तमानपत्र, मुख्य कार्यालयाच्या व विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर अशा सूचना दिल्या होत्या. या सूचनांवर कोणतीही हरकत अथवा सूचना कार्यालयास प्राप्त झाली नसल्यामुहे उपरोक्त पोटकलम नियम २(अ) मध्ये दरमहा रु. ३५०/- ऐवजी रु. ४५०/- मानधन देण्यात येईल अशी दुरुस्ती करणे योग्य प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. २११ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने तयार केलेल्या महापालिकेचे नियम १९८७ चे पोट कलम २(अ) मध्ये दरमहा रु. ३५०/- ऐवजी रु. ४५० दरमहा मानधन देण्यात येईल अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# पुरवणी विषयपत्रिका

**दिनांक १७/०३/८९**

**विषय क्र. २१२ -** औरंगाबाद शहराला "बी" ग्रेड जाहीर करण्याकरिता ठराव मंजूर करून शासनाला शिफारस करणे.

सुचक - रशीद खान (मामू)
अनुमोदक - अजिजउल्ला बेग
दिनांक - १५/०२/१९८९

सुचक - चंद्रकांत खैरे.
अनुमोदक - मोरेश्वर सावे.
दिनांक - १६/०२/१९८९.

**ठराव क्र. २१२ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात वास्तव्यास असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेता या शहरास "बी" ग्रेड जाहीर करण्याची शिफारस महाराष्ट्र शासनान्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१३ -** महानगरपालिका शाळेतील चार माध्यमिक शाळा (१) प्रा. शाळा, उस्मानपुरा (२) नूतन मा. शाळा (३) मुलींची मा. शाळा, औरंगपुरा (४) मॉडेल मिडल स्कूल राजाबाजार आणि (५) कें. प्रा. शाळा लेबर कॉलनी (६) कें. प्रा. शाळा सिडको एन-७ (७) कें. प्रा. शाळा किराडपुरा उर्दू नं. १ या शाळेत येत्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग उघडण्यात यावा.

सुचक - मोहसीन अहमद खाँ
अनुमोदक - रशीदखान (मामू)
दिनांक - ०९/०३/१९८९.

**संवाद -** महानगरपालिका तर्फे चालविण्यात येणाऱ्या बऱ्याच शाळांमध्ये अशा प्रकारे पाचवी, सहावी ७ वी आणि ८ वी चे वर्ग उघडण्याची आवश्यकता आहे. या बाबीचा विचार करून अशा सर्व शाळांमधून आवश्यकतेनुसार इ. ५ वी, ६ वी, ७वी, ८ वी चे वर्ग उघडण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी सूचना स. सभासद श्रीमती लता दलाल श्री. अब्दुल रशीद खान (मामू) आणि श्री. अजितकुमार शेळके यांनी केली राज्यातील सर्व प्राथमिक शाळांची कक्षा ८ वी पर्यंत वाढविण्याचा विचार शासन करीत असल्याचा खुलासा स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी केला. बन्सीलाल नगर शाळेतील उर्दू वर्ग बंद करण्यात आलेले आहेत. तेंव्हा ते उर्दू वर्ग पूर्ववत चालू करण्यात यावेत अशी मागणी स. सभासद श्री. अजिज जहागिरदार यांनी केली.

**ठराव क्र. २१३ -** महानगरपालिके तर्फे चालणाऱ्या शाळांमध्ये आवश्यकतेनुसार इयत्ता ५वी, ६वी, ७वी, ८वी चे वर्ग उघड्या बाबतचा सविस्तर अहवाल शिक्षणाधिकारी यांनी द्यावा. त्यानंतर यावर विचार करण्यात येईल असे ठरले.

**<u>विषय</u> क्र. २१४ -** स्थायी समिती ठराव क्रमांक ७८२/ दि. ०५/०१/१९८९ चे कॅन्टोनमेंट स्थित जि. प. शाळांचे महानगरपालिकेकडे हस्तांतर करणेस्तव मंजुरी दिली आहे. तद्अनुषंगाने हस्तांतर कार्यवाही कार्यान्वित करण्यात यावी.

सुचक - श्री. रतनकुमार पंडागळे.
अनुमोदक - तुळशीराम भगुरे.
दिनांक. - १०/०३/१९८९.

**<u>संवाद</u> -** कॅन्टोनमेंट भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा महापालिकेकडे हस्तांतर केल्यास या शाळा ताब्यात घेतल्यानंतर नियमाप्रमाणे शासनाने अनुदान दिले नाही तर महापालिकेस अंदाजे १० लाख खर्च येणार आहे. आणि अनुदान दिले तरी सुमारे ५ लाख खर्च येईल. याचा शिक्षणाधिकारी यांनी अभ्यास करावा असे मा. महापौर यांनी सुचविले.

**<u>ठराव</u> क्र. २१४ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कॅन्टोनमेंट अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळा महापालिकेकडे हस्तांतर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी व शासनास आवश्यक ती शिफारस करण्यात यावी.

**<u>विषय</u> क्र. २१५ -**

| सि. सर्वे नंबर | फाईन नंबर | परवाना क्र. |
|---|---|---|
| १७९२७ | ८६८/१७/८५ | ५०४/८७ |
| - | १९२/१७/८७ | ५९०/८७ |
| ४७९४/ए | ३१६/१७/८७ | ७५७/८७ |
| १८७७४/पी | ८७७/१७/८७ | ८२३/८७ |
| १८२६७/६ | ८७७/१७/८७ | ३७/८८ |
| २०१५७/१ | ९८८/१७/८७ | ६८/८८ |
| १८०७ | २०३/१७/८८ | २७४/८८ |
| ६०/६ | ४७६/१७/८७ | ८०९/८८ |

या जागांना बांधकाम परवाना नियमबाह्य देण्यात आला असून त्वरित चौकशी करावी. या प्रकारामुळे महापालिकेचे प्रचंड आर्थिक नुकसान झालेले आहे. तेंव्हा संबंधितावर योग्य ती कार्यवाही व्हावी.

सुचक - सौ. लता दलाल.
अनुमोदक - श्री. मोतीराम घडामोडे.
दिनांक - १४/०३/१९८९.

**<u>संवाद</u> -** या प्रकरणाशी संबंधित सर्व संचिका माझ्याकडे आहेत त्या बाबतची सर्व जबाबदारी प्रशासनाची आहे. तेंव्हा या प्रकरणी चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली जाईल. असा खुलासा मा. आयुक्त यांनी केला.

आजच्या विषयपत्रिकेसाठी दाखल केलेल्या प्रस्तावापैकी काही प्रस्ताव संचिवांनी पुरवणी विषय पत्रिकेतून गाळलेले आहेत असा आरोप सौ. लता दलाल यांनी केला असता प्रस्ताव प्रशासकीय असल्यामुंळे ठेवण्यात आला नाही व त्यात सचिवाची चूक नाही असा खुलासा मा. महापौर यांनी केला. सन्माननीय सभासदाचे मागणीचा विचार करणे आवश्यक असल्याचा खुलासा करून या प्रकरणी ३१ मार्च ८९ पर्यंत माहिती देण्याची मागणी स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे व सौ. लता दलाल यांनी केली. प्रस्तावात सिटी सर्व्हे नंबर, फाईल नंबर आणि परवाना नंबर या बाबींचा उल्लेख असल्यामुळे ही प्रकरणे नेमकी कोणत्या मोहल्यातील आहेत याचा खुलासा होत नसल्यामुळे त्या प्रत्येका समोर मोहलयाचा उल्लेख करण्यात यावा अशी सूचना स. सभासद श्री. अ. रशीद (मामू) व श्री. अजिजउल्ला बेग यंनी केली.

सदर प्रकरणी माहे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात माहिती देण्यात येईल असे मा. महापौर यांनी सुचविले.

**<u>ठराव</u> क्र. २१५ -** प्रस्तावात दर्शविलेले प्रकरणी मा. आयुक्त यांनी चौकशी करून सविस्तर माहिती पुढील सभेत द्यावी असे ठरले.

**<u>विषय</u> क्र. २१६ -** औरंगाबाद मंजूर विकास योजने अंतर्गत आरक्षण क्र. १० अ/१०/१३, अ/१३ ब, १३ क, १४, १४-अ, १४-ब, इत्यादी आरक्षणातून वगळून निवास क्षेत्रात सामील करणे बाबत.

वरील आरक्षित जागेमध्ये धनमंडी बाग, जुना बाजार, नारळीबाग इत्यादी परिसर समाविष्ट आहे. ह्या आरक्षणामधील जागेचा सि. स. नं. ३३९७, २९४० ते २९६१, २९२६ असा आहे व शिट नं. ४१, ४१ व ५७ आहेत. येथील पुष्कळ घरे, १५/२० वर्षापूर्वीचे बांधलेली आहेत.

महानगरपालिकेने येथे पाणीपुरवठा, विद्युत, गटार इत्यादी नागरी सुखसोयी पुरविल्या असून येथील रहिवासी वरील सुखसोयींचा उपभोग घेत आहेत. येथील बहुसंख्य लाक गरीब असून मोलमजुरी करतात. ह्या परिसरातील नागरीकांची घरे पाडण्यात आली तर ते बेघर होतील.

सदरील भागात महानगरपालिकेतर्फे मालमत्ता कर आकारण्यात आलेला असून तेथील मालमत्ताधारक मालमत्ता कर नियमितपणे भरत आहेत. तसेच सदर भागातील नागरिक विकास खर्चही भरण्यास तयार आहेत.

नागरीकांचे नुकसान टाळण्यासाठी वरील जागा आरक्षणामधून वगळणे आवश्यक आहे. करिता वरील ठराव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. जयवंत ओक. |
| अनुमोदक | - | श्री. चंद्रकांत खैरे. |
| दिनांक | - | १४/०३/१९८९. |

**<u>ठराव</u> क्र. २१६ -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजने अंतर्गत आरक्षण क्र. १० अ/१०/१३ अ, १३ब, १३क, १४, १४-अ, १४-ब इत्यादी आरक्षित जागेवर पुष्कळ घरे १५/२० वर्षापासून बांधण्यात आली असून महानगरपालिकेने या ठिकाणी पाणीपुरवठा विद्युत, गटार, इत्यादी नागरी सुखसोई पुरविल्या आहेत. तसेच या भागातील मालमत्ता कर नियमित भरत असून विकास खर्चही भरण्यास तयार असल्यामुळे औरंगाबाद

मंजूर विकास योजने अंतर्गत वरील आरक्षणात बाधित होणारी जागा आरक्षणामधून वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१७ -** महानगरपालिका हद्दितील विटभट्ट्यामुळे शहरातील प्रदूषण वाढले. त्या मुळे नागरिकांना होणारा त्रास व ऐतिहासिक स्थळा जवळील विट भट्ट्यामुळे ऐतिहासिक स्थळे काळी पडत आहेत.

सुचक - नारायण फत्तेलष्कर.
अनुमोदक - प्रभाकर विधाते.
दिनांक - १४/०३/१९८९

**ठराव क्र. २१७ -** सदरील प्रकरण तहसील कार्यालयाचे कक्षेतील आहे. तेंव्हा या प्रकरणी तहसील कार्यालयामार्फत कार्यवाही व्हावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २१८ -** गुलमंडी ते औरंपुरा मार्गे मिलकॉर्नर पर्यंत व जामा मस्जिद ते टाऊन हॉल भडकल गेट मार्गे बस स्टँड रोडवर सोडीयम व्हेपर (मर्क्युरी लँप) बसविणे.

कारण हे रस्ते महत्वाचे व जास्त रहदारीचे आहेत तसचे सुदंर रोड दिसण्यासाठी व जास्त प्रकाश देण्यासाठी हे सोडीयम लँप कामी येतील. शहराच्या मध्यवस्तीत हे रस्ते येतात.

सुचक - जयवंत ओक.
अनुमोदक - प्रदिप जैस्वाल.
दिनांक - १४/०३/१९८९.

**ठराव क्र. २१८ -** सदरील प्रकरण स्थायी समितीचे अखत्यारीत येत असल्यामुळे स्थायी समिती मध्ये या बाबत निर्णय व्हावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २१९ -** वॉर्ड क्र. २० मधील भडकलगेट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याभोवती रंगीत लाईट व विद्युत रोषणाई करून कारंजे सुरू करणे बाबत.

वरील पुतळा शहराच्या मध्य भागात व भडकलगेट समोर असून राज्यमार्गावर स्थित आहे. औरंगाबादा शहराचे सुधारणेत हा परिसर अत्यंत महत्वाचा आहे.

सुचक - श्री. जयवंत ओक.
अनुमोदक - श्री. प्रदिप जैस्वाल.
दिनांक - १४०३/१९८९.

**ठराव क्र. २१९ -** सदरील प्रकरण स्थायी समितीचे अखत्यारित येत असल्यामुळे स्थायी समिती मध्ये या बाबत निर्णय व्हावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २२० -** औरंगाबाद महानगरपालिकेने दि. ३१ मार्च १९८९ नंतर विकास निधी वाढविण्याचे ठरविले आहे.

अद्याप ओरंगाबाद शहरातील बहुसख्य मालमत्ता धरकांनी विकास निधी भरलेला नाही. शहरात बहुसंख्य गरीब लोक झोपडपट्ट्या तसेच दलित वस्त्यांमध्ये वास्तव्य करून राहतात. त्यांना नविन दराने आकारलेला विकास निधी भरणे कठीण जाणार आहे.

तरी विनंती की, शहरातील गरीब नागरीकांचा विचार करून विकास निधी जुन्या दराने स्विकारणेची मुदत ३१ डिसेंबर ८९ पर्यंत वाढविण्यात यावी.

सुचक - श्री. चंद्रकांत खैरे, मनमोहनसिंग ओबेराय
अनुमोदक - श्री. गिरजाराम हाळनोर, मोतीराम घडामोडे
सुचक - मुजीब खान
अनुमोदक - स. हुसेन.
दिनांक - १५/०३/८९.

**ठराव क्र. २२० -** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील बहुसंख्य मालमत्ता धारकांकडून जुन्या दरात विकास निधी स्विकारण्याची मुदत १ मे, १९८९ वाढवून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## प्रश्नोत्तरे

**स. सभासद, संचेती** : मागील सभेमध्ये मी विचारलेल्या प्रश्नांचा अद्यापही खुलासा झालेला नाही तेंव्हा सभासदांना विचारलेल्या प्रश्नाबाबत काय पध्दती आहेत याचा खुलासा करावा आणि माझ्या प्रश्नांची उत्तरे मला केंव्हा मिळतील.

**आरोग्य वैधकीय अधिकारी** : स. सभासदांनी विचारलेली माहिती मा. आयुक्त व सचिव यांचे कार्यालयात माहितीसाठी दिलेली आहे व त्याप्रमाणे संबंधीत सदस्यास कळविण्यात आले आहे.

**स. सभासद, संचेती** : सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची ही पध्दत योग्य नसून सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची संपूर्ण लेखी माहिती मिळणे आवश्यक आहे. यासाठी सभासदांनी वाट पाहण्याची सुध्दा काही हद्द असते. तेंव्हा मी विचारलेल्या प्रश्नांची माहिती मला किती दिवसात मिळेल याचा खुलासा आजच करण्यात यावा.

**आरोग्य वैधकीय अधिकारी** : येत्या आठ दिवसांमध्ये स. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची लेखी माहिती पुरविण्यात येईल.

**स. सभासद, श्री. गाढे** : शहराच्या दैनिक वृत्तपत्रामध्ये आरोग्य विभागातील

वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीमती बाऱ्हाळे यांनी राजीनामा दिल्याचे वृत्त आहे. यामुळे महापालिके विषयी नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण होत असून प्रशासनाचे दृष्टीने ही बाब योग्य नाही. तेंव्हा या प्रकरणी आरोग्य वैद्यकीय अधिकारी ह्यांची चौकशी झाली पाहिजे.

**मा. आयुक्त** : या प्रकरणी उप आयुक्त यांनी संपूर्ण चौकशी करून अहवाल दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राजीनामा देण्यापूर्वी डॉ. श्रीमती बाऱ्हाळे यांनी भेट घेतली होती. प्रशासन प्रस्तुतचे प्रकरणी योग्य ती चौकशी करीत आहे.

**स. सभासद, श्री गाढे** : डॉ. श्रीमती बाऱ्हाळे यांनी राजीनामा दिला म्हणजे काही तरी गंभीर घटना घडली असावी अस वाटते. तेंव्हा या गंभीर प्रकरणी मा. आयुक्त यांनी स्वतः लक्ष घालावे.

**मा. महापौर** : या प्रकरणी मा. आयुक्त स्वतः लक्ष घालतील.

**स. सदस्या सौ. लता दलाल** : एक महिन्यापूर्वी अशाच प्रकारचे एक प्रकरण झाल्याचे वृत्त शहराच्या एका साप्ताहीकात प्रसिध्द झालेले आहे. या अशा प्रकारामुळे महापालिकेची बदनामी होत आहे. तेंव्हा या प्रकरणी चौकशी करण्यात यावी.

**मा. महापौर** : या प्रकरणी चौकशी करून अहवाल देण्यात येईल. असे मा. महापौर यांनी सांगितले.

या नंतर जन गण मन हे राष्ट्रगीत झाल्यानंतर सर्वसाधारण सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

***दिनांक १८/०५/१९८९ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या नगरभूवनमध्ये सर्वधारण सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.***

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंत | महापौर |
| २) | मा. श्री. तकी हसन खान कासिम खाँ | उपमहापौर |
| ३) | मा. श्री. यादव अशोक सायन्ना | सदस्य |
| ४) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मण | --//-- |
| ५) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ६) | मा. श्री. अजीजउल्ला बेग वाहेद बेग | --//-- |
| ७) | मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | --//-- |
| ८) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | --//-- |
| ९) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | --//-- |
| १०) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | --//-- |
| ११) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १२) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १३) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायण | --//-- |
| १४) | मा. श्री. म. अयुब गुलाम जिलानी | --//-- |
| १५) | मा. श्री. मुजीब आलमशा खान | --//-- |
| १६) | मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव | --//-- |
| १७) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | --//-- |
| १८) | मा. श्री. जावेद हसन खाँ कासीम खान | --//-- |
| १९) | मा. श्री. स. अ. एकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| २०) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | --//-- |
| २१) | मा. श्री. ओक जयवंत केशव | --//-- |
| २२) | मा. श्री. गिल एकबालसिंग प्रितमसिंग | --//-- |
| २३) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | --//-- |
| २४) | मा. श्री. अ. रशीदखाँ अ. हमीद खान | --//-- |
| २५) | श्रीमती दलाल लता श्रिनिवास | --//-- |
| २६) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | --//-- |
| २७) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| २८) | मा. श्री. हाजी मोहंमद हफिजोद्दिन | --//-- |
| २९) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | --//-- |
| ३०) | मा. श्री. पालीवाल विजय मोविंदलाल | --//-- |
| ३१) | मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | --//-- |
| ३२) | मा. श्री. संचेती चेनकरण गणेशलाल | --//-- |
| ३३) | मा. श्री. म. इस्माईल अ. करीम | --//-- |
| ३४) | मा. श्री. फैय्याजखान अहमदखान | --//-- |
| ३५) | मा. श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग | --//-- |
| ३६) | मा. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३७) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | --//-- |
| ३८) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | --//-- |
| ३९) | मा. श्री. मानकापे नामदेव शामराव | --//-- |
| ४०) | मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी | --//-- |
| ४१) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलॉन | --//-- |
| ४२) | मा. श्री. अलफखाँ हुसेन खाँ | --//-- |
| ४३) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | --//-- |
| ४४) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | --//-- |
| ४५) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | --//-- |
| ४६) | मा. श्री. अजिमखाँ दादामिया अ. रहेमान | --//-- |
| ४७) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ | --//-- |
| ४८) | मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | --//-- |
| ४९) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. | --//-- |
| ५०) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ५१) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ५२) | मा. श्री. गोडसे आनंद जगदिश | --//-- |
| ५३) | मा. श्री. जहागिरदार अजीज मुख्तार अहमद | --//-- |
| ५४) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | --//-- |
| ५५) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | --//-- |
| ५६) | मा. श्री. गाढे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५७) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५८) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ५९) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल | --//-- |
| ६०) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

प्रथमतः महापौर यांनी सभेच्या कामकाजाची सुरुवात करण्यापूर्वी महापौर व उप महापौर पदासाठी अर्ज भरलेल्या उमेदवारांना उमेदवारी परत घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत असल्याचे सांगितले सदर १५ मिनिटांच्या अवधीत खालील सदस्यांनी उमेदवारी अर्ज परत घेतल्याचे सचिव यांनी सांगितले.

## *महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज मागे घेतलेले उमेदवार*

**१) श्री. जहागिरदार अजिज मुख्तार अहेमद.**
**२) श्री. डॉ. काळे शांताराम यशवंत.**
**३) श्री. रतनकुमार नारायणराव पंडागळे.**
**४) श्री. यादव अशोक सायन्ना.**
**५) श्री. खैरे चंद्राकांत भाऊराव.**
**६) श्री. अलफ खॉ हुसेन खॉ.**
**७) श्री. मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय**
**८) श्री. भगुरे तुळशीराम छगन.**
**९) श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव.**
**१०) श्री. डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल.**

११) **श्री. हुसेन स. अहमद.**
१२) **श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव.**

## *उप महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज मागे घेतलेले उमेदवार*

१) **श्री. किशोर गोविंदराव थोरात.**
२) **श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण.**
३) **श्री. अजिजउल्ला बेग वाहेद बेग.**
४) **श्री. मुजीब आलमशा खान.**
५) **श्री. तकी हसन खान कासीम खान.**
६) **श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग.**
७) **श्री. पिटर प्रभाकर वंजारे.**
८) **श्री. म. अय्युब गुलाम जिलानी.**

उमेदवारी मागे घेणे व मलपत्रिका तार करणे ठिक दुपारी १२.०५ वा. संपले. यानंतर महापौर यांनी महपौर पदांसाठी श्री. नरेंद्र पाटील व श्री. मोरेश्वर सावे हे तर उप महापौर पदांसाठी श्री. मनमोहनसिंग ओबेराय व श्री. महादेव सुर्यवंशी हे निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले.

नंतर निवडणूकीच्या कामकाजास ठिक १२.१० वाजता सुरुवात झाली. सर्व सदस्यांनी मतदान केल्यावर व निवडणूकीची प्रक्रिया चालू असतांना महापौर श्री. काळे यांचे हक्काचे मतावरून व श्री. रिडलान यांनी मतपत्रिका सभागृहात दाखविल्यावरून वाद होवून त्यावर बरीच चर्चा झाली.

चर्चेच्या अंती महापौर पदांच्या दोन्ही उमेदवारासह सभागृहाच्या ५८ सदस्यांनी मा. महापौर यांचे नांवे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचिचे प्रकरण २ मधील उपकलम १ (म) अन्वये आजची बैठक पुढे ढकलून ती दिनांक ३१/०५/१९८९ रोजी सकाळी ११.०० वा ठेवण्यात यावी व आजच्या सभेतील झालेले कामकाज रद्द करून दि. ३१/०५/१९८९ रोजी होणाऱ्या बैठकीमध्ये महापौर व उपमहापौर यांच्या निवडणूकीसाठी परत मतदान घेण्यात यावे असा स्वरुपाचा लेखी प्रस्ताव सादर केला. हा प्रस्ताव महापौरांनी सभागृहात वाचून दाखविला आणि याला सभागृहात सर्व सदस्यांनी संमती दर्शविली. या प्रस्तावाच्या अनुषंगाने आजच्या सभेतील कामकाज रद्दबादल करून आजची मिटींग पुढे ढकलून दि. ३१, मे, १९८९ रोजी सकाळी ११.०० वा. घेण्याचे व तीत महापौर व उप महापौर पदांसाठी फेरमतदन घेण्याचे सर्वानुमते ठरले. आणि असा ठराव मंजूर करण्यात आला. मंजूर झालेला प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

**ठराव क्र. २२१ -** दिनांक १८/०५/१९८९

मा. महापौर साहेब,
(पीठासिन अधिकारी),
महानगरपालिका, औरंगाबाद .

महोदय,

आज दिनांक १८/०५/१९८९ रोजी बोलावलेली महापौर व उपमहापौर पदाची निवडीबाबत जी प्रक्रिया झालेली आहे ती रद्दबादल ठरवून मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे अनुसूचीचे प्रकरण २ मधील उपकलम १ (म) अन्वये आजची मिटींग पुढे ढकलून ती दिनांक ३१/०५/१९८९ ला ११.०० वाजता ठेवण्यात यावी व फेरमतदान घेण्यात यावे.

वरील प्रस्तावास सभागृहातील हजर असलेले निम्म्या सदस्यांपेक्षा जास्त सदस्यांनी पाठींबा दिलेला आहे.

तरी आजच्या बैठकीमधील जो इतिवृत्तांत घेतलेला आहे तो रद्दबादल करून पुढील बैठक सभागृहाच्या सर्व संमतीने दि. ३१/०५/१९८९ रोजी ठेवण्यात यावी व फेर मतदान घेण्यात यावे.

श्री. मोरेश्वर सावे (स्वाक्षरी)
श्री. नरेंद्र पाटील (स्वाक्षरी)
व इतर ५६ नगरसेवक (स्वाक्षरीत)

सभागृह नेते श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, विरोधी पक्ष नेते श्री. चंद्रकांत खैरे व उप महापौर श्री तकी खान यांनी सदर प्रस्तावास पाटींबा दर्शविणारी मते व्यक्त केली, त्यानंतर मा. महापौर यांनी सभागृहातील सर्व सदस्यांना संमतीने आजच्या सभेतील कामकाज रद्दबादल केल्याचे व ती दिनांक ३१/०५/१९८९ रोजी सकाळी ११.०० वाजता महापौर व उप महापौर यांच्या फेर मतदानासाठी घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

राष्ट्रगीतानंतर सभेची सांगता झाली.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|
| सचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

### *दिनांक २३/०३/१९८९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत*

गुरुवार दिनांक २३/०३/१९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता नगरभूवन (टाऊनहॉल) येथे मा. महापौर डॉ. शांताराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्नलिखील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

सन्माननीय सभासदांची उपस्थिती हजेरी रजिष्टरप्रमाणे.

**विषय** - स्थायी समिती ठराव क्र. ९३२ दि. २३, फेब्रुवारी, १९८९ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या इ. स. १९८८-८९ चे सुधारित व १९८९-९० चे मुळ अंदाजपत्रकास मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. विचारार्थ सादर.

**संवाद** - मुळ अंदाजपत्रक व सुधारित अंदाजपत्रक स्थायी समितीचे सभापती श्री. रतनकुमार पंडागळे ह्यांनी मा. महापौर ह्यांना सादर केले. मा. महापौर त्यांनी अंदाजपत्रकाची रुपरेषा समजावून सांगितल्यानंतर सभागृहात अंदाजपत्रकावर चर्चा सुरू झाली

मालमत्ता कर, पाणी पुरवठा कर इत्यादी बाबत अंदाजपत्रकामध्ये सन १९८८-८९ सालात ३३% वसुली झाल्याचा खुलासा आहे. तेंव्हा या वसुलीमध्ये वाढ होण्याच्या दृष्‌ष्टीने कार्यालयाने काही पर्यायी योजना केली आहे काय? याचा खुलासा व्हावा. सुपर मार्केटसाठी ९ लाखाच्या केलेल्या तरतुदीमधून कोणकोणती कामे हाती घेण्यात येणार आहेत? तसेच सिल्लेखाना, एकनाथ रंगमंदिर, स्विमींग पुल, शॉपिंग कॉम्प्लेक्स, आयुक्त निवास या बांधकामाविषयी माहिती मागविण्यात आली असता फक्त शॉपिंग कॉम्प्लेक्स व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामकाबाब कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. असा खुलासा स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी केला मा. आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती माहिती पुरविण्याचे सुचविले.

सन १९८९-९० च्या अंदाजपत्रकामध्ये पाणी पुरवठा / जलनिसःरण, रस्ते, इमारत बांधणी भूमी संपादन, शहर सौंदर्य, क्रीडांगण इ. बाबत केलेली तरतूद पुरेल काय? या आर्थिक वर्षात जालना रोड महापालिकेकडे हस्तांतर होईल ही संभाव्य बाबही लक्षात घेण्यासारखी आहे. या अंदाजपत्रकामध्ये स्मशानीभूमीसाठी कोणत्याही पुकारची तरतूद दिसून येत नाही. शहराच्या दृष्टीने स्मशानभूमी परिपूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच या अंदाजपत्रकात महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहाची सोय करता येईल याची रततूद करावी या बाबींचाही विचार करण्यात यावा. पोहण्याच्या तलावावर एकूण ७० लाख रुपयांचा खर्च झालेला आहे. तेंव्हा हा पोहण्याचा तलाव जनतेसाठी केंव्हा खुला होईल आणि या बांधकामाबाबत केलेल्या चौकशीची मागणी केली होती त्याची माहिती केंव्हा मिळेल याचा खुलासा करण्यात यावा अशी सूचना स. सदस्या सौ. लता दलाल यांनी केली.

सन- १९८९-९० च्या अंदाजपत्रकात एकत्रित मालमत्ता कर अडीच कोटी वरून पाच कोटीपर्यंत वाढविण्यात आल्याचे दर्शविले आहे. सर्वसाधारण सभेने मालमत्ता कराच्या वाढीत बदल न करण्याचा ठराव घेतलेला आहे. याचा या ठिकाणी विचार केला असता वाढीव रक्कम कशी? तसेच निवडणूक जाहिरात, पाणीपट्टी इत्यादी बाबत

केलेली तरतूद कमी वाटते. करमणूक कराच्या वसुलीमध्ये चालू वर्षी सहा लाखाची वाढ दर्शविण्यात आलेली आहे. तेंव्हा करमणूक कराच्या दरात वाढ करण्याचा महापालिकेचा विचार आहे काय? या बाबीचा खुलासा होणे आवश्यक आहे. या शिवाय पोटविभाग "क" जमीनभाडे, कत्तलखाना, हाड व कातडी विक्री, विकास निधी इत्यादी बाबतीत पूर्वीपेक्षा दाखवण्यात आली आहे. असे श्री. बेग ह्यांनी विचारले व खुलासा मागितला. पोटविभाग "ड" रस्ते बांधणी व दुरुस्ती, अग्निशामक अनुदान, मलेरिया अनुदान, गलिच्छ वस्ती सुधारणा अनुदान, शहरी आरोग्य योजना अनुदान इत्यादइबाबत अनुक्रमे कमी / जास्त तरतूद करण्यात आली आहे. पोटविभाग "इ" मध्ये रस्ते दुरुस्ती चार्जेस, घराचे डिझाईन पास करणे या कामासाठी ८५-८६ पेक्षा कमी रकमेची तरतूद करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागात कार्यालयीन दिवाबत्तीसाठी ८८-८९ चे मूळ अंदाजपत्रकात २५ हजाराऐवजी १२५ हजारांची तरतूद केलेली आहे आणि ८९-९० करिता ५० हजारांची तरतूद दाखविली आहे. तेंव्हा ही तफावत कशी? या सर्व बाबींचा खुलासा करण्यात यावा. तसेच पोटविभाग "क" मध्ये नागरीकांचे सेप्टीक संडास साफ करणेसाठी कार्यालय उपयोगात आणित असलेल्या मशीन पासून मिळणारे उत्पन्न दर्शविलेले नाही. तेंव्हा या बाबींचा खुलासा व्हावा यशिवाय सफाई, प्राथमिक शिक्षक, यांची गरजेनुसार भरती केली तर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च ४५% पर्यंत होईल. तेंव्हा सध्या अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये जास्तीत जास्त कार्यक्षमता कशी आणता येईल या बाबीचा विचार होणे आवश्यक आहे. असे विचार स. सभासद श्री. नरेंद्र पाटील यांनी मांडले.

स. सभासद श्री. अलफखाँ हुसेन खाँ यानी (लेखी पत्र दि. २२/०३/८९) सन १९८८-८९ चे सुधारित आणि ८९-९० चे मूळ अंदाजपत्रकाबाबत खालील प्रमाणे लेखी विचार मांडले.

सन १९८९-९० च्या अंदाजपत्रकातील तरतूदीमध्ये खालील दर्शविलेल्या ॲटमकरिता वाढीव तरतूद असणे आवश्यक वाटते.

(आकडे हजारात)

| शिर्षक | १९८९-९० ची मूळ तरतूद | अपेक्षेप्रमाणे वाढीव तरतूद | एकूण |
|---|---|---|---|
| जाहिरात कर | ५० | ५० | १०० |
| भेसळ प्रतिबंधक परवाना | २० | ८० | १०० |
| खाजगी सेप्टीक टँक साफ करणे का किराया | - | २० | २० |
| स्कूल के खाजगी मकानात के किराये की बचतसे | ९०० | | |

तसेच सन १९८९-९० च्या अंदाजपत्रकाबाबत शाळा इमारत भाड्यासाठी दाखविण्यात आलेली ९ लाखाची तरतूद जास्त वाटत असल्यामुळे ही तरतूद ९ लाखावरून दीड लाख रुपये करण्यात यावी आणि नगरसेवकांसाठी असलेला रुपये २५ हजाराचा स्वेच्छा निधी रुपये ४० हजार करण्यात यावा. या शिवाय सन १९८३ ते ८७ पर्यंत महापालिकेने विकास योजने अंतर्गत ज्या जमीनी संपादन केलेल्या आहेत त्यावर अंदाजे २ कोटी रुपये खर्च झाला असावा. या रकमेवर शासनाचे जी. आर. प्रमाणे मिळणारे ४० लाख रुपयांचे अनुदानबाबत शासनाशी पत्रव्यवहार करून विशेष बाब या सदराखाली प्राप्त

करण्यात असे सुचविण्यात आले. सहायक संचालक नगररचना ह्यांनी ह्या बाबत त्वरित कार्यवाही करणेची आवश्यकता मा. आयुक्तांनी सुचविले.

अनुसूचित जाती व जमातीसाठी सन १९८९-९० च्या अंदाजपत्रकातील जमेच्या पाच टक्केऐवजी १५% रकमेची तरतूद करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. पण त्याचा उल्लेख अंदाजपत्रकात नाही. तेंव्हा आश्वासनाप्रमाणे अंदाजपत्रकात आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी स. सभासद श्री. गंगाधर गाढे यांनी केली. त्याचप्रमाणे सविस्तर व सांगोपांग चर्चा होऊन नियमाप्रमाणे एकूण अपेक्षित उत्पन्नाचे आवश्यक खर्च वगळता १५% खर्च करण्याची सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

या अंदाजपत्रकात लोकशिक्षणाच्या तरतूदीमध्ये तूट असलेल्या २२० शिक्षकांच्या वेतनाचा विचार केलेला दिसत नाही. शिक्षणासारखी अत्यावश्यक बाब लक्षात घेऊन शिक्षकांची तुट भरून काढण्याची मागणी सभासदांतर्फे वेळोवेळी करण्यात आलेली आहे. तेंव्हा अंदाजपत्रकामध्ये या बाबीची तरतूद नसावी ही जाणीवपूर्वक चूक आहे काय? शिक्षकांच्या वेतनासाठी शासनाकडून ५०% अनुदान मिळेल. ही बाब लक्षात घेऊन किंवा भावी काळात या २२० शिक्षकांची भरती करण्यात येईल ही बाब लक्षत घेऊन या अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक आहे. असे विचार स. सभासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी मांडले. जादा शिक्षकांचा शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यास मान्यता मिळाल्यास खर्च करण्यात येईल व सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करण्याचे आश्वासन मा. आयुक्तांनी दिले.

शहरातील गलिच्छ वस्त्या सुधारण्यासाठी अंदाजपत्रकात करण्यात आलेली ७० लाख रुपयांची तरतूद शहरातील वस्त्या विचारात घेता कमी वाटते ७० लाखांऐवजी ९० लाखाची तरतूद करण्याची मागणी स. सभासद श्री. यादव अशोक सायन्ना यांनी केली.

वाचनालयासाठी अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतूदीत उर्दू विभागाची पुस्तके खरेदी करण्यासाठी स्वतंत्र प्रकारे तरतूद करण्याची मागणी स. सभासद श्री. रशीद खान (मामू) यांनी केली.

अंदाजपत्रकातील नवीन इमारती आणि क्रीडा विभागसाठी करण्यात आलेली तरतूद कमी वाटते ती वाढवून देण्यात यावी अशी मागणी स. सभासद श्री. आनंद गोडसे यांनी केली.

कार्यालयीन फर्निचर, झोपडपट्टी सुधारणा, कुटुंब कल्याण, बैठक खर्च इत्यादी बाबत अंदाजपत्रकात तरतूद नाही. तसेच फर्निचर खरेदी बाबतचा खुलासा करण्यात यावा अशी मागणी स. सभासद श्री. चंद्रकांत खैरे यांनी केली. उपलब्ध उत्पन्नाचे मानाने सर्व बाबीचा विचार करून तरतूद करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.

महानगरपालिकेचे २५% अंदाजपत्रक मालमत्ता करावर अवलंबून आहे. शहरातील ६ लाख नागरीकांच्या मालमत्ता कराबाबत महापालिकेने ५३/४५/४०/३५ पैसे यापैकी किती आधारभूत किंमत मालमत्ता करासाठी निश्चित केली आहे याबाबतचे ठोस आश्वासन सभागहाला होणे आवश्यक असल्याचा खुलासा स. सभासद श्री. मोरेश्वर सावे यांनी केला असता मालमत्ता कर आकरणीबाबत एक उपसमिती कायम करण्यात येईल. जेंव्हा अंदाजपत्रकामध्ये सुध्दा मालमत्ता कराची आकारणी कोणत्या दराने करण्यात येणार आहे याचा निश्चित खुलासा होणे आवश्यक असल्याची मागणी स. सभासद श्री. नरेंद्र पाटील यांनी केली. ह्या बाबीत सभागृहास विश्वासात घेऊन व मान्यता घेवूनच कराबाबत कार्यवाही करणेत येईल असे आश्वासन मा. आयुक्तांनी दिले.

या अंदाजपत्रकात निवडणूक विभाग, करमणूक कर, जाहिरात कर, पाणीपट्टी, जलनिस:रण, अग्निशामक दल, जमीनभाडे, कत्तलखाना, हाडे चामडी विक्री, रोडरोलर भाडे, देणग्या, रस्ता दुरुस्ती बांधणे, अल्पबचत गलिच्छ वस्ती चालू खाते दुरुस्त खाते, इंधन, सामान्य प्रशासन, दिवाबत्ती, मालमत्ता खाते, मानधन व भत्ते सानुग्रह अनुदान इत्यादी बाबत सन १९८७-८८ च्या आकडेवारीची तलना सन १९८९-९० च्या आकडे वारीशीा केली असता त्यात तफावत दिसून येते. तेंव्हा ही तफावत कशी याचा खुलासा करण्याची मागणी स. सभासद श्री. अजिजउल्ला बेग यांनी केली. प्रत्येक वर्षी उत्पन्नाचे साधन, त्याबाबत अपेक्षित व आवश्यक खर्च ह्या बाबीचा विचार करूनच अंदाजपत्रक तयार करण्यात येते. तेंव्हा काही बाबतीत तफावत येऊ शकते. तरीही काही तफावती असल्यास वर्षभराचे जमा खर्चाचा आढावा घेवून योग्य ती तरतूद सुधारित अंदाजपत्रकाचे वेळी करण्यात येईल. असा खुलासा मुख्य लेखा परीक्षक यंनी केला.

वरील चर्चेनंतर मा. महापौर यांनी अनुसूचित जाती जमातीसाठी ज्या योजना राबविण्यात येणार आहेत. त्याबाबत अंदाजपत्रकात केलेली तरतूद मुलतः ५% ऐवजी नियमानुसार १५% रकमेइतकी आहे. तेंव्हा स्थायी समितीचे सभापती यांनी दिलेल्या निवेदनात आवश्यक ती दुरुस्ती करण्यात येईल असे सुचविले.

वरील सर्व बाबीचा विचार करून सभागृहाने स्थायी समितीने शिफारस केलेले सन १९८८-८९ चे सुधारित व १९८९-९० चे मूळ अंदाजपत्रक सर्वानुमते मान्य करण्योच ठरले.

**ठराव** - स्थायी समितीने शिफारस केलेले सन १९८८-८९ चे सुधारित व १९८९-९० चे मूळ अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर व आवश्यक तेथे सुधारीत अंदाजपत्रकात वर्षभराच्या जमा व खर्चाचा आढावा घेऊन मा. सभासदांचे सूचनेचा विचार करून सुधारित अंदाजपत्रकात योग्य ती तरतूद / बदल करण्याचे आश्वासन दिल्यामुळे अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यत देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करावी.

स्वाक्षरीत/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक दि. ३१ मे १९८९**

बुधवार दि. ३१ मे, ८९ रोजी स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक "नगरभूवन" (टाऊन हॉल) येथे आयोजित करण्यात आली होती.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३ "ब" अन्वये सभापती पदाची निवडणूक सभा मा. आयुक्त यांनी बोलावली होती. सदरील सभेस खालील अधिकारी तथा निम्ननिर्दिष्ट सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१) गाडे गंगाधर सुखदेव.
२) श्री. अलफखान हुसेनखान.
३) श्री. गील इकबालसिंग प्रितमसिंग.
४) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव.
५) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण.
६) श्री. नवपूते कचरू चंद्रभान.
७) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव.
८) श्री. मगर शंकर जिजाराम.
९) श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग.
१०) श्री. यादव अशोक सायन्ना.
११) श्री. स. अ. इकबालुद्दिन स. मसे. कुतुबुद्दीन
१२) श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ.

सभेच्या सुरुवातीस मा. आयुक्तांनी स्थायी समितीच्या सभापती पदासाठी निवडणूक होत असल्याचे सांगून याबाबतची सविस्तर माहिति सचिव देतील असे सांगितले. महापालिका सचिवांनी स्थायी समिती सभापतींची मुदत संपल्याने आजच्या सभेसाठी १२ स्थायी समिती सदस्यांतून एका सदस्यांची प्रभारी सभापती म्हणून निवड करून त्यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभापतीची निवडणूक घेण्यात येईल.

यावेळी स. सीाासद श्री. मोतीराम घडामोडे यांनी सीाापती पदाच्या निवडणूकीचे अध्यक्षपद स. सदस्य श्री. मोरेश्वर सावे यंना देण्याची विनंती केली. त्यास स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी अनुमोदन दिले. दुसरे स. सदस्य श्री. एकबालासिंग गील यांनी अध्यक्षपदासाठी स. सदस्य श्री. अलफखान यांचे नाव सुचविले. त्यास स. सदस्य श्री. यादव अशोक सायन्ना यांनी अनुमोदन दिले. अध्यक्षपदासाठी दोन नावे जाहीर केल्यानंतर स. सदस्य मोतीराम घडामोडे यांनी अशी विनंती केली की, दोघांच्या नावाच्या चिठ्ठ्या टाकण्यात याव्यात. यावेळी मा. आयुक्त यांनी स्थायी समितीचे कामकाज नियम (ई) अन्वये, दोन पक्षातील सभासदांनी ज्याची अध्यक्ष पदासाठी निवड करावयाची असेल त्यांनी हात वर करावे ज्याच्या बाजूने हात वर केलेल्यांची संख्या जास्त होईल तो सभासद निवडून येईल असे सुचविले. त्याप्रमाणे दोन्ही बाजूने हात वर करून ६ विरुध्द ५ अशी मते पडून श्री. अलफखान यांची बहुमताने आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आल्याचे मा. सचिव यांनी जाहीर केले.

मागील महापौरांची निवडणूक ही निष्पक्षपाती झालेली नाही. स. सदस्य श्री. अलफखान यांची अध्यक्षपदासाठी निवड ठरलेली आहे ते या कामकाजात निष्पक्षपातीपणे काम करणार नसल्याचा आक्षेप स. सदस्य श्री. मोतीराम घडामोडे यांनी केला. यावेळी स. सदस्य श्री. यादव अशोक सायन्ना यांनी हा आरोप चुकीचा आहे. ते पक्षपाती नाहीत त्यांची निवड बहुमताने झालेली असून ते सभा कामकाज व्यवस्थित व निष्पक्षपातीपणे पार पाडतील असे सांगितले. याचवेळी सभेच्या अध्यक्षस्थानी आरुढ झालेले श्री. अलफखान यांनी स. सदस्य श्री. मोतीराम घडामोडे यांना आपल्याला काय आक्षेप घ्यावयाचा आहे तो लेखी स्वरुपात देण्यात यावा. असे सुचविले.

मा. अध्यक्षांनी "ज्या उमेदवारास आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना १० मिनीटांचा अवधी देण्यात येतो" असे सभागृहात सुचविले. मनपा सचिव यांनी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची नावे वाचून दाखविली. ती येणेप्रमाणे.

१) गाडे गंगाधर सुखदेव.
२) श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव.
३) श्री. नवपूते कचरू चंद्रभान.
४) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव.

उक्त एकूण चार उमेदवारांपैकी श्री. कचरू नवपूते यांनी उमेदवारी मागे घेत असल्याचे जाहीर केले. आता केवळ तीनच उमेदवारा सभापतीसाठी उत्सुक असल्याचे सांगून आजच्या सभेच्या कामकाजासाठी मतमोजणी अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग असल्याचे सांगून आता रितसर मतदानास प्रारंभ होत असल्याचे सांगितले. वेळ ५.२०.

**<u>मतदान प्रक्रिया -</u>**

मतदान प्रक्रियेस प्रारंभ होण्यापूर्वी मतदान अधिकारी ह्यांनी मतपेटी उघडून सर्व सदस्यांना मतपेटी सर्वतोपरी रिक्त असलयाचे दाखवून दिले. तद्नंतर मतदान पेटी अध्यक्षांच्या परवानगीने मोहरबंद करित असलयाचे सचिव यांनी सुचविले. सर्व सन्माननीय सभासदांनी मतपत्रिकेवर फुली मारून मतपेटीत मतपत्रिका कशी टाकावी याबाबत सभागृहात सविस्तर खुलासा केला.

स्थायी समितीतील एकूण १२ सन्माननीय सदस्यांची नंवे वाचून दाखविण्यात येत आहेत. त्याप्रमाणे क्रमाक्रमाने येऊन मतदानाचा अधिकार बजवावा असे सचिवांनी सुचविले. (१) स. स. श्री. अलफखन, (२) श्री. गाडे गंगाधर, (३) श्री. गील एकबालसिंग, (४) श्री. घडामोडे मोतीराम, (५) श्री. प्रदिप जैस्वाल, (६) श्री. नवपुते कचरू, (७) श्री. पंडागळे रतनकुमार, (८) श्री. मगर शंकर, (९) श्री. मिर्झा अन्वर बेग, (१०) श्री. यादव अशोक सायन्ना, (११) श्री. सय्यद अहमद एकबालुद्दिन, (१२) श्री. मोरेश्वर सावे, - अशा प्रकारे सर्व सन्माननीय सभासदांनी क्रमाने मतदान पूर्ण केले. शेवटी सभेच्या प्रभारी अध्यक्षस्थानी असलेले स. स. श्री. अलफखन यांनी मतदान संपल्याचे घोषित केले. वेळ ५.३०.

मतदान संपल्यानंतर नियमाप्रमाणे मतमोजणी सुरू करणेसाठी अध्यक्षांनी मोहरबंद असलेली मतपेटी स्वतःकडे घेऊन सभागृहासमोर मतपत्रिका काढून स्वाक्षऱ्याकिंत केल्यानंतर त्या छाननी अधिकाऱ्यांकडे हस्तांतर केल्या. त्यावेळेस स. स. श्री. गंगाधर गाडे यांचे प्रतिनिधी म्हणून स. स. श्री. यादव अशोक सायन्ना तर स. स. श्री. मोतीराम घडामोडे यांचे प्रतिनिधी म्हणून स. स. श्री. प्रदिप जैस्वाल उपस्थित होते. छाननी अधिकाऱ्यांस श्री.

जी. एम. हाश्मी मदत करीत होते. सर्व मतपत्रिका मोजून मतमोजणी छाननी अधिकारी यांनी मतपत्रिका प्रभारी अध्यक्षांकडे सुपूर्द केला.

सभे्चे प्रभारी अध्यक्ष स. स. श्री. अलफखान यांनी सभापती पदासाठी उभे असलेले उमेदवार -

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गंगाधर गाडे | यांना ७ मते. |
| २) | श्री. मोतीराम घडामोडे | यांना ० मते. |
| ३) | श्री. रतनकुमार पंडागळे | यांना ५ मते. |

पडली असल्याचे सभागृहात जाहीर करून स. सभासद श्री. गाडे ह्यांना सर्वाधिक मते मिळाली असल्याने ते स्थायी समिती सभापती पदासाठी निर्वाचित झाल्याचे घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

तपासणी करणाऱ्याचे नांव व सही :-